विषय . निबंध
सं. क्र. २०७२.

भूतांचे ऋणानुबंध

ज. ना. हर्गे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय जीवंधा
सं. क्र. 2064



REFBK-0012326

सार्वजनिक वाचनालय, ठाणे. स्वामी
क्रमांक ७५२९४ वि: निबंध
२०६२ दि: १८।३।७१
ग्रंथालय
ग्र. क्र. 92326

मृताचें ऋणानुबंध

REFBK-0012326

लेखक
ज. ना. ढगे एम्. ए.

रामकृष्ण बुकडेपो. मुंबई ४.

किंमत ४ रुपये

प्रकाशक : वि. र. बाम,
रामकृष्ण बुकडपो. गिरगांव, मुंबई ४

प्रथमावृत्ति १९६२

मुद्रक : ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय, ५५१ बुधवार, पुणें २.

अर्पण —



माझ्या व सौ. च्या जीवनांत जिचीं आठवण पदोपदीं होते व जीं गेलीं असूनहीं अजून आमच्यांत आहे असें वाटतें, त्या सासूबाई कै. सौ. सुशिलाबाई काशिनाथ केदारीं ऊर्फ मम्मींच्या पवित्र स्मृतींस—

चार शब्द

मरणोत्तर स्थितीविषयीं वाचकांना विश्वसनीय ज्ञान प्राप्त करून द्यावें या मुख्य हेतूनें माझे मित्र श्री. ज. ना. ढगे एम्. ए. यांनीं 'मृतांचे ऋणानुबंध' हें पुस्तक लिहिलेलें आहे. त्या पुस्तकाच्या वाचनानें माणसाचें मरणोत्तर जीवन कसें असतें याची चांगली कल्पना वाचकांना येऊं शकेल. मृत्यूनंतर माणसाचा जीवात्मा शाबूत असतो ही गोष्ट जगांतील सर्व धर्मांनीं एकमुखानें सांगितलेली आहे. पण त्या धर्मांनीं पुरेसा शास्त्रीय तपशील दिलेला नाहीं. तो या पुस्तकांत वाचकांस सांपडेल. पुष्कळ लोकांस वाटतें कीं माणसाच्या मृत्यूनें त्याचा सर्व कारभार आटपतो. अशा लोकांना पुरावा मिळणें जरूर असतें. पण मृत्यूनंतर जीव शाबूत असतो या गोष्टीचा भरपूर पुरावा देऊन तो मुद्दा सिद्ध करणें हा या पुस्तकाचा प्रमुख उद्देश नाहीं. ज्यांस पुरावा हवा असेल त्यांनीं चमत्कार संशोधन (Psychical Research) व परलोकविद्या (Spiritualism) या क्षेत्रांत झालेलें संशोधन पहावें. मृत्यूच्या वेळीं सर्व संपत नाहीं, जीवात्मा पूर्ववत् शिल्लक असतो. हें दाखवणारा पुरावा अलीकडे वरील दोन क्षेत्रांत संकलित करण्यांत आला आहे.

या पुस्तकांत अनेक घटना वर्णन करून सांगितल्या आहेत. त्या सर्व खरोखरच घडलेल्या आहेत. पण त्या पुराव्यानिशीं सिद्ध करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत श्री. ढगे यांनीं फारसा केलेला नाहीं. पुष्कळ लोकांना पुराव्याची तादृश आवश्यकता वाटत नाहीं. पण त्यांना मरणोत्तर स्थितीची नीट व व्यवस्थित माहिती हवी असते. अशांच्याकरितां हें

पुस्तक लिहिण्यांत आलेलें आहे. मरणोत्तर स्थितींत नाना प्रकार असतात. त्यापैकीं बरेच प्रकार या पुस्तकांत दिलेले आढळतील.

पिशाच्च–सृष्टीविषयीं जनतेमध्यें भलभलत्या कल्पना रूढ झाल्या आहेत. त्या अंशतः तरी या पुस्तकाच्या वाचनानें दूर होतील व मरणोत्तर स्थितीविषयीं वाचकांस विश्वसनीय माहिती मिळेल अशी आमची आशा आहे. कठोपनिषदांत या विषयाची कांहीं माहिती आहे. पण आजच्या सुशिक्षित माणसास ज्या प्रकारच्या माहितीची जरुरी भासते ती कठोपनिषदांत फारशी दिलेली नाहीं. या पुस्तकांत ती वाचकांस सांपडण्याजोगी आहे. ज्यांस अधिक माहिती पाहिजे असेल त्यांनीं थिऑसफीय वाङ्मय वाचावें.

ज्यांत पिशाच्चांचा संबंध नाहीं अशा गोष्टींतहि आपण पिशाच्चांचा संबंध आणीत असतों. असले कांहीं अनुभव श्री. ढगे यांनीं नमूद केले आहेत. पिशाच्चांचे विविध प्रकार असतात, तेहि या पुस्तकांत दिलेले आढळतील. पिशाच्चें सदा वाईट गोष्टी करतात असा बहुजनांचा समज आहे. हा समज सर्वस्वीं खरा नाहीं; कांहीं पिशाच्चें सदुद्योग करीत असतात हें या पुस्तकांतील गोष्टींवरून दिसून येईल.

कधीं कधीं आपणांस स्वप्नांत इष्ट मित्र भेटतात. मृत माणसांना स्वप्नांत जिवंत माणसांची भेट घेणें सुलभ जातें. कित्येकदां मृत माणसाला एकाद्या गोष्टीची काळजी वाटून तो बेचैन होतो, तेव्हां तो दृश्य स्वरूप घऊन जिवंत माणसांस भेटतो. अशा वेळीं त्या मृत माणसास विवेकीपणानें सहाय्य करून त्याची काळजी दूर करणें हें जिवंत माणसाचें काम असतें. पण प्रायः जिवंत माणूस त्याला भितो व जरूर तें त्याचें काम करीत नाहीं. कधीं कधीं मृत माणूस जिवंत माणसाला अडचणींत सहाय्य करण्याकरितां येतो. त्यालाहि आपण पिशाच्च म्हणतों, पण तो चांगल्या कार्यासाठीं आलेला असतो हें आपण लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

जसे आपल्या पृथ्वीवर आळशी लोक रेंगाळत रहातात तसे मृत्यूनतरहि भूवर्लोकांत कित्येक लोक रेंगाळून आपला काळ फुकट घालवितात. त्यांना प्रायः पृथ्वीवरील जीवनाचें आकर्षण असतें व म्हणून ते स्वतःची प्रगति न करतां परलोकांत रेंगाळत रहातात. बरींच पिशाच्चें

या सदरांत मोडण्यासारखीं असतात. असल्या रेंगाळण्यांत बिलकुल शहाणपणा नसतो.

या पुस्तकांत कांहीं उदाहरणें माणसाच्या अंगांत आल्याचीं आहेत. माणसाला जो जड देह सृष्टीनें दिलेला असतो तो त्याच्या स्वतःच्या उपयोगाकरितां असतो. पण क्वचित् प्रसंगीं एकादा मृत माणूस शिरजोरपणानें दुसऱ्या माणसाच्या दृश्य देहाचा ताबा घेतो व त्याच्या देहांत शिरून त्याच्या तोंडानें बोलूं शकतो. या गोष्टीस अंगांत यणें म्हणतात. ही गोष्ट एकादे वेळीं घडूं शकते. ती खरी असल्याबद्दलचा पुष्कळ पुरावा चमत्कार–संशोधनाच्या (Psychical Research) क्षेत्रांत अलीकडे उपलब्ध झालेला आहे. त्याचीहि उदाहरणें या पुस्तकांत श्री. ढगे यांनीं दिलीं आहेत. अशा रीतीनें जिवंत माणसाचा दृश्य देह बळकावणारीं मृत माणसें बहुधा दुष्ट बुद्धीचीं असतात. तेव्हां असल्या गोष्टीस शहाण्या माणसानें उत्तेजन देतां कामा नये. त्यानें जिवंत माणसाचें फार नुकसान होण्याचा संभव असतो.

परलोकविद्येच्या चळवळींत तिवईवरचे अनेक संदेश उपलब्ध आहेत. या तिवईस इंग्रजींत Planchette म्हणतात. हे संदेश कित्येकदां मृत माणसांकडून येत असतात. मृत माणसें सदा चांगलींच असतील अथवा सदा वाईटच असतील असें निश्चितपणें ठरवितां येणार नाहीं. अर्थात असले संदेश कधीं उपयुक्त होतात व कधीं घातकहि असतात. कधीं ते सत्वदर्शक असतील, तर कधीं खोटेही असूं शकतात. माणसानें नेहमींच हा नीरक्षीर विवेक केला पाहिजे. तो करण्यास शिकवण्यासाठीं या पुस्तकाचा उपयोग होण्याजोगा आहे.

ठाणें ३।९।६२
गणेशचतुर्थी

– राजाराम सखाराम भागवत

अनुक्रम



विषय	पृष्ठांक
१ पिशाच्चसृष्टीसंबंधीं कांहीं सर्वसामान्य माहिती	९
२ पिशाच्चांचा आभास	२२
३ निसर्गांतील ध्वनिमुद्रित व आकाशवाणी	३९
४ अदृश्य मदतगार, योगायोग व चमत्कार	४७
५ अखेरच्या इच्छा	७२
६ अंतकाळीचे व्यवहार	८४
७ मदतीची अपेक्षा करणारे परलोकवासी	९३
८ स्वप्नांत भेटणारीं मृत माणसें	१०९
९ भूलोकावर रेंगाळणारे रहिवासी	१२०
१० पिशाच्च–बाधा	१२७
११ मृत्यूनंतरची धडपड	१४३
१२ मृत्यूनंतरचा दुष्टावा	१५१





१ पिशाच्च–सृष्टीसंबंधीं कांहीं सर्व सामान्य माहिती

मृत्यूनंतरच्या जीवनाच्या प्रांतांतील वस्तुस्थितीविषयीं एकंदर अज्ञान, गैरसमजुती व अनास्था यांचेंच प्राबल्य असल्यामुळें पुष्कळसे लोक आपले खरेखुरे अनुभव प्रसिद्ध करण्यास कचरतात. या प्रांताविषयीं रेव्हरंड सी. डब्ल्यू. लेडबीटर, फ्रेडरिक पायर्स, जी. एन्. एम्. टिरेल इत्यादि पाश्चात्य शास्त्रज्ञानीं जीं व्यवस्थित संशोधनें केलीं व आपले प्रत्यक्ष अनुभव ग्रंथित करून ठेवले त्याबद्दल त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच.

एखाद्या सावलीला किंवा काळोखांतल्या सावलीला माणसें अनेक वेळां निष्कारण घाबरतात ही गोष्ट खरी, परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं जिवंत माणसांना भेदरून सोडणारीं पिशाच्चें अस्तित्वांतच नाहींत. कित्येक चमत्कृतिजनक प्रकारांमुळें त्या प्रकारांचे निसर्ग नियम माहीत नसल्यामुळें माणसें घाबरून जाऊन फसतात.

ज्यांचा पार्थिव देह नष्ट झाला आहे, असे परलोकवासी ज्यावेळीं जिवंत माणसांना दिसतात त्यावेळीं ते निसर्गांत असलेलें कुठलें तरी जड द्रव्य आपल्या विरल देहाभोंवतीं लपेटत असतात. जवळपासच्या जिवंत

माणसाच्या शरिरांतील एक्टोप्लॅझम (Ectoplasm) नांवाचें द्रव्य खेंचून घेऊन व तें आपल्या अंगाभोंवतीं लपेटून जिवंत माणसांशीं किंचित्काल संबंध आणण्याची कला काहीं मृत माणसांना साधलेली असते. मृतांनी धारण केलेली ही पार्थिवता (Materialisation) कधीं पूर्ण तर कधीं अर्धवट असते. पार्थिवता अर्धवट असली म्हणजे नुसता हात, नुसतें शिर किंवा देहाचा विशिष्ट भाग तेवढा दिसतो व तें तसें दृश्य भयानक असतें.

सुप्रसिद्ध जर्मन शास्त्रज्ञ Shrank Notzing यांच्या The Phenomence of Materialisation या शास्त्रीय ग्रंथांत एक्टोप्लॅझम-संबंधीं विस्तृत माहिती दिली आहे. आपल्या विरल देहावर एक्टोप्लॅझम द्रव्य थापटून दृश्य होणाऱ्या कित्येक परलोकवासियांचीं प्रत्यक्ष घेतलेली छायाचित्रें या पुस्तकांत दिलेलीं आहेत.

मृत माणसाचा देह ईथर (Ether) नांवाच्या द्रव्याच्या सूक्ष्म परमाणूंचा बनला असल्याकारणानें कोणतीही जड वस्तू त्याच्या देहावर आघात करूं शकत नाहीं. ती वस्तू त्याच्या देहांतून आरपार जाते. यासंबंधीं प्रत्यक्ष घडलेली एक हकीकत अशी--

कारवार जिल्ह्यांतील दांडेलीच्या जंगलांत एक पडकें घर होतें. सूर्यास्त झाल्यानंतर कुणीही जंगली माणूस देखील त्या घराच्या आसपास फिरकण्यास डरत असे. एलाप्पा नांवाच्या कुणा एका तरुण माणसाची एकदां तिथें जंगलचा अधिकारी (Forest Officer) म्हणून नेमणूक झाली. एलाप्पाचा भूतपिशाच्यांवर बिलकूल विश्वास नव्हता. त्यानें त्या पडक्या घराच्या ओटीवर रात्रीं झोपून दाखवून पिशाच्च वगैरे सर्व कांहीं थोतांड आहे हें सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केला. 'विषाची परीक्षा पाहूं नका' म्हणून त्या जंगलांतल्या कित्येक अनुभवी माणसांनीं एलाप्पाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यानें आपला आग्रह सोडला नाहीं. मग एके दिवशीं संध्याकाळीं एलाप्पासाठीं एक खाट त्या पडक्या घराच्या ओटीवर ठेवण्यांत आली. एलाप्पाच्या नोकरानें डबाभर जेवण व दोन बाटल्या पाणी तिथें नेवून ठेवलें. काळोख पडतांच तो नोकर तिथून पळाला. एलाप्पा एकटाच तिथें राहिला. आत्मसंरक्षणासाठीं त्यानें

जवळ भरलेलें पिस्तूल व कांहीं गोळ्या ठेवल्या होत्या. चांगला काळोख पडल्यानंतर फाणसांच्या उजेडांत एलाप्पानें आपले जेवण उरकलें. बाटलीभर पाणी पिऊन शतपावली केली. कंदिलाची वात बारीक करून खाटेवर अंग टाकिलें. प्रथम कांहीं काळ त्याचा डोळा लागेना; आणि जेव्हां कुठें जरासा डोळा लागला तेव्हां त्याला जवळ कुणीतरी आलेसें वाटलें. एलाप्पानें डोळे उघडून पाहिलें तेव्हां त्याला शुभ्र वस्त्र परिधान केलेली व डोक्यावरून पदर घेतलेली एक स्त्री दिसली. त्या स्त्रीच्या एका हातांत जळती पणती होती. पोटापर्यंत तिचा देह दृश्य होता. खालचा भाग जवळ जवळ अदृश्य होता. सर्व धैर्य एकवटून एलाप्पानें तिच्यावर गोळी झाडली. ताबडतोब ती अदृश्य झाली. परंतु गोळीचा धूर नाहींसा होतांच हातांत पणती घेतलेली ती बाई किंचित् मान हलवून मला मारूं नका असें सुचवूं लागली. परंतु पिशाच्च-सृष्टीसंबंधीं कांहींच माहिती नसलेल्या एलाप्पानें तिच्यावर दुसरी गोळी झाडली. त्यानें गोळी झाडली कीं ती अदृश्य व्हावी आणि धूर नाहींसा झाल्याबरोबर पुन्हा तिची प्रतिमा दिसावी, असा प्रकार घडत होता. एलाप्पानें तिच्यावर एकूण बावीस गोळ्या झाडल्या. अखेर आपल्याजवळची सर्व सामुग्री संपली आणि पिशाच्च तर जसें आहे तसें आहे हें समजून कतांच एलाप्पा बेशुद्ध पडला. सकाळीं मंडळी त्याला पहावयास गेली तेव्हां खाटच्या बाजूला जमिनीवर तो अस्ताव्यस्त पडला होता व त्याच्या तोंडाला फेस आला होता.

एलाप्पानें आपल्या आयुष्यांतील एक असामान्य संधि फुकट घालविली होती. सावधगिरीनें त्यानें त्या पिशाच्चाची हालचाल अवलोकिली असती तर त्या पिशाच्चानें त्याला कांहींतरी सांगितलें असतें. एलाप्पाला जीवनांत नवा अनुभव मिळाला असता. तिचा देह हा जड नसल्यामुळें त्याच्या पिस्तुलांतील गोळ्या त्या देहांतून तिला इजा न करतां आरपार गेल्या. तिनें अर्धवट किंवा जरुरीपुरतें जडत्व धारण केलें असल्यामुळें एलाप्पाला तिचा पोटापर्यंतचाच भाग तेवढा दिसूं शकला.

० ० ०

जिवंतपणीं कांहीं माणसांना दुसऱ्यांची चेष्टा करण्याची, दुसऱ्यांना भिवविण्याची किंवा निष्कारण त्रास देण्याची आदत पडलेली असते. तीं चेष्टेखोर व उपद्रवी माणसें मेल्यावर त्यांचा स्वभाव कायम असतो आणि भूवर्लोकांतहि आपल्यासारखींच अनेक माणसें गोळा करून जिवंत माणसांना मधून मधून त्रास देण्याचा किंवा छळण्याचा त्यांचा उपद्व्याप चालूं असतो. ज्यांचा पार्थिव देह नष्ट झाला आहे, त्यांनीं तात्पुरतें जडत्व धारण करून जिवंत माणसांना दृश्य होणें ही एक कठीण कला आहे. ती सर्वांनाच साध्य होते असें नाहीं. दुष्ट प्रवृत्तीचे व अघोरी पंथाचे परलोकवासी ती कला साध्य करून घेतात. जिवंत माणूस त्यांच्या या चेष्टांना डगमगला नाहीं म्हणजे त्यांचे हे चाळे आपोआप बंद होतात. असल्या पिशाच्चांचा जाच आपण मंत्रतंत्रानें किंवा अन्य कोणत्या उपायांनीं बंद करूं शकलो व तीं दिसेनाशीं झालीं म्हणजे त्यांचा उद्धार झाला असें समजण्याचें कांहींच कारण नाहीं. लांडीलबाडी करून प्रकरण अंगावर आलें व म्हणून एकादा लबाड माणूस एक गांव सोडून दुसऱ्या गांवी गेला म्हणजे त्याचा जसा उद्धार होत नाहीं तोच प्रकार पिशाच्चांच्या बाबतींत समजावा.

'भुतांना माणसांसारखे हातपाय असतात का ? तोंड असतें का ? मग तसं असतं तर माणसाचं जसं आपल्याला मेल्यावर प्रेत दिसतं तसं भुताचं प्रेत कां दिसत नाहीं?—' या प्रश्नांना कधीं समाधानकारक उत्तर मिळालेलें दिसत नाहीं. भुताचा जो देह असतो त्याचा आकार व मुद्रा वगैरे दृश्य देहाबरहुकूम असते. त्याचें तोंड पूर्वीसारखेंच असतें. पण तें तोंड अन्न खाण्याकरितां नसतें. फक्त आकार सारखा असतो. भारतांतील प्राचीन वाङ्मयापैकीं तैत्तिरीयोपनिषदांत माणसाच्या सर्व देहासंबंधीं चर्चा केलेली आहे. मृत माणूस ज्या देहांत राहातो त्याची माहितीहि त्या चर्चेंत सांपडण्याजोगी आहे.

तैत्तिरीय उपनिषदांत पुढील वर्णन आहे. अन्नात् पुरुषः। स वा एष पुरुषो अन्नरसमयः।-खातें आणि खाल्लें जातें त्याला अन्न असें म्हणतात. त्या अन्नावर पोसला जाणारा जगणारा जो देह किंवा कोष त्याला अन्नमय कोष असें म्हणतात. एतस्मात् अन्नरसमयात् अन्यो आंतर

आत्मा प्राणमयः। त्या अन्नमय कोषाच्या आंत दुसरा एक कोष असतो त्याला प्राणमय कोष असें म्हणतात.

हा प्राणमय कोष कसा असतो? उपनिषद सांगतें–'स वा एष पुरुषविध एव।'– जसा हा पुरुष तसाच अगदीं, बरोबर त्याच्याच आकारासारखा त्याचा प्राणमय कोष असतो. मात्र हा कोष वायूच्या अतिसूक्ष्म परमाणूंचा बनला असल्याकारणानें त्याच्या त्या विरलत्वामुळें जिवंत माणसाला तो दिसूं शकत नाहीं.

'एतस्मात् प्राणमयात् अन्यो आंतर आत्मा मनोमयः।'– या प्राणमय कोषाच्या आंत तिसरा आणखी एक कोष असतो, त्याला मनोमय कोष असें म्हणतात. तो प्राणमय कोषाहून विरलतर असतो. 'स वा एष पुरुषविध एव' आणि त्याचा आकारही त्या देहधारी पुरुषासारखा असतो. खरोखरी मनोमय कोष मोठ्या वर्तुळासारखा असून त्याचा मधला भाग दृश्य शरीरासारखा असतो. या उपनिषदांत आणखींही कोष सांगितले आहेत. पण पिशाच्च–सृष्टीचाच विचार या प्रकरणीं कर्तव्य असल्यामुळें मनोमय कोषापलीकडील कोषांचा विचार करणें आवश्यक नाहीं. गवताच्या एका काडींतले कोष जसे एकांत एक राहिलेले असतात, तसे माणसाचे हे अनेक कोष एकांत एक स्थित असतात. मनुष्य मेला–– म्हणजे त्याच्यावरचा जो अन्नमय कोष तो गळून पडतो आणि बाकीच्या चार कोषांचें गाठोडें जें मृत माणसाच्याच आकृतीसारखें असतें आणि ज्यामध्यें ईथर नामक द्रव्याचे अतिसूक्ष्म परमाणू प्रामुख्यानें असतात तें भूवर्लोकांत तरंगत जातें.

(मनुष्याच्या याच देहाची व्यवस्थित कल्पना आणून देणारें पुस्तक Man and his bodies डॉ. ॲनी बेझंट यांनी लिहिलें आहे. भारतीय पूजाविधींत 'ॐ अन्नमय--प्राणमय–मनोमय–विज्ञानमय–आनंदमया मे शुद्धतां ज्योतिरइम् विरजा विपाका भूयास स्वाहा, हा मंत्र उपासकानें आपल्या अंतर्बाह्य शुद्धीसाठीं म्हणावयाचा असतो. प्राचीन मंत्रद्रष्ट्या ऋषींना माणसाच्या सर्व सूक्ष्म देहांच्या व्यवहाराची कल्पना होतीसें दिसतें.)

असा मेलेला माणूस जर कांहीं काळ जडत्व धारण करून आपणाला

दिसला तर त्याला सर्वसामान्य लोक पिशाच्च असें म्हणतात. त्या पिशाच्चाचा आकार त्याच्या जिवंतपणीच्या आकारासारखाच असतो. त्याला उलटे पाय वगैरे असत नाहींत. पिशाच्चाविषयींच्या विपरीत कल्पना लोकभ्रमांतून निर्माण झाल्या आहेत. मात्र शिमग्याच्या सणांत विद्रप मुखवटे लावून जशीं सोंगें मिरवतात त्याप्रमाणें आपल्या विरल शरीराभोवतीं एक्टोप्लॅझम विरूप व भयानक रीतीनें मुद्दाम गुंडाळून कित्येक पिशाच्चें दृश्य होऊं शकतात. परंतु तें त्यांचें खरें स्वरूप नव्हे.

पिशाच्चाचें जडत्व हेंच मुळीं नकली असल्याकारणानें सर्वच गोष्टी त्याला जिवंत माणसांप्रमाणें करितां येत नाहींत. बोलणें म्हणजे जड कंठांतून आवाज काढणें. सर्वच पिशाच्चांना ही कला साधत नाहीं. आपल्या नकली जडत्वाचा थांगपत्ता लागूं नये आणि तें जडत्व भंग पावूं नये म्हणून पिशाच्चें जिवंत माणसांपासून दूर दूर चालत असतात, परंतु कधीं कधीं कांहीं पिशाच्चांना, दीर्घकाळ टिकणारें घनत्व धारण करतां येतें. अशीं पिशाच्चें मात्र जिवंत माणसाच्या जवळ बसून बोलूं शकतात, व इतरही कांहीं भयंकर गोष्टी करूं शकतात. [' मदतीची अपेक्षा करणारे परलोकवासी ' व ' मृत्यूनंतरचा दुष्टावा ' या पुढील दोन लेखांत अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें मी दिलीं आहेत.]

" जिवंतपणीं माणसाची एखादी वासना अपुरी असली तर तो माणूस मेल्यावरही त्या वासनेसाठीं धडपडत असतो. ती वासना तृप्त होईपर्यंत त्याचा जीवात्मा जरी कुडी सोडून गेला तरी तो आत्मा तळमळत असतो आणि यालाच आपण भूत म्हणतो." अशी जी व्याख्या कांहीं लोकांकडून केली जाते त्यांत अर्धसत्य आहे. ज्यांची आसक्ति सुटली नाहीं अशीं माणसें मृत्यूनंतरही इहलोकाशीं संबंध ठेवूं पाहातात. कोणी सूडबुद्धीनं, तर कुणी स्वतःच्या मूर्ख समजुतीमुळें आणि क्वचित् कांहीं भली माणसें इहलोकांतील माणसांना मदत करण्यासाठीं इहलोकाशीं संबंध ठेवीत असतात.

आपल्या लहानग्या मुलाला टाकून परलोकीं जाण्याचा प्रसंग जर एखाद्या बाईवर आला तर ती बाई मातृवात्सल्यामुळें त्या जिवंत बाल-

काशीं संबंध ठेवते. अशीं उदाहरणें निरनिराळ्या देशांत वेळोवेळीं घडलेलीं आहेत; परंतु आईचें हें असल्या प्रकारचें वात्सल्य नेहमींच हितावह असतें असें नाहीं. ज्या माणसाचा जड देहापासून संबंध सुटला त्यानें कोणत्या ना कोणत्या स्वार्थी निमित्तानें इहलोकाशीं संबंध ठेवणें इष्ट नसतें. भुवर्लोकांतील कित्येक माणसांना जवळच्या भवितव्याचें ज्ञान मिळूं शकतें. जें भाग्य आपल्याला भोगायला मिळालें नाहीं तें दुसऱ्यालाही भोगतां येऊं नये असें वाटणारीं पुष्कळ माणसें आपण पाहातों. जिवंतपणींचा त्यांचा तो स्वभाव मृत्यूनंतरही बदलत नाहीं.

'पिशाच्चें कांहीं माणसांना दिसतात व कांहींना कां दिसत नाहींत?' असा एक प्रश्न विचारला जातो. या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं सर्वच माणसांची दृष्टी तंतोतंत सारखी नसते. पाहाण्याच्या शक्तींतही चढउतार होऊं शकतो. रात्रीं एकदम उठून मेणबत्तीची ज्योत पाहिली तर एखाद्या माणसाला तिच्याभोंवतीं तेजोवलय दिसतें. तें सर्वांस दिसत नाहीं. तसेंच ज्यास तें दिसतें त्यालाही कांहीं वेळानें तें दिसेनासें होतें. कांहींना दूर अंतरावरचें दिसत नाहीं तर कांहींना जवळचें दिसत नाहीं. त्यांतही पिशाच्चाचें जडत्व जेव्हां संपूर्ण नसेल, अंशतःच सिद्ध झालेलें असेल तेव्हां तें सर्वांनाच दृग्गोचर होऊं शकत नाहीं.

आपल्या देशांतील देवगण, देवदेवतर विषयींच्या कल्पना पाश्चात्य देशांतील Angel च्या कल्पनेशीं सदृश आहेत. पृथ्वीच्या पाठीवर परोपकारासाठीं नेहमींच सिद्ध असलेलीं अशीं कांहीं माणसें आहेत. या सज्जनांकडून संकटग्रस्तांना कधीं कधीं अदृश्य अथवा दृश्य मदत मिळत असते. असल्या प्रकारचीं उदाहरणें पुढील 'योगायोग, चमत्कार व अदृश्य मदतगार' या प्रकरणांत आलेलीं आहेत. मानव जातीची सेवा करणाऱ्या सज्जनांनीं जर कधीं तात्कालिक जडत्व धारण केलें तर त्यांची ती आकृति मोठी तेजःपुंज व आकर्षक दिसते. स्वच्छतेची आवड असणारा श्रीमंत माणूस ज्याप्रमाणें सुंदर पोषाख करतो तद्वत् मानवजातीचे हे मदतगार आपल्या सूक्ष्म देहाभोंवतीं जें जडत्व पांघरतात त्यांतील द्रव्यहि अत्यंत शुद्ध व पवित्र असतें. जडत्व धारण करण्याची कला या मंडळींना संपूर्ण अवगत असल्याकारणानें बोलण्याचालण्याची

किंवा इतर कांहीं क्रिया करण्याची या मंडळींना मुळींच अडचण नसते. पण जडत्व धारण केल्यास कांहीं लोक भितात, कांहीं भोळसर समजुतींना बळी पडतात, म्हणून होतां होईल तों हे सज्जन दृश्य स्वरूप धारण करीत नाहींत.

सूक्ष्म देहधाऱ्यानें जिवन्त माणसाला दृश्य होणें म्हणजे कोणतें तरी द्रव्य त्याच्या नैसर्गिक अवस्थेंतून बदलून आपल्या देहाभोंवतीं लपेटण्याचा प्रकार आणि म्हणून त्या द्रव्यावरून चित्त किंचित् जरी चलित झालें तरी तें द्रव्य झटकन् विरून त्याच्या मूलस्थितींत जातें. म्हणूनच जडत्व टिकविण्याची ही कला परिश्रमसाध्य व अत्यंत कठीण आहे.

जडत्व धारण करण्याचे साधारणतः तीन प्रकार आहेत. (१) एका खोलींत बसून मृतांना बोलाविण्याचे कांहीं लोक प्रयोग करतात. या प्रयोगाचे वेळीं टेबलावर हातांनीं मारलेलें ठोके ऐकूं येतात. कधीं कधीं इकडल्या वस्तू तिकडे नेल्या जातात. परंतु ठोके मारणारी किंवा वस्तू उचलून नेणारी व्यक्ति दिसत नाहीं. इतकें तें जडत्वहि विरल असतें.

(२) कधीं कधीं मृताचें जडत्व दृश्य असतें पण त्याला स्पर्श करितां येत नाहीं. आपण त्याच्या शरिराला हात लावला तर तो जसा हवेंतून फिरावा तसा त्याच्या शरिरांतून जाऊं शकतो. असल्या प्रकारच्या जडत्वाची आकृति कधीं कधीं अत्यंत स्पष्ट दिसते तर कधीं कधीं शरीराचे कांहीं भाग धुक्यासारखे किंवा विरळ ढगांसारखें दिसतात. असल्या या ढगाळलेल्या विचित्र आकृति पाहूनच भुताचे पाय उलटे असतात हा समज लोकांत रूढ झाला असावा.

(३) पूर्ण जडत्व धारण करण्याची कला ज्यांना साधली ते मृत्यूनंतर आपल्या आप्तेष्टांना दिसून त्यांच्याशीं हस्तांदोलनही करूं शकतात. मात्र कधीं कधीं हस्तांदोलन करणारा तो हातच तेवढा जड असतो. बाकीचा देह जरी स्पष्ट दिसला तरी तो घट्ट झालेला असत नाहीं.

रस्त्यांतून जातांना जशीं आपणांला माणसें दिसतात तशीं भुतें दिसत नाहींत. कारण ज्यांचा जड देहाशीं असलेला संबंध तुटला त्यांना जिवंत माणसांशीं संबंध ठेवणें सहजसाध्य नसतें. मृत्यूनंतर माणूस प्राणमय कोष, मनोमय कोष वगैरे कोष धारण करीत असतो. ती त्याची नेह-

मींची स्वाभाविक स्थिती असते. या कोषांतील द्रव्यें विरळ असतात; अदृश्य असतात. तीं जर दृश्य असतीं तर आपणांला आपल्या सभोंवतीं तीं सहज दिसलीं असतीं. दृश्यत्व आणण्याला मृत माणसाला एक्टोप्लाझमची जरुरी असते.

भूमींत भुतें दिसतात अशा पुष्कळ गप्पा ऐकूं येतात. कित्येक वेळां नुकत्याच पुरलेल्या मृताचा प्राणमय कोष त्याच्या थडग्यावर तरंगतांना दिसतो. त्यालाच सामान्य माणसें भूत म्हणून समजतात. कधीं कधीं जिवंत माणूस स्वप्नांत आपल्या सूक्ष्म देहानें आपल्या जिवलग मृताच्या थडग्याभोंवतीं घोटाळत असतो. त्या स्वप्नांत संचार करणाऱ्या जिवंत माणसाच्या संवेदना अत्यंत तीव्र असल्या तर, त्याचाहि सूक्ष्म देह कांहीं काळ दुसऱ्या माणसाला दिसूं शकतो व त्या आकृतीला 'भूत' म्हणून संबोधण्यांत येतें. मेलेल्या माणसाचे अनेक आप्तेष्ट दुःखी कष्टी झाले असले म्हणजे कधीं कधीं त्यांच्या मनांत त्या मृत माणसाची स्पष्ट प्रतिमा येते. या प्रतिमा मनांतून बाहेर पडून इतर वस्तूंसारख्या हवेवर तरंगतात. त्यांना इंग्रजींत Thought forms असें नांव आहे. कधीं कधीं असल्या निर्जीव आकृति मृताच्या थडग्यावर तरंगतांना दिसतात. केवळ गैरसमजुतीनें कांहीं लोक त्या आकृतीलाच 'भूत' म्हणतात. पण ती खरी इतर लोकांच्या मनानें निर्मिलेली प्रतिमा असते.

आसन्नमरण झालेल्या माणसाला कधीं कधीं आपल्या अत्यंत लाडक्या परंतु शेंकडों मैल दूर असलेल्या माणसाला भेटण्याची इच्छा असते. ही इच्छा जड देहानें पुरी करतां येत नसल्याकारणानें मृत्यूच्या जरा अगोदर अथवा मरतांक्षणींच किंवा कांहीं काळानंतर मृत माणूस आपल्या जिवंतपणींच्या आप्ताला पिशाच्चरूपानें त्याच्या निवासस्थानीं जाऊन भेटतो किंवा डोळे भरून पाहातो!

('अखेरच्या इच्छा' या पुढील प्रकरणांत असल्या प्रकारचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत.)

ज्या ठिकाणीं एखाद्या माणसाचा खून झालेला असतो किंवा अन्य कोणता निर्दय व क्रूर अत्याचार घडलेला असतो अगदीं नेमक्या त्याच ठिकाणीं 'पिशाच्च' दिसतें अशी लोकांत वदंता असते. या प्रकारांत

सुद्धां बहुधा पिशाच्चाचा मागमूस नसतो. ज्या माणसाची गुन्हा करण्याची प्रवृत्ती नाहीं अशा माणसाच्या हातून भावनावश होऊन एखादें क्रूर कृत्य घडलें म्हणजे त्यासंबंधीचे विचार त्याच्या मनांत एकसारखे घोटाळत असतात. विशेषतः तें क्रूर कृत्य जेव्हां घडलें ती तारीख किंवा तो दिवस उगवला म्हणजे तो गुन्हा करणारा माणूस बेचैन होतो व आपल्या मनानें तो आपल्या डोळ्यांपुढें आपल्या त्या कृत्याचा देखावा तें विचार-चित्र उभें करीत असतो. जडत्व पावलेलें तें विचार-चित्र त्या हत्या घडलेल्या ठिकाणीं दिसतें व त्याला कांहीं लोक 'भूत' म्हणून समजतात.

('पिशाच्चांचा आभास' या प्रकरणांत या प्रकारचीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत.)

ज्या ठिकाणीं अनेक स्त्रीपुरुषांच्या कल्पनेला सहन होणार नाहीं, अशा क्रूरपणानें वध झाला असला किंवा तत्सम आणखी कांहीं नीच कृत्यें घडलीं असलीं तर तिथल्या वातावरणांत ग्रामोफोनच्या तबकडीवर जसे स्वर-ध्वनि मुद्रित होऊन राहातात तसा तो सर्व प्रकार मुद्रित होऊन राहतो व ज्या माणसाच्या अतींद्रिय शक्ति अगदीं अत्यल्प प्रमाणांत कां होईना पण जागृत झाल्या आहेत तो माणूस त्या ठिकाणीं गेल्यास त्या कृत्याचा देखावा कधीं कधीं डोळ्यांपुढून जसा चित्रपट जावा तसा दिसतो व आपणांला 'भुतें' दिसलीं अशी त्याची कल्पना होते. ज्या ठिकाणीं अशीं अघोर कृत्य घडलीं आहेत त्या ठिकाणीं नहमींच कांहीं-तरी आकृति दिसतात असें नाहीं आणि दिसल्या तरी त्या आकृति सर्वांसच दिसतात असें नाहीं. मात्र त्या ठिकाणीं असें वातावरण निर्माण झालेलें असतें कीं कित्येक चांगलीं माणसें त्या ठिकाणीं गेलीं असतांना कांहीं एक स्पष्ट कारण नसतांना त्यांच्या चित्ताला एकाएकीं विषण्णता प्राप्त होते.

दारें-खिडक्या बंद असतांनादेखील घरांत दगड येणें, बंद कपाटांतील कपबशा फुटणें वगैरे भुताटकीचे प्रकार घडले म्हणजे त्या घरांत रहाणारीं माणसें गर्भगळित होऊन जातात. भूवर्लोकात Nature Spirits असें ज्यांना म्हणतात त्या व्यक्ति असले चाळे माणसाची टर उडवि-

ण्यासाठीं करतात. प्लँचेटवर बसून किंवा कुणातरी मृताला अंगांत आणून संदेश देण्याचे परलोकविद्येचे प्रयोग करणारी जी मंडळी त्यांना ही Nature spirits पुष्कळदां भलभलते संदेश देऊन फसवीत असतात. प्लँचेटवर बसून जर कांहीं माणसांनी एखाद्या विशिष्ट मृताला बोलाविलें तर तोच माणूस हमखास येतो असें नाहीं. भुवर्लोकांतील भलतींच माणसें येऊन प्लँचेटवर बसणाऱ्या माणसाला कधीं कधीं आपण त्याचे आप्तेष्ट आहोंत असें भासवीत असतात. प्लँचेटचे प्रयोग करणाऱ्या सर्व लोकांनीं ही मुख्यतः ध्यानांत ठवण्याजोगी गोष्ट आहे. भुवर्लोकांत वावरणाऱ्या मंडळींना जिवंत माणसांच्या मनांतल्या गोष्टी ओळखतां येतात. म्हणून अंगांत आलेल्या माणसानें किंवा प्लँचेटवर आलेल्या माणसानें भोंवतीं जमलेल्यांपैकीं एखाद्याला पटणारी गोष्ट सांगितली तर एकदम हुरळून जाऊं नये व आपण बोलावलेलाच माणूस आपणाशीं संवाद करीत आहे असें समजूं नये.

अशा आणि असल्या सर्व प्रकारांचें निराकरण करून मरणोत्तर जीवनाचा पुरावा Rev. C. D. Thomas यांनीं आपल्या Life beyound Death with Evidence या पुस्तकांत दिला आहे.

कोणताहि जड पदार्थ त्याला उष्णता देऊन त्यांच्या घन अवस्थेंतून द्रव अवस्थेंत व द्रप अवस्थेंतून वायुरूप अवस्थेंत नेण्याची रीत आपणांस माहीत आहे. विशिष्ट प्रकारचे मंत्र म्हणून व नादलहरी निर्माण करून घन पदार्थ वायुरूप अवस्थेंत नेण्याची कला जारणमारणकर्म करणाऱ्या कांहीं माणसांना अवगत झालेली असते. या प्रकारास इंग्रजींत Distintegration असें म्हणतात. परलोकविद्येचे प्रयोग चालूं असतांना कधीं कधीं खोलींत नसलेल्या ज्या वस्तू एकाएकीं आलेल्या दिसतात त्या पिशाच्चांनीं जवळपास कुठेंतरी असलेल्या वितळवून-वायुरूप करून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन ठेवलेल्या असतात. असल्या प्रकारचीं कित्येक उदाहरणें कर्नल ऑलकॉट यांच्या People from the other World या पुस्तकांत जिज्ञासूंनीं पहावीं. M. A. Aksakow यांचे Un cas de Demate ralisation व madame Experance यांचे Shadow land हीं पुस्तकेंदेखील अभ्यासकांनीं अवश्य वाचावीं.

पिशाच्चांना बोलावण्याचे प्रयोग ज्या ज्या ठिकाणीं चालतात त्या त्या ठिकाणीं आलेलीं पिशाच्चें जवळपासच्या माणसाच्या देहांतील कांहीं द्रव्य खेंचून स्वतः जडत्व धारण करतात. त्या खेंचल्या जाणाऱ्या पदार्थाची, ज्या शरीरांतला तो पदार्थ मूळचा असतो त्याच शरीराकडे ओढलें जाण्याची प्रवृत्ती असल्याकारणानें दृश्य झालेलीं पिशाच्चें जरा अंतरावर गेलीं कीं विरून जातात. पिशाच्च्यानें जिवंत माणसाच्या देहांतील द्रव्य खेंचावें व जिवंत माणसाच्या देहानें त्याला आपणाकडे ओढून धरावें या खेचाखेचींत शरीरप्रकृतीची हानी होत असते. हें लक्षांत ठेवून पिशाच्चांना बोलावण्याचे प्रयोग सूज्ञ माणसांनीं करूं नयेत.

प्रकाशकिरण हे ईथरच्या कंपनानें निर्माण होतात. मृत माणूस ईथरसारखें द्रव्य घेऊन भूलोकाशीं स्वतःचा संबंध जोडूं पहात असतो. म्हणून प्रकाशकिरणांमुळें पिशाच्चांना त्या कंपायमान वातावरणांत येणें, तसेंच धारण केलेलें जडत्व टिकविणें जड जातें. म्हणूनच काळोखांत किंवा मंद उजेडांत दृश्य होणें त्यांना त्यांतल्यात्यांत बरें पडतें. मात्र योगमार्गांत ज्यांची प्रगति झाली आहे अशीं थोर माणसें दृश्य होतांना आपल्या सूक्ष्म देहाभोंवतीं जें द्रव्य धारण करितात तें कुणाच्याहि शरीरापासून आयतें घेतलेलें नसतें. विस्तीर्ण आकाशांत ईथर नांवाचें जें द्रव्य आहे तें ते खेचून घेतात व योगबळावर तें टिकवितात म्हणून दिवसरात्रीचा, काळोखाचा किंवा प्रकाशाचा त्यांना निर्बंध नसतो. पतिताचा उद्धार करण्यासाठीं कळवळचानें प्रेरित झालेल्या त्या थोर पुरुषांचें दर्शन मात्र क्वचित्च एखाद्याला सुदैवानें होत असतें.

ईथर नामक द्रव्याच्या लहरींनीं पिशाच्चांना दिवे, ज्योती, चुडचा इत्यादि निर्माण करितां येतात. कधीं असल्या दिव्यांचा प्रकाश मंद असतो तर कधीं कधीं तेजस्वीही असतो. देशोदेशींच्या वाङ्मयांत या भुताटकीच्या दिव्यांच्या गोष्टी भाकडकथांच्या रूपानें प्रचलित आहेत. इंग्रजी वाङ्मयांत हे दिवे Jack O' the Lantern आणि Will O' the Wasp या नांवानें प्रसिद्ध आहेत.

अंगांत आलेलीं माणसें भोंवतालच्या लोकांना आपलें देवत्व सिद्ध करण्याकरितां हातांत जळते निखारे घेऊन दाखवितात. हा चमत्कार

नव्हे. ईथर द्रव्याच्या पातळ थरानें शरीराच्या ज्या भागावर विस्तव ठेवावयाचा तो भाग वेष्टित करतां आला म्हणजे हा जादूचा प्रयोग करतां येतो.

अशा रीतीनें या विस्तृत विषयाचा थोडक्यांत आराखडा हा असा आहे. वर दिलेल्या दृष्टिकोनांतून विचार करणारांना पिशाच्चसृष्टीसंबंधीं बरोबर कल्पना येऊन या बाबतींतली त्यांची भीति कमी होईल अशी अपेक्षा आहे. विस्तृत माहितीसाठीं जिज्ञासूंनीं Rev C W. Leadbeater यांचें The Astral Plane हें पुस्तक अवश्य वाचावें. दृश्य स्वरूप धारण केलेल्या भुताचे फोटोग्राफ Stanchey De Brath यांच्या Physical Researeh Science and Religion या पुस्तकांत दिले आहेत. वर लिहिलेल्या Shrank Notzing कृत The Phenemena of materialisation या पुस्तकांत तीं आहेत.

पुष्कळ भुतांच्या गोष्टी खोट्या असतात पण सर्वच खोट्या नसतात. Spiritualism व Psychical research या चळवळींत कांहीं शास्त्रज्ञांनीं पुढाकार घेऊन भुतांच्या कित्येक गोष्टी खऱ्या असतात असें दाखविलें आहे. त्या खऱ्या गोष्टी समजून घेणें सुशिक्षित लोकांना आवश्यक आहे. त्या समजण्यासाठीं लोकांच्या मनांत या विषयाबद्दल जे प्रश्न नेहमीं येतात त्यांस उत्तरें देण्याचा या ग्रंथांत प्रयत्न केला आहे. ठिकठिकाणीं जरूर त्या दुरुस्त्या सुचवून ग्रंथाच्या उभारणीस मदत केल्याबद्दल प्रा. राजाराम सखाराम भागवत एम्. ए. यांचा लेखक आभारी आहे.

० ० ०

२ पिशाच्चांचा आभास

पिशाच्चांसंबंधी कित्येक लोकांच्या मनांत ज अनेक विपरीत विकल्प आहेत त्यांचीं कारणें विविध असून माणसांना अकल्पितपणें ज्या आकृति दिसतात, जे आवाज ऐकूं येतात, ते प्रकार पुष्कळदां आभासमय असतात. परंतु हे आभासदेखील निसर्गनियमाला धरून असतात. मात्र त्या आवाजांच्या, त्या आकृतींच्या पाठीमागें कोणत्या शक्ती कार्य करीत असतात हें पूर्णपणें न समजल्यामुळें त्यांच्यावर पिशाच्चांचा आरोप केला जातो. यासंबंधीं कांहीं मनोरंजक संशोधनांचा या प्रकरणांत विचार करावयाचा आहे. डॉ. ली यांनी आपल्या Sights and shadows नामक पुस्तकांत पुढील एक अद्‌भुत प्रकार वर्णन केला आहे.

डब्ल्यू आणि पी. हे दोघे मित्र होते. डब्ल्यू एका कॉलेजांत फेलो होते आणि पी आपल्या मित्राच्या वसतिस्थानापासून अठरा मैल अंतरावर राहात होता. डब्ल्यू यांना एके रात्रीं स्पष्ट आणि विषादात्मक असें स्वप्न दोनदां पडलें. त्या स्वप्नांत त्यांचा मित्र पी हा त्यांच्यासमोर आला होता. तो अगदीं घाबरा झाला होता, आणि म्हणत होता कीं 'ते मला गाडीत आहेत.'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं डब्ल्यूसाहेब आपली छोटी हजेरी उरकून आराम खुर्चीवर बसले असतांना दरवाज्यावर एक थाप ऐकूं आली. ते

बसल्याबसल्याच म्हणाले "आंत ये ! " दरवाजा उघडून कुणीतरी आंत आल्याचा आवाज त्यांना ऐकूं आला. त्यांना वाटलें कीं तो त्यांचा नोकर असेल. म्हणून त्यांनीं वर पाहिलें नाहीं. परंतु त्यांच्या अगदीं परिचयाचा असा पी चा आवाज त्यांच्या कानांत पुटपुटला,' ते मला गाडीत आहेत ! ' तेव्हां ते दचकून उभे राहिले आणि खोलींत कुणीच नाहीं हें पाहून चकित झाले. तावडतोब ते आपल्या दोस्ताला भेटण्यासाठीं निघाले. पी च्या घरीं जाऊन पाहतात तों पी च्या दाराजवळ प्रेताची पेटी स्मशानाकडे वाहून नेणारी गाडी उभी होती; आणि पी यांचें शरीरदेखील पेटींत घालून बंद करण्यांत आलें होतें. डब्ल्यू यांनी ती पेटी उघडण्याचा आग्रह धरला आणि पी यांची स्मशानयात्रा काढूं नये म्हणून निक्षून सांगितलें.

डब्ल्यू यांनीं नंतर पी यांचें शरीर त्या लाकडाच्या पेटींतून काढून पलंगावर ठेवविलें आणि त्याला शेक देण्याची सूचना केली. थोड्या वेळानें पी यांच्या शरीरावर चैतन्याच्या खुणा दिसूं लागल्या. पी कांहीं दिवसांनी पूर्ण बरे झाले आणि त्यानंतर पुढें नऊ वर्षें हयात होते. (Dr. Lee's Sights and shadows पृष्ठ ८८)

असें दिसतें कीं पी हे दुर्दैवी गृहस्थ आपल्यावर आलेल्या संकटाची जाणीव प्रथम आपला मित्र झोपेंत असतांनाच त्यांना देऊं शकले. परंतु प्राणांतिक संकट तर अतीं समीप आलें आणि डब्ल्यू यांनीं स्वप्नांत मिळालेल्या संदेशाची सकाळीं उठल्यानंतरदेखील दखल घेतली नाहीं, तेव्हां पी यांच्या आत्म्याला जोराचा प्रयत्न करून पार्थिव आवाजानें आपल्या मित्राला आपल्यावर ओढवलेल्या संकटाची जाणीव द्यावी लागली. अर्थात् डब्ल्यू यांनी जो आवाज ऐकला तो पिशाच्चाचा नसून खरोखरीच त्यांच्या जिवंत मित्राचा होता.

संकटांत सांपडलेल्या, दूरवर असलेल्या माणसाचा आवाज जसा ऐकूं येऊं शकतो त्याप्रमाणें कधीं कधीं जिवंत माणसाची हुबेहूब आकृतीदेखील कित्येक मैल दूर असलेल्या माणसाला दिसूं शकते. याबाबत पुरावा सांपडला आहे. मिस्टर रॉबर्ट डेल ओवेन यांच्या Foot falls on the Boundary of Another World या पुस्तकांतील २४२

साव्या पृष्ठावरून खालील वृत्तांत घेतला आहे.

"रॉबर्ट ब्रूस नांवाचा एक खलाशी एका फत्तेमारीवरील मुख्य कप्तानाचा सहाध्यायी होता. एकदां ही फत्तेमारी लिव्हरपूल सोडून जवळ जवळ पांच सहा आठवडे समुद्रांतून पश्चिमेकडे चालली होती. न्यू फाउंडलंडचा पूर्व किनारा जवळ आला होता आणि दुपारच्या वेळीं कप्तान आणि ब्रूस यांनी सूर्य आकाशांत कुठें आहे हें पाहून ते दोघे अरूख्या दिवसांत केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठीं खालीं आपल्या खोलींत उतरले.

"तें काम टाकून कप्तान सुकाणू पकडण्यासाठीं गेला आणि ब्रूस त्या खोलींत आंकडे मोडीत बसला. कप्तान उठून गेल्याचें त्याला समजलें नाहीं. ती आकडेमोड पुरी झाल्यावर तो म्हणाला, "माझ्या हिशोबानें आपण या ठिकाणीं आहों. आपला हिशोब काय सांगतो?" उत्तर न मिळाल्यामुळें खालच्या मानेनें त्यानें तो प्रश्न पुन्हां विचारला. त्याचा समज होता कीं कप्तान आपल्या पाटीवर अजून गणित करीत आहे. पण त्यानें तोंड वर करून पाहिलें तों कप्तानाच्या जागीं दुसराच कोणीतरी मनुष्य बसला आहे.

"ब्रूस भित्रा नव्हता. परंतु, त्या तिऱ्हाइतानें शांत, गंभीर परंतु भेदक अशा दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें तेव्हां तो चरकला. आणि त्या तिऱ्हाइताला प्रश्न विचारण्याऐवजीं तो दौडत कप्तानाला बोलाविण्यास गेला.

"अरे काय झालं तुला?" तांडेलानें विचारलें. "कांहीं नाहीं, तुमच्या त्या टेबलाजवळ कोण बसला आहे!

"कोणी नाहीं!"

"कोणी नाहीं कसा? तुम्हीं त्या खालच्या खोलींत आतां बसला होतां त्या खुर्चीवर कुणीतरी परका मनुष्य बसला आहे."

"परका माणूस? अरे, तूं कांहीं स्वप्नांत तर नाहींस? अरे आपल्याच खलाशांपैकीं कुणीतरी असेल. परका माणूस इथें येणार कसा आणि माझ्या परवानगीशिवाय भलता सलता त्या खोलींत शिरणार तरी कसा?"

"पण मी त्या माणसाला अगदीं प्रत्यक्ष तुमच्या पाटीवर लिहितांना पाहिला ना ?"

"हं ! कोणाला पाहिलंस तूं ?"

"ईश्वराला माहीत; पण मी खरं सांगतों कीं ज्या माणसाला मी पूर्वी कधींहि पाहिलं नव्हतं त्या माणसाला तुमच्या पाटीवर कांहींतरी लिहीत असतांना मी पाहिलं."

"तुला वेड लागलं आहे वेड. अरे, सहा आठवड्यांत आपण केवळ समुद्र आणि आकाश यांच्याच संगतींत आहोंत. येथें तिऱ्हाईत माणूस येऊं शकणार तरी कसा ?"

ब्रूस थोडीशी कांकूं करीत म्हणाला, "माझा भुतांखेतांवर कधींच विश्वास नव्हता; परंतु खरं सांगायचं म्हणजे त्या खोलींत एकटें जाण्याची माझी छाती नाहीं. आपण दोघेहि खालीं जाऊं या."

ते दोघेहि खालच्या खोलींत उतरले तेव्हां तेथें कोणीहि व्यक्ती नव्हती.

"पांहिलंस ब्रूस ?" कप्तान म्हणाला, "मी तुला सांगितलं नाहीं कीं, तूं स्वप्नांत होतास म्हणून ?"

"माझी खात्री आहे कीं तो माणूस पाटीवर कांहींतरी लिहीत होता."

कप्तानानें ती पाटी हातांत घेऊन पाहिली आणि त्याच्या तोंडून उद्‌गार निघाले, "ब्रूस, हें तुझें हस्ताक्षर आहे काय ?" ब्रूसनें पाटी हातांत घेऊन पाहिली. त्यावर स्वच्छ लिहिलें होते. 'Steer to the North West' (ईशान्येकडे हाका)

कप्तानानें थोडासा विचार करून म्हटलें, "हेच शब्द तूं तुझ्या पाटीवर लिही पाहूं."

ब्रूसनें तसें केल्यावर तीं दोन्ही हस्ताक्षरें कप्तानानें समोर धरून पाहिलीं. त्यांत मुळींच साम्य नव्हतें. मग कप्तानानें फत्तेमारीवरील प्रत्येक माणसाला बोलावून घेऊन त्यांच्याकडून 'Steer to the North West' हे शब्द लिहून घेतले. परंतु एकाचेंहि हस्ताक्षर कप्तानाच्या पाटीवरील हस्ताक्षराशीं जमेना. कप्तान मोठ्या विचारांत पडला.

साव्या पृष्ठावरून खालील वृत्तांत घेतला आहे.

"रॉबर्ट ब्रूस नांवाचा एक खलाशी एका फत्तेमारीवरील मुख्य कप्तानाचा सहाध्यायी होता. एकदां ही फत्तेमारी लिव्हरपूल सोडून जवळ जवळ पांच सहा आठवडे समुद्रांतून पश्चिमेकडे चालली होती. न्यू फाउंडलंडचा पूर्व किनारा जवळ आला होता आणि दुपारच्या वेळीं कप्तान आणि ब्रूस यांनी सूर्य आकाशांत कुठें आहे हें पाहून ते दोघे अख्ख्या दिवसांत केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठीं खालीं आपल्या खोलींत उतरले.

"तें काम टाकून कप्तान सुकाणू पकडण्यासाठीं गेला आणि ब्रूस त्या खोलींत आंकडे मोडीत बसला. कप्तान उठून गेल्याचें त्याला समजलें नाहीं. ती आकडेमोड पुरी झाल्यावर तो म्हणाला, "माझ्या हिशोबानें आपण या ठिकाणीं आहों. आपला हिशोब काय सांगतो?" उत्तर न मिळाल्यामुळें खालच्या मानेनें त्यानें तो प्रश्न पुन्हां विचारला. त्याचा समज होता कीं कप्तान आपल्या पाटीवर अजून गणित करीत आहे. पण त्यानें तोंड वर करून पाहिलें तों कप्तानाच्या जागीं दुसराच कोणीतरी मनुष्य बसला आहे.

"ब्रूस भित्रा नव्हता. परंतु, त्या तिऱ्हाइतानें शांत, गंभीर परंतु भेदक अशा दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें तेव्हां तो चरकला. आणि त्या तिऱ्हाइताला प्रश्न विचारण्याऐवजीं तो दौडत कप्तानाला बोलाविण्यास गेला.

"अरे काय झालं तुला?" तांडेलानें विचारलें. "कांहीं नाहीं, तुमच्या त्या टेबलाजवळ कोण बसला आहे!

"कोणी नाहीं!"

"कोणी नाहीं कसा? तुम्हीं त्या खालच्या खोलींत आतां बसला होतां त्या खुर्चीवर कुणीतरी परका मनुष्य बसला आहे."

"परका माणूस? अरे, तूं कांहीं स्वप्नांत तर नाहींस? अरे आपल्याच खलाशांपैकीं कुणीतरी असेल. परका माणूस इथें येणार कसा आणि माझ्या परवानगीशिवाय भलता सलता त्या खोलींत शिरणार तरी कसा?"

"पण मी त्या माणसाला अगदीं प्रत्यक्ष तुमच्या पाटीवर लिहितांना पाहिला ना ?"

"हं ! कोणाला पाहिलंस तूं ?"

"ईश्वराला माहीत; पण मी खरं सांगतों कीं ज्या माणसाला मी पूर्वी कधींहि पाहिलं नव्हतं त्या माणसाला तुमच्या पाटीवर कांहींतरी लिहीत असतांना मी पाहिलं."

"तुला वेड लागलं आहे वेड. अरे, सहा आठवड्यांत आपण केवळ समुद्र आणि आकाश यांच्याच संगतींत आहोंत. येथें तिऱ्हाईत माणूस येऊं शकणार तरी कसा ?"

ब्रूस थोडीशी कांकूं करीत म्हणाला, "माझा भुतांखेतांवर कधींच विश्वास नव्हता; परंतु खरं सांगायचं म्हणजे त्या खोलींत एकटें जाण्याची माझी छाती नाहीं. आपण दोघेहि खालीं जाऊं या."

ते दोघेहि खालच्या खोलींत उतरले तेव्हां तेथें कोणीहि व्यक्ती नव्हती.

"पाहिलंस ब्रूस ?" कप्तान म्हणाला, "मी तुला सांगितलं नाहीं कीं, तूं स्वप्नांत होतास म्हणून ?"

"माझी खात्री आहे कीं तो माणूस पाटीवर कांहींतरी लिहीत होता."

कप्तानानें ती पाटी हातांत घेऊन पाहिली आणि त्याच्या तोंडून उद्‌गार निघाले, "ब्रूस, हें तुझें हस्ताक्षर आहे काय ?" ब्रूसनें पाटी हातांत घेऊन पाहिली. त्यावर स्वच्छ लिहिलें होते. 'Steer to the North West' (ईशान्येकडे हाका)

कप्तानानें थोडासा विचार करून म्हटलें, "हेच शब्द तूं तुझ्या पाटीवर लिही पाहूं."

ब्रूसनें तसें केल्यावर तीं दोन्ही हस्ताक्षरें कप्तानानें समोर धरून पाहिलीं. त्यांत मुळींच साम्य नव्हतें. मग कप्तानानें फत्तेमारीवरील प्रत्येक माणसाला बोलावून घेऊन त्यांच्याकडून 'Steer to the North West' हे शब्द लिहून घेतले. परंतु एकाचेंहि हस्ताक्षर कप्तानाच्या पाटीवरील हस्ताक्षराशीं जमेना. कप्तान मोठ्या विचारांत पडला.

कुणीतरी परका माणूस फत्तेमारीवर आल्याचें वर्तमान सर्व खलाशांना समजलें होतें. त्या फत्तेमारीचा कानाकोपरा शोधण्यांत आला, पण कोणीहि परका माणूस सांपडला नाहीं. मग कप्तानानें ब्रूसला विचारलें, "या सर्व प्रकारासंबंधीं तुला काय वाटतें ?"

"कांहीं सांगतां येत नाहीं महाराज. त्या माणसाला मी तुमच्या पाटीवर लिहितांना पाहिलं आणि त्याच्या हस्ताक्षराची साक्ष तुमच्यासमोर आहे." ब्रूस म्हणाला. "ठीक आहे तर, हवा चांगली आहे. आपण ईशान्येकडे जाऊन पाहूं या."

आणि मग त्यांनी तें जहाज त्या दिशेकडे हाकारलें. तीनच्या सुमारास फत्तेमारीवरील दुर्बीणवाल्यांना एक मोठा हिमखंड दिसला, आणि त्याच्या जवळच बर्फांत अडकून पडलेलें एक जहाज दिसलें. त्या जहाजावरील माणसांची सोडवणूक करण्याकरितां कप्तानानें आपलीं माणसें होडचा घेऊन पाठविलीं.

क्वेबेकहून लिव्हरपूलला जाणारें तें जहाज होतें. त्यावर कित्येक उतारू होते. तें जहाज कांहीं आठवडे त्या बर्फांत अडकून पडलें होतें. त्यावरील अन्नसामुग्री आणि पाणीहि खलास झालें होतें. त्यावरील माणसांनीं जीविताची आशा सोडली होती. आणि अशा स्थितींत अनपेक्षित मदत घांवून आलेली पाहतांच त्या लोकांना किती आनंद झाला असेल तो काय वर्णन करावा ?

त्या दुर्दैवी जहाजावरील माणसें होडक्यांत घेतलीं जात असतांना ब्रूस एकदम दचकला. कारण आपल्या फत्तेमारीवरील खोलींत कांहीं काळापूर्वी पाहिलेला तिऱ्हाईत माणूस त्याला त्या मंडळींत दिसला. त्यावेळीं त्या माणसाच्या अंगावरील पोषाखही जसा त्यानें पाहिला होता तसाच होता. आणि मग तो आपल्या कप्तानाच्या कानांत पुटपुटला, "मला जें आपल्या फत्तेमारीवर दिसलं तें भूत नव्हतं. तो जिवंत माणूस आहे."

"काय म्हणतोस तूं ? कोण जिवंत आहे ?" कप्तान आश्चर्यानें म्हणाला.

"महाराज, आपण आतां वांचविलेल्या उतारूंपैकीं तो एक आहे हें मी न्यायासनासमोर शपथपूर्वक सांगेन."

" दाखव मला तो माणूस. हा सारा प्रकार अधिकाधिक अस्वाभाविक होत चालला आहे."

ज्यावेळीं व्रूस त्या माणसाच्या समोर जाऊन उभा राहिला त्यावेळीं तो माणूस त्या दुर्दैवी जहाजावरील कप्तानाशीं बोलत उभा होता. त्या दोघांनीं व्रूसचे व त्याच्या कप्तानाचे आभार मानले. व्रूसनें व त्याच्या कप्तानानें त्याला आपल्या फत्तेमारीवरील खोलींत नेलें. कप्तानानें त्याच्यापुढें पाटी करून म्हटलें या पाटीवर 'Steer to the North West असे शब्द जरा लिही."

तो माणूस थोडासा स्तंभित झाल्यासारखा दिसला. हे शब्द पाटीवर कां लिहावयाचे तें त्याला समजेना. परंतु आपल्याला जीवदान देणाऱ्या माणसाच्या विनंतीवरून त्यानें तें शब्द त्या पाटीवर लिहिले. मग कप्तानानें थोडा वेळ बाजूला जाऊन तीच पाटी उलटी करून त्याच्यासमोर धरली व म्हटलें, 'तुझं म्हणणं असं आहे कीं हें तुझं हस्ताक्षर आहे ?"

" अलबत्. कारण आत्तां मी हे तुमच्या समोरच लिहिलं कीं."

" आणि मग हें हस्ताक्षर कुणाचं ?" कप्तानानें फिरविलेली पाटी त्याच्यापुढें धरून म्हटलें.

त्या माणसानें ती पाटी हातांत घेऊन उलटी पालटी करून पाहिली. ही काय जादू झाली हें न समजून तो म्हणाला, " दोन्ही बाजूचें हस्ताक्षर माझेंच आहे. पण मी तर ते शब्द एकदांच लिहिलें. मग दुसरे कोणाचे ?"

" हा माझा सहाध्यायी व्रूस म्हणतो कीं तूंच ते या खोलींतील या टेबलावर बसून लिहिलेस."

दोन्ही जहाजांचे कप्तान एकमेकांकडे टकमका पाहूं लागले. त्या दुर्दैवी जहाजावरील कप्तानानें आपल्या माणसाला विचारलें, " प्रत्यक्ष नव्हे, पण स्वप्नांत तूं हे शब्द या पाटीवर लिहिलेले तुला आठवतें काय ?'

'नाहीं महाराज, मला आठवत नाहीं.'

व्रूसच्या कप्तानानें त्या दुसऱ्या कप्तानास विचारलें, " आज दुपारीं हा माणूस काय करीत होता ? हा सर्व प्रकार अत्यंत गूढ आणि असामान्य असा आहे." त्या उताऱ्याकडे बोट दाखवून त्या दुसऱ्या कप्तानानें म्हटलें, " अगदीं थकून गेल्यामुळें हा माणस दुपारीं गाढ झोंपला होता.

सुमारें तास सव्वातास झोपल्यानंतर त्याला जाग आली आणि तो मला म्हणाला, ' कप्तानसाहेब, आज आपली सुटका होणार ! ' मी त्याला तसें आश्वासन देण्याचें कारण विचारलें, तेव्हां तो म्हणाला, ' मला असें स्वप्न पडलें कीं एक फत्तेमारी आपली सोडवणूक करण्याकरितां याच दिशेनें धाऊन येत आहे ! ' त्यानें स्वप्नांत पाहिलेल्या फत्तेमारीचें वर्णन केलें तें अगदीं हुबेहूब तुमच्या फत्तमारीला लागूं पडण्यासारखें आहे. आणि आम्हांला जेव्हां तुमची फत्तेमारी धाऊन येत असतांना दिसली तेव्हां तर आम्हीं थक्कच झालों. मी ही हकीकत सर्व कांहीं स्थिरस्थावर झाल्यावर सांगणारच होतों. पण पाहातों तों तुम्हींच या विषयाला तोंड फोडलें. आपल्या पाटीवरच्या त्या संदेशानें एवढ्या माणसांचे जीव वांचविले ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे."

मग घडलेले प्रकार एकमेकांनीं एकमेकांस सांगितले आणि ते सर्व लोक ईश्वरी योजनेचें कौतुक करीत राहिले.

कर्मधर्मसंयोगानें आपत्तींतून सुटका व्हावयाची असली म्हणज कधीं कधी कसे अद्भुत प्रसंग घडतात याचा प्रत्यय वरील हकीकतीवरून येतो. वाचकांपैकीं कित्येकांच्या आयुष्यांत अद्भुत हकीकती घडल्या असतीलहि. त्यांनीं आपल्या अनुभवांशीं वरील हकीकत ताडून पहावी. आणीबाणीच्या वेळीं माणसाच्या सुप्त शक्ति जागृत करण्याची निसर्गाची योजना आहे. त्या दुर्दैवी जहाजावरील तो माणूस स्वप्नांत आपल्या सूक्ष्म देहानें कांहीं मैलांवरून जाणाऱ्या जहाजावर गेला.

कारण स्वतःच्या आणि इतरांच्या सुटकेची अतीवोत्कंठा त्याला लागून राहिली होती. संधी साधून पाटीवर त्यानें ते शब्द लिहिले. स्वप्नांतील जाणीव पुष्कळदां मेंदूंत जशीच्या तशीच उतरत नसल्यामुळें त्या माणसाच्या फक्त फत्तेमारीच तेवढी लक्षांत राहिली.

जिवंतपणीं माणसांच्या आयुष्यांत कधीं कधीं अत्यंत भावनोत्कट असे प्रसंग घडतात. या प्रसंगांचीं चित्रें कधीं कधीं निसर्गांत मुद्रित केलीं जातात आणि त्या माणसांच्या मृत्यूनंतर कधीं कधीं तीं चित्रें चलच्चित्रपटावर जशीं दिसावीं तशीं दिसूं शकतात. असल्या प्रकारच्या एका अनुभवाची हकीकत मिसेस् एम्. नांवाच्या एका बाईनें सांगितली. ती

फ्रेडरिक मायर्स यांनीं आपल्या ग्रंथांत नमूद करून ठेवली आहे—

'त्या रमणीय घराचा कांहीं भाग जुना होता व कांहीं नवीन होता. आमच्या झोपण्याच्या खोल्या त्या घराच्या जुन्या भागांत होत्या. एके रात्रीं अकराच्या सुमारास मी माझ्या बिछान्यावर अंग टाकीत होते. इतक्यांत विशिष्ट प्रकारचें रुदन माझ्या कानांवर आलें. मनावर अतीव दुःखाचें दडपण पडल्यामुळें कुणीतरी दुःखानें हुंदके देत होतें. मी लक्षपूर्वक कानोसा घेतला. ते हुंदके चालूच होते. दिवा मोठा करून मी खिडकीचा पडदा बाजूला केला, तों खालीं गवतावर एक अत्यंत सुंदर तरुण मुलगी एका सैनिकासमोर गुडघे टेकून हुंदके देत देत व आपले हात घट्ट धरून त्याच्यापाशीं क्षमेची याचना करीत होती. त्या मुलीची दया येऊन मी ताबडतोब जिना उतरून खालीं हिरवळीवर गेले, आणि त्या मुलीला तिच्या दुःखाचें कारण मला निवेदन करण्यास सांगितलें. परंतु त्या आकृत्या नाहींशा झाल्या !'

'मिसेस् एम्. यांनीं ताबडतोब वर जाऊन एका कागदावर आठवणीसाठीं लिहून ठेवलें— March 13 th 1886. Have just seen visions on Lawn:– A soldier in General's Uniform, a young lady kneeling to him. 11–40. p. m.

त्या दृश्याच्या पाठीमागील इतिहास असा आहे— त्या घरांत राहाणाऱ्या जुन्या कुटुंबांतील एका तरुण मुलीला व्यभिचारापासून एक मूल झालें होतें; तेव्हांपासून त्या दीन अबलेचा तिच्या आईबापांनीं व नातेवाइकांनीं अजीबात संबंध सोडून दिला, आणि ती भग्नहृदयी अबला एके दिवशीं मरून गेली. तो सैनिक तिचा एक जवळचा नातलग होता. होऊं नये गोष्ट झाली, परंतु आतां आपणांला आपल्या अपराधाचो क्षमा करावी, म्हणून तिनें त्या अधिकारी सैनिकापाशीं अनेक वेळां व्यर्थ याचना केली होती. तो सेनापति त्याच घरांत जन्माला येऊन त्याच घरांत मेला होता. त्या मुलीवरची ती आपत्ती १८४७–४८ सालीं आली होती.'
(Human Personality and its servival of Bodily Death पृष्ठें ३८३–३८४ खंड २ रा)

या प्रकारास मायर्सनें Veridical after image (कालांतराची

सन्प्रतिमा) असें नांव दिलें आहे. जो देखावा मिसेस् एम्. यांना दिसला तो त्या देखाव्यांतील माणसांकडून त्यांच्या जिवंतपणीं अभिनीत झाला होता. चाललेल्या मार्गावर पायाचा ठसा उमटावा तसा माणसाच्या भावनोत्कट कृतींचा ठसा निसर्गांत उमटत असतो. मानवी कृतींचा आणि मनोव्यापारांचा शास्त्रज्ञांना सांपडलेला हा एक विशिष्ट पुरावा आहे. अशाच प्रकारची दुसरी एक घटना मिस्टर D. M. Tyre 157 St, Andrew's Road, Pollokshialds Glasgow यांनीं १८८५ सालीं निवेदन केली आहे –

" आम्हीं १८७४ च्या उन्हाळ्याच्या सुट्टींत एका टकडीवरील सुंदर बंगल्यांत रहावयास गेलों होतों. माझ्या दोन बहिणी आणि मी प्रथम मे महिन्यांत त्या बंगल्यावर गेलों तेव्हां त्या बंगल्याचा माळी व त्याची बायको एवढीच आम्हांला जवळची सोबत होती.

" एके दिवशीं माझी मोठी बहीण जे. ही कांहीं कामानिमित्त खालच्या एका खेड्यांत गेली होती. दुपार टळून गेली तरी ती आली नाहीं, म्हणून माझी धाकटी बहीण एल्. हिला त्या बंगल्यावर एकटीच सोडून मी जे. ला पहावयास गेलों. जे मला अर्ध्या वाटेवर भेटली, आणि आम्ही दोघें परत येत असतांना म्हणजे संध्याकाळीं सुमारें ६ च्या सुमारास आम्हांला भेटण्यासाठीं एल् टेकडीवरून खाली येत असलेली आम्हांला दिसली. ती कावरीबावरी झाली होती. आम्हांला ती म्हणाली, " माझ्या पलंगावर एक म्हातारी बाई येऊन निजली आहे. !" आम्ही तिला विचारलें, " तुझ्या माहितीची आहे का ती बाई ?"

एल्. म्हणाली ' ती बाई कपडे घालून पलंगावर पडली आहे. बहुधा ती जिप्सी जातीची असावी. ती असतांना मला खोलींत जायला भीति वाटते. "

आम्ही आमच्या बंगल्यांत गेलों तेव्हां स्वयंपाक खोलीपाशीं जाऊन एल्. म्हणाली, " ती आहे पहा तिथें. ' तिचा असा समज होता कीं आम्हीं त्या बाईला जाऊन हलवूं आणि ती कोण आहे तें तिला विचारूं. पण मला व माझ्या मोठ्या बहिणीला त्या अत्यंत व्यवस्थित अशा बिछान्यावर कुणींच दिसलें नाहीं. तेव्हां एल्. म्हणाली, 'ती पहा म्हतारी. तिचं

डोकं त्या खिडकीच्या बाजूला आहे.' परंतु आम्हांला त्या बिछान्यावर कोणतीच आकृति दिसत नव्हती. तेव्हां आपण भूत पाहिलें या समजुतीनें ती थरथरूं लागली. आमच्या मनाला तसें कांहीं वाटलें नाहीं. आम्हीं चूल पेटवून रात्रीचें जेवण शिजविण्यास लागलों. एल्. ला कांहींतरी भास झाला असें सांगून आम्ही तिची समजूत केली. दोन दिवस ठीक गेले आणि पुन्हां तिसऱ्या दिवशीं आम्हीं संध्याकाळच्या सुमारास शेकोटी करून भोंवतीं बसलों असतांना एल्. घाबऱ्या घाबऱ्या येऊन म्हणाली,' पुन्हां ती बाई येऊन तशीच निजली आहे!' यावेळीं ती पूर्वीइतकी घाबरलेली दिसत नव्हती. म्हणून आम्हीं तिला त्या आकृतीचें वर्णन विचारलें. त्या पलंगाकडे टक लावून आणि आपलें बोट फिरवीत ती म्हणाली, ' ती पहा, तिनें आपले कपडे आणि बूट घातले आहेत. पाय जवळ ओढून घेतले आहेत. जणूं काय तिला थंडी लागत आहे. तिनें आपलें तोंड भिंतीच्या बाजूला वळवलं आहे आणि म्हाताऱ्याच बायका वापरतात तशी पांढरी टोपी तिनें डोक्यावर घातली आहे.' तिच्या अंगावरच्या इतर कपड्यांचेंही तिनें व्यवस्थित वर्णन केलें आणि नंतर ती म्हणाली, ' मला तिचा चेहरा दिसत नाहीं. उजव्या हातानें ती आपला डावा हात आवळीत आहे. तो हात पिवळा पडलेला आणि बारीक आहे. आयुष्यभर अत्यंत काबाडकष्ट करणाऱ्या म्हाताऱ्या माणसांच्या सुरकुतलेल्या हातासारखा तो हात आहे.'

आम्ही पुष्कळ वेळ त्या पलंगाकडे पाहात बसलों परंतु आम्हांला ती आकृती दिसली नाहीं. हा प्रकार पुष्कळ वेळां घडूं लागला आणि आम्हांला त्याची संवयच झाली म्हणाना. एकदां माझ्या मोठ्या बहिणीनें हा प्रकार आमच्या जवळच्या बंगल्यांत राहणाऱ्या मिसेस् एम्. पी. नांवाच्या एका बाईला वर्णन केला. तो ऐकून एम्. पी. ला जवळ जवळ मूर्च्छाच आली. कारण तें वर्णन आमच्या-- पूर्वी त्या बंगल्यांत राहणाऱ्या एका माणसाच्या पहिल्या बायकोच्या मृत्युशय्येवरील वर्णनाला हुबेहुब लागूं पडण्यासारखें होतें. मग एम्. पी. बाईनें थोडा पूर्वेतिहास सांगितला.

" मालकम् आणि त्याची म्हातारी बायको केट यांचें जीवन एके

ठिकाणीं राहणाऱ्या कुत्र्या–मांजराप्रमाणें होतें. ती कष्टाळू होती. शक्य असेल तेव्हां तो दारू पिऊन बेहोष होत असे. एके दिवशीं तें दांपत्य बाजाराला गेलें होतें आणि परत येतांना मालकमनें अर्धा गॅलन व्हिस्की विकत घेतली. रस्त्यांत कांहीं वेळ त्यानें ती हातांत धरली होती, आणि दमल्यावर त्यानें तो बोजा आपल्या बायकोजवळ दिला. चालतां चालतां तो वाटेंत अनेक वेळां विश्रांति घेत होता. केट मात्र हळु हळु चालत त्याच्या अगोदर घरीं येऊन पोहोंचली. तो उशीरानें घरीं आला आणि त्याच्या सुरईंतील दारू प्याल्याचा त्यानें तिच्यावर आरोप केला आणि तिला बेदम मारली. नंतर तो घाबरला आणि केट अतिशय आजारी असल्याचें मला त्यानें सांगितलें. मी मालकमच्या बंगल्यावर जाऊन केटला पाहिली, तेव्हांची तिची अवस्था एल. नें वर्णन केल्याप्रमाणेंच होती. नवऱ्याच्या मारामुळें काळानिळा पडलेला चेहेरा तिनें भिंतीच्या बाजूला लपविला होता. त्या दुखण्यांतून ती कधींच उठली नाहीं.''
(Proceedings S. P. R. Vol V P. 418)

या हकीकतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं केट शारीरिक आणि मानसिक दुःखाच्या अवस्थेंत होरपळून मेली. ती मेली तरी तिचें विचारचित्र तिच्या मृत्युशय्येवर राहून गेलें. ती फक्त एल्. लाच कां दिसली हें सांगतां येत नाहीं. तें पिशाच्च नव्हतें खास. कारण त्या आकृतीनें खुणा केल्या नाहींत किंवा कुणाशीं बोलण्याचाही प्रयत्न केला नाहीं. जडदेहाशीं असलेला तिचा संबंध सुटल्यावर जडदेहाबरोबर तें दुःख नष्ट झालें. परंतु तिच्या मनांतल्या दुःखाच्या, क्रोधाच्या आणि कदाचित् सूडाच्या जोरदार भावना उसळल्या असतील. परंतु त्यामुळ मरणोत्तर जडसृष्टीशीं तिनें संबंध ठेवला असें संभवत नाहीं. मूर्खपणाच्या आणि क्रोधाच्या भरांत माणसांच्या हातून आततायीपणा होतो, त्याचे परिणाम कसे टिकाऊ आणि भयंकर असतात हें वरील गोष्टीवरून सिद्ध होतें.

रेव्हरेंड लेडबीटर यांना एकदां आपली स्वतःचीच आकृति स्वतः पहाण्याचा प्रसंग आला होता. तो प्रकार त्यांनी आपल्या The other side of Death नामक पुस्तकांत वर्णन केला आहे--

" मी एका गांवांत एका चर्चचा धर्मोपदेशक होतों. थोड्याच दिवसांपूर्वी घडलेल्या अपघातामुळें मला बरीच क्षीणता आली होती आणि रविवारचें तें भरपूर काम करण्याची माझ्या अंगांत ताकद नव्हती.

" परंतु कशीबशीं तीं सर्व धार्मिक कर्मे पार पाडणें भागच असल्यामुळें त्या दिवशीचें शेवटचें प्रवचन मी आटोपलें तेव्हां मला फार थकवा आला होता. निःसंशय माझ्या हातून तीं कार्यें पार पडत असतां मला विश्रांतीची ओढ लागली असली पाहिजे. कांहीं का असेना मी जेव्हां काम आटोपून माझ्या खोलीकडे परतलों तेव्हां मला स्वतःलाच त्या ठिकाणीं पाहून दचकलो. त्या खोलींत एकच खुर्ची होती आणि तिच्यावर माझी आकृति बसली होती. त्या आकृतीच्या अंगावरील झगा वगैरे हुबेहूब माझ्या अंगावर त्या वेळीं असलेल्या झग्याप्रमाणें होता. आणि ती आकृति त्या खुर्चीवर शांतपणें माझ्याकडे पाहात बसली होती. मी ऐकलें होतें कीं अशा प्रकारचें स्वतःचें पिशाच्च दिसणें म्हणजे स्वतःचें मरण जवळ आल्याचें निदर्शक आहे; परंतु तसल्या प्रकारच्या विचाराची मला पर्वादेखील नव्हती.[1]

' मी त्या माझ्या आभासमय पिशाच्चापाशीं चालत गलों आणि त्या खुर्चीवर बसलों. त्या आकृतीचें काय झालें तें मला माहीत नाहीं, परंतु मी दहा मिनिटें विश्रांति घऊन त्या खुर्चीवरून उठलों त्यावेळीं ती आकृति नाहींशी झाली होती. "

" चर्चमधील तीं प्रवचनादि कार्यें माझ्या हातून पार पाडलीं जात असतां त्या माझ्या थकलेल्या दहाला विश्रांतीची नुसती ओढ लागली होती. आणि त्याचा परिणाम असा झाला कीं माझ्या अंतर्मनानें तें विचारचित्र प्रत्यक्ष निर्माण करून विश्रांति घेतली. "

डॉ. जॉर्ज वाईड यांनीही वरील हकीकतीला सदृश असा अनुभव

---

१ हा प्रकार लेडबीटर साहेबांच्या तरुणपणीं घडला. The other side of Death या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १९२८ सालीं प्रसिद्ध झाली. साहेब वयाच्या ८७ व्या वर्षी, १९३३ सालीं इहलोक सोडून गेले.

सांगितला आहे.

' मिस जॅक्सन नांवाची ती तरुणी गरिबांची काळजी वाहण्यांत अत्यंत दक्ष होती. सर्व दिवस दया–धर्माच्या कामांत घालून ती अगदीं थकून घरीं जात होती. कडक थंडीमुळें तिला अस्वस्थता आली होती. आणि तिनें असें ठरविलें होतें कीं घरीं गेल्यावरोबर स्वयंपाक खोलींतील शेगडी-जवळ जाऊन आपण थोडी ऊब घेऊं. मिस जॅक्सनच्या मनांत ज्या क्षणाला ही कल्पना आली त्याच क्षणीं तिच्या घरच्या त्या स्वयंपाक खोलींत त्यावेळीं असलेल्या दोन मोलकरणींना दरवाजा उघडून मालकीण घरांत आलेली दिसली. ती विस्तवाजवळ गेली आणि तिनें आपल्या हातांना शेक दिला. तिच्या हातावर असलेल्या हिरव्या रंगाच्या मोज्यांवर त्या मोलकरणीचें लक्ष वेधलें गेलें. आणि काय चमत्कार–ती त्यांच्या डोळ्यां-समक्ष अदृश्य झाली ! तोंडाचा चंबू करून त्या आपल्या धाकट्या माल-किणीच्या आईकडे गेल्या आणि त्यांनीं तें वृत्त तिला निवेदन केलें.

' मिस–जॅक्सनच्या आईनें थोडा विचार करून म्हटलें, ' माझी मुलगी हिरवे मोजे कधींच घालीत नाहीं. तुम्हीं तिला पाहिली म्हणतां, पण तो तुमचा निव्वळ भ्रम असला पाहिजे !'

' अर्ध्या तासानंतर मिस् जॅक्सन प्रत्यक्ष घरीं आली. ती सरळ स्वयं-पाकगृहांत गेली आणि विस्तवापाशीं तिनें स्वतःला चांगली ऊब घेतली. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं नेहमींचे तिचे काळे मोजे तिला वेळेवर न सांपडल्यामुळें तिनें हिरवे मोजे हातावर चढविले होते.

(Light 1882 पृष्ठ २६)

वाचकांपैकीं कित्येकांना अनुभव असेल कीं तहान लागली असतांना पाणी न पितां आपण झोपलों कीं स्वप्नांत कुठेंतरी जाऊन आपण पाणी पितों. आपला आवडता माणूस बरेच दिवस आपणाला भेटला नाहीं आणि त्याला पाहण्याची अतीवोत्कंठा आपल्याला लागली म्हणजे स्वप्नांत आपण त्याला जाऊन भेटतों, परंतु मनांतली इच्छा जबरदस्त असली म्हणजे जागेपणींहि असले प्रकार होतात.

Dublin University magazine मध्यें प्रसिद्ध झालेली हकीकत रेव्हरेंड लेडबीटर यांनीं आपल्या पुस्तकांत उद्धृत केली आहे—

'एका गृहस्थानें एकदां आपल्या घरीं जाऊन आपल्या नोकराला चकित केलें. आपल्या धन्याला पाहून तो म्हणाला, 'अरे बापरे ! साहेब, तुम्हीं आज लवकर आलांत !' त्यानें आपल्या धन्याला घरांत घेतलें. वर खोलींत जाऊन कपडे काढून पलंगावर अंग टाकतांना पाहिलें. परंतु कांहीं काळानंतर तो वर खोलींत जाऊन पाहातो तों मालक नाहीं, मालकाचे कपडे नाहींत, परंतु पलंग मात्र कुणीतरी त्यावर झोपून उठल्यावर दिसतो तसा दिसत होता.

'प्रकार असा घडला होता कीं तो मालक आपल्या कामावर असतांना त्याला अतिशय थकवा आला होता आणि त्यामुळें त्याला गुंगी आली आणि त्या गुंगींत आपण घरीं नाहीं हें तो विसरून गेला. (मिसेस् कॉवेकृत The Night Side of Nature पृष्ठ १८१)

कांहीं विशिष्ट प्रसंगीं जिवन्त माणूस आपल्या सूक्ष्म देहानें दूर अंतरावर जाऊं शकतो. जडत्व धारण केलेला त्याचा सूक्ष्म देह दुसऱ्या माणसाला दिसूंहि शकतो. याचें एक उदाहरण Mr. Elliot o'Domuel यांनीं आपल्या Ghosts Helpful and Harmful नामक पुस्तकांत दिलें आहे.

आत्महत्त्येपासून सुटका

'मिस्टर के नांवाचे एक गृहस्थ एके दिवशीं दुपारीं आपल्या खोलींत बसले असतां त्यांचा डोळा लागला आणि मग त्यांना असें दिसलें कीं, त्या शहरांतील दुसऱ्या एका भागांत राहणारा त्यांचा मित्र बी. दार उघडून अगदीं हलक्या पावलानें आंत आला. तो कशाला आला आहे हें के. त्याला विचारणार इतक्यांत त्यानें आपल्या खिशांतून एक वस्तरा काढला, तो उघडला आणि गळ्याजवळ नेला. बी. आतां आपला घात करणार हें जाणून के. यांनीं धावरून खुर्चीवरून उडी मारली. बी. ची व त्यांचीं जोराची झटपट झाली आणि अखेर दोघेही धाडकन् जमिनीवर आदळले. तत्काळ मिस्टर के. यांस जाग आली. आपण अनुभविलें तें स्वप्न कीं सत्य हें त्यांस कळेना. आपल्या हाताच्या घड्याळाची कांचदेखील फुटली आहे हें त्यांनी पाहिलें. आपल्याला झोंप लागण्यापूर्वी ती काच शाबूत अस-

त्याची त्यांची खात्री होती.

'दुसऱ्या दिवशीं वाटेंत के. यांना त्यांचा मित्र बी. भेटला. त्याचा पांढरा फिक्कट आणि आजारी पडलेला चेहरा पाहून के. यांना धक्काच बसला. बी. होता त्यापेक्षां बारा वर्षांनीं अधिक म्हातारा झाल्यासारखा दिसला त्यांना.

'आणि मग बी. म्हणाला, 'मित्रा, मला एक मोठा विचित्र अनुभव आला. अलीकडे माझी परिस्थिति कांहीं ठीक नसल्यामुळें काल गळा कापून जीव देण्याचा विचार मी नक्की केला होता, आणि माझ्या निजावयाच्या खोलींत मी तें कृत्य करणार इतक्यांत तूं येऊन माझा हात पकडलास. तुला आश्चर्य वाटेल, पण मी सांगतों आहें तें अगदीं सत्य आहे. तूं माझें उजवें मनगट पकडलेंस. मला कल्पना नव्हती कीं तूं इतका मजबूत असशील. आपली दोघांची जोराची झटापट झाली आणि शेवटीं आपण दोघेहि जमिनीवर आदळलों. आणि चमत्कार घडला तो यानंतरच. ज्याच्याबरोबर माझी घडपड झाली तो तूं एकाएकीं नाहींसा झालास. एक क्षणभर तरी माझी सुटका करण्याकरितां मी तुझ्या गळ्याभोंवतीं विळखा घातला होता; पण दुसऱ्याच क्षणीं मला कळून आलें कीं माझ्या पकडींत कांहींच नव्हतें. या प्रकाराचें तूं स्पष्टीकरण करूं शकशील काय?'

'नंतर मिस्टर के. यांनी आपला अनुभव बी. यांस सांगितला आणि दोघांनींही आपापलीं टिपणें ताडून पाहिल्यावर अगदीं एकाच वेळीं आपणास तो अनुभव आला अशी त्यांची खात्री झाली.

मानवतेला लाज आणणारीं अशीं कित्येक क्रूर कृत्यें कांहीं दुष्ट लोकांनीं वेळोवेळीं केलेलीं आहेत. या कृत्यांचे ठसे ज्या ज्या ठिकाणीं तीं कृत्यें केलीं गेलीं त्या त्या ठिकाणीं विचारचित्राच्या रूपानें अनेक वर्षेपर्यंत राहूं शकतात. या विचारचित्रानांच लोक गैरसमजुतीनें पिशाच्च म्हणून मानीत असतात. नौखाली, पंजाब आणि हैद्राबाद संस्थानांत अलीकडे जे निर्दय आणि अमानुष अत्याचार घडले त्यांचीं कांहीं विचारचित्रें तीं माणसें जरी इहलोकांतून नाहींशीं झालीं तरी निसर्गांत राहून गलीं असतील. एका माणसानें असल्याच प्रकारचा सांगितलेला एक अनुभव Real Ghosts Stories नामक पुस्तकांत ग्रंथित झाला आहे.

गेल्या वीस वर्षांत मी त्या रस्त्यावरून अनेक वेळां गेलों आहें; पण मी सांगणार आहें तसल्या प्रकारचा विचित्र अनुभव मला गल्या सोमवारच्या संध्याकाळपर्यंत आला नव्हता. त्या दिवशीं संध्याकाळीं मी चार हातावरुन[1] माझ्या घोडीवरून चाललों असतांना डाव्या बाजूच्या रस्त्यावरून माझ्या मार्गाच्या काटकोनांत करडचा रंगाच्या घोडचावर बसलेला दुसरा एक माणूस येत होता. मी त्याच्या घोडचाच्या डोक्याजवळून गेलों तेव्हां त्याला Good Night म्हणून म्हणालों. परंतु त्याचं प्रत्युत्तर न आल्यामुळं त्याच्या डोळचांवर झोपबीप आहे कीं काय तें जाणण्याकरितां मी वळून पाहिलें तों घोडाही नाहीं आणि स्वारही नाहीं. मी माझी घोडी वळवून चारी रस्त्यांवर दृष्टी फेकली परंतु तो घोडेस्वार मला दिसला नाहीं. मग मी तिथून जवळच असलेल्या गवताच्या शेताकड जाणाऱ्या रस्त्यावरील फाटकाजवळ जाऊन सर्वत्र पाहिलें तरीही मला कांहीं दिसलें नाहीं. तेव्हां माझी खात्री झाली कीं आपल्याला जें कांहीं दिसलें तें अमानुष होतें. आणि त्या विचाराबरोबर माझ्या अंगावर शहारे आले. तिथून जवळच असलेल्या एका शेतावर माझें कांहीं काम होतें तें उरकून मी निघालों तेव्हां त्या शेतकऱ्यानें हकीकत सांगितली——

चोवीस वर्षांपूर्वीची गोष्ट. इथला एक गिरणीवाला बाजारांतून संध्याकाळच्या वेळीं परत येत असतांना कुणीतरी वाटमाऱ्यानें त्या चारहातावर त्याचा खून केला. तेव्हांपासून फिक्कट रंगाचे कपडे घालून करडचा घोडचावरून जाणारी त्याची आकृति पुष्कळांनीं पाहिली आहे.

वरील उदाहरणावरून असें दिसतें कीं घोडचावर बसलेली जी आकृति लोकांना गिरणीवाल्याच्या खुनानंतर चोवीस वर्षांनींदेखील दिसत असे तें गिरणीवाल्याचें पिशाच्च नसावें. कारण त्या आकृतींतून रक्त गळत नव्हतें कीं शस्त्रघाताच्या खुणाही नव्हत्या. त्या आकृतीवर गिरणीवाल्याचा खून करणारा माणूस कुठेंतरी आधीं लपून बसला असेल आणि त्याला ती आपली शिकार जशी रस्त्यावरून येतांना दिसली त्या आकृतीचें तें विचारचित्र राहून गेलें असावें.

---

१ चार रस्ते एके ठिकाणीं मिळतात तो नाका.

वरील विविध उदाहरणावरून ठिकठिकाणीं अमावस्या पौर्णिमेला कुणाकुणाला दिसणाऱ्या पिशाच्च्यांच्या ज्या दंतकथा आहेत त्यांच्या मुळाशीं कोणतें तत्व आहे याची कल्पना सूज्ञ वाचकांस आलीच असेल. हें झालें आकृतीविषयीं, पण निसर्गांत ठिकठिकाणीं दृश्य कारणाशिवाय आवाज ऐकूं येतांच त्यांचें काय ? ही बाबदेखील विचार करण्यासारखी आहे. प्रस्तुत प्रकरण फार वाढलें असल्याकारणानें निसर्गांतील या गूढ ध्वनीविषयीं पुढील प्रकरणांत विवरण करूं.

० ० ०

३ : निसर्गांतील ध्वनिमुद्रित व आकाशवाणी

कांहीं घरांत, पडक्या वाड्यांत, माळरानांवर अथवा अनेक ऐकूं निर-निराळ्या ठिकाणीं कारणाशिवाय विविक्षित प्रकारचे आवाज येण्या-संबंधीच्या गोष्टी कितीतरी लोकांच्या कानीं आल्या असतील. सर्वसाधारण लोकांची अशी समजूत असते कीं पिशाच्चें असल्या प्रकारचे आवाज काढून माणसांना भिववीत असतात. परंतु वास्तविक त्या आवाजांचा पिशाच्चांशीं कांहींएक संबंध नसून निसर्गांतल्या ध्वनिमुद्रितांचे ते पुरावे असतात. ज्याप्रमाणें गवई एकदांच गातो आणि त्याचें गाणें ग्रामोफोनच्या तबकडीवर घेण्यांत येतें आणि मग ती तबकडी अनेक लोकांना अनेक वेळां तें गाणें ऐकवूं शकते, त्याप्रमाणें निसर्गांत निनादित झालेल्या ध्वनींचें कधीं कधीं आपोआप मुद्रण होतें व ते ध्वनी कधीं कधीं तसेच्या तसे उमटून माणसांना ऐकूं येतात. या प्रकारचा एक अनुभव रेव्हरेंड लेड-बीटर यांनीं सांगितला आहे.

"त्यावेळीं मी लंडनच्या एका उपनगरांत राहात होतों. एका उघड्या माळरानावरून गांवापासून स्टेशनला जोडणारा असा एक नवा रस्ता बांधला जात होता. रस्त्याचा मध्यभाग जरी अजून पुरा झाला नव्हता तरी दोन्ही बाजूच्या दगडी पाऊल वाटा जवळजवळ तयार झाल्या होत्या

आणि त्या पाऊलवाटांचाच उपयोग त्या रस्त्यानें जाणारीं माणसें करीत. त्या नव्या रस्त्याची लांबी सुमारें एक मैल होती. बहुधा त्या रस्त्याचा जवळचा मार्ग म्हणून लोक दिवसा उपयोग करीत. त्या रस्त्याला अजून दिवे न आल्याकारणानें लोक रात्रीं त्याचा फारसा उपयोग करीत नसत. लवकरच त्या रस्त्याची अपकीर्ति पसरली. त्या रस्त्यावर भताटकी आहे असें लोक म्हणूं लागले. सूर्यास्तानंतर एकटा दुकटा माणूस त्या रस्त्यावरून जात नसे.

" एका शांत अशा चांदण्या रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमारास मी सहज फिरत फिरत त्या रस्त्यावरून चाललों होतों. बाजूच्या शेतावर धुकें तरंगत होतें तरीसुद्धां त्या रस्त्यावरचा मागला पुढचा चढउतार मला स्वच्छ दिसत होता. मी साधारण अर्धा रस्ता चालून गेलों. माझ्या दृष्टीच्या टप्प्यांत एकहि माणूस नव्हतें आणि मला एकाएकीं कुणातरी जीव घेऊन पळत असलेल्या माणसाच्या पावलांचा आवाज यावा तसा आवाज आला. ज्या भीतीनें आणि संभ्रमित त्वरेनें तीं पावलें दणादण त्या दगडी पाऊलवाटेनें पळत होतीं त्या तऱ्हेचें मला शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं. माझ्या मनांत असं आलं कीं कुणीतरी घाबरलं आहे. त्याला कांहींतरी दिसलं असलं पाहिजे किंवा त्याची कांहींतरी कल्पना झाली असली पाहिजे. परंतु तो माणूस कुठें होता ? ती पावलांची बेडी आणि रानवट धडधड प्रत्यक्ष माझ्या पायांखालीं आली आणि जशी ती लांबून माझ्यासमोर आली तशी ती लांब माझ्यामागें गेली आणि ऐकूं येईनाशी झाली. मी दचकून आश्चर्यचकित होऊन उभा राहिलों. पण प्रत्यक्ष अशी कोणतीहि आकृति मला दिसली नाहीं. त्या रात्रीच्या निवांत वेळीं त्या पावलांचा अगदीं स्पष्ट आवाज मी ऐकला होता. थोडा वेळ त्या जागीं उभा राहून मी जरा सावधगिरीनें पुढें वाट चालूं लागलों. पुढें कांहींच झालं नाहीं. "

या प्रकाराचें स्पष्टीकरण लेडबीटरसाहेबांनीपुढील प्रमाणें केलें आहे--

" निःसंशय त्या रस्त्यावर कुणीतरी माणसानें कांहींतरी भयंकर असें पाहिलें असलें पाहिजे किंवा त्याला भीतिदायक असा भास झाला असला

पाहिजे. आणि म्हणून त्या निर्जन रस्त्यावरून तो त्या मृतवत् वाटणाऱ्या जुन्या रस्त्यावरील दिव्याच्या आणि मनुष्यवस्तीच्या रोखानें पळत गेला असला पाहिजे. त्या पळणाऱ्या आणि पळत असतांना प्रतिध्वनी निर्माण करणाऱ्या पावलांचा ध्वनि निसर्गाच्या कांहीं नियमांनुसार सृष्टीच्या त्या भागांत मुद्रित झाला ! असल्या प्रकारच्या ध्वनिमुद्रिताचे नैसर्गिक नियम अद्याप शास्त्रज्ञांना आकलन झालेले नाहींत. (The other side of Death. पृष्ठें ५५८ ते ५६१)

आवाज ऐकूं आला आणि त्या आवाजाचा निर्माता दिसला नाहीं म्हणजे सहाजिकच कुणालाहि आश्चर्य आणि कधीं कधीं भीतीदेखील वाटते. आणि मग तो चमत्कार भुताटकीच्या सदरांत ढकलण्यांत येतो. कधीं कधीं असले आवाज आपलें मनच निर्माण करीत असतें. मिस्टर जॉस स्टीव्हनसन यांना एकदां असा अनुभव आला होता.

" १८८१ च्या मे महिन्यांतली गोष्ट. एके रविवारीं संध्याकाळीं ५–६ च्या सुमारास आपण केव्हां परत येऊं तें न सांगतां माझा भाऊ बाहेर गेला; परंतु तो असा बाहेर पडला म्हणजे बहुधा रात्रीं १० च्या सुमारास परत येत असे. त्या दिवशीं संध्याकाळीं ७ च्या सुमारास मी खिडकीपाशीं वाचीत बसलों होतों आणि जवळच माझी बायको शेगडी-जवळ बसून शेक घेत होती. इतक्यांत माझ्या कानावर शब्द आले 'David is Comming' डेव्हिड येत आहे. मी माझ्या पत्नीकडे वळून म्हटलें, 'काय म्हणालीस तूं ?'

'कुठें काय, मी एक शब्ददेखील उच्चारला नाहीं.'

त्यानंतर बरोबर ३ मिनिटांनी अगदीं अनपेक्षितरीत्या डेव्हिड परत आला ! (Phantasms of living Vol. II पृ. १००)

मिस्टर जॉस यांना तो भ्रम झाला म्हणावें तर डेव्हिड, ज्यावेळीं त्यांनीं तें वाक्य ऐकिलें त्यावेळीं खरोखरीच घराकडे येत होता. तें वाक्य त्यांनींच फक्त ऐकिले. जवळच असलेल्या त्यांच्या पत्नीस तें ऐकूं आलें नाहीं. जॉस यांचें बाह्य मन तर त्यावेळीं वाचनांत गुंग झालें होतें. अर्थात् डेव्हिडच्या अनपेक्षित आगमनाचा संदेश त्यांच्या अंतर्मनानें

त्यांना दिला असला पाहिजे.

द्रौपदीनें वस्त्रहरणाच्या वेळीं हस्तिनापुरांत प्रभूचा धांवा केला त्यावेळीं—

अवतरला उतराया जो दुःसह दुष्टभार गहिवरला ॥
अहिवरलास्यपटु प्रभु करुणोक्ते द्वारकेंत गहिवरला ॥

असें मोरोपंतांनीं वर्णन केलें आहे. हस्तिनापुरांत मारलेली हांक द्वारकेंत कशी पोहोचूं शकली हें जडवाद्यांना समजत नाहीं. पांच हजार वर्षांपूर्वीची ही गोष्ट सोडून दिली तरी अगदीं अलीकडे साहेब लोकांना असले अनुभव आलेले आहेत.

" १८७९ च्या पावसाळ्यांत एक विचित्र अनुभव मला आला. माझा भाऊ दोन तीन दिवस बाहेर गेला होता. एके दिवशीं संध्याकाळीं पांचच्या सुमारास त्यानें मारलेली हांक मला स्पष्ट ऐकूं आली. मी सर्व घर शोधून पाहिलें आणि आपल्याला कांहींतरी भास झाला असावा अशी मी माझ्या मनाची समजूत करून घेतली. त्यानंतर सहा दिवसांनीं माझा भाऊ गांवाहून परत आला आणि आपण एका अपघातांतून कसें वाचलों त्याची हकीकत त्यानें सांगितली. गाडी पुरती थांबण्यापूर्वीच चालत्या गाडींतूनच नेहमीं घाईघाईनें उतरण्याची त्याला वाईट संवय होती. त्या संवयीप्रमाणें तो उतरावयास गेला असतांना त्याचा पाय निसटला; आणि आपण आतां गाडीखालीं गेलोंच अशा समजुतीनें त्यानें मला निर्वाणीची हांक पडतां पडतां मारली. हातावर तोल सांवरून मोठ्या शिताफीनें त्यानें आपला बचाव केला, म्हणूनच ही हकीकत सांगण्यास तो घरीं येऊं शकला होता. चमत्कार असा कीं ज्या दिवशीं ज्या क्षणीं त्यानें भीतीनें ती हांक मला मारली होती त्या क्षणीं ती मला ऐकू आली होती ! (फ्रेडरिक मायर्सकृत Human Personality हकीकत क्रमांक ६५५ ए)

माणसाच्या मनावर बरा अथवा वाईट कोणताहि जोराचा परिणाम झाला म्हणजे त्या काळच्या त्याच्या वर्तनाचा अवशेष कसा मागें राहातो याचें टी. वेस्टवुड यांनीं एके ठिकाणीं वर्णन केलें आहे.

" एका अत्यंत जुनाट घरांत माझ्या ओळखीच्या दोन प्रौढ अविवाहित बायका राहात होत्या. एकदां मी त्यांचा पाहुणा म्हणून त्यांच्या

घरीं गेलों होतों. मला माझे कपडे बदलावयाचे होते म्हणून त्यांच्या नोकरानें मला वरच्या मजल्यावरील एका खोलींत नेऊन सोडलें. तो नोकर गेल्यावर मला त्या खोलींत कुणाचा तरी आवाज ऐकूं आला. माणूस अतिशय भ्यालेला असावा आणि अशा परिस्थितींत त्याला आपली भीति प्रगट करण्याची बंदी असावी म्हणजे त्याच्या तोंडांतून जसा कापरा आवाज येतो तसा तो आवाज होता. तो आवाज माझ्या अगदीं जवळ होता. प्रथम मला वाटलें कीं खिडकींतून घोंघावणाऱ्या वाऱ्याचा तो आवाज असेल. म्हणून मी त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं; परंतु मी जसजसा खोलींतून इकडे तिकडे फिरूं लागलों तसतसा तो आवाज माझ्याबरोबर येऊं लागला. तेव्हां मला थोडीशी भीति वाटली. त्या आवाजाचें कारण मला समजेना. मी हात–पाय–तोंड धुवून जिना उतरून खालीं दिवाणखान्यांत आलों तरी तो आवाज माझ्याबरोबर खालीं आला. मी इतर माणसांबरोबर जेवावयास बसलों, गप्पा गोष्टी सुरू झाल्या तरी मधून मधून तो आवाज स्पष्टपणें मला ऐकूं येत होता. तो आवाज माझ्याशीं इतका संलग्न होता कीं मी आणि तो एकाच खुर्चीवर होतों असें तिऱ्हाइताला वाटलें असतें. परंतु त्या गडबडींत त्या आवाजाकडे कुणाचें लक्ष गेलें नाहीं आणि मला त्रास देतां देतां तो आवाज बराच वेळ लागलेली उचकी थांबावी त्याप्रमाणें थांबला. त्या रात्रीं त्या खोलींत झोंपण्याचा मला प्रसंग आला नाहीं हें माझें सुदैवच. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या घराच्या त्या दोन मालकिणींना मी त्या आवाजासंबंधीं सांगितलें तेव्हां त्या स्मित करून म्हणाल्या. "आम्हांला त्या आवाजाची आतां इतकी संवय झाली आहे कीं आतां त्याचा आम्हांला मुळींच त्रास होत नाहीं. कित्येक आठवडे तो आवाज आम्हांस कधीं ऐकूं येत नाहीं आणि मग एखाद्या दिवशीं अगदीं हट्टानें आम्ही घरांत जिकडे जाऊं तिकडे तो आमचा पाठलाग करीत येत असतो. मात्र त्या आवाजानें कधींहि कुणालाहि इजा केलेली नाहीं."

"तो आवाज कुठून आणि कसा निर्माण होत होता याचें स्पष्टीकरण त्या मालकिणी करूं शकल्या नाहींत." (Notes and queries of April 5 th 1873)

वरील हकीकतींतील आवाज भतकालांत कुणातरी एखाद्या बलात्कारित व्यक्तीकडून केला गेला असला पाहिजे. ज्या जुलमी माणसाच्या तावडींत ती व्यक्ति सांपडली असेल त्याच्या दहशतीमुळें बलात्कारित व्यक्तीच्या तोंडून निघालेला आवाजहि दबकत दबकतच आला असेल. त्या बलात्कारित व्यक्तीच्या त्या वेळच्या भावना इतक्या उद्दाम असल्या पाहिजेत कीं त्यामुळें तो आवाज कित्येक वर्षेंपर्यंत त्या घरांत राहिला होता.

मेजर मूर यांनीं आपल्या Bealings Bells नांवाच्या एका पुस्तिकेंत हॅम्पशायर येथील 'यूशॉट हाऊस' नामक एका घरांत ऐकूं येणाऱ्या आवाजाविषयीं लिहिलें आहे :–

"रात्री कुटुंबांतील बहुतेक सर्व माणसें झोपीं गेलीं म्हणजे एखाद्या पोकळ भितीवर अथवा जमिनीवर घणाचे घाव मारलें म्हणजे जसे आवाज येतात तसे आवाज एकाएकीं ऐकूं येत. असल्या प्रकारचे आवाज मध्यरात्रीं १२ ते २ च्या दरम्यान ऐकूं येत. कधीं कधीं त्या घावांचा दणका इतका मोठा असे कीं त्यामुळें झोपीं गेलेलीं माणसें जागीं होत. कधीं हे दणके भराभर मारल्याप्रमाणें ऐकूं येत तर कधीं कधीं अगदीं सावकाशपणें काम करणाऱ्या माणसानें घाव घालावे तसा आवाज निर्माण होई. परंतु तो आवाज ज्यानें एकदां ऐकला त्याला त्याचा जनक एकच असावा अशी खात्री झाली असती. तो आवाज घरांतून येत होता कीं घराबाहेरून येत होता हें त्या घरांत राहाणाऱ्या माणसांना कधींच समजलें नाहीं. हे आवाज मधून मधून वीस वर्षें सारखे ऐकूं येत होते. परंतु अनेक प्रयत्न करूनहि त्यांचें मूळ कारण कुणालाच शोधून काढतां आलें नाहीं. त्या घरांत कितीतरी निरनिराळीं कुटुंबें त्या वीस वर्षांत राहून गेलीं आणि त्या सर्व कुटुंबांतील मंडळींनी ते आवाज ऐकले."

माझे मित्र सीतारामपंत हे एकदां आपल्या खेडचांतील घरांत रात्रीं सुखानें झोपले असतांना घराच्या भोंवतालीं असलेल्या वाडींत त्यांनीं खुळखुळ्याच्या काठीचा आवाज ऐकला. तो आवाज दोन चारदां ऐकल्यावर ते जागे झाले. भाद्रपद शुक्ल पक्षाची ती रात्र होती. चांदणें स्वच्छ पडलें होतें. रात्रीं कधींतरी पाऊस पडून गेला होता, त्यामुळें

आकाश बरेंचसें स्वच्छ झालें होतें, तरी आकाशांतून वावरणारा एखाद दुसरा मोठा ढग मधून मधून चंद्राच्या आड येऊन पृथ्वीवर पसरलेल्या चंद्रप्रकाशांत व्यत्यय आणीत होता. सीतारामपंताची अशी समजूत झाली कीं, त्या रात्रीं कुणीतरी खेडूत आपल्या वाडयांतील वेलीवरचे दुधे चोरण्यास आला असावा. पलंगाजवळच्या खिडकींतून डोकावून त्यांनीं वाडीकडे पाहिलें. कुणीही दिसलें नाहीं म्हणून पांघरूण घेऊन ते झोपीं गेले. पुन्हां काठीच्या खुळखुळयाचा आवाज आला. दुधे चोरावयास आलेला चोर कितीही हलक्या पावलांनी आला तरी सापाच्या भीतीनें तो काठी आपटून खुळखुळयाचा आवाज करीत होता अशी खात्री झाल्यामुळें सीतारामपंत अंथरुणांतून उठले व चोराला पकडण्यासाठीं काठी घेऊन वाडींत जावयासाठीं निघाले. मागील दार सताड उघडें पाहून त्यांच्या मनांत आणखी भलती शंका आली. ते तसेच पुढें गेले. पाहातात तों त्यांची म्हातारी आजी पायरीजवळ झालेल्या निसरडचावरून पाय घसरून पडली होती. पायरीचा मार बसल्यामुळें ती वेशुद्ध झाली होती. ती शौचविधीसाठीं बाहेर गेली होती आणि परत घरांत शिरतांना हा असा अपघात घडला होता. बेशुद्ध होण्यापूर्वी तिनें कदाचित् बोंब मारली असेल, परंतु घरांतील निद्रिस्त माणसांना ती ऐकूं गेली नव्हती. दिवस उजाडेपर्यंत ती म्हातारी त्या ओल्या जागेंत पावसाळी सर्द हवेंत तशीच पडून राहिली असती तर तिच्यावर मोठा विकट प्रसंग आला असता. तो टळावा म्हणून घरांतील कुणीतरी माणूस जागें होणें जरूर होतें आणि म्हणून कुठल्यातरी अदृश्य मदतगारानें खुळखुळचा काठीसारखा आवाज करून सीतारामपंतांना जागें केलें होतें. कारण त्यांनीं वाडींत जाऊन पाहिलें तेव्हां कुणीही माणूस त्यांना दिसला नव्हता आणि वेलीवरचे सर्व दुधेही जागच्या जागीं होते.

मागें दिलेल्या सर्व प्रकारांपेक्षां हा प्रकार अगदीं निराळा आहे. देशोदेशींच्या माणसांना कुठल्यातरी आवाजानें सावध करून संकटमुक्त केल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत नमूद आहेत. माणसांच्या जीवनांत असला कांहीं अद्‌भुत प्रकार घडला म्हणजे तेवढचापुरता त्यांचा बोलबाला होतो व नंतर सर्व कांहीं विसरलें जातें. कुणी त्या प्रकाराला

दैवी चमत्कार समजतात तर कुणी भूतचेष्टा म्हणून आश्चर्य करीत राहातात; परंतु सदृश अनुभव अनेक देशांतील अनेक व्यक्तींना आले म्हणजे सृष्टीमध्यें मानवांना मदत करणारी एक अदृश्य संस्था आहे असें म्हणावें लागतें. या विषयावर रेव्हरेंड सी. डब्ल्यू लेडबीटर यांनी Invisible Helpers नांवाचें अत्यंत व्यवस्थित व शास्त्रीय माहिती देणारें एक पुस्तक लिहिलें आहे. या पुस्तकाची प्रथमावृत्ती १८९८ सालीं प्रसिद्ध झाली होती. जिज्ञासंनी हें पुस्तक अवश्य वाचावें. त्याचप्रमाणें डॉक्टर ली यांच्या More Glimpses of the world unseen या पुस्तकांत अदृश्य मदतगारांच्या कितीतरी मनोरंजक व खऱ्या हकीकती ग्रथित झाल्या आहेत.

रेव्हरेंड लेडबीटर यांनीं स्वतःचा एक अनुभव सांगितला आहे–

" एका पावसाळी आणि वादळी रात्रीं मी वेस्टर्न ग्रोव्ह विभागांतून माझी छत्री कशीबशी सांभाळीत चाललों होतों.

एकाएकीं दचकून सोडणारा एक आवाज माझ्या कानीं आला–तो माझ्या चांगल्या ओळखीचा एका हिंदी शिक्षकांचा होता–" मागें सर!" आणि एखाद्या यंत्रासारखा कांहीं एक विचार न करतां मी झटकन् मागें सरकलों. माझ्या तशा मागें जाण्यामुळें माझ्या हातांतील छत्री पुढें कलली व माझ्या हातून सुटली आणि कुठल्यातरी धुराड्याचें उडालेलें एक मोठें छप्पर माझ्यासमोर धप्पकन् आपटलें. मी जर त्या " मागे सर ! " या आवाजानें मागें सरलों नसतों तर त्या जड वस्तूनें माझ्या देहाचा चुराडाच केला असता. त्या रस्त्यावर माझ्याशिवाय कुणीच नव्हतें. आणि ज्या व्यक्तीचा मी आवाज ऐकला ती व्यक्ती सात हजार मैल दूर होती.

आकाशवाणीच्या सहाय्यानें मानवाला भवितव्याची जाणीव दिली गेल्याच्या अनेक गोष्टी पुराणांतरीं आहेत. परंतु त्यांत अतिशयोक्ती असल्याकारणानें त्या केवळ भोळसट मनाला पटतील अशा आहेत. शास्त्रीय चिकित्सकांनी जे अलीकडे अनेक अदभुत शोध लावले आहेत त्यांवरून मानवाला अदृश्य मदत हरप्रकारें होत असते असें सिद्ध झालें आहे. परंतु हा स्वतंत्र विषय आहे, म्हणून त्याचा विचार पुढच्या प्र क-रणांत करूं.

० ० ०

४ : अदृश्य मदतगार, योगायोग व चमत्कार

मागील प्रकरणाच्या शेवटीं 'मानवाला अदृश्य मदत हरप्रकारें होत असते !' असें विधान मी केलें होतें. त्या विधानाच्या पुष्टयर्थ कांहीं घडलेले प्रकार या प्रकरणीं सादर करावयाचे आहेत.

माणसांच्या जीवनांत कधीं कधीं अशा चमत्कारिक व वैशिष्ट्यपूर्ण घटना घडतात कीं त्यांचीं कारणें अगदीं क्षुल्लक असतात. त्या कारणांवरून कार्याची व्याप्ती व महत्वदेखील लक्षांत येत नाहीं. घटना घडून गेल्यानंतर मात्र मोठा अचंबा वाटतो; आणि या कार्यकारणभावांच्या पाठीमागे कोणतीतरी शक्ति कार्य करीत असते काय याचा विचार करण्याची ज्यांना कुवत नाहीं किंवा इच्छा नाहीं ते लोक त्या कार्यकारणभावांना (Coincidence) योगायोग या सदरांत ढकलीत असतात.

अगदीं थोडचा दिवसांपूर्वी घडलेली एक घटना मी वाचकांच्या विचारार्थ निवेदन करतों.

माझा एक क्रिकेटपटु मित्र त्या दिवशीं सकाळीं ८॥ वाजतां दाढी वगैरे उरकून ओटीवरील बाकावर बसला होता. ठाण्याहून सकाळीं ९-४० ला सुटणारी मुंबईकडे जाणारी गाडी पकडण्याकरितां तो ९-२० ला घर सोडीत असे. त्याला त्या दिवशीं घर सोडण्यास अजून ४५ मिनिटें

अवकाश असल्याकारणानें त्याच्या चित्ताला स्वस्थता होती. त्या स्वस्थ मनांत पाटील व त्याचा एक मित्र या दोघांविषयीं एकदम एक विचार त्याच्या मनांत आला. पाटील हा माझ्या क्रिकेटपटु मित्राचा दोस्त होता. अलीकडे कित्येक दिवसांत पाटलाची व त्याची गांठभेटदेखील झालेली नव्हती व पाटलासंबंधीं मनांत विचार येण्यास तसें कांहीं खास कारणहि घडलेलें नव्हतें.

पाटलासंबंधींचा तो विचार त्या माझ्या क्रिकेटपटु मित्राच्या नुसता चित्तांत येऊन गेला नाहीं तर पाटील त्याच्या मनःश्चक्षूंना दिसूं लागला आणि वस्तुतः उघड कांहींएक कारण नसतांना आमचा क्रिकेटपटु दोस्त अस्वस्थ झाला.

आणि थोड्याच वेळानें एका माणसानें त्याला येऊन बातमी सांगितली, "पाटील वारला!" "कशानं?" आश्चर्यचकित होऊन त्यानें विचारलें, "त्याला झाला होता रोग. तो ऑपरेशन करण्यापूर्वीच फुटलेल्या आंतल्या आंत आणि त्याचं विष अंगांत भिनून आज पहांटे तो एकाएकीं वारला."

ताबडतोब कपडे चढवून तो पाटलाच्या स्मशानयात्रेला गेला. या बाबतींत असें दिसतें कीं लहानपनापासून पाटलाचे व आमच्या क्रिकेटपटूचें संबंध फार चांगले होते. पाटील आजारीपणांत आपल्या मित्राला पाहूं शकला नव्हता. कदाचित् मरणकाळीं पाटलाला आपल्या मित्राची आठवण झाली असेल व त्या विचारसंक्रमणामुळें वरील प्रकार घडला. नुसत्या योगायोगाच्या सदरांत ढकलण्यासारखा तो प्रकार खास नव्हता.

आतां यांत शंका घेण्यासारखी एक गोष्ट अशी कीं आमच्या क्रिकेटपटूच्या मनांत विचार प्रथम आला तो पाटील व त्याचा आणखी एक मित्र या दोघांविषयीं आला. त्या दुसऱ्या माणसाच्या बाबतींत कांहींच विशेष घडलें नव्हतें. कदाचित् पाटलाच्या प्रेतयात्रेला तो दुसरा माणूस हजर असेल पण जमिनीवरील शेण उचलतांना जशी जमिनीवरची माती त्याला चिकटून येते तद्वत् एका विचाराबरोबर दुसरा विचार आपल्या मनांत निष्कारण येऊं शकतो.

कित्येक वर्षेपर्यंत एके ठिकाणीं खेळलेल्या, बोललेल्या, बसलेल्या दोन मित्रांपैकीं एकजण इहलोक सोडून गेला. ही घटना मृताच्या जिवंत मित्राला अस्वस्थ करणारी होती आणि इहलोकांतील घडलेला प्रकार कळण्याचीं जीं स्वाभाविक साधनें त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारें घडलेल्या घटनेमुळें मृताचा जिवंत मित्र अस्वस्थ झाला हें या बाबतींत सत्य आहे.

जो तो माणूस आपल्या मगदुराप्रमाणें बरे वाईट व्यवहार करीत असतो. आणि त्या बऱ्यावाईट व्यवहारांत 'इच्छा तशीं फळें' या न्यायानें कधीं इच्छातृप्ती तर कधीं निराशा त्याच्या वाटयाला येत असते. सदिच्छेनें प्रेरित झालेल्या माणसाला अपेक्षिताचा लाभ कधीं कधीं मोठ्या चमत्कृतिजनक घटनेमुळें होत असतो. 'विद्वानांत हिरा' म्हणून चमकत असलेले, मुंबई विद्यापीठाच्या पी. एच्. डी. साठीं बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या विद्यमानें निघालेल्या सरकारी संशोधन संस्थेचे डायरेक्टर आणि सरकारी गॅझेटिअरच्या मराठी विभागाचे संपादक व लेखक श्री. अ. का. प्रियोळकर यांनी आपल्या आयुष्यांतील कांहीं अपूर्व योगायोग नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. ते लिहितात–

"एका गुरुवारीं मला अंगांत जरा ताप होता. तरीपण महत्वाचें काम असल्यामुळें ऑफिसांत जावें लागलें. संध्याकाळीं ऑफिस सुटल्यावर प्रकृति ठीक नसल्यामुळें दर गुरुवारीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ग्रंथ समितीची जी सभा असते त्या सभेला न जातां घरीं जाण्याचा विचार केला. पण पुन्हां विचार केला कीं जर मी सवेतन कामाला ऑफिसांत जाऊं शकतों तर निर्वेतन कामाला जाण्यास अडचण कां यावी! असा विचार करून ठाकुरद्वारकडे जाण्याऱ्या बसमध्यें मी तीनदां चढलों पण माणसें जास्त झाल्यामुळें मला तीनदां खालीं उतरावें लागलें! पुढें व्हिक्टोरिया मिळेल म्हणून मी चालतच गिरगांवपर्यंत गेलों. तिकडे एक सेकन्डहॅण्ड बुकसेलर धांवत धांवत दुकानाबाहेर येऊन मला म्हणाला, "तुमच्याकरितां एक पुस्तक ठेवलं आहे, आतां तुम्ही भटला नसतां तर दुसऱ्या एका गिऱ्हाइकाला देणार होतों." आशियासंबंधीचें वर्णनात्मक उच्च भाषेंतील १६८० मध्यें (म्हणजे शिवाजी वारले त्या सालीं)

मुद्रित झालेलें व सुंदर चित्रें असलेलें हें पुस्तक होतें. याच्याइतकें जुनें पुस्तक मजजवळ दुसरें नाहीं. त्यानें मागितले ते पैसे देऊन मी तें पुस्तक ताबडतोब विकत घेतलें. पुस्तक मिळाल्यामुळें मला मोठा आनंद झाला. ताप आहे म्हणून जर परस्पर मी घरीं गेलों असतों किंवा बसमधून मला पुनः पुन्हां उतरावें लागलें नसतें तर या ग्रंथाचा लाभ झाला नसता."
(मनोहर मासिक एप्रिल १९५१ पृष्ठें १०४–१०५)

श्री. प्रियोळकर हे जुन्या वाङमयाचे संशोधक आहेत. जुन्या ग्रंथांचा मोठा संग्रह त्यांनीं केला आहे. त्यांच्या संशोधनकार्यास मदत व्हावी म्हणूनच त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी निर्माण झाल्या व अखेर अकल्पिताचा इष्ट लाभ त्यांस झाला. अशा घटना अनेक माणसांच्या आयुष्यांत कधीं कधीं घडत असतात. परंतु रस्त्यांतून जातांना एखादी लहानशी वस्तु वाटेंत दिसली तर पायानें ठोकरून पुढें जावें त्याप्रमाणें असल्या अपूर्व घटनांचा कांहीं एक विचार न करतां माणसें आपल्या जीवनाचा मार्ग आक्रमीत असतात.

श्री. प्रियोळकरांचा आणखी एक अनुभव या ठिकाणीं देणें उचित होईल.

" रा. ब. दादोबा पांडुरंग ' ह्या माझ्या ग्रंथाचे दोन्ही भाग ज्यावेळीं छापून तयार झाले त्यावेळीं पुस्तकांत घालावयाचे फोटो छापून काढावे म्हणून मी सर्व सामुग्री मुद्रक श्रीयुत बा. ग. ढगळे यांच्या स्वाधीन केली. ' अहो, हें तुम्ही सगळं जमवलं खरं; पण त्यांत दादोबांची सही दिसत नाही ती ?" ती सामग्री पाहून ढवळे म्हणाले.

" दादोबांची मराठी सही जंगजंग पछाडलेलें असतां कुठेंच मला सांपडली नाहीं. सरकारी दप्तरांत त्यांच्या अनेक सह्या आहेत, त्या सर्व इंग्रजी. मराठीचे पाणिनी म्हटले जाणाऱ्यांची इंग्रजी सही देण्यापेक्षां मुळींच न दिलेली बरी असं मला वाटलं म्हणून मी तिचा फोटो घेतला नाहीं." मी अगदीं खिन्नपणें उत्तर दिलें.

" त्या दिवशीं बुधवार होता. (२६ मार्च १९४७) संध्याकाळीं सरकारी दप्तरखान्यांत जाऊन दादोबांची स्पष्ट सही असलेला एक चांगलासा कागद मी शोधून काढला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं चार वाजतां

त्याचा फोटो घेण्याकरितां फोटोग्राफरला तेथें बोलाविलें. फोटो घेऊन झाल्यावर पुरस्कार लिहिण्यासाठीं पुस्तकाचा दुसरा भाग कौन्सिल हॉलमध्यें जाऊन पंतप्रधान बाळासाहेब खेर यांना द्यावयाचा होता. त्या दिवशीं मी फारच दमलों होतों. नेहमी मी बस किंवा ट्रॅम गांठून घरीं परत जातों; पण त्याच दिवशीं संध्याकाळच्या वेळीं बस किंवा ट्रॅम मिळेपर्यंत फार वेळ क्यूमध्यें तिष्ठत राहावें लागेल असा विचार मनांत येऊन मीं चर्चगेट गांठून रेल्वेनेंच जाण्याचें ठरविलें. मला चर्नीरोड स्टेशनवर उतरावयाचें होतें; पण चर्नीरोड स्टेशन आलें याचें भान न राहून तेथें न उतरतां अखेर मी ग्रॅन्टरोडला उतरलों. फार दमून गेलों असतांहि तेथें असलेल्या सेकंडहँड पुस्तकांच्या दुकानापैकीं एकांत जाण्याचा मला अनावर मोह झाला. मला पाहिल्याबरोबर दुकानांतील एक पोऱ्या मजकडे येऊन म्हणाला, " शेठ, पलीकडच्या पुस्तकांचा ढीग तुम्ही पाहिला नाहीं ! " तिकडे जाऊन पाहातों तों मला वरच संस्कृत भागवताची एक बांधलेली पोथी आढळली. त्या पोथीच्या मुखपृष्ठावर ' दादोबा पांडुरंग ' अशा देवनागरी व इंग्रजी सह्या होत्या. दादोबा पांडुरंगांनीं ' प्रभाकर ' पत्राच्या अंकांत ज्या भागवताच्या आवृत्तीसंबंधीं लेख लिहिला ती हीच त्यांची १८३९ सालची प्रत होती. मला दादोबांची देवनागरी सही मिळाल्याबद्दल जो आनंद झाला त्यापेक्षां तो ग्रंथ मला ज्या परिस्थितींत मिळाला त्या बनावाचा मोठा चमत्कार वाटला, हें येथें सांगावेंसें वाटतें. (मनोहर मासिक एप्रिल, १९५१ पृष्ठ १०३)

वरील हकीकतीवरून हें स्वच्छ दिसतें कीं श्री. प्रियोळकरांना दादोबा पांडुरंगांची मराठी स्वाक्षरी मिळण्याविषयीं तळमळ लागून राहिली होती व अनेक खटपटींनंतरहि त्यांना ती मिळूं शकली नव्हती. ती मराठी स्वाक्षरी अस्तित्वांत होती. मात्र ती अमुक ठिकाणीं आहे हें सांगणारा कोणीही त्यांना भेटला नव्हता. त्यांचा थकवा, त्यांचें नेहमींच्या शिर-रस्त्याला धरून ट्रॅममधून न जाणें, व गाडींत बसल्यानंतर चुकून पुढल्या स्टेशनवर जाणें, तिथेंही सहज जुन्या पुस्तकांच्या दुकानांत शिरणें व त्या दुकानांतील एका दिवाकडे त्या दुकानांतील एका पोऱ्यानें त्यांचें लक्ष वेधणें या सर्व घटनांनीं श्री. प्रियोळकरांना जें पाहिजे होतें तें मिळवून

9232

दिलें होतें. मनोवांछिताचे लाभ करून देणारे असे योगायोग दुर्लक्ष करण्यासारखे खास नाहींत असें विचार करणाऱ्या कुणाच्याहि लक्षांत येईल.

'स्वप्न' या विषयाचा अभ्यास करतांना मलाहि असा एक अपूर्व अनुभव आला होता. स्वप्नद्वारां माणसाला भवितव्याचें दर्शन होतें कीं काय याचा प्रत्यक्ष ताजा प्रत्यय मला हवा होता. या विषयावर प्रकाश पाडणारा पाश्चात्य पंडित फ्राइड यानें असें स्पष्ट विधान केलें आहे कीं "माणसाला पडलेलीं स्वप्नें गतकालच्या अनुभवावर आधारलेलीं असतात. माणसाच्या इच्छा, आकांक्षा व भावना यांतून त्यांचा उदय होतो. भवितव्याचा स्वप्नांशीं कांहींहि संबंध नसतो." केवळ जडवादी असा जो फ्रॉइड त्याचें हें विधान घादांत खोटें आहे हें इतर अनेक शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दिलेलें आहे. मलाहि फ्रॉइडच्या विधानाची असत्यता पटलेली होती. तरीसुद्धां एखादा ताजा प्रत्यय मला हवा होता. अशा परिस्थितींत मला गुरुवार दिनांक १५-१-१९४३ रोजीं पहांटे उठण्यापूर्वीं स्वप्न पडलें-मुंबईहून रोजच्याप्रमाणें मी लोकल गाडींतून ठाण्यास येत होतों. त्यावेळीं महायुद्ध जोरांत चालू असल्याकारणानें वस्तुस्थितींत असलेला मुंबईचा काळोख (Black out) मला स्वप्नांतहि प्रत्ययास आला. डाव्या बाजूला फलाट असलेल्या एका स्टेशनवर गाडी थांबली. तें स्टेशन कोणतें होतें तें स्वप्नांत मला समजलें नाहीं. थांबलेली गाडी चालूं झाली व कुणीतरी मनुष्य गाडीखालीं पडल्या कारणानें गाडी थांबली. मी चटकन् डब्यांतून उतरलों. पुढें धांवत गेलों व हातांतल्या टॉर्चनें खालीं रुळांत पाहिलें. तों बरोबर पहिल्या वर्गाच्या डब्याखालीं जाडजूड काळचा वर्णाचा, तपकिरी गरम कोट घातलेला माणूस पडलेला होता व त्याचे दोन्ही पाय गेले होते."

इतकें स्वप्न पाहून मी जागा झालों व नेहमीच्या पद्धतीप्रमाणें पडल्यापडल्याच मी त्या स्वप्नाविषयीं विचार करूं लागलों. रेल्वेंतले अपघात आपण नेहमीच पाहातों. त्यामुळें तसल्या प्रकारचें स्वप्न दिसलें असेल, असें प्रथम मला वाटलें. अगदीं तसल्या प्रकारचा, घडलेला, अपघात माझ्या स्मृतींत नव्हता. तेव्हां मला जें स्वप्न पडलें तो घडणारा अपघात कशावरून नसेल असा चटकन् एक विचार माझ्या मनांत आला व हा

अपघात घडतो का पाहूं या असें मनांत म्हणून मी उठलों व तें स्वप्न जेवढें आठवत होतें तेवढ्या सर्व बारकाव्यानिशीं लिहून काढलें.

एक दोन दिवसांनंतर त्या स्वप्नाची आठवण पार बुजून गेली. त्यानंतर गुरुवार दिनांक २१–१–१९४३ रोजीं त्यावेळीं बॅलार्ड पिअरला असलेलें माझें ऑफिस नित्याप्रमाणें ५–३० वाजतां संध्याकाळीं सोडण्याऐवजीं मला कांहीं कामामुळें उशीर झाला व मीं ५–४५ वाजतां खुर्चीवरून घाईघाईनें उठलों. बोरीबंदर स्टेशनवर पोहोंचलों तेव्हां पांच वाजून सत्तावन मिनिटें झालीं होतीं व माझी नित्याची बरोबर सहा वाजतां सुटणारी गाडी सुटण्यास फक्त तीनच मिनिटें अवकाश होता. मी घाईघाईनें फलाटावर शिरणार इतक्यांत माझा जुन्या काळचा कॉलेज स्नेही प्रभाकर नेरूरकर एकदम पुढें येऊन मला अडवून म्हणाला, "अरे जाशील ठाण्याला, एवढी घाई कसली ?" फार दिवसांनीं दोस्त भेटला म्हणून त्याच्याबरोबर चहा घेण्यासाठीं मी ती रोजची गाडी सोडली. एवींतेवीं फास्ट गाडी चुकलीच तेव्हां आतां जरा दादरला उतरून जावें असा विचार माझ्या मनांत आला व मी सव्वा सहाच्या गाडीनें दादरला गेलों. त्यावेळीं मी मनांत असें योजिलें होतें कीं दादर स्टेशनपासून दहा मिनिटांच्या रस्त्यावर असलेल्या माझ्या एका मित्राच्या घरीं जावें, तासभर गप्पा माराव्या व पावणे आठच्या सुमारास दादरला येणारी फास्ट कल्याण लोकल गांठून ठाण्यास जावें. त्याप्रमाणें मी त्या मित्राच्या घरीं गेलों तेव्हां तो आमचा मित्र मालाडला गेला असल्याचें त्याच्या सौभाग्यवतीनें सांगितलें. तरीसुद्धां त्याच्या घरीं बसून वहिनींशीं मला गप्पागोष्टी करीत वेळ घालवतां आला असता; पण योगायोग असा कीं वहिनी त्यावेळीं कांहींतरी कारणामुळें कुणावर तरी रुसलेली दिसली. म्हणून मी ताबडतोब घरांतून काढता पाय घेतला व स्टेशनवर आलों. त्यावेळीं कुर्ला लोकल स्टेशनांत शिरत होती. याच गाडीनें पुढें जाऊन कुर्ल्यास गाडी बदलावी. एखादी हार्बर मिळाली तर आपण लवकर ठाण्यास पोहोचूं अशा हिशोबानें मी धांवतच जिना उतरलों व जिन्याजवळच्या डब्याच्या दांड्याला हात धरून पायरीवर पाय दिला. तोंच मागाहून कुणीतरी माझा कोट खेंचला. वळून पाहातों तों आमचे प्राध्या-

पक दळवी. ते मला म्हणाले, "कशाला जातां या गाडीनें? मागाहून पांच मिनिटांत ठाणा लोकल आहे." त्यांच्या सांगण्यावरून मी ती गाडी सोडली. मागाहून आलेल्या गाडींत आम्ही दोघेही बसलों. गाडीनें माटुंगा स्टेशन सोडलें, सायनला गाडी उभी राहिली. एक मिनिटानें सुटली व आम्हीं बसलों होतों त्याच्या पुढच्या बाजूला एकदम हलकल्लोळ होऊन गाडी उभी राहिली. काय झालें तें पाहाण्याकरितां मी तावडतोब खालीं उतरलों व पुढें धांवत गेलों 'पडला! खालीं गेला!' म्हणून लोक ओरडत होते. स्टेशनवर काळाकुट्ट अंधार होता. पहिल्या वर्गाच्या डब्याखालीं आपल्या हातांतील टॉर्चचा उजेड पाडून एक गार्ड कोण खालीं पडला आहे तें पाहात होता. त्याच्या शेजारीं उभें राहून त्या टॉर्चच्या झोतांत खालीं रुळांत पडलेला माणूस मी पाहिला. लठ्ठ, काळा, तपकिरी रंगाचा गरम कोट घातलेला तो माणूस होता व त्याचे दोन्ही पाय त्या अपघातांत गेले होते. वडाळ्याचा तो एक दादा होता. चिक्कार दारू प्याला असल्याकारणानें चालत्या गाडींत चढतांना झोक जाऊन तो पडला होता. आठ दिवसांपूर्वी स्वप्नांत पाहिलेला तो माणूस मी बरोबर ओळखला. जागृतावस्थेंत त्याला मी पूर्वी कधींही पाहिलेला नव्हता. त्याची माझी ओळख नव्हती. त्याचा माझा कांहीं एक संबंध नव्हता. त्याच्या जीवनांत आगाऊच निश्चित ठरलेला अपघात मी आठ दिवसांपूर्वी स्वप्नसृष्टींत पाहिला होता. स्वप्नांत मी माझ्या हातांतील टॉर्चनें तो डब्याखालीं पडलेला माणूस पाहिला होता. वस्तुस्थितींत तो त्या गार्डाच्या हातांतील टॉर्चच्या झोतांत मला दिसला होता. एवढी एकच बाब वगळली तर स्वप्नांत पाहिलेले सर्व बारकावे माझ्या जसेच्या तसे प्रत्ययास आले होते. हा अपघात मी नित्याच्या ठराविक गाडीनें येत असतांना जर मला दिसला असता तर त्याचें मला विशेष वाटलें नसतें. परंतु मी तो पहावा अशी कुठली तरी आगाऊ योजना होती म्हणून प्रभाकर नेरूरकर मला भेटला व रोजची गाडी चुकली. दादरची वहिनी रागावलेली नसती तर मी उशीरानें सायनला न उभ्या राहणाऱ्या फास्ट गाडीनें जाणार होतों. दादरच्या स्टेशनवर प्रा. दळवी यांनीं माझा कोट खेचला नसता तर कुर्ला लोकलनें पुढें जाऊन तो अपघात पाहाण्याची संधि मला मिळाली नसती.

या प्रकरणांतील सर्व घटना कशा अगदीं बरोबर जमवून आणिलेल्या दिसतात, म्हणून तर त्या मला अत्यंत महत्त्वाच्या वाटल्या व कुणाही विचारवंतास त्या तशा वाटतील.

एखाद्याच्या आयुष्यांत एखादी घटना घडावयाचीच असली म्हणजे ती बरी असो अथवा वाईट असो, अपेक्षित असो अनपेक्षित असो, तिच्याकडे माणूस ओढला जातो. मृत्यूच्या दाढेंत ओढला जातो तसा मृत्यूच्या दाढेतूनहि ओढला जातो. तूर्त आपण अदृश्य मदतगारांचा विचार करीत असल्याकारणानें माणसाची भयंकर संकटांतून कशी अकल्पित मुक्तता होते त्याबद्दलचाच प्रकार लक्षांत घेऊं.

१९३२ सालच्या सप्टेंबर महिन्यांतली गोष्ट. गणपति उत्सव जिकडे तिकडे चालू होते. त्या रात्रीं मी कोणत्यातरी करमणुकीच्या कार्यक्रमास मुंबईस गेलो होतों. शेवटच्या गाडीनें ठाण्यास परत आलों तेव्हां रात्रीचे दोन वाजले होते. त्यावेळीं मी मुंबईस कधींही रात्रीच्या एखाद्या कार्यक्रमास गेलों म्हणजे परत आल्यानंतर स्टेशनपासून दूर असलेल्या माझ्या घरीं न येतां जवळच असलेल्या मावशीच्या घरीं झोपत असें. त्या रात्रीं तसाच मी मावशीच्या घरीं दमलाभागलेला असा अंथरूणावर पडलों. डोळा लागत होता इतक्यांत कानाशीं डांस गुणगुणूं लागले म्हणून मी उठलों. एक फुलपात्रभर थंड पाणी प्यालों व झिरझिरीत धोतर अंगावर घेऊन निजलों. डांसांचा उपद्रव हा त्याच रात्रीं कांहीं नवीन नव्हता. मला त्याची चांगली संवय होती. पण त्या रात्रीं ते मावशीच्या घरचे डांस मला असह्य झाले व मी चिडून उठलों.

'अरे कुठें चाललास ?' म्हणून मावशीनें विचारलें.

'घरीं जातों.' मी कपडे चढवीत म्हणालों.

'बाबा एवढ्या रात्रीं आणि एवढ्या लांब आतां झोप मोडून कुठें चाललास ? पड, पड, आतां लागेल झोंप !' या तिच्या सांगण्यावरून मी तसेच अर्धवट कपडे घालून पुन्हां निजलों.

पांच मिनिटें गेलीं नसतील, पुन्हां डांस कानांशीं गुणगुणूं लागले आणि आतां कुणाचेंच न ऐकतां आपल्या घरींच जाऊन झोपायचें असा निश्चय करून मी अंगावरचें पांघरूण फेकून दिलें, दिवा लावला व कपडे करून खालीं

उतरलों. त्यावेळीं मावशीच्या घरची मंडळी मला हट्टी व मूर्ख म्हणाली पण तो माझा हट्टीपणा, तो मूर्खपणा केवढा फायदेशीर ठरला होता !

मी टेंभीवरच्या माझ्या घरीं पोहोंचलों तेव्हां पहांटेचे ३ वाजून गेले होते. एक हांक मारतांक्षणींच म्हाताऱ्या आजीनें आंतून ओ दिली. दिवा लावला व दार उघडलें. घरांत पाऊल टाकतों तों माझ्या नाकातोंडांत धूर जाऊन मी गुदमरून गेलों.

'कसला ग एवढा हा धूर ?' म्हणून मी तिला विचारलें, 'कुठें आहे धूर ?' म्हणून म्हणत ती आपल्या अंथरुणावरच पडली. तिच्या डोळ्यांवर झोंप होती.

माझ्या डोळ्यांची धुरामुळें आग होत होती तरी घरांत कांहींतरी कुठेंतरी जळत असल्याची खात्री झाल्यामुळें मी त्वरेनें आंत शिरलों. कापूस जळल्याचा मला वास आला आणि दिव्याच्या उजेडांत आजी ज्या बिछान्यावर निजली होती तोच बिछाना पायाच्या बाजूनें जळत असलेला मला दिसला. मी घाबऱ्या घाबऱ्या तिला बिछान्यावरून बाजूला केलें व घरांतलें हंडाभर पाणी आणून ती आग विझवली !

त्या काळीं आमच्या घरांत विजेचे दिवे नव्हते. घासलेटचे कुपटें लावून घरांत एकटीच असलेली आजी मध्यरात्रीं केव्हांतरी मोरीवर जाण्यासाठीं उठली असेल तेव्हां पेटवलेली काडी पुरती विझण्यापूर्वी अंथरुणांत पडून हळूहळू आग लागली असेल. बिछान्याचा कापूस अतिशय जुनाट असल्याकारणानें तो भरभर पेटला नाहीं.

त्या रात्रीं आजी पेटून मरायचीच होती, पण डांस चावल्यामळें मी जो वैतागून घरीं आलों त्यामुळें तिचा मृत्यु टळला. मावशी घरीं जाऊं नको असें सांगत असतांहि मी तेवढ्या अपरात्रीं जो घरीं येण्याचा त्रास घेतला त्यावेळीं आपल्या घरीं स्वस्थ झोंप मिळावी एवढाच माझा हेतु होता; पुढें संकट दत्त म्हणून उभें आहे याची लेशमात्र कल्पना मला त्यावेळीं नव्हती. परंतु कल्पना नसतांनादेखील जरूर त्या ठिकाणीं अगदीं ऐन वेळीं मनुष्य ओढला जावा हा अनुभवच माणसांच्या हितासाठीं एखादी अदृश्य संस्था सतत जागरूक असावी असें वाटावयास लावतो.

आमचा एक गांववाला कांहीं मंडळींसह थोड्याच दिवसांपूर्वी काशी-यात्रेला गेला होता. त्या मंडळींचा अर्धा प्रवास ठीक झाला. परंतु पुढें पदोपदीं अडचणी येऊं लागल्या. आपण आतां घरीं परत जावें असें कांहीं मंडळींना वाटूं लागलें. परंतु 'देव आपलं सत्व पाहातो. या संकटांतून देवांचा देव आपणांला निभावून नेईल.' असें त्याच्यांतले कांहीं भाविक म्हणत होते. त्यामुळें वाढत्या संकटांतूनहि मंडळी पुढेंच जात चालली होती. अखेर गयेला त्यांची गाडीच उलटी झाली. सात आठ माणसांना दुखापती होऊन त्यांची इस्पितळांत रवानगी झाली. सुदैवानें सगळ्यांचे हात पाय शाबूत राहिले होते. या अपघातानंतर परमेश्वर सत्व पाहातो म्हणणारे भक्तहि डळमळले. त्याच सुमारास एका यात्रेकरूस तार मिळाली. 'असाल तसे निघून या' एवढाच मजकूर त्या तारेंत होता. आणि मग मंडळी यात्रा अर्धवट सोडून परतली.

वास्तविक इकडे पाठीमागें घरीं असाल तसे निघून या अशी सूचना देण्यासारखा भयंकर प्रकार घडला नव्हता. छपरावरचीं कौलें काढून चोर एके रात्रीं घरांत शिरला होता व फक्त थोडीशी फाटकीं वस्त्रें घेऊन गेला होता. यात्रेकरूंनीं आपल्या पाठीमागें घरांत चोरांनीं नेण्या-सारखा ऐवज ठेवलाच नव्हता. तरी पण तार करण्यापुरतें जें थोडेसें निमित्त घडलें व त्यामुळें त्या तार करणाऱ्याला 'असाल तसे निघून या,' असा संदेश देण्याची जी बुद्धि झाली त्यामुळें पुढें वाढून ठेवलेल्या कुठल्यातरी संकटांतून त्या यात्रेकरूंचा बचाव झाला असें म्हणावें लागेल.

यावर असा कोणी प्रश्न विचारील कीं जर एखाद्या अदृश्य मदत-गाराला त्या यात्रेकरूंच्या पुढें वाढून ठेवलेलें संकट दिसत होतें तर 'अरे तुम्हीं आपल्या घरीं परत जा.' असा त्यानें स्पष्ट संदेश कां दिला नाहीं ? यावर उत्तर असें कीं तसा संदेश स्पष्ट रीतीनें दिला गेला असता तरी त्याचा योग्य तो परिणाम झाला नसता अशी त्या अदृश्य मदत-गाराची खात्री असली पाहिजे. जीं माणसें दुराग्रही असतात त्यांना प्रत्यक्ष प्रचीति आली तरी त्यांचा दुराग्रह सुटत नाहीं. रक्षण करणारा म्हणून लक्षावधी लोक ज्या सोरटी सोमनाथाची ९०० वर्षांपूर्वी भक्ति करीत

होते त्या महाप्रभावी सोमनाथाला गझनीच्या महंमदापासून स्वतःचें रक्षण करतां आलें नाहीं ही गोष्ट देवाच्या निःसत्वतेची द्योतक नाहीं काय ? पण कोणता भक्त हें विधान कबूल करील ? उलट असलें विधान केल्याबद्दल कितीतरी लोक माझ्यावर तुटून पडतील. ईश्वर आणि त्याचे सृष्टिनियम लोकांना समजत नाहींत–ते समजून घेण्याचा लोक प्रयत्न करीत नाहींत. दुःख झालें म्हणजे त्या दुःखाचें कारण शोधून त्या दुःखाचा समूळ नायनाट करण्याऐवजीं त्या दुःखापासून पळून जातां यावें म्हणून आपल्या समजुतीप्रमाणें सुटसुटीत असा ईश्वर लोक निर्माण करतात व त्या ईश्वराची भक्ती करतात. अर्थात तो निरर्थक खटाटोप असतो.

सृष्टींतील योजना मानवाचें कधीं कसें बेमालूम संरक्षण करतात याचें आणखी एक उदाहरण देऊन हें प्रकरण आटोपतें घेतों.

एके संध्याकाळीं बंगालच्या उपसागरामध्यें असलेल्या बोटीवरील एक तरुण अधिकारी आत्महत्या करण्यास उद्युक्त झाला होता. आपल्या खोलीचा दरवाजा लावून तो आंत एकटाच बसला होता. आपल्या हातांतील पिस्तूल आंतील गोळी झाडण्याकरितां तो डोक्याजवळ नेई, पुन्हां खालीं ठेवी. स्वतःला ठार करण्याचा त्याचा निश्चय जवळ जवळ नक्की झाला होता. आणखी एकदोन क्षणांत आत्मघाताचें तें कर्म त्यानें आटपून टाकलें असतें; परंतु त्याच्या मनांत एकदम विचार आला कीं असलें कर्म करण्यास ही वेळ चांगली नाहीं. मध्यरात्रीच्या वेळीं सर्वत्र सामसूम झाली म्हणजे आपण जें करायचें तें करून घ्यावें.

त्या एका जोरदार विचारामुळें त्यानें तें आत्मघाताचें कर्म कांहीं तास पुढें ढकललें. मात्र त्या चार सहा तासांत त्या तरुणाची मनस्थिति बिघडली होती ती तशीच राहिली.

मध्यरात्र झाली आणि त्या तरुणानें आपलें आयुष्य खलास करण्यासाठीं पुन्हां तें पिस्तूल हातांत घेतलें. जहाजावरील सर्व व्यापाचा जमाखर्च त्या तरुण अधिकाऱ्याच्या हातांत होता आणि त्या जमाखर्चांत त्यानें कांहींतरी अफरातफर केली होती, ती त्याला पचवतां आली नव्हती. हिशोबांतला खोटेपणा लवकरच उघडकीस येऊन पैसे खाल्ल्याचा आरोप आपणावर शाबीत होईल याची त्याला मोठी भीति वाटत होती. ती

अफरातफर फारशी मोठी नव्हती ; पण माणूस एकदां भ्याला म्हणजे काय करावें व काय न करावें हें त्याला समजत नाहीं. तसा एरवीच्या व्यवहारांत तो एकंदरींत भला माणूस होता. लांडीलबाडी करणारा नव्हता. परंतु अलीकडे तो एका तरुणीच्या प्रेमपाशांत सांपडला होता, आणि तिला तिच्या आवडीच्या कांहीं कांहीं चिजा घेऊन देण्यासाठीं त्यानें जो वाजवीपेक्षां जास्त खर्च केला होता त्यामुळें ही पैशाची अफरातफर करण्याची दुर्बुद्धी त्याला झाली होती. ती चूक त्याला भोंवली होती आणि ती निस्तरण्याचे उपाय न समजल्यामुळें तो आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त झाला होता.

आणि अखेरचा निधडा निश्चय करून त्यानें जेव्हां त्या मध्यरात्रीच्या प्रशांत समयीं तें पिस्तूल आपल्या डोक्याजवळ नेऊन चापावर बोट ठेवलें त्याच वेळीं त्याला एकदम आपल्या म्हाताऱ्या आईची आठवण झाली. " आपण पाठविलेल्या पैशावर जगणारं तें आपल्या घरीं असलेलं पिकलं पान–आपल्या मृत्यूची वार्ता कानीं जातांच काय वाटेल तिला ! म्हातारपणची काठी हातून हिसकली गेल्यामुळें ती एकदम कोलमडून पडेल; चक्काचूर होईल तिच्या हृदयाचा ! अशा आणि असल्या प्रकरच्या विचारांनी त्याच्या चित्रांत एकदम गर्दी केली आणि क्षणभर आपल्या हातांतील पिस्तूल बाजूला ठेवून आपल्या परमपूज्य वृद्ध आईचें छायाचित्र त्याच्या बॅगेंत होतें तें त्यानें काढलें व आपल्या मृत्युमुळें या जिवाची अवस्था काय होईल असा विचार करीत तो त्या चित्राकडे पहात राहिला. आणि मग त्याला असें वाटूं लागलें कीं आपल्या वृद्ध मातेच्या आयुष्याच्या अखेरच्या काळांत आपण मरून चालायचें नाहीं. आपणच निर्माण केलेल्या संकटाला तोंड देऊन आपण जगलें पाहिजे.

मग जगायचें कसें याचा त्यानें विचार केला आणि त्याला असें वाटलें कीं जहाजाच्या कप्तानाजवळ जाऊन त्याला खरी हकीकत सांगावी. या विचाराबरोबर तो तडक त्या मध्यरात्रीच्या वेळीं कप्तानापाशीं गेला. कामावर असलेला खलाशी सतत जागृत असतो. कप्तान जागा होता. त्यानें त्या तरुण अधिकाऱ्याची सर्व हकीकत नीट ऐकून घेतली व त्याला बापानें आपल्या उनाड पुत्राला उपदेश करावा तसा उपदेश

करून "कमी पडत असलेले सर्व पैसे मी भरतों." अशी ग्वाही दिली. "माझ्या पगारांतून दर महिन्याला मी तुम्हांला ते हळूहळू परत करीन." असें त्या तरुणानें कबूल केलें.

आणि अशा रीतीनें तो आत्महत्त्येचा प्रसंग टळला. (Rt. Rev. C. W. Leadbeater कृत Invisible Helpers पृ. ७१ ते ७४.)

या प्रकरणांत त्या तरुण अधिकाऱ्याच्या मनांत संध्याकाळच्या वेळीं आत्महत्त्या स्थगित करण्याचा व मध्यरात्रीच्या वेळीं आपल्या आईसंबंधींचा जो विचार आला त्यामुळें तो त्या कुकर्माला प्रवृत्त झाला असतांनाही पराङ्मुख झाला. हे विचार त्याच्या मनांत अगदीं ऐन वेळीं जिथून आले तीच अदृश्य शक्ति होय कीं जिनें त्याला मनाच्या कोलमडलेल्या स्थितींत मदत करून वर काढलें.

अतीव संकटाचे प्रसंग ज्यांच्यावर आले असतील त्यांना त्या संकटांतून सोडविणारे विचार कसे न कळत एकदम माणसाच्या मनांत येतात याचा प्रत्यय आलेला असेल. संकटपरंपरेंतला एखादाच क्षण इतका महत्त्वाचा असतो कीं ज्यावेळीं स्फुरलेली एखादी कल्पना किंवा कृति सोसाट्याचा वारा मेघाडंबराचा एकदम नायनाट करतो त्याप्रमाणें माणसाला संकटमुक्त करते.

तुम्हाला अशींही माणसें भेटलीं असतील कीं जीं सांगतात–"स्वप्नांत मला गणपति दिसला आणि मग सगळं ठीक झालं." असे आणि असल्या प्रकारचे अनुभव चिकित्सक दृष्टीनें पाहिले म्हणजे त्यांतून काय अर्थ निघतो, अदृश्य मदगार कधीं दृश्य कसे होतात याचा पुढील परिच्छेदांत विचार करूं.

भवितव्य जाणण्यासाठीं अनेक माणसांची सारखी धडपड चाललेली असते. परंतु वस्तुस्थितींत असें नेहमीं आढळतें कीं, माणसाला जें हवें आहे तें मिळूं नये आणि जें नको आहे तें त्याला जरूर प्राप्त व्हावें. अनेक ज्योतिषी आणि हस्त–सामुद्रिक जाणणाऱ्यांच्या नादीं लागूनहि माणसाला जें कधीं कधीं समजत नाहीं त्याची जाणीव मोठ्या अद्भुत आणि अकल्पित प्रकारें माणसाला होते. यासंबंधींचे पुरावे न्यूयॉर्कच्या सायकिकल रिसर्च सोसायटीनें बहुत गोळा करून ठेवले आहेत.

१८८७ च्या जानेवारी महिन्यांतली गोष्ट. अमेरिकन सैन्यांतील कॅप्टन ए. बी. मॅकगोवन हे ब्रुकलिन येथें रजेवर गेले होते. त्यावेळीं त्यांच्यावरोबर त्यांचे दोन मुलगेही होते. मुलांची शाळा बंद होती म्हणून वडिलांबरोबर मजा मारण्याकरितां तेही ब्रुकलिनला आले होते. कॅप्टन मॅकगोवन यांनीं आपली हकीकत सांगितली आहे. "त्या दिवशीं रात्रीं मुलांना मी नाट्यगृहांत नेण्याचें अभिवचन दिलें व आम्हां तिघांकरितां राखीव जागांचीं तिकिटें विकत घेतलीं. नाट्यगृहांत जाऊन आमच्या राखीव जागा प्रत्यक्ष कुठें आहेत त्या पाहाण्याची मला संधि मिळाली. परंतु त्या दिवशीं जणूं काय माझ्यांतला आवाज मला एकसारखा म्हणत होता, 'नाट्यगृहांत जाऊं नको. मुलांना परत शाळेंत घेऊन जा.' आणि ते शब्द मला माझ्या मनांतून काढून टाकतां आले नाहींत. त्या शब्दांचा माझ्यावर इतका परिणाम झाला कीं दुपारीं मी माझ्या कांहीं मित्रांना मला असा असा आवाज एकूं येतो आहे असें मी सांगितलें. त्याचप्रमाणें 'ठरल्याप्रमाणें आपणांला आज नाट्यगृहांत जावयाचें नाहीं, असेंहि मी मुलांस सांगून टाकलें. माझ्या मित्रांनीं माझी चेष्टा केली आणि 'मुलांना नाटक दाखविण्याची आशा दाखवून आतां त्यांचा हिरमोड करणें ठीक नव्हे असेंही ते म्हणाले. आणि मग मलाहि त्यांचें म्हणणें बरोबर वाटूं लागलें. तरीसुद्धां तो आंतला आवाज माझ्या मनावर 'नाट्यगृहांत जाऊं नको' हेंच एकसारखें बिंबवीत होता. मी अखेर निश्चय केला आणि नाट्यगृहाचे दरवाजे उघडण्याच्या एक तास अगोदर मी मुलांना घेऊन न्यूयॉर्कमधील एका हॉटेलांत गेलों; तसें करणेंही मला लज्जास्पद वाटलें. कुठला आवाज आणि काय मी वेड्यासारखा वागत होतों! परंतु तसें करण्यावांचून गत्यंतर नव्हतें–त्या रात्रीं नाट्यप्रयोग चालूं असतांना त्या नाट्यगृहाला आग लागून भयंकर नुकसान झालें! तीनशें पांच माणसें जळून मेलीं!"

कॅ. मॅकगोवन यांना तो आवाज ते मुलांना न्यूयॉर्कला घऊन जाईपर्यंत छळीत होता. त्यांना असल्या प्रकाराचा पूर्वी कधींहि अनुभव नव्हता. तो आवाज म्हणजे आभास म्हणावा तर त्याची जाणीव अगदीं स्पष्ट आणि कित्येक तासपर्यंत त्यांना एकसारखी होत होती. कांहीं असलें

तरी त्या अदृश्य मदतगारानें त्या तीन जीवांची संकटांतून मुक्तता केली होती. (ही हकीकत G. N. M. Tyrell कृत The Personality of man या ग्रंथाच्या ७४।७५ पृष्ठावर आहे.)

असल्याच प्रकारचा आणखी एक अनुभव अन्यत्र नमूद करण्यांत आला आहे. १८६० सालच्या जुलै महिन्यांत रेव्हरेंड डॉ. डब्ल्यु यांची पत्नी आपली मुलगी ए. व एक मोलकरीण यांच्या सहवर्तमान ट्रिनिटी येथें रहावयास गेली होती. एके रविवारीं दुपारीं ती लहान मुलगी घराजवळच असलेल्या लोहमार्ग आणि समुद्रकिनाऱ्यावरचा धक्का यांच्या मध्यभागीं असलेल्या लहानशा जागेंत खेळावयास गेली. ती गल्यानंतर थोड्याच वेळानें मिसेस डब्ल्यू यांना स्वच्छ आवाज ऐकूं आला, "तिला घेऊन येण्यासाठीं कुणाला तरी पाठव, नाहींतर कांहींतरी भयंकर होईल!" परंतु त्या मातेच्या बुद्धीला तें पटेना. पुन्हा तसाच प्रकार घडला. आणि ते शब्द अधिक स्पष्ट आणि अधिक जोरदारपणें तिला ऐकूं आले. मिसेस डब्ल्यू यांना एवढेंच वाटत होतें कीं एखादा पिसाळलेला कुत्रा आपल्या मुलीच्या अंगावर येईल; परंतु हा विचारसुद्धां त्यांनीं आपल्या मनांतून काढून टाकण्याचा प्रयत्न केला. पुन्हां तिसऱ्यांदा ते शब्द त्यांच्या कानीं आले आणि भीतीनें त्यांच्या हृदयाची पक्कड घेतली. मग त्यांनीं घंटा वाजवून मोलकरणीला बोलाविलें आणि आपल्या मुलीस परत घेऊन येण्यास सांगितलें. मोलकरीण त्या मुलीला आणण्यास गेली आणि मिसेस डब्ल्यू यांच्या मनांत जी कालवाकालव चालली होती ती थांबली. थोड्या वेळानें एक इंजिन त्या रुळावरून आलें आणि नेमकें त्याच ठिकाणीं घसरून त्या धक्क्यावर आदळलें. Journal S. P. R. Vol. VIII पृ. ४५)

मिसेस् डब्ल्यू यांना त्या आवाजानें धोक्याची अस्पष्ट सूचना दिली नसती तर त्या अपघातांत त्यांच्या मुलीचा चुराडा झाला असता !

संकटांतून आपला बचाव व्हावयाचा असला म्हणजे असले प्रकार घडतात. मात्र नेहमीं आवाजच ऐकूं येतात असें नाहीं. कधीं कधीं माणसाचीं इंद्रियें त्याला नकळत चमत्कारिक परंतु विधायक व्यवहार करितात.

लंडन शहरांतील एक नामांकित सर्जन मिस्टर ई. जी. ईम्स हे २४ मे १९३० रोजीं आपल्या गाडींतून सेंट आल्बान्सहून लंडनकडे चालले

होते. त्यांना गाडी जोरानें हांकण्याची संवय होती. आणि त्या दिवशीं तर त्यांना लंडन शहरांत कांहीं महत्वाच्या शस्त्रकिया करावयाच्या असल्याकारणानें ते घाईंतच होते. परंतु पुढें एक लहानशी गाडी आरामांत सावकाश चालली असल्याकारणानें त्यांची गाडी मागें पडली. वास्तविक त्या गाडीचा त्यांना तसा कांहीं अडथळा झाला नाहीं; ते त्या गाडीला डावलून सहज पुढें जाऊं शकले असते. परंतु त्यावेळीं त्यांना पुढें जावेंसें वाटलेंच नाहीं. "अपघात होणार आहे" अशी एक उद्दाम जाणीव त्यांच्या मनाच्या कुठल्यातरी गूढ कप्प्यांतून डोकावत होती आणि ती जाणीव नेहमींच्या भौतिक जाणीवेहून कांहींतरी निराळी होती असेंही त्यांना वेळोवेळा वाटत होतें. मिस्टर ईम्स यांच्या गाडीपुढें जी लहान गाडी चालली होती तिच्यापुढें एक लॉरी चालली होती. इतक्यांत वाटेंत उभ्या असलेल्या एका गाडीचा दरवाजा फटकन् उघडला गेला. अपघात टाळण्याकरितां लॉरी अकस्मात झटकन् थांबली व त्यामुळें मिस्टर ईम्स यांच्या पुढील लहान गाडी त्या लॉरीवर जाऊन आदळली व त्या गाडींत बसलेलें एक मूल व त्याची आई यांना मोठचा जखमा झाल्या. मिस्टर ईम्स जर त्या लहान गाडीला मागें टाकून पुढें गेले असते तर मातेच्या व मुलाच्या दुखापतीवर त्यांना इलाज करून आपल्या गाडींतून त्यांना जवळच्या एका इस्पितळांत नेतां आलें नसतें.

या बाबतींत मिस्टर ईम्स यांनीं पुढें असें म्हटलें आहे, "अशा प्रकारें संकटाची अकस्मित आणि आगाऊ सूचना देणारा माझ्या आयुष्यांतील हा तिसरा प्रसंग होय. आणि ज्या अदृश्य शक्तीनें मला ही जाणीव दिली त्या शक्तीचा मी ऋणी आहें." (The personality of man by G. N. M. Tyrell पृष्ठें ७५–७६)

अशा आणि असल्या प्रकारच्या तारक सूचना वाचकांपैकीं कित्येकांच्या अनुभवास आल्या असतील. आणि खरोखर मानवी जीवनांतला हा एक प्रांत संशोधन करण्यासारखा आहे. अदृश्य मदतीच्या कितीतरी गोष्टी पुराणांतही आहेत. परंतु त्यांतील बहुतेक अंधश्रद्धेनें लिडबिडलेल्या असल्याकारणानें त्यांतील सौंदर्य व काव्य नष्ट झालें आहे. निसर्गातलें हें सत्य स्पष्ट आणि पूर्णपणें समजलें तर ज्ञानाचें एक नवें दालन खुलें होईल

यांत शंका नाहीं.

माणसाला होणारी ही अदृश्य मदत कधीं अमानुष व्यक्तींचा आवाज ऐकूं येऊन तर कधीं कसला तरी भास होऊन आणि कधीं कधीं तर प्रत्यक्ष एखाद्या व्यक्तीचें दर्शन होऊन होत असते.

एके रात्रीं एका शेतकऱ्याचें कुटुंब दक्षिण अमेरिकेंतील एका खेडेगांवांत शांतपणें झोपलें होतें. थोड्याच मैलावर कांहीं रानटी लोकांनीं त्या खेड्यांतील लोकांचे प्राण घेऊन लूटमार करण्याचा कट केला होता, याची त्या बिचाऱ्या खेड्यांतील माणसांना कुठून जाणीव असणार ? इतक्यांत त्या शेतकऱ्याच्या बायकोला आपल्या खांद्याला धरून कोणीतरी हलविलें असें वाटून ती जागी झाली. तिला असें वाटलें कीं, आपली एकादी शेजारीण आपल्याला जागें करावयास आली असेल; परंतु सर्व दरवाजे बंद असतांना ती येऊं शकली कशी ? आणि जर आली तर ती एकाएकीं अदृश्य कशी झाली ?—हा प्रश्न तिला आयुष्यांत कधीं सुटला नाहीं.

त्या बाईला जाग आल्यावर हा केवळ भास असेल किंवा आपणांला स्वप्न पडलें असेल असें वाटलें. तरीसुद्धां ती उठली आणि आपल्या घरांत कुणीहि शिरलेलें नाहीं याची तिनें खात्री करून घेतली. मग तिनें सहज खिडकी उघडून पाहिली तों दूरवर तिला ज्वाळांचा कल्लोळ दिसला. तिनें ताबडतोब आपल्या नवऱ्याला व कुटुंबांतील इतर मंडळींना जागें केलें. मग तें सर्व कुटुंब ताबडतोब सुरक्षित ठिकाणीं पळून गेलें. कोणत्यातरी अदृश्य मदतगारानें त्या बाईला हलवून जागें केलें नसतें तर अर्ध्या तासाच्या आंत त्या नरमांसभक्षक रानटी लोकांच्या टोळीनें त्यांचें घरदार लुटून त्यांचे खून केले असते. (लेडबीटरकृत Invisible Helpers पृष्ठें ४३–४४)

अदृश्य मदतगारानें मदत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला तरी देखील माणसें त्याकडे कधीं कधीं दुर्लक्ष करितात. अर्थात् ज्यांच्या नशिबांत अरिष्ट आहेच ते आपण होऊन त्या अरिष्टाच्या तोंडांत जातात. उलट अरिष्टांत नकळत सांपडलेलीं कांहीं माणसें अनपेक्षितपणें सही-सलामत बाहेर पडतात.

एका बाईला दूरचा प्रवास करावयाचा होता. ती एकटीच कुठेंतरी चालली होती. आगाऊ तरतूद करून राखून ठेवलेल्या एका लहानशा वरच्या वर्गाच्या डब्यांतून ती चालली होती; परंतु गाडी अगदीं सुरू होण्याच्या वेळेस कुणीतरी एक खलपुरुष झटकन् त्या डब्यांत त्या बाईच्या समोरच्या बाकावर बसला. तो माणूस दुष्ट वृत्तीचा आहे हें त्याच्या चेहेऱ्यावरून कुणालाहि स्पष्ट होण्यासारखें होतें. त्याच्या डब्यांतील आगमनामुळें ती बाई अगदीं भेदरून गेली व कांहीं एक करण्यापूर्वी गाडीनें वेगहि घेतला होता. कुणाची मदत मागणें शक्य नव्हतें. ती बाई ख्रिश्चन असल्याकारणानें त्या भयंकर परिस्थितींत तिनें आपल्या आवडत्या संताचें स्मरण केलें.

लवकरच त्या बाईची भीति दुणावली. कारण तो खलपुरुष उठला व पापी नजरेनें त्या बाईकडे पाहूं लागला. त्या खलपुरुषानें एक पाऊल पुढें टाकलें आणि काय चमत्कार एकदम आश्चर्यचकित होऊन त्यानें भयभीतपणें तें पाऊल मागें घेतलें. त्या खलपुरुषाची दृष्टी बाईकडे नसून बाईच्याच बाकाच्या दुसऱ्या टोकाला बसलेल्या एका सद्गृहस्थावर खिळली होती. तो खलपुरुष ज्या ठिकाणीं पाहात होता त्या ठिकाणाकडे त्या बाईनें पाहिलें तों तिलाहि मोठा आश्चर्याचा धक्का बसला. कारण ज्या डब्यांत आपण एकटयाच बसलों होतों आणि चालत्या गाडींत तो दुसरा माणूस चढला होता त्या डब्यांत आणखी एक तिसरा माणूस तिला दिसला. अचानक दृश्यमान झालेला तो पुरुष त्या चोरट्याकडे टक लावून पाहात होता आणि त्याला पाहून तो नीच चोरटा अगदीं गडबडून गेला होता. आणखी अर्धा तासपर्यंत ती गाडी वेगानें चालली. तो चोरटा अगदीं दबकून थरथरत आपल्या जागीं बसला होता. आणि ती बाई अगदीं ऐन संकटाच्या वेळीं निर्माण झालेल्या पुरुषाकडे कृतज्ञतापूर्वक दृष्टीनें पाहात होती. त्या माणसानें त्या बाईच्या दृष्टीला आपली दृष्टी भिडविली नाहीं. तो फक्त त्या दुष्टाकड अगदीं रोखून पाहात होता. आणि मग गाडी सांध्यावरून जातांना रुळाचा खाड खाड आवाज झाला. गाडीचा वेग मंद मंद होत गाडी स्टेशनांत शिरली. तो भेकड चोरटा गाडी पुरती थांबावयाच्या आंतच फलाटावर उडी मारून पळून

गेला. त्याला नाहींसा झालेला पाहून बाईला फारच समाधान वाटलें व ज्या पुरुषाच्या अस्तित्वामुळें आपल्यावरचें संकट टळलें त्याचे आभार मानण्याकरितां ती त्या पुरुषाकडे वळली. परंतु काय चमत्कार; ज्या जागेवर तो पुरुष इतका वेळ बसला होता ती जागा रिकामी होती. तो पुरुष जसा त्या जागीं चालत्या गाडींत निर्माण झाला होता तसा तो ती गाडी थांबण्यापूर्वीच अदृश्य झाला होता ! सर्वसामान्य माणसांप्रमाणें तो गाडीत शिरून गाडीतून निघन गेला नव्हता. (Invisible Helpers पृष्ठें २७–२८)

कोणत्या तरी अदृश्य सहाय्यकानें बराच वेळ जडत्व धारण करून त्या बाईचें रक्षण केलें होतें. अदृश्य सहाय्यकांच्या व्यापक कार्यपैकीं हा एक लहानसा नमुना आहे. अर्थात् अशी मदत प्रत्येक संकटग्रस्त माणसाला मिळते असें नाहीं. ती मिळणें हें योगायोगावर व ज्याच्या त्याच्या नशिबावर अवलंबून असतें.

वर वर्णन केलेल्या प्रकारापेक्षां अधिक अद्भुत असे प्रकारही कांहीं कांहीं माणसांच्या अनुभवाला येतात. माझी कांहीं मित्रमंडळी एकदां समुदायानें शिकारीला गेली होती. त्यांत प्रत्यक्ष शिकारी दोघे तिघेच आणि बाकीचे पूर्वी सैन्याबरोबर जसे बाजारबुणगे जात तसे होते. त्या मंडळींना संबंध रात्र आलोचन जाग्रण घडून एक झनाटचा डुक्कर त्यांच्या गोळचांना बळी पडला होता. पहांटेच्या सुमारास त्या शिकाऱ्याचे मदतनीस जे कातकरी लोक ते तो डुक्कर घेऊन जवळच्या खेडचांत गेले. त्यांच्याबरोबर जेवणाची व्यवस्था करण्यासाठीं कांहीं मंडळी गेली व बाकीचे लोक स्वच्छ ऊन पडल्यावर जंगलांत बोरें खात रेंगाळत राहिले. त्या रेंगाळणाऱ्या माणसांतला एक माणूस चुकला आणि साडे आकरा वाजले, दुपार होत चालली तरी त्याला रस्ता सांपडेना. तहानेनें त्याचा घसा कोरडा पडला. मनुष्यवस्तीचें कोणतेंहि चिन्ह त्याला त्या ठिकाणीं दिसेना. माणसाला अशा वेळीं देव आठवतो आणि तो त्याचा धावा करूं लागतो. त्या चुकलेल्या गृहस्थानेंहि तसेंच केलें. रात्रीचें जाग्रण, पाय थकून गेलेले, घशाला कोरड पडत चाललेली आणि तशांत उन्हाचा वाढता ताप, काय करावें तें त्याला समजेना. दुसरीं बरोबरीचीं

माणसें आनंदांत असतील आणि आपण तेवढे एकटेच दुःख भोगीत आहोंत या जाणीवेनें त्याच्या अस्वस्थतेंत अधिक भर पडली. इतक्यांत एक जख्खड म्हातारी रानटी बाई हातांतील कांठी टेकीत टेकीत त्या ठिकाणीं उपस्थित झाली. तेव्हां थोडीशी हुशारी वाटून ज्या खेडचांत त्याला जावयाचें होतें त्या खेडचाचा रस्ता त्यानें तिला विचारला. आणि तिच्या सांगण्यावरून त्याला कळून आलें कीं 'अरे, आपण अगदीं विरुद्ध रस्त्यानें चाललों आहोंत.' तो गृहस्थ आणखी पंधरा मिनिटांनीं आपल्या साथीदारांत जाऊन मिळाला. ती म्हातारी त्याला केवळ रस्ता दाखविण्यासाठींच त्या ठिकाणीं निर्माण झाली होती. कारण आपल्याला वाट दाखविणाऱ्या जरठेकडे त्यानें नुसतें कृतज्ञतापूर्वक दृष्टीनें पाहण्यापूर्वीच ती जशी एकाएकीं आली होती तशीच एकाएकीं नाहींशी झाली होती !

लेडबीटर साहेबांनीं लिहिलें आहे--"जिच्या नेतृत्वाखालीं माझ्या आयुष्याला निराळें वळण लागलें ती अशीच एकदां घोर संकटांत सांपडली होती. भोंवतालीं लोकांचा गोंगाट चालला होता. कांहीं माणसांना जबर जखमा होत होत्या आणि कांहीं पटापट मरून पडत होतीं. या अनर्थांतून आपली आतां सुटका होत नाहीं व मारेकऱ्यांच्या शस्त्राला आपण आतां बळी पडणार हा विचार तिच्या मनांत येतो न येतो तोंच आपणांला कुणीतरी उचलून भिरकावून दिलें असें तिला वाटलें आणि ती पाहाते, तो आपण त्या संकट स्थानापासून जवळच परंतु सुरक्षित असलेल्या एका गल्लींत आहोंत असें तिला आढळून आलें. पलीकडच्या रस्त्यावरील लोकांच्या आरोळ्या तिथें ऐकूं येत होत्या आणि घडलेल्या प्रकाराबद्दल आश्चर्यस्तंभित होऊन ती क्षणभर इकडे तिकडे पहाते तों त्या दंगलींतून स्वतःचा बचाव करून आलेलीं दोन तीन माणसें त्या ठिकाणीं आलीं. तिला पाहून त्यांना साश्चर्य आनंद वाटला. ती त्या ठिकाणाहून एकाएकीं अदृश्य होतांच ती जमीनदोस्त झाली असावी असाचा त्यांचा समज झाला होता.

तिचें मरण ओढवलें नव्हतें म्हणूनच ती तशा अद्भुत प्रकारें बचावली. या प्रकाराचा विचार करतां असें दिसतें कीं तिला कोणत्यातरी अदृश्य शक्तीनें अशा रीतीनें दूर भिरकाऊन दिलें होतें कीं ती पलीकडल्या

गल्लींत वेडीवाकडी न आपटतां व्यवस्थित उभी राहूं शकली होती. परंतु एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातांना ज्या अर्थीं ती कुणालाच दिसली नव्हती त्याअर्थीं मानवी दृष्टि आणि तिचें शरीर यामध्यें एखादा पडदा त्या अदृश्य शक्तीनें कांहीं काळ निर्माण केला असला पाहिजे. किंवा स्वाभाविक रीत्या सरळ जाणारे प्रकाश किरण तिचें शरीर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात असतांना वाकविले गेले असले पाहिजेत. कांचेच्या जाड अष्टपैलू तुकड्यांतून (prism) जातांना अथवा पाण्यांतून जातांना प्रकाश किरणांचा मार्ग बदलतो व ते थोडेसे तिरके होतात हें पदार्थ-विज्ञान शास्त्रांत सिद्ध झालें आहे. परंतु वाटेल तेव्हां वातावरणांतील प्रकाशकिरण वाकविण्याची कला अजून शास्त्रज्ञांना साधलेली नाहीं. ती पुढें कदाचित् साधेल आणि मग एखादी दृश्य वस्तू त्यांना अदृश्य करितां येईल. (Invisible Helpers पृ. २४–२५)

लहान मुलांना त्यांच्या अंगावरील दागिन्यांच्या लोभामुळें किंवा इतर अनेक कारणांस्तव दुष्ट माणसांनीं पळविल्याचीं उदाहरणें आपण नेहमीं वाचतों व ऐकतों. आईबापांच्याबरोबर जत्रेला किंवा एखाद्या गर्दीच्या ठिकाणीं गेलेलीं मुलें अनेक वेळां हरवतात. अशा ठिकाणीं असल्या प्रकारच्या आपत्तींत सांपडलेलीं कितीतरी मुलें पुन्हां त्यांच्या आईबापांना सुखरूप सांपडतात. हीं पळविलीं जाणारीं मुलें भुताटकीनें, ग्रहदशेनें संकटमुक्त फेऱ्यांत सांपडलीं अशी कित्येकांची कधीं कधीं भ्रामक समजूत होते. या संकटग्रस्त मुलांना अगदीं ऐनवेळीं कशी मदत होते याची अनेक उदाहरणें निरनिराळ्या देशांत घडलीं आहेत.

लंडन शहरांतील एका रस्यावरील दोन घरांस एकदां आग लागली. आगीच्या बंबवाल्यांनी बहुतेक सर्व माणसांस जिवंत बाहेर काढलें. परंतु धुरानें गुदमरून गेलेली एक म्हातारी व पांच वर्षांचा एक मुलगा चुकून आंत राहून गेला. त्या मुलाची आई त्या रात्रीं त्या घराच्या मालकिणीच्या ताब्यांत आपला मुलगा ठेवून कांहीं कामानिमित्त जवळच्या एका गांवीं गेली होती. सगळें घर ज्वालांनी ग्रासलें गेल्यावर त्या घरमालकिणीला त्या पोराची आठवण झाली. त्या भयंकर परिस्थितींत एका घाडशी बंबवाल्यानें तो मुलगा नक्की कुठें असेल याचा अदमास घेऊन त्या

जळत्या घरांत प्रवेश केला.

त्याला तो मुलगा सांपडला व अगदीं अलगत त्याला तो बाहेर घेऊन आला; परंतु बाहेर आल्यानंतर त्यानें आपल्या सहकाऱ्यांना आपला रोमांचकारी अनुभव सांगितला. तो म्हणाला, "मी ज्या वेळीं त्या खोलींत शिरलों त्या वेळीं ती सर्व खोली ज्वालांनी लपेटलेली होती. बहुतेक सर्व भाग कोसळला होता. परंतु खिडकीच्या बाजूला ज्वाला अशा रीतीनें वळल्या होत्या कीं तो अपूर्व प्रकार मी पूर्वी कधींहि पाहिला नव्हता. त्या ज्वालांनी जणूं काय अनैसर्गिकपणें आपले हात आखूड करून घेऊन त्या मुलला स्पर्श केला नव्हता. C. W. Leabeater कृत Invisible Helpers पृ. १४) अदृश्य मदतीचा हा एक अपूर्व नमुना आहे.

व्याख्यानांत किंवा लिखाणांत अशीं पाश्चात्य ग्रंथांतून घतलेलीं उदाहरणें दिलीं म्हणजे कांहीं देशप्रेमी लोकांना राग येऊन ते म्हणतात. "पाश्चात्यांचींच उदाहरणें कशाला ? आमच्याकडे अशा कांहीं गोष्टी घडत नाहींत ? घडतात. कारण मनुष्यस्वभाव व निसर्गनियम पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र सारखेच आहेत. परंतु पाश्चात्यांप्रमाणें नेटानें संशोधन करण्याची सध्यांच्या भारतीयांची वृत्ती नाहीं. आमचे पूर्वज फार मोठे होते याच अभिमानानें जगण्यांत आमच्यापैकीं बहुतेकांना मौज वाटते. निसर्गाच्या कित्येक गूढ नियमांवर पाश्चात्यांनी परिश्रम करून प्रकाश पाडला आहे. तेव्हां त्यांचीं उदाहरणें विषय समजण्यासाठीं आपण लक्षांत घेतलीं तर त्यांत बिघडलें कुठें ? अस्तु.

आतां अदृश्य मदतीचा आणखी एक प्रकार वर्णन करून हें प्रकरण आटोपतें घतों.

ठाण्यापासून ९ मलांवर तुरंभे नांवाचें एक खेडें टेकडीच्या पायथ्याशीं व खाडीच्या किनाऱ्यावर वसलें आहे. या गांवापासून जवळ जवळ एक मैल दूर रानांत कोशिमशेत नांवाचा एक भाग आहे. या ठिकाणीं एक लहानसें गणोबाचें देऊळ आहे. त्या भागांत प्रत्यक्ष फिरून व तेथील लोकांनीं सांगितलेली माहिती ऐकून असें स्वच्छ दिसतें कीं त्या वनप्रदेशांत राहाणाऱ्या एका अशरीरी देवदूताला त्या लोकांनीं

गणोबा हें नांव दिलें आहे. त्या प्रदेशांत एखादा मनुष्य वाट चुकला तर त्या वाट चुकणाऱ्या माणसाची ओळख असलेल्या एखाद्या व्यक्तीचें रूप घेऊन गणोबा त्याला बरोबर रस्ता दाखवितो, असे अनुभव वर्षानुवर्षं कित्येकांना आलेले आहेत.

१९११ सालीं तुरंभ्यास वाख्याची साथ आली होती. थोड्या दिवसांत अनेक माणसें पटापट मेलीं. मग एके दिवशीं रात्रीं माझे त्या गांवांतील स्नेही श्री. सीतारामपंत यांना घोड्याच्या टापांचा आवाज आला. ही शुभवार्ता दुसऱ्या दिवशीं सकाळीं सीतारामपंतांनी आपल्या वडिलांना सांगितली. तेव्हां ते म्हणाले, "गणोबाची स्वारी येऊन गेली. आतां आपल्या गांवांतला वाखा नाहींसा होईल."

आणि खरोखर तसें घडलें. पांढऱ्या घोड्यावर बसून व पांढरीं शुभ्र वस्त्रें परिधान करून जाणारी गणोबांची स्वारी तुरंभ्यांतील कित्यक माणसांनीं वेळोवेळीं पाहिली आहे.

तुरंभ्यांतले खेडूत गणोबाला जरी देव मानीत असले तरी देवत्वाची कल्पना नसल्यामुळें दरवर्षीं गणोबाला बोकडाचा बळी देण्याची दुष्ट प्रथा त्यांनीं परंपरेनें चालवली होती. मात्र बोकड प्रत्यक्ष त्या देवळासमोर कापण्याचें पाप न करतां ही मंडळीत्याला बाजूला नेऊन कापीत. ही चाल सीतारामपंतांनी १९४५ सालापासून बंद पाडली, तेव्हां गांवांतल्या कित्येक भोळसट लोकांनी मोठा गहजब केला. गांवावर महामारी येईल अशी कित्येकांना भीति वाटली. पण तसा कांहीं प्रकार घडला नाहीं. मात्र बलिदानाचा दिवस टळल्यावर थोड्याच दिवसांनीं गांवच्या लोकांचा एक म्होरक्या सदू पोशा पाटील हा बेफाम तापानें आजारी पडला. हा परिणाम गणोबाला बळी न देण्याचा अशीच गांवांतील सर्व लोकांची समजूत झाली. सदू पोशाला ताप येऊन दोन तीन दिवस गेले आणि एके रात्रीं गणोबा सीतारामपंतांच्या वेषांत सदू पोशाच्या स्वप्नांत दिसला. "हें घे" म्हणून त्यानें सदू पोशाच्या हातांत कांहीं तरी दिलें व त्यानें तें स्वप्नांतच खाऊन टाकलें. दुसऱ्या दिवशीं सदू पोशा पाटील उठला तो त्याचा ताप साफ नाहींसा होऊन. तो खडखडीत बरा झाला होता!

गणोबासारखे मदतगार गांवोगांवीं असतील. श्रद्धा, भोळसटपणा व परंपरित समजुती दूर भिरकावून देऊन स्वच्छ व निरभ्र दृष्टीनें हे प्रकार लक्षांत घेण्याचा प्रयत्न केला तर भलभलत्या देवतांना भलभलते नवस करण्याची पाळी माणसांवर येणार नाहीं.

० ० ०

५ अखेरच्या इच्छा

पिशाच्चांचा आभास हें प्रकरण वाचून कित्येक वाचकांची अशी कल्पना झाली असेल कीं 'पिशाच्च' ही केवळ कल्पना असून त्यांच्या आभासामुळेंच कित्येक लोक भितात. सत्य शोधण्याची व विचार करण्याची सर्वसामान्य लोकांत कुवत नसल्याकारणानें निसर्गातील कित्येक गूढें माणसांना उकलतां येत नाहींत. त्यामुळें बनावट व ढोंगी माणसाला साधु समजून लोक वंदन करतात. केवळ ऐकीव माहितीवर विश्वास ठेवणाऱ्यांच्या पिशाच्च्यांविषयीं अशाच भलत्या कल्पना असतात.

माणसाच्या मरणोत्तर अस्तित्वाचे शतशः पुरावे फरेडरिक मायर्स यांनीं आपल्या Human personality नामक ग्रंथांत अत्यंत चिकित्सक व शास्त्रीय पद्धतीनें मांडले आहेत. त्याचप्रमाणें परलोकवासी रेव्हरेंड सी. डब्ल्यु. लेडबीटर यांनींदेखील कांहीं उपयुक्त पुस्तकें लिहून या जीवनाच्या एका गूढ प्रांतासंबंधीं बरीच माहिती दिली आहे. मेलेलीं माणसें जिवंत माणसांशीं कां व कोणत्या प्रकारचे संबंध जोडूं शकतात याचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे; आणि तोसुद्धां निव्वळ भाकडकथांच्या आधारें नव्हे तर जी शास्त्रीय माहिती संशोधकांनीं उपलब्ध करून ठेवली आहे, तिच्या जोरावर. -

जिज्ञासूंनीं रेव्हरेंड लेडबीटरकृत The other side of Death (2) The Astral plane (3) Devchanic plane व (4) The perfume of Egypt हीं पुस्तकें अवश्य वाचावीं.

मनुष्य कां मरतो ?

मृत्यूविषयीं विचार करणारा जॉन आर्. मीडर यानें आपल्या Death, it's causes and phenomena या पुस्तकांत एक असें विधान केलें आहे कीं, "माणसाला मरणाची आवश्यकता नाहीं. मरण ही माणसाला लागलेली एक खोड आहे. वर्षानुवर्षांच्या संवयीनें आपणाला अखेर मेलेंच पाहिजे अशी मनुष्यजातीनें मोहनिद्रेंतल्या सूचनेप्रमाणें स्वतःला सूचना देऊन ठेवली आहे; आणि ही सूचना इतकी प्रबळ आहे कीं माणूस अखेर त्यामुळें मरतोच." केवळ जडवादावरच विश्वास ठेवणारे शास्त्रज्ञ आपली अक्कल कशी चालवतात याचा उत्तम नमुना म्हणजे मीडरचें वरील विधान होय.

भारतांतील प्राचीन ऋषींनीं जीवनाच्या अनेक गूढ महासिद्धांतांचा चांगला विचार करून जी माहिती नमूद करून ठेवली तिची एक तर मांडणी जुनी व कालौघांतून ती माहिती आपणापर्यंत येतां येतां तिच्यावर निरनिराळीं पुटें चढल्याकारणानें या बाबतींत ज्या भारतीयांना या ज्ञानाचा वारसा हक्क आहे त्यांचा बराचसा गैरसमज दिसून येतो.

यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यंतेकलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥ गीता ८-६ ॥

— अथवा हे अर्जुना, ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाचें किंवा ज्या ज्या वस्तूंचें अंतकालीं स्मरण करीत मनुष्य हा देह सोडतो त्या त्या वस्तूलाच तो प्राप्त होतो; कारण सर्वकाल त्या स्वरूपाचेंच त्यानें चिंतन कलेलें असतें.

गीतेंतील या श्लोकाचा अर्थ अनेक विद्वानांनीं आपल्या बुद्धीनुसार लावलेला आहे. मरणोत्तर परिस्थितीचें संशोधन करणाऱ्या आजकालच्या कित्येक विज्ञान-शास्त्रज्ञांना वरील श्लोकांतील विधानावर प्रकाश पाडणाऱ्या कांहीं हकीकती आढळल्या आहेत.

मेलेल्या मावशीची भेट

आपल्या अत्यंत जवळच्या नातेवाईकाला भेटण्याची कित्येक मरणाऱ्या माणसांना इच्छा असते. परंतु तो शेंकडों मैल दूर असल्याकारणानें अनेक माणसांची ती आखेरची इच्छा तृप्त होत नाहीं. मग तहानलेला माणूस पाणी न पितांच झोंपी गेल्यावर कधीं कधीं जसा स्वप्नांत जलप्राशनाचें सौख्य अनुभवितो तशीं तीं माणसें मरतांक्षणींच किंवा कांहीं काळानें शेंकडों मैल दूर असलेल्या आपल्या प्रिय माणसांच्या घरीं जाऊन त्याचें दर्शन घेतात किंवा त्यांना दर्शन देतात. वेळगांवच्या माझ्या एका मित्रानें मला त्याचा स्वतःचा अनुभव सांगितला होता —

"असे रात्रीचे आठ सव्वा-आठ झाले होते. मी नुकताच जेऊन विडा चघळीत होतों. तों एकाएकीं दिवाणखान्यांत असलेली आमच्या आत्याची टांगलेली तसबीर खाडकन् तुटून खालीं पडली.

दोनच दिवसांपूर्वी आत्या अत्यवस्थ असल्याचें पुण्याहून मला पत्र आलें होतें. आणि ती तसबीर तशी एकाएकीं पडतांच आत्याचें कांहीं बरें वाईट झालें नाहीं ना ? असा एकदम मला संशय आला. आणि कांहीं वेळानें आत्याचें नक्कीच प्राणोत्क्रमण झालें असें मला खात्रीपूर्वक वाटूं लागलें. पहाटे ४।। च्या एक्स्प्रेसनें पुण्याला जाण्याचा बेत कायम करून मी ती गाडी गांठली. आश्चर्याची गोष्ट अशी कीं हुबळीचा माझा दुसरा आतेभाऊ गोपाळ त्याच गाडीनें पुण्यास चालला होता. तो म्हणाला, 'काल रात्रीं बरोबर आठ वाजून दहा मिनिटांनीं मावशी आमच्या दाराच्या एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जातांना दिसली व अदृश्य झाली. मला व माझ्या आईलाच फक्त ती दिसली. दुसऱ्या कुणालाच ती दिसली नाहीं. बहिणीवर व भाच्यावर तिचें फार प्रेम असल्यामुळें कदाचित् तसें घडलें असेल. तो चमत्कार पाहून आई रडूं लागली. कारण दोनच दिवसांपूर्वी मावशी भयंकर आजारी असल्याचें पत्र आमच्याकडे आलें होतें. आईनें जवळ जवळ जबरदस्ती करूनच मला या गाडीनें पाठविलें आहे.'

"मी पुण्यास पोहोंचलों त्याच्या कितीतरी तास पूर्वी आत्याचा अंत्यविधि पार पडला होता. आम्ही घरांतल्या सुतकी वातावरणांत

सामील झालों तेव्हां आत्या मरणापूर्वी माझी, गोपाळची व त्याच्या आईची फार फार आठवण काढीत होती असें आम्हांला कळलें, आणि त्याहूनहि अद्‌भुत गोष्ट म्हणजे तिनें प्राण सोडले ती वेळ आदल्या रात्रीं ८ वाजून १० मिनिटें ही होती ! "

वेळगांवकरानें ही हकीकत सांगितली तेव्हां जवळ असलेलीं कांहीं माणसें त्याच्या भोळेपणाचा उपहास करूं लागलीं. तेव्हां गुर्ने साहेबांच्या phantasms of living नामक पुस्तकांत नमूद केलेलीं कांहीं उदाहरणें मी त्यांना दाखविलीं. कारण साहेब लोकांचे आधार दिल्याशिवाय आमच्या लोकांची समजूत सहसा पटत नाहीं.

कांहीं पाश्चात्य अनुभव

" रेव्हरेंड आर. एम्. हिल यांनीं एक उंच आकृति आपल्या खोलींत घुसतांना पाहिली. ते दचकले आणि त्यांना आश्चर्य वाटलें: ती आकृति थोडचाच क्षणापूर्वी मेलेल्या त्यांच्या काकांची होती. "

(Phantasms of the living vol. I पृष्ठ ६९४)

आपल्या प्रिय आप्तांना मृत माणसें मरतांक्षणींच कशीं भेटतात याचें एक उदाहरण फ्रेडरिक यानें दिलें आहे—

" माझी आई जेवणाच्या खोलींत बसली होती. तिच्या मांडीवर माझा मोठा भाऊ जॅमी जो त्यावेळीं दोन वर्षांचा होता तो बसला होता. घरांत कोणी नव्हतें. फक्त मोलकरीण होती, ती तळमजल्यावर. दिवाणखान्याचा आणि जेवणाच्या खोलीचा दरवाजा उघडा होता. अशा त्या वेळीं तिला एकाएकीं दैवी शोकपूर्ण परंतु हृद्य असें संगीत ऐकूं आलें. तें संगीत फक्त दोनच मिनिटें टिकलें आणि नंतर बंद झालें. जॅमी एकदम आईच्या मांडीवरून उठला आणि दिवाणखान्यांत धांवत गेला. त्याला वाटलें पप्पा पियानो वाजवीत बसले असतील; परंतु तो दिवाणखान्यांत पियानोपाशीं जाऊन उभा राहिला आणि त्याच्या तोंडून उद्‌गार निघाला, " पप्पा नाहीं ! "

" माझ्या आईनें त्या दिव्य संगीताची ती वेळ नमूद करून ठेवली. सहा आठवडचांनीं दरबान, नाताळ येथें असलेली माझी मावशी मेल्याचें आम्हांला पत्र आलें. ज्या क्षणीं तें संगीत माझ्या आईनें ऐकलें त्याच

क्षणीं ती शेंकडों मैल दूर असलेल्या दरवान शहरीं मेली होती. इथें हें सांगितलें पाहिजे कीं माझी मावशी वादनकलेंत पटाईत होती.

सही–मिस् एमिली एम्. हॉर्न.

(Fredric myres – Human Personality case 747 A vol. II Page 388)

मरणानंतर कांहीं तासांनी ज्यांना पार्थिव नेत्रांनीं पाहतां आलें नाहीं अशा आपल्या आवडत्या माणसांकडे मृत माणसें क्षणभर जातात असा पुरावा आढळला आहे. सिस्टर बर्था नांवाच्या एका बाईनें स्वानुभव सांगितला आहे–

" १० नोव्हेंबर १८६१ च्या रात्रीची गोष्ट. बरोबर वेळ मला माहित नाहीं. मी माझ्या बिछान्यावर जागी होत्ये, कारण शेजारच्या खोलींतल्या एका माणसाची प्रकृति ठीक नव्हती. मला माझ्या अगदीं ओळखीचा आवाज आला, 'मी तुझ्याजवळ आहे.' मी पाहिलें तों मला कुणीच दिसलें नाहीं; म्हणून मी विचारलें, 'तूं कोण आहेस ?' तो आवाज म्हणाला– 'तें तुला अद्याप समजतां उपयोगी नाहीं.' त्यानंतर मी कांहीं ऐकलें नाहीं व मला कांहीं दिसलें नाहीं. मला मुळींसुद्धां भीति वाटली नाहीं. पण माझी खात्री झाली कीं माझी लाडकी मैत्रिण मिस् लुसी गॅम्बीअर पॅरी हिचा तो आवाज होता. दुसऱ्या दिवशीं माझ्या आईला बातमी मिळाली कीं लुसी गॅम्बीअर १० नोव्हेंबर १८६१ रोजीं सकाळीं ख्रिस्तवासी झाली होती. म्हणजे मला तिचा आवाज ऐकूं आला, त्यापूर्वी सुमारें बारा तास तिचें प्राणोत्क्रमण झालें होतें. "

(Phantasms of the living vol. I p 522 Foot note)

मरतें वेळच्या आपल्या इच्छा माणूस कशा तऱ्हेनें पुऱ्या करून घेतो याचीं अनेक उदाहरणें निरनिराळ्या संशोधकांच्या पुस्तकांत वाचावयास मिळतात. मिस्टर ओवेन (Owen) यांनीं लिहिलेल्या The Debatable land नामक पुस्तकांत अशीं जीं अनेक उदाहरणें आहेत त्यांपैकीं एक असें आहे–

" मिसेस् एल्. नांवाच्या एका बाईला ईस्थर नांवाची एक बहीण

होती. कांहीं आठवड्यांपूर्वी तिचें लग्न होऊन ईस्थर आपल्या नवऱ्या-बरोबर कॅलिफोर्नियास गेली होती. एके रात्रीं स्वप्नांत ही बहीण मिसेस् एल्. यांच्या बिछान्याजवळ येऊन म्हणाली, "सेसीलिया, तूं माझ्याबरोबर कॅलिफोर्नियास चल." मिसेस एल्. यांनीं आपल्या बहिणीच्या विनंतीला प्रथम मान न देतां म्हटलें, 'मला माझ्या नवऱ्याला आणि मुलांना सोडून इतका लांब आणि कंटाळवाणा प्रवास करावासा वाटत नाहीं.'

'आपण लवकरच तिथें जाऊं' ईस्थर म्हणाली, 'आणि तूं उजाडण्यापूर्वी परत येशील.' नंतर सेसीलिया स्वप्नांत आपल्या अंथरुणावरून उठली आणि आपण आपला हात आपल्या बहिणीच्या हातांत घालून वरवर चढत व तरंगत तरंगत अनंत आकाशांतून जात आहोंत असें तिला वाटलें. नंतर त्या दोघीही एका वसतिस्थानाजवळ खालीं उतरल्या. परदेशांत नशिबाच्या शोधार्थ आपल्या नवऱ्यासमवेत गेलेल्या आपल्या बहिणीचें घर इतकें दरिद्री आणि रानवट असेल अशी सेसीलियाची कल्पना नव्हती. त्या दोघीही बहिणी त्या घरांत शिरल्या. सेसीलियानें एका मेहुण्याला ओळखलें. ईस्थर नंतर तिला शोकावस्थेतील कपड्यांत असलेल्या आपल्या खोलींत घेऊन गेली आणि एका उघड्या पेटींत ठेवलेलें प्रेत तिनें तिला दाखविलें. ती ईस्थरची कुडी होती. तिच्यावर फिक्कटपणा आणि प्रेताची कळा आली होती. सेसीलियानें आश्चर्यस्तंभित होऊन त्या प्रेताकडे आणि आपणांस तिथें घेऊन येणाऱ्या बहिणीच्या तेजस्वी आकृतीकडे पाहिलें. तिची चौकस आणि अचंबित दृष्टि पाहून ईस्थर म्हणाली. 'होय, ती कुडी माझी होती; परंतु रोगानें तिच्यावर हल्ला केला. मला कॉलरा होऊन मी परलोकांत आलें आहें. लवकरच तुला जी दुःखद वार्ता कळणार आहे तिचा स्वीकार करण्याची तुझी तयारी असावी म्हणून हें प्रेत तुला दाखविण्याची माझी इच्छा होती–"मिस्टर ओवेन कृत The Debatable Land पृष्ठ २१९)

साध्या चर्मचक्षूनें सेसीलियाला वर वर्णन केलेला प्रकार पहातां आला नसता. स्वप्नांत सूक्ष्म देहानें दूरवर प्रवास करणें शक्य असल्या-

मुळें ईस्थरनें आपल्या बहिणीची मरणोत्तर भेट घेऊन आपलें फक्त शरीर मृत झालें याचा प्रत्यक्ष पुरावा दिला. मृत माणसें स्वप्नांत आपल्या आप्तांस आणि मित्रांस कां व कशीं भेटतात, अंतकाळच्या प्रबल इच्छेमुळें काय होतें, त्याच्या स्पष्टीकरणार्थ वरील उदाहरण दिलें आहे.

खलाशी मुलाचें पुनरागमन

ग्रीनिच येथें मिस्टर हॅमाँड नांवाचा एक गृहस्थ रहात असे. त्याच्या सेवकपरिवारांत मिसेस् पॉटर नांवाची एक बाई होती. या बाईचा एक पंधरा वर्षांचा मुलगा डोरीस नामक वोटीवर खलाशी होता. तो मुलगा मोठा चुणचुणीत परंतु अस्वस्थ प्रकृतीचा होता. परवानगीशिवाय अनेकदां आपलें जहाज सोडून पळून आला होता. तेव्हां त्याच्या मित्रांनीं मध्ये पडून आणि त्या कप्तानाच्या दाढीला हात लावून त्याला परत आपल्या कामावर रुजू केलें. दरम्यान त्याच्या आईनें हॅमाँड कुटुंब सोडून दुसरें लग्न केलें. खलाशी पॉटर यास तो फार दूर असल्यामुळ ही हकीकत कळली नाहीं.

८ सप्टेंबर १८६६ च्या रात्रीं मिस्टर हॅमाँड याच्या दारावरची घंटा वाजली. मेरी नांवाच्या घरांतील मोलकरणीनें दरवाचा उघडला. बाहेर आलेल्या व्यक्तीची व तिची थोडीशी बातचीत होऊन तो दरवाचा बंद केला गेला. मिसेस् हॅमाँड यांची प्रकृति त्यावेळीं थोडीशी नादुरुस्त होती. त्या आपल्या शयनगृहांत होत्या. त्यांना त्या बाहेरून आलेल्या व्यक्तीचा आवाज नक्की पॉटरच्या आवाजासारखा वाटला म्हणून त्यांनीं विचारलें, 'मेरी, कोण ग आलं होतं ?' 'बाई तो एक खलाशी पोऱ्या होता ; त्याला त्याची आई हवी होती. मी त्याला सांगितलं कीं मला तुझ्या आईविषयीं कांहीं माहीत नाहीं आणि त्याला लावून दिला.'

मिसेस हॅमाँड यांची उत्सुकता वाढून त्यांनीं मेरीला तो मुलगा कसा दिसत होता असें विचारलें.

ती म्हणाली, 'तो मुलगा चांगला होता आणि त्यानें खलाशाचे कपड घातले होते. मी त्याला पुन्हां कुठें पाहिला तर नक्की ओळखेन. त्याचे पाय उघडे होते. तो फिक्कट आणि अतिशय दुःखी दिसत होता. आणि

जेव्हां मी त्याला सांगितलं कीं तुझी आई इथं नाहीं तेव्हां त्यानें कपाळावर हात मारून म्हटलं, ' अरे काय करावं आतां ?'

मिसेस् हॅमाँड यांनीं कोणता अस्वागतार्ह पाहुणा आपल्या दाराशीं येऊन गेला असावा तें मिस्टर हॅमाँड यांस सांगून म्हटलें, " माझी खात्री आहे कीं, तो पॉटर परत आपल्या बोटीवरून पळून आला असला पाहिजे. '

हॅमाँड दांपत्यानें नंतर त्या मुलाच्या आईपाशीं चौकशी केली परंतु आपल्या पळपुट्या रत्नाविषयीं तिला कांहींच बातमी समजली नव्हती. नंतर पॉटरचे शाळामास्तर डॉक्टर टॉड यांजकडे चौकशी करण्यांत आली तेव्हां ते म्हणाले, " पॉटर बोटीवरून पळून येईल असें संभवत नाहीं ; कारण फक्त दोनच महिन्यांपूर्वी मला त्याचें पत्र आलें होतें आणि आपलें फार चांगलें चाललें आहे असें त्यानें लिहिलें होतें. डॉक्टर टॉड यांजपाशीं आपल्या अनेक शिष्यांचीं छायाचित्रें होतीं त्यांत टॉम पॉटरचेंहि एक होतें. तीं छायाचित्रें त्यांनीं मेरीपुढें ठेवून रात्रीं दारांत आलेल्या मुलाचें चित्र तिला त्या चित्रसमूहांत सांपडल्यास शोधून काढ असें सांगितलें. आणि त्याचवेळीं मेरीचा खरेपणा ताडून पहाण्यासाठीं भलत्याच एका मुलाचें छायाचित्र तिच्यासमोर धरून त्यांनीं विचारलें, ' तूं रात्रीं पाहिलास तो हा मुलगा होता काय ? मेरीनें नकारात्मक उत्तर दिलें आणि त्या चित्रसमूहांतून तिनें नेमकें टॉम पॉटरचें चित्र हुडकून काढलें.

ऑक्टोबर महिन्यांत नाविक अधिकाऱ्यांकडून डॉ. टॉड यांस एक पत्र आलें. हें पत्र पॉटरच्या आईचा पत्ता नसल्यामुळें डॉ. टॉड यांस लिहिण्यांत आलें होतें. या पत्रांत टॉम पॉटरनें ६ सप्टेंबर १८६६ रोजीं म्हणजे तो हॅमाँड साहेबाच्या दारांत दिसला त्याच्या दोनच दिवस अगोदर शेवटचा श्वास घेतला अशी बातमी होती. कारण जामाइका बेटाजवळ डोरीस बोटीला अपघात झाला होता आणि त्या अपघातांत टॉम पॉटर सांपडला होता. (Glimses in the twilight by Fredric George Lee पृष्ठ ११८)

ती मेरी मोलकरीण जर चाणाक्ष असती तर वरील हकीकतीवरून बऱ्याच मनोरंजक गोष्टी बाहेर आल्या असत्या. टॉम पॉटरला आपण

मेलों आहोंत याची जाणीव होऊन तो आपल्या आईला ती वार्ता कळविण्यास आला होता कीं आपण आपल्या घरीं जात आहोंत अशा समजुतीनें तो आला होता हें स्पष्ट होत नाहीं. आपल्या आईचें लग्न वगैरे झाल्याची हकीकत त्याला माहीत नव्हती आणि म्हणूनच त्यानें शेवटीं ज्या ठिकाणीं तिला पाहिली होती त्या ठिकाणीं तो तिला भेटावयास गेला. त्याचें तें वागणें व्यवहारांत जसा माणूस वागतो त्याप्रमाणेंच होतें.

सोळा जणांनीं पाहिलेलें पिशाच्च

मरणकाळीं माणसाचा जो पोशाख असतो किंवा त्याच्या पार्थिव देहावर ज्या कांहीं जखमा किंवा व्रण उठलेले असतात त्याच व्रणांनीं युक्त असें त्याचें पिशाच्च दिसूं शकतें. स्वीडनमधील एका पाद्र्यानें खालील हकीकत सांगितली आहे.

" मी लहानपणीं शाळेंत जात असतांना फ्रू स्मिथ नांवाच्या एका बाईच्या वसतिगृहांत राहात होतों. ज्या काळची गोष्ट मी सांगत आहें त्यावेळीं त्या वसतिगृहांत एकंदर सोळा लोक होते. फ्रू स्मिथ ही सुईणपणाचाही धंदा करीत असल्यामुळें पुष्कळदां वसतिगृहाच्या बाहेरहि असे.

" ते हिवाळ्याचे दिवस होते आणि एके दिवशीं दुपारीं आपण कुठेंतरी बाहेर जात आहोंत आणि दुसऱ्या दिवसापर्यंत परत येणार नाहीं असें सांगून फ्रू स्मिथ आम्हांला सोडून गेली. जाण्यापूर्वी आमच्या जेवणाची वगैरे व्यवस्था तिनें करून ठेवली होती. त्याचप्रमाणें शेगडी आणि दिव्यांची काळजी घेण्यासंबंधीं तिनें आम्हांला बजावून ठेवलें होतें. संध्याकाळच्या वेळीं आम्हीं दुसऱ्या दिवसाचे घडे तयार करण्यांत गुंतलों होतों. रात्रीं साडेनऊ वाजतां आम्हीं सारे दरवाजे लावून व दिवे मालवून अंथरुणांत पडलों; परंतु कडक थंडीपासून निवारण करण्याकरितां जी शेगडी ठेवली होती तिच्यांतील निखाऱ्यांच्या प्रकाशानें खोलींतील प्रत्येक वस्तू आम्हांला स्वस्छ दिसत होती. आम्हीं पडल्या पडल्या बोलत होतों, इतक्यांत आम्हांला आमच्या बिछान्यापाशीं एक आकृति दिसली. शेतकऱ्यासारखा तो एक मध्यमवयी माणूस होता. आमच्याकडे तो रोखून पहात होता. तो उंच असून त्यानें कबऱ्या रंगाचे कपडे घातले होते. त्याच्या डाव्या छातीवर आणि डाव्या पायावर पांढऱ्या रंगाचे कप्पे दिसत होते. माझ्या सोबत्यानें कोपरानें धक्का मारून मला विचारलें,

'कोण हा कुरूप माणूस ?' मी त्याला स्तब्ध राहाण्याची खूण केली आणि दोघेहि त्या माणसाकडे पाहात राहिलों.

" तो माणूस आमच्याकडे बराच वेळ पहात राहिला. नंतर तो वळला आणि त्या खोलींत इकडून तिकडे फेऱ्या घालूं लागला. त्याच्या पावलांचा घप् घप् आवाज येत होता. जणूं काय तो बर्फावरूच चालत होता. तो एका कपाटाजवळ गेला आणि त्या कपाटाचे सर्व खण त्यानें उघडले आणि बंद केले. जणूं काय त्या खणांत तो कांहीं शोधीत होता. नंतर तो शेगडीजवळ गेला आणि त्या जळत्या निखाऱ्यांवर हळू हळू फुंकर घालूं लागला. आणि आपले हात गरम करण्याकरितां त्यानें शेगडीवर धरले. नंतर तो पुन्हां आमच्या बिछान्यापाशीं आला आणि पुन्हां आमच्याकडे पाहात उभा राहिला. आम्हीं त्याच्याकडे टक लावून पाहिलें, तेव्हां आम्हांला उमगलें कीं त्याचें शरीर पारदर्शक होतें आणि त्यांतून पलीकडच्या वस्तू दिसत होत्या. आम्हीं त्याच्याकडे तसें पाहात असतांनांच त्याचा तो आकार नाहींसा होत होत अदृश्य झाला. हा प्रकार इतका चमत्कारिक होता कीं त्यामुळें आम्हीं अस्वस्थ झालों. परंतु आम्हीं बिछान्यावरून उठलों नाहीं आणि अखेर आम्हीं झोपीं गेलों.

सकाळीं उठल्यानंतर आम्हांला कळून आलें कीं तें पिशाच्च त्या वसतिगृहाच्या निरनिराळ्या खोल्यांत निजणाऱ्या सर्व मिळून सोळा विद्यार्थ्यांना दिसलें होतें. आमच्यापैकीं जे कांहीं जुने विद्यार्थी होते त्यांनीं ती आकृति फ्रू स्मिथच्या नवऱ्याची होती असें सांगितलें. तो एक नालायक माणूस होता. आयुष्यांत विधायक असें कांहींच त्यानें केलें नव्हतें. आणि अलीकडे कांहीं वर्षें तो बायकोपासून दूर राहिला होता आणि पृथ्वीच्या पाठीवर कुठेंतरी भटकत होता.

आमच्यापैकीं कांहीं विद्यार्थ्यांनीं अशा वर्णनाचा मनुष्य जवळपास कुणाला दिसला का म्हणून चौकशी केली. आणि खात्रीलायक बातमी अशी मिळाली कीं, त्याच रात्रीं नऊ वाजल्यानंतर आमच्या वसतिगृहापासून दोन मैल दूर असलेल्या एका झोंपडींत रात्रीपुरती निवाऱ्याची जागा मागण्यासाठीं तो गेला होता. त्या झोंपडींत जागा नसल्यामुळें त्याला जवळच असलेल्या दुसऱ्या शेतावरील घराचा रस्ता दाखविण्यांत

आला. हा वृत्तांत ऐकल्यानंतर आमच्या संशोधकांनीं समोर पसरलेल्या बर्फांत पावलें उमटलीं आहेत कीं काय तें पाहिलें. आणि लवकरच त्यांना मानवी पायांचे ठसे त्या हिमाच्छादित भूमीवर आढळले. त्यांच्या अनुरोधानें आमचे संशोधक चालत चालत गेले त्यांना एक लांकडी बूट सांपडला आणि त्यानंतर थोड्याशा अंतरावर त्याच माणसाचें प्रेत सांपडलें. तें प्रेत जवळजवळ अर्धें त्या हिमराशींत गाडलें गेलें होतें. तें प्रेत उलटून पाहिल्यावर असें आढळलें कीं, त्याच्या छातीच्या डाव्या बाजूला व डाव्या गुडघ्यापाशीं घट्ट झालेला बर्फाचा एक एक गोळा चिकटला होता. पिशाच्चाच्या अंगावर आम्हांला पांढरे कप्पे जे दिसले ते हेच." (The theosophical review vol XXII पृष्ठ १७७)

प्रत्येक माणसाच्या वृत्ती निरनिराळ्या असतात असें असूनदेखील तें पिशाच्च सोळा जणांना दिसलें ही विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. जिवंतपणीं तो एक नालायक आणि भटक्या माणूस असल्यामुळें मरतांक्षणींच त्या दरिद्री नारायणानें प्रथम आपल्या पत्नीच्या वसतिगृहास भेट देऊन तेथील कपाटाचे खण चांचपले ते आपणांला कुठें पैशाची एखादी थैली वगैरे मिळते कीं काय या इराद्यानेंच. कारण जित्याची खोड मेल्यानंतरहि जात नाहीं. माणूस मेल्यानंतर देवदूत होतो ही सामान्य प्रचलित समजूत अगदीं खोटी आहे. फ्रू स्मिथचा नवरा बर्फांत कुडकुडून मेला. अंतकाळीं निवाऱ्याची जागा आणि शेगडी यांची त्याला आवश्यकता होती. म्हणून निवाऱ्याचें स्थान त्यानें आपल्या पत्नीच्या वसतिगृहांत शोधलें आणि खोलींतील त्या शेगडीवर फुंकर घालून आणि हात शेकून त्यानें आपली अखेरची इच्छा पुरी करून घेतली.

तात्पर्य

मरणोत्तर अस्तित्व, पुनर्जन्म आणि कर्म इत्यादि जीवनाचे महासिद्धांत हिंदुस्थानांतील लोकांच्या जितके हाडीं मांसी खिळले असतील त्याच्या शतांशानेंहि या प्रकारांची दरकार दुनियेंतील इतर लोकांना नसते. पाश्चात्यांचा तर भुतें-खेतें, पुनर्जन्म यांवर विश्वास नाहींच.

असें असूनसुद्धां मानवी जीवनांत कधीं कधीं प्रत्यक्ष प्रत्ययास येणाऱ्या या गूढ अनुभवांचें संशोधन पाश्चात्यांनींच अत्यंत व्यवस्थित अशा शास्त्रीय पद्धतीनें केलें आहे ही कौतुकाची गोष्ट आहे. फ्रेडरिक मायर्स-सारख्या अमेरिकन शास्त्रज्ञानें तर असल्या अद्‌भुत प्रकारांच्या संशोधनांत आपली हयात घालविली व Human Personality नांवाचा सुंदर ग्रंथ जगाला माहिती देण्यासाठीं लिहून ठेवला. मला वाटतें कीं, हिंदु संस्कृतीचा पगडा ज्यांच्या मनावर आहे अशा लोकांना या बाबतींत संशोधन करणें अधिक सोपें जाईल. परंतु कोणत्याहि संशोधकाची दृष्टि पूर्वग्रहदूषित असतां उपयोगी नाहीं. ती तशी असली तर कोंकणच्या भुतांशिवाय दुसरें कोणतें संशोधन त्याच्या हातून होईल? ज्या कांहीं थोडचा माणसांना आपल्या आयुष्यांत वर वर्णन केल्या प्रकारचे अनुभव येतील त्यांनी ते व्यवस्थितपणें नमूद करून ठेवल्यास व आस्थेवाईक मंडळींस सांगितल्यास मानवी जीवनासंबंधींच्या माहितीचें एक नवें दालन खुलें होईल.

० ० ०

६ : अंतकाळीचे व्यवहार

अत्यानंद झाला असतांना माणूस जसा गाऊं–नाचूं लागतो तसा तो अति दुःखाच्या प्रसंगींहि आक्रंदन केल्यावांचून राहात नाहीं. सामान्य माणसाला जास्तींत जास्त दुःखाचा प्रसंग म्हणजे त्याच्यावर येणारी मृत्यूची घाड.

मृत्यूच्या कचाट्यांत सांपडलेल्या माणसाची हांक कधीं कधीं इतकी आर्त आणि उत्कट असते कीं, ज्याला ती हांक मारली असेल तो कितीहि अंतरावर असला तरी तें दीर्घ अंतर तोडूनदेखील ती त्याच्या कानावर जाऊन पडते. अर्थात असल्या प्रकारांत एक मुख्य गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, दुःखिताच्या कंठांतून निघणाऱ्या नादलहरी केवळ त्यांच्या जोरदारपणामुळें त्यांना दूर अंतरावर नेऊं शकत नाहींत, तर उगमस्थानांतला दुःखाचा झटका विद्युद्वेगानें त्यांना इच्छित स्थळीं पोहोंचवितो. असल्या प्रकारचे प्रत्यय कित्येक माणसांना आले आहेत.

'३० ऑक्टोबर १८५७ रोजीं संध्याकाळीं ७ च्या सुमारास मी माझ्या निवासस्थानांतील एका खोलींत बसलों असतांना मला माझ्या ओळखीच्या एका माणसाचा आवाज ऐकूं आला. तो माणूस खिडकीच्या खालच्या बाजूला बाहेरून मला हांक मारीत होता. 'मिस्टर मस्केल,

मला तुमची जरूर आहे, तुम्ही या.' मी बाहेर जाऊन पाहिलं तेव्हां कुणीच तिथें नव्हतं. मी खोलींत येऊन बसलों आणि रात्रीं ९ वाजेपर्यंत मला त्या प्रकाराची कांहींच आठवण नव्हती. ज्या माणसाचा आवाज मी ऐकला होता त्याचं नांव होतं जे. बी. त्याच्या पत्नीनं-जी माझ्या निवासस्थानापासून सुमारें एक मैल अंतरावर राहात होती-माझ्याकडे मला बोलावण्यासाठीं एक माणूस पाठविला. स्टेशनपासून गांवाकडे जायला जो रस्ता होता त्या रस्त्यावर जे. बी. मरून पडल्याची बातमी तो नोकर घेऊन आला होता.

"त्या दिवशीं संध्याकाळीं ७ वाजतां जे. बी. कुठल्या व्यवसायांत गुंतला होता याची मला मुळींच जाणीव नव्हती. जे. बी. हा गुरांचा व्यापारी होता, आणि त्या शनिवारच्या बाजारांत बरेच पैसे मिळवून घरीं येत असतांना चोरट्यांनीं बहुधा त्याचा खून केला होता." ही हकीगत Rev. J. Husket यांनी निवेदन केली असून Society for psychical Research proceedings vol. X पृ. २५८ वर प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

जे. बी. यानें मरतां मरतां मदतीसाठीं म्हणून जी हांक मारली ती एक मैलाहून अधिक दूर असलेल्या त्या धर्मोपदेशकाला अगदीं खिडकीखालून ऐकूं यावी व तो आवाज नेमका त्या मृत माणसाचा असावा ही वरील अनुभवांतील विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

अशाच प्रकारचा एक अनुभव Mrs. E. L. Kearney नांवाच्या एका बाईस १८७५ सालीं आला होता. बाईनें म्हटलें आहे—

"माझा बिछाना खालच्या बाजूनें मला हलल्यासारखा वाटला. कुणीतरी पाण्यांत गुळणे करावे तसें मला वाटलें आणि मदतीसाठीं कुणाची तरी आर्त किंकाळी ऐकल्यासारखं वाटलं. १ जानेवारी १८७५ दुपारचा १ वाजला होता. त्यावेळीं मी ऑस्ट्रेलिया खंडांतील व्हिक्टोरिया शहरीं होतें.

'त्यावेळीं मी पूर्ण जागी होतें. मी आजारी असून मला आंकड्या येत होत्या. आंकडी आली म्हणजे ती कांहीं तास राही माझ्या अंगांत ताप

नव्हता, मला तहान लागत नव्हती आणि माझी शुद्धीही चांगली होती. त्यावेळीं कोणत्याहि काळजीनें किंवा दुःखानें माझं मन पछाडलं नव्हतं. माझं वय १८ वर्षांचं होतं. ते चांगल्या सूर्यप्रकाशाचे दिवस होते आणि मनस्वी उकाडा होत होता.

'त्या आर्त किंकाळीमुळें माझं मन फार व्यथित झालं; परंतु तो आवाज अमूक एका व्यक्तीचा असेल असं मला त्यावेळीं तरी वाटलं नाहीं.

'माझ्याबरोबर त्या खोलींत कोणीच नव्हतं आणि मला जो अनुभव आला तो दुसऱ्या कुणालाहि आला नव्हता. मी घंटा वाजवली; आणि माझी आई जेव्हां त्या खोलींत धांवत आली तेव्हां मी घडलेला प्रकार तिला निवेदन केला.

'त्याच दिवशीं दुपारीं ३ च्या सुमारास पोस्टमननें एक तार आणली. त्या तारेनें माझा चुलतभाऊ Charles Griffith (वय वर्षे १३) हा दुपारीं १ वाजतां बुडून मेला अशी बातमी आणली होती. तो शिकारीला गेला होता आणि एका रानबदकाचा पाठलाग करीत असतांना पट्टीचा पोहणारा असूनदेखील त्याला मृत्यू आला होता.'

वरील हकीगत Gertrude E. Kearney या बाईनें ३० नोव्हेंबर १८९१ च्या पत्रान्वयें सायकिकल रिसर्च सोसायटीला कळविली. त्यानंतर सोसायटीनें आणखी कांहीं पृच्छा केल्यावरून बाईनें १७ जानेवारी १८९२ च्या पत्रांत लिहिलें होतें,

"जें कांहीं घडलं तें माझ्या स्मृतींत अगदीं ताजं आहे. मला आणखी असं सांगायचं आहे, कीं मरणाच्या फक्त दोन दिवस आधीं Charles Griffith हा दूर गांवीं चालला होता म्हणून मला व माझ्या कुटुंबांतील मंडळींना भेटावयास आला होता; परंतु मला कांहींतरी संसर्गजन्य रोग झाला असेल अशा समजुतीनें त्याच्या मंडळींनीं त्याला मला भेटूं दिलं नाहीं. तो आमच्या बागेच्या फाटकापाशीं उभा राहिला व गच्चींत उभ्या असलेल्या माझ्या आईला त्यानें हांक मारली. 'Gretrude ला माझा गुड-बाय सांगा!' असें तो तिथून म्हणाला. आणखी फक्त दोनच दिवसांनीं त्यानं जगाला रामराम ठोकला.' (Proceedings of the society for psychical Research Vol X. पृष्ठ ३६९.)

Gertrude ला भेटण्याची कदाचित् तीव्र इच्छा असूनदेखील charles Griffith तिला भेटूं शकत नव्हता आणि म्हणून कदाचित् त्याला मृत्यूच्या क्षणीं तिची आठवण झाली असेल असा वरील हकीकतीवरून अंदाज बांधतां येण्यासारखा आहे. त्याचे प्राण देहाला सोडून जाण्याची वेळ व आजारी Gertrude ला आर्त किंकाळी ऐकूं येण्याची वेळ बरोबर जमावी ही घटना वैशिष्ट्यपूर्ण आहे.

मरणाऱ्या माणसाला जशी आपल्या जिवलग माणसाला हांक मारावीशी वाटते त्याप्रमाणें त्याला कधीं कधीं भेटावेंसेंदेखील वाटतें. आणि जीं माणसें मरणाऱ्या माणसांपासून दूर असतात त्यांना भेटण्याची इच्छा करणारा मरणारा माणूस कधीं कधीं भेटूं शकतो असें आढळून आलें आहे. The English mechanic and world of Science च्या २० जुलै १९०६ च्या अंकांत खालील हकीकत प्रसिद्ध झाली होती—

शुक्रवार दि. १०–१–१८७९ च्या रात्रीं मी लवकरच अंथरुणावर अंग टाकलें. झोपेच्या पहिल्या भरांतच मी जागा झालों. दक्षिण दिशेकडच्या खिडकींतून मी चंद्र पाहिला. त्याच्या किरणांनी माझी सर्व खोली प्रकाशित झाली होती. त्याचवेळीं त्या खोलींतील भिंतीच्या कपाटाकडे माझें लक्ष गेलें. माझ्या खोलीच्या पूर्वभागावरील भिंतींत तें कपाट होतें. त्या कपाटाच्या दरवाज्यासमोर मला एकाएकीं एक आकृति दिसली. प्रथम ती अस्पष्ट होती. नंतर हळूहळू स्पष्ट झाली व मी माझ्या आजीचा चेहरा ओळखला. मला कांहीं सेकंद ती आकृति दिसत होती, नंतर आस्ते आस्ते ती त्या चंद्रप्रकाशांत लुप्त झाली. त्या अलौकिक दृश्याचा माझ्या मनावर चमत्कारिक ठसा उमटला. आजीच्या डोक्यावर एक जुन्या पद्धतीची टोपी होती आणि तिचा शिंपल्यासारखा आकार होता. मला भीति अशी मुळींच वाटली नाहीं. चंद्रप्रकाशांत कांहींतरी भास झाला असं समजून मी कुशीवर वळलों व झोंपीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी फराळास बसलों असतांना त्या रात्रीच्या दृश्याची हकीकत सांगूं लागलों, तों आश्चर्याची गोष्ट अशी कीं वडील टेबलावरून एकाएकीं उठून चालूं लागले. त्यांच्या चित्तांत एकदम खळबळ उडालेली दिसली. समोरच्या बशींतल्या फराळाला हात न लावतांच

ते खोलीबाहेर घाईघाईनें गेले. त्याचं कारण मी माझ्या आईला विचारलं, तेव्हां तिनं खूण करून मला गप्प बसायला सांगितलं. आईनं दरवाजा लावला तेव्हां आईला वडील असे एकाएकीं अस्वस्थ होण्याचं कारण मी पुन्हां विचारलं. ती म्हणाली, 'चार्लस, कधीं ऐकली नव्हती अशी एक चमत्कारिक हकीकत मी तुला सांगणार आहें. पहाटे तुझ्या वडिलांनीं मला असं सांगितलं कीं ते रात्रीं जागे झाले होते आणि त्यांना त्यांच्या अंथरुणापाशीं त्यांची आई दिसली आणि त्यांनीं तिच्याशीं बोलायला आपलं तोंड उघडलं तोंच ती अदृश्य झाली.'

"माझं व आईचं हें संभाषण रविवार दिनांक ११ जानेवारीच्या सकाळीं ८॥ च्या सुमारास झालं. दुपारच्या आंत आमच्या हातीं तारेनं संदेश येऊन पडला कीं, माझ्या आजीचं मध्यरात्रीं प्राणोत्क्रमण झालं. एवढ्यानं थांबलं नाहीं, माझ्या वडिलांना नंतर कळलं कीं आमच्या घरापासून अंदाजें ५ फर्लांग अंतरावर राहाणाऱ्या त्यांच्या बहिणीला-देखील आजीनं दर्शन दिलं होतं. अशा रीतीनं माझी आजी तीन माणसांना स्वतंत्रपणें दृश्य झाली होती. आणि आम्हां तिघांनाहि वाटत होतं कीं तो निव्वळ आभास होता.

"तिघांनाहि एकाच वेळीं दिसलेलं तें पिशाच्च मरण नांवाची जी अवस्था आहे त्या अवस्थेंतून जाणाऱ्या व्यक्तीचं होतं. मला ज्यावेळीं तें पिशाच्च दिसलं त्यावेळीं रात्रीचे दोन वाजले होते. वडिलांनीं ही वेळ बघून ठेवली होती. मी उठून घड्याळ बघितलं नव्हतं परंतु वेळेचा अंदाज घेतला होता. आमच्या घराचं तोंड दक्षिणेला आहे आणि ज्या खिडकीपाशीं मी झोंपलों होतों त्या खिडकीचं तोंडदेखील दक्षिणेस आहे. घराच्या भिंतीवर पडलेल्या प्रकाशावरून माझ्या मतें चंद्र त्यावेळीं आकाशमध्याजवळ होता.

मी याबाबत अधिक खुलासा करण्याचा प्रयत्न केला तेव्हां १०-११-१-१८७९ च्या रात्रीं चंद्र आकाशमध्यांत केव्हां होता याची चौकशी केली. नॉटिकल अलमॅनॅकअन्वयें चन्द्र त्या रात्रीं आकाशमध्यांत होता, तेव्हां रात्रीचे २ वाजून १९ मिनिटें झालीं होतीं. यावरून पिशाच्च दर्शनाच्या वेळेची माझ्या वडिलांनीं जी नोंद केली होती ती बरोबर होती. त्या

रात्रीं १२–१५ वाजतां माझ्या आजीचें प्राणोत्क्रमण झालें होतें व तनु-त्यागानंतर कांहीं तासांनीं ती आम्हां तिघां, तिच्या जवळच्या आप्तांना दृश्य झाली होती.

'मरते वेळीं माझ्या आजीच्या अंगावर कोणते कपडे होते हें जाण-ण्याच्या इराद्यानें ज्या माझ्या चुलत्यांच्या घरीं आजी वारली त्यांना पत्र पाठवून विचारलें. पत्रासोबत डोकीवर मी जी शिंपल्याच्या आकारा-सारखी टोपी पाहिली होती तिचें एक लहानसें चित्र पाठवलें होतें. त्या पत्राचें मला खालीलप्रमाणें चुलत्यांकडून उत्तर आलें––

'तुझ्या आजीच्या अंगावर जे कपडे तूं पाहिलेस व जी टोपी तूं पाहिलीस त्याच पोषाखांत असतांना तिची जीवनज्योती ११ जानेवा-रीच्या पहांटे १२। वाजतां मालवली. शुक्रवारीं रात्रीं तिच्या मरणाच्या संवेदना सुरूं झाल्या होत्या. ज्या प्रकारच्या टोपीचें तूं चित्र काढून माझ्याकडे पाठविलें आहेस त्याच प्रकारची टोपी तुझ्या आजीच्या सबंध आजारीपणांत व मरतेवेळीदेखील तिच्या डोक्यावर होती.'

मी सांगितलेली ही हकीकत अगदीं तावून सुलाखून पहाण्यांत आली असून ती अगदीं संशयातीत आहे. असले अलौकिक अनुभव जर कुणाच्या आयुष्यांत आले तर त्यांनीं त्यापासून जरूर तें निसर्गांतील सत्य शोधून काढावें. असे कितीतरी चमत्कारिक प्रकार घडलेले आहेत व घडत अस-तात कीं ज्यांचें स्पष्टीकरण विज्ञान–शास्त्रज्ञांना अजून देतां आलें नाहीं.

सही– Charles Tweedle, Member of The Royal Astro-nomical Society of London.

युरोपियन लोकांचा भूतपिशाच्चांवर विश्वास नसतांना Tweedle साहेबांनीं आपला अनुभव प्रसिद्ध करण्याचें धारिष्टच दाखविलें ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. मृत्युनंतर भुवर्लोकांत गेलेल्या माणसाला आपण कुठें आहों याची ताबडतोब जाणीव होतेच असें नाहीं. कधीं कधीं आपल्या या नव्या परिस्थितीची जाणीव माणसास कांहीं तासांनंतर होते. ती जाणीव Tweedle साहेबांच्या आजीला मरणोत्तर पावणे दोन तासांनीं

झाली असावी व जे तिचे जवळचे आप्त तिच्या बिछान्यापाशीं तिच्या मरणकाळीं नव्हते त्यांना पार्थिव देहांतील अंतिम इच्छेनुसार डोळे भरून पाहाण्याच्या निमित्तानें म्हणा किंवा आतां तुमचें आमचे ऋणानुबंध संपले हें सुचविण्याकरितां म्हणा, म्हातारी मरणोत्तर त्या तीन व्यक्तींच्या बिछान्यापाशीं गेली असें म्हणावें लागतें.

डॉक्टर लोकांचा मरणाऱ्या माणसाशीं नेहमींच संबंध येत असल्याकारणानें मरणोत्तर अस्तित्वाचे व मरणोत्तर संदेशांचे पुरावे देणारे विचित्र प्रकार त्यांच्या अनुभवाला अनेकवार येत असतात. परंतु अनेक डॉक्टरांना असल्या अनुभवांकडे निरभ्र दृष्टीनें पाहण्याची संवय नाहीं. माणूस मेला म्हणजे संपला अशी बहुतेक डॉक्टरांची ठाम कल्पना असल्याकारणानें मेलेल्या रोग्याची प्रत्यक्ष आकृति जरी त्यांना दिसली तरी त्यांना आभास, विचारसंक्रमण, इ. भलभलतीं नांवें देऊन तो अनुभव ते डावलून टाकतात. तरीसुद्धां कांहीं डॉक्टरांनीं आपले अनुभव प्रसिद्ध करून जगाच्या ज्ञानांत भर टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

रात्रीं १ वाजतां मेलेली एक तरुण बाई पहांटे ४ वाजतां आपल्या डॉक्टरांच्या निजावयाच्या खोलींत जाऊन दृश्य झाली. खोलींतल्या उजेडामुळें डॉक्टर जागा झाला. अलबानी (अमेरिका) इथून एका डॉक्टरांनीं आपले स्नेही Dr. Hodgson यांना दिनांक १७ सप्टेंबर १८८८ रोजीं ही हकीकत कळविली होती.

(सविस्तर वृत्तांतासाठीं Camille Flamarion कृत Death & its Mystary खंड ३ रा पृष्ठ १४७ पहा)

मरणकाळ अति समीप आला म्हणजे बहुतेक माणसांना आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांना पाहाण्याची इच्छा होते. परंतु ही इच्छा सर्वांच्याच बाबतींत फलद्रूप होते असें नाहीं. आणि त्यांतल्या त्यांत ज्यांना एकाएकीं मृत्यु येतो त्या माणसांना कांहींतरी निराळ्या क्लृप्त्या योजून आपल्या आप्तस्वकीयांची भेट घेण्याची उद्दाम इच्छा पुरी करावी लागते.

लग्न होऊन हिंदुस्थानांत रहावयास आलेल्या एका युरोपियन बाईचा

भाऊ १९ मार्च १९१७ रोजीं फ्रान्समध्यें गोळी लागून मेला. तिनें म्हटलें आहे, 'माझा भाऊ १९ मार्च १९१७ रोजीं मला दिसला. अगदीं त्या क्षणीं मी काय करीत होतें तें मला बरोबर आठवत नाहीं. परंतु मला वाटतें मी कांहींतरी शिवीत होतें. किंवा माझ्या लहान मुलाशीं बोलत होतें. तें मूल पलंगावर होतें. मला एकाएकीं अशी इच्छा झाली कीं वळून पाहावें. आणि तसें केल्यानंतर मला माझा भाऊ एड्रेड दिसला. तो हिंदुस्थानांत आला असेल अशा समजुतीनें मला आनंद झाला. मी मुलाला पलंगावरून पडणार नाहीं अशा रीतीनें ठेवलें आणि त्याच्याशीं बोलण्याकरितां वळलें तों काय चमत्कार–एड्रड नाहींसा झाला होता. मला वाटलें त्यानें थोडी गम्मत केली असेल, म्हणून मी त्याला हाका मारल्या व घरांत सर्व ठिकाणीं तपास केला. तो आढळला नाहीं तेव्हां मला भीति वाटली व तो मेला तर नसेल अशी मला शंका आली. दोन आठवड्यांनी पाश्चात्य वर्तमानपत्रांत तो नाहींसा झाल्याची मी बातमी वाचली. पुढें मला समजलें कीं अपघात होण्याची वेळ मला व तो दिसण्याची वेळ जवळ जवळ एकच होती.' (Journal S. P. R. Vol. xxxiii पृ. १७०)

'न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वाकृतम्' या माणसाचें काम पुरें झालें आहे किंवा कांहीं करावयाचें राहिलें आहे हें मृत्यू पहात नाहीं तो आपला माणसाला घेऊन जातो. परंतु कित्येक वेळां हातीं घेतलेलें काम मृत्यु येण्यापूर्वी पुरें करण्याची माणूस पराकाष्टेची धडपड करतो. याबाबतींत तत्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या चार्लस हॉफमन नांवाच्या एका विद्यार्थ्यानें स्वतःच्या कुटुंबांतील एक अनुभव सांगितला आहे —

'माझे आजोबा पिआनोसारखीं मोठमोठीं वाद्यें तयार करण्याचा धंदा करीत. ऱ्हाईन नदीच्या काठीं असणाऱ्या एरनॉमशीम नामक एका गांवांतील चर्चमध्यें नवीन ऑर्गन बसवून देण्याचें काम आयुष्याच्या शेवटीं त्यांनीं आपल्या हातीं घेतलें होतें. तें ऑर्गन बहुतेक सर्व तयार झालें व त्याच्या तारा मिळून व्यवस्थित सुरांत लावावयाच्या तेवढ्या राहिल्या असतांनांच ते एकाएकीं इतके आजारी झाले कीं त्यांना त्या गांवांतून बऱ्याच दूर असलेल्या दुसऱ्या गावांतील त्यांच्या घरीं नेण्यांत आलें.

म्हातारबुवा आतां थोड्याच काळापुरते आपले सोबती आहेत अशी भोंवतीं जमलेल्या सर्व माणसांची खात्री होती. त्या आसन्नमरण स्थितींत ते बराच वेळ बेशुद्धींत होते. परंतु काय चमत्कार! ते एकाएकीं आपल्या मृत्युशय्येवर उठून बसले आणि म्हणाले, 'Nothing is the matter, everything is alright' कांहीं राहिलें नाहीं. सर्व कांहीं बरोबर आहे–आणि एवढें म्हणून ते जे बिछान्यावर पडले ते पुन्हां उठले नाहींत त्या त्यांच्या शेवटच्या वाक्याचा अर्थ कुणासच कळला नाहीं.

परंतु दोनच दिवसांनी आमच्या अजोबांनी ज्या चर्चमध्यें तें ऑर्गन बसविलें होतें त्या चर्चच्या धर्मोपदेशकाकडून एक पत्र आलें. त्यांत मजकूर होता. 'रात्रीच्या वेळीं एकाएकीं चर्चमधून ऑर्गनचे सूर ऐकूं आले, त्यावेळीं शाळामास्तर व मी जागे होऊन चर्चचीं कवाडें उघडून आंत कोण ऑर्गन वाजवतो तें पहावयास गेलों. ऑर्गनला किल्ल्या लावल्या असल्याकारणानें तें बंदच होतें. तें कसें व कोणी वाजविलें तें समजत नाहीं; परंतु ऑर्गन तयार करणारा व त्यांतून तें अशा रात्रीच्या वेळीं त्यांतून सूर उमटणें यांचा कांहींतरी संबंध असावा असें वाटलें म्हणून हें पत्र लिहिलें आहे–'

तें पत्र वाचल्यानंतर मृताच्या आप्तांना कळून चुकलें कीं जिवंतपणीं अपुरें राहिलेलें काम पुरें करण्यासाठीं म्हातारा आयुष्य सरण्यापूर्वी सूक्ष्मदेहानें केवळ स्वतःच्या दुर्दम्य मनीषेमुळें त्या चर्चमध्यें गेला व त्यानें 'तें अपुरें' राहिलेलें काम पुरें केलें. Camile Flamanion कृत Death & Its Mystery– खंड २ रा पृ. १३२–१३३)

वरील सर्व हकीकती नीट लक्षांत घेतल्यानंतर कुडीला सोडून जाणारा जीव आपल्या आकांक्षा व लागेबांधे यांना अनुसरून कसा धडपडत असतो हें वाचकांना समजून येईल. यासाठींच आसन्नमरण झालेल्या माणसाच्या खोलींत अत्यंत शांत वातावरण ठेवणें इष्ट आहे. रडणाऱ्या नातेवाईकांचे हुंदके त्याच्या कानीं जाऊं देऊं नयेत. शांती व प्रसन्नतेंत त्याला आपला पुढील मार्ग आक्रमण करूं द्यावा.

० ० ०

७ : मदतीची अपेक्षा करणारे परलोकवासी

माणूस कधीं कधीं आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणींच्या इच्छा कशा पुऱ्या करून घेतो त्यासंबंधीची संशोधित माहिती आपण पाहिली. परंतु जड देह सोडून गेल्यानंतर ज्या ठिकाणीं आपण राहिलों, ज्या माणसांत आपण वावरलों, जे बरेवाईट व्यवहार केले त्यासंबंधीच्या त्याच्या आठवणी नष्ट होत नाहींत. जिवंतपणीं माणूस आजारी पडला, त्याला शारीरिक अथवा मानसिक दुःख झालें म्हणजे तो दुःखभार हलका करण्यासाठीं व हरतऱ्हेनें त्याला मदत करण्यासाठीं त्याचे इष्टमित्र भोंवतीं गोळा होतात. आपल्या आप्तस्वकीयांपासून असहाह्य स्थितींत मदतीची अपेक्षा करण्याची माणसाला लागून राहिलेली संवय अनेकांच्या बाबतींत मरणोत्तरहि कायम असते असें आढळून आलें आहे. वास्तविक भूलोकावर श्वासोच्छ्वास करणाऱ्या माणसानें भूलोकावरील माणसांपासून मदतीची अपेक्षा केली तर तिची शक्यता जितकी साहजीक असते तशी परलोकांत वावरणाऱ्या सूक्ष्मदेहधारी माणसानें जडदेहधाऱ्यापासून सहाय्याची अपेक्षा करणें अनैसर्गिक नसलें तरी सहज शक्य नसतें. कारण भिन्न लोकांत व भिन्न सृष्टिनियमांत वावरणाऱ्यांच्या अज्ञानामुळें निकटचा संबंध येऊं शकत नाहीं. तरीसुद्धां इच्छातृप्तीसाठीं धडपड करण्याची माणसाला लागलेली संवय त्याला परलोकीं

गेल्यानंतरहि स्वस्थ बसूं देत नाहीं. या बाबतींतले प्रत्यय हजारों वर्षांपासून माणसांस आले असल्याकारणानें आपल्या परलोकीं गेलेल्या आप्तासाठीं–त्याला शांति व समाधान लाभावें म्हणून–देशोदेशींच्या लोकांनी अतिप्राचीन काळापासून प्रयत्न केलेले दिसतात. त्या प्रयत्नांच्या निर्मात्यांचें शहाणपण कालौघांत लुप्त झाल्यामुळें या बाबतींतील लोकांची कृति पाहिली म्हणजे तिच्या विफलतेबद्दल हसूं व कींव येते.

मेलेल्या माणसाबरोबर त्याला स्मशानांत नेतांना भाताची पुरचुंडी देण्याची चाल हिंदु लोकांत आहे. चिनी लोकांत तर मुलाला आपल्या दूरच्या प्रवासांत भरपूर खावयास मिळावें म्हणून प्रताबरोबर गाडाभर विविध प्रकारचें सुग्रास अन्न गाडण्याचा प्रघात आहे. एका अमेरिकन माणसानें आपल्या एका मित्राचा अत्यंविधी पाहून स्मशानांतच एका माणसाला विचारलें होतें. "कां हो, या प्रेताबरोबर जें हें एवढें अन्न तुम्हीं गाडलें आहे तें तो मृत माणूस खाणार तरी केव्हां ?"

त्या चिनी माणसाला त्या अमेरिकनाच्या बोलण्यांतली खोंच लक्षांत येऊन त्यानें उत्तर दिलें, "परवां तुमचा तो अमेरिकन मित्र वारला ना? त्याच्या कबरीवर जीं सुगंधी फुलांचीं शेकडों वर्तुळें ठेवलीं होतीं त्यांचा वास घेत घेत तो तुमचा अमेरिकन मृत माणूस त्या कबरीवर लावलेल्या शेकडों मेणबत्त्यांच्या उजेडांत जेव्हां बायबल वाचील तेव्हां आमचा हा मित्र त्याच्याबरोबर गाडलेल्या या अमोलिक अन्नाचा आस्वाद घेईल !" सारांश, नाक जाऊन भोकें राहावीं त्याप्रमाणें केवळ तांत्रिक रीतिरिवाज केवळ वाडवडिलांपासून चालत आले म्हणून लोक आचरतात. ज्याचा भूलोकाशीं संबंध तुटला तो भूलोकांतील अन्न खाऊं शकणार नाहीं, पाणी पिऊं शकणार नाहीं किंवा त्या मृताच्या नांवानें कुणाला पलंग दान दिला तरी त्या पलंगावर निजूं शकणार नाहीं. मृत माणसाला भूलोकांतील त्याच्या जिवंतपणीच्या आवडीची एखादी वस्तु खायची किंवा प्यायची झाली तर त्याला दुसऱ्या कुणाच्या तरी जिवंत देहाचा उपयोग करावा लागतो. कारण तृप्तीचें साधन जो जड देह तो त्याच्या बाबतींत नष्ट झालेला असतो. या विषयाचा सांगोपांग विचार एखाद्या

निराळ्या प्रकरणांत करूं.

जे कांहीं आपले आप्तस्वकीय इहलोक सोडून गेले त्यांच्यासाठीं प्रार्थना करण्याची, गोग्रास घालण्याची, काकबली देण्याची व श्राद्ध-पक्षाच्या वेळीं मंत्रद्वारा मदत करण्याची जी पद्धति तिचा पुरस्कार निरनिराळ्या धर्मांनीं केलेला आहे. यावरून मृत माणसांना आपल्या जिवंतपणीच्या सख्यासोयऱ्यांपासून मदतीची अपेक्षा असते हें प्राचीन काळापासून लोकांना ठाऊक आहे असें दिसतें. आपल्या देहाला पद्धतशीर सद्गती न मिळालेली पाहून कांहीं मृत माणसांना खेद होत असतो. जिवंतपणीं केलेला गुन्हा कबूल करण्यासाठीं कांहींना इहलोकाशीं संबंध आणावासा वाटतो तर कांहीं माणसें दडवून ठेवलेलें मृत्यूपत्र कुठें ठेवलें गेलें आहे तें सांगण्यासाठीं परत फिरतात. ह्या बाबतींत माणसानें जे उद्योग केले असतील त्या उद्योगांनुसार ज्या लोकाशीं त्याचा संबंध तुटला त्या लोकांशीं तो हरतऱ्हेनें जोडण्याचा अनेक कारणांस्तव प्रयत्न केला जातो. अर्थात हें सामान्य माणसांच्या बाबतीत बहुधा होतें. उच्च आचार-विचारांची माणसें स्वार्थासाठीं कधींही मागें परतून पाहात नाहींत.

मिस्टर थॉमस केस्टन नांवाच्या लंडनच्या एका सुप्रसिद्ध बॅरिस्टरानें सांगितलेला आपला अनुभव विस्तारभयास्तव शक्य तितका संकलित करून या ठिकाणीं देतों--

ईजिप्तचा खुषबू

"मी माझा पहिला ग्रंथ"[1] लिहीत बसलों होतों. लिहीत असतांना एका वाक्यावर विचार करीत मी थोडासा थांबलों आणि एकाएकीं मला वाटलें कीं मी माझ्या खोलींत नाहीं. खोलीचा दरवाजा बंद होता हें मला माहीत होतें. म्हणूनच माझी ती कल्पना वेडगळ होती, परंतु मला झालेला तो भास इतका प्रबळ होता कीं खुर्चीवरून अर्धवट उठून मी खोलींत सर्वत्र नजर फिरविली. खोलींत कुणीच दिसलें नाहीं. माझ्या मूर्खपणाबद्दल माझें भलाच हसूं आलें आणि पुन्हा मी माझ्या त्या वाक्याकडे वळलों. इतक्यांत एक अस्पष्ट परंतु विशिष्ट सुगंध खोलींत

1 On the Present state of the Law of conveyancing.

पसरल्याचा मला भास झाला. तो सुगंध आपल्या परिचयाचा असावा असें मला वाटलें. आणि थोडासा विचार करून माझा व सुगंधाचा प्रथम केव्हां परिचय झाला याची मला आठवण होतांच मला आश्चर्याचा धक्का बसला.

मागच्या वर्षीच्या सुट्टींत मी ईजिप्त देश पहाण्यांत बराच काळ घालवला. कैरो शहरीं शेख नांवाच्या एका माणसाशीं माझी ओळख झाली. हा माणूस बराच माहितगार होता आणि मौजेची कितीतरी माहिती त्याच्याकडून मला मिळाली होती; परंतु तो चेटुक करणारा आहे, त्याची संगति धरूं नये; असें माझ्या नोकरानें मला वेळोवेळीं बजाविलें होतें.

" एकदां सहज मी शेखच्या घरीं गेलों असतांना मला त्याची खोली अत्यंत आल्हाददायक अशा सुगंधानें दरवळलेली आढळली. ज्या अत्तराचा तो दिव्य सुगंध होता तें अत्तर थोडेसें तरी त्यानें द्यावें म्हणून मी त्याला विनंती केली. तेव्हां तो म्हणाला, ' हा पवित्र खुषबू कांहीं जादूच्या प्रयोगाच्याच वेळीं वापरण्यांत येतो. तो तयार करण्याची पद्धति जगांत अगदीं थोड्याच लोकांना माहीत आहे. आणि जगांतलं सगळं सोनं जरी एकत्र केलं तरी या जातीचं थोडसंदेखील अत्तर त्या किंमतीला खरेदी करतां येणार नाहीं ! '

" त्याच्या त्या सांगण्यामुळें त्या सुगंधाबद्दलची माझी उत्सुकता अधिकच वाढली. तो बाजारांत कुठें मिळूं शकेल कीं काय ही चौकशी करीत मी जवळ जवळ एक तास त्याच्या खोलींत होतों; परंतु तेवढ्या वेळांत माझे कपडे सुगंधयुक्त झाले. आणि हॉटेलांत परत आल्यावर माझा कोट मी माझ्या नोकराच्या स्वाधीन केला तेव्हां एकदम दचकून तो म्हणाला, ' इफेन्डी, ' (तुर्की भाषेंतील बहुमानार्थी शब्द) आपण कुठें गेला होतां ? तुमच्या कपड्यांवर हा आसुरी सुगंध कोठून आला ?'

' काय म्हणतोस ? ' मी त्याला विचारलें, ' त्या सुगंधामुळें तूं इतका बावरून गेलास ?'

जवळजवळ रडतच तो म्हणाला, 'महाराज, सावध, तुम्हा इंग्रज लोकांना ईजिप्तमधील चेटकी चाळ्यांची कल्पना नाहीं. हा सुगंध फक्त चेटुक करणारे लोकच वापरतात. या अत्तराची एक बाटली तयार करण्यासाठीं एका माणसाला बळी द्यावें लागतें. म्हणून आम्ही या अत्तराला 'कुमारीचें रक्त' असें म्हणतों.

मी त्याला म्हणालों, 'मुस्तफा, वेडा आहेस तूं. या अद्भुत अत्तराची एखादी लहानशी शिशी आणून दे ना.'

भयभीत होऊन मुस्तफा म्हणाला, 'नाहीं मिळणार. साऱ्या दुनियेंत हें अत्तर कुठें विकत मिळणार नाहीं. या अत्तराला मी स्पर्शहि करणार नाहीं. इन्फेडी, आपल्या आत्म्यासाठीं आपण असल्या वस्तूंपासून दूर राहाणें बरें!'

कैरोमधील प्रत्येक सुगंधाच्या दुकानांत मी चौकशी केली परंतु मला तें अत्तर मिळूं शकलें नाहीं.

"ज्या चिरस्मरणीय रात्रीची मीं हकीकत सांगत आहें त्या रात्रीं तो ईजिप्तचा खुषबू माझ्या खोलींत मंद मंद पसरला होता. कैरोहून इंग्लंडांत परत आल्याला पंधरा महिने लोटले होते आणि माझ्या कपड्यालत्त्यांत कुठेंतरी तो सुगंध दडून रहावा अशी शक्यतादेखील नव्हती. ही भूतचेष्टा तर नसेल असा एकदां मला संशय आला. त्या सुगंधाचा विचार बाजूला सारून मी पुन्हां माझें लक्ष माझ्या लेखनाकडे वळविलें. परंतु कुणीतरी माझ्या मानेवर आपला निःश्वास सोडल्यासारखे मला वाटलें. खोलींतील कपाटें आणि टेबलाचे खण मी वेड्यासारखे उघडून पाहिले. कानेकोपरे शोधले. त्या सुगंधाचें उत्पत्तिस्थान मला सांपडेना. लिहिण्यास लक्ष लागेना म्हणून 'मॉन्टेनचे लेख' हें माझे आवडतें पुस्तक मी हातीं घेऊन आराम खुर्चीवर वाचीत पडलों.

"अर्धा तास माझें वाचन झालें असेल आणि काय चमत्कार, त्या ईजिप्तच्या सुगंधाची एक जोराची लहरी माझ्या खोलींत आल्यासारखी वाटली. कांहींतरी सळसळल्याचा आवाज माझ्या कानीं आला. आणि थोड्याच वेळापूर्वी मी ज्या टेबलावर बसून लिहीत होतों त्याच टेबलावर

म्हणजे माझ्यापासून फक्त दहा हात अंतरावर एक मनुष्याकृति कांहींतरी लिहीत बसली होती. मी त्या माणसाकडे पाहिलें तोंच त्याच्या हातून लेखणी गळून पडली. तो खुर्चीवरून उठला. कटु निराशेचा एक कटाक्ष त्यानें माझ्यावर टाकला–त्या कटाक्षांत हृदयभेदक अशी एक विनवणी देखील होती–आणि तो अदृश्य झाला !

" भयंकर स्वप्न पडून जागा झालेला माणूस जसे डोळे चोळतो तसे मी चोळले. तें पिशाच्च माझ्या खोलींतून पार दूर गेलें होतें आणि तो अमानवी सुगंध हळूहळू नाहींसा होत होता.

" माझ्या खोलींत येऊन गेलेल्या त्या पाहुण्याची आकृति उंच आणि एखाद्या अधिकारी पुरुषासारखी होती. सत्ता आणि निश्चय त्याच्या चेहऱ्यावर विलसत होता; परंतु उद्दाम विषयवासना आणि सुप्त पाशवी वृत्तीच्या छटाही त्या ठिकाणीं प्रतिबिंबित झाल्या होत्या. या माणसावर प्रेम करण्यापेक्षां त्याला भिऊन त्याच्यापासून चार पावलें दूरच असावें असें कुणालाही वाटलें असतें. त्याच्या खालल्या ओठाखालीं एक चमत्कारिक असा पांढरा व्रण होता. क्रोध आणि निराशा यांनीं मिश्रित अशी त्याची दृष्टि जणूं काय मदतीसाठीं करुणा भाकीत म्हणत होती––

'––कोणत्याहि माणसापुढें मदतीसाठीं म्हणून मी मान वाकवली नाहीं. पण ती मदत आज मी तुझ्याजवळ मागत आहें !'

त्या क्षणापर्यंत माझा भुताखेतांवर विश्वास नव्हता. कांहीं कां असेना परंतु ती अशरीरी व्यक्ति आपणापासून मदतीची अपेक्षा करीत आहे अशी खात्री होऊन माझी भीति नाहींशी झाली. मी उठलों आणि माझ्या टेबलापाशीं गेलों. माझी लेखणी त्या पिशाच्चाच्या हातून ज्या ठिकाणीं मी पडतांना पाहिली होती त्याच ठिकाणीं ती होती. परंतु पूर्वी नसलेला असा एक चमत्कारिक कागदाचा कपटा त्या ठिकाणीं पडला होता. ५"×३" आकाराचा तो कपटा अत्यंत जुनाट, जाड, दमट पिवळ्या रंगाचा होता.

त्यावर जुनीं लिहिलेली कांहीं अक्षरें–वाक्यें कालाच्या प्रवाहानें पुसून

गेलीं होतीं. माझ्या शाईनें नुकतींच लिहिलीं गेलेली अशी 'Ra' हीं अक्षरें मात्र मला स्वच्छ दिसलीं. तीं अक्षरें म्हणजे अर्थात् कोणत्यातरी वाक्याची सुरुवात होती; परंतु कां नकळे कांहीं कारणास्तव त्या आमच्या पाहुण्याला तें वाक्य पुरें करतां आलें नव्हतें. त्यानें लिहिण्यासाठीं आपला कागद कां बरोबर आणावा हेंहि मला समजेना.

.....त्या रात्रीं तें पिशाच्च कांहीं माझ्या स्वप्नांत आलें नाहीं. मात्र त्याच्या विचारानें मला कांहीं झोप लागली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्यानें त्या कागदावरील एक पुसट ओळ मी जेमतेम वाचूं शकलों. Iomm uia daousa sita eo uia uiese quoam.

त्या वाक्याची भाषा लॅटिनसारखी वाटत असली तरी ती लॅटिन नव्हती. मला ती अगम्य होती. तो कागद मी माझ्या खिशांतील लहानशा रोजनिशींत ठेवून दिला.

त्यानंतर पंधरा दिवसांनीं म्हणजे डिसेंबरच्या १४ तारखेला मी संध्याकाळीं मला आलेल्या पत्रांचीं उत्तरें लिहीत बसलों होतों तोंच दारावर थाप बसली. दार उघडून पाहातों तों माझा जुना कॉलेज मित्र जॅक फर्नले ! बऱ्याच वर्षांत त्याचा माझा पत्रव्यवहारदेखील नव्हता. कांहीं वर्षांपूर्वी आपल्या चुलत्याशीं भांडून तो वेस्ट इन्डीज बेटांत दैव शोधण्यास गेला होता एवढेंच मला माहीत होतें. मी त्याचें स्वागत करून त्याला लंडन शहरीं येण्याचें कारण विचारलें तेव्हां तो म्हणाला, 'माझा काका एकाएकीं वारला. वकिलांनीं तारा करून मला बोलावलं. काकाच्या दौलतीचा वारसा घेण्यासाठीं मी वेस्ट इन्डीज बेटांतील माझा उद्योग सोडून आलों आहें. लंडन शहरांत तुझ्याशिवाय मला दुसरा कोणी मित्र नसल्यामुळें तुला भेटण्यासाठीं आलों आपला सहज.'

"एक रात्र त्याचा मुक्काम होता.जातां जातां त्यानें फर्न हॉल[1] येथें' नाताळासाठीं येण्याचें मला आमंत्रण दिलें. त्याप्रमाणें मी २३ डिसेंबरला फर्नल येथें गेलों. जॅकच्या मालकीची ती हवेली[1] आणि तिच्या आसपासची

१ त्याच्या काकाची ही दौलत आतां त्याच्या मालकीची झाली होती.

जागा इतकी मोठी होती कीं एखादें सैन्य त्या ठिकाणीं सामावलें गेलें असतें. चौकशी अंतीं मला असें समजलें कीं त्या मालमत्तेवर गहाणाचा बोजा त्याच्या उधळ्या काकानें करून ठेवला होता, आणि सर्व कर्जाची फेड करितां जॅकला त्याच्या लग्नापुरतेदेखील पैसे उरणार नव्हते.

"आम्हीं रात्रीं जेवण उरकून गप्पा गोष्टी करीत बसलों तेव्हां जॅक म्हणाला, 'या मालमत्तेचा मागला मालक 'Wicked Sir Ralph' या नांवानें कुप्रसिद्ध होता. मोठा गर्विष्ठ आणि बाणेदार माणूस होता तो. जादूटोण्याविषयीं त्याची ख्याती होती. आणि द्रव्यार्जनाचे त्याचे मार्गही गुप्त होते. सोन्यारुप्याच्या लगड्या आणि जगांतील नामांकित रत्नांचा मोठा संग्रह त्याच्यापाशीं होता. पण ज्याअर्थीं मला त्यापैकीं कांहींच सांपडलें नाहीं त्याअर्थीं त्याची ती वाममार्गानें मिळविलेली संपत्ति नष्ट झाली असावी. सर राल्फ याच्या अखेरच्या दिवसांत त्याचा फक्त एक इटालियन नोकरच तैनातीस होता. एवढी संपत्ति असूनसुद्धां ते दोघ कद्रू एखाद्या बैराग्यासारखे राहात. सर राल्फला लोक मोठा गुन्हेगार समजत पण त्याचा एकही गुन्हा कधीं बाहेर आला नाहीं.

एके दिवशीं सकाळीं तो एकाएकीं नाहींसा झाला. 'मला उद्यां पहांटे शेजारच्या एका गावीं जावयाचें आहे तेव्हां माझा घोडा सज्ज करून ठेव,' अशी आपल्या त्या इटालियन नोकराला त्यानें ताकीद देऊन ठेवली होती. त्याप्रमाणें घोडा सज्ज करून तो आपल्या मालकाच्या खोलींत गेला तों मालक नाहीं. त्याचा बिछानाहि त्यावर कोणीही रात्रीं न निजल्याची साक्ष देत होता. आपला मालक जीं भुतें उ [illegible]त असे त्याचे भुतांनीं त्याला पळवून नेला अशी त्या नोकरानें आपली समजूत करून घेतली. परंतु गांवांतले लोक आपल्याला पकडतील या धास्तीनें तोही त्याच रात्रीं अदृश्य झाला. गांवांतल्या लोकांनी पुष्कळ तपास केला पण प्रेताचा सुगावा लागला नाहीं आणि इथें सर राल्फचें भूत वावरतें अशा गप्पा उठल्या.

त्यानंतर कांहीं वर्षेपर्यंत ही जागा ओसाड पडली होती. मग आमच्या कुटुंबांतील एका माणसानें कायद्याच्या जोरावर ती आपल्या ताब्यांत

घेतली. त्याच्या मार्फत ती आमच्या दुसऱ्या एका चुलत्याच्या ताब्यांत आली आणि आतां मी या मालमत्तेचा मालक बनलों आहें.

त्या रात्रीं मी ज्या स्वतंत्र खोलींत झोपलों तिथें मला लंडनला माझ्या घरीं दिसलेलें तें भूत पुन्हां दिसलें. तोच काळा झगा त्याच्या अंगावर होता. ज्या लहान पुस्तकांतला लहान कागदाचा कपटा माझ्या खिशांत होता तेंच लहान पुस्तक त्याच्या हातांत असावें; कारण ती फाडलेली जागा मला खोलींतील शेगडीच्या उजेडांत स्वच्छ दिसूं शकली. त्या पुस्तकाच्या शेवटच्या पानाकडे तें पिशाच्च बोट दाखवीत होतें. मी उठलों आणि त्या पिशाच्चापाशीं गेलों. परंतु ती आकृती मागें हटून भितीला लागून असलेल्या एका पडद्यांतून अदृश्य झाली. ईजिप्तच्या अत्तराचा तो मोहक सुगंध याही वेळीं दरवळला होता.

दुसऱ्या दिवशीं जॅकच्या एका दिवाणखान्यांतील चित्रें पाहात असतां एका तैलचित्रावर माझी नजर खिळली. ज्या माणसाचें पिशाच्च मी पाहिलें होतें त्याच माणसाचें तें चित्र होतें. मात्र काळ्या झग्याऐवजीं त्या व्यक्तीच्या अंगावर सुंदर पोषाख होता आणि पिशाच्चाची ती आर्जवी दृष्टि त्या चित्रांतील चेहेऱ्यावर नव्हती. जॅकच्या सांगण्यावरून मला कळलें कीं ती सर राल्फ यांची प्रतिमा होती !

मी सर्व इतिहास जॅकला सांगून तो कागदाचा कपटा त्याच्या हातीं दिला. त्या कपट्यावरील तीं 'Ra' हीं अक्षरें सर राल्फच्या जिवंतपणींच्या हस्ताक्षराची साक्ष देत होती. कारण सर राल्फच्या पुस्तकावरील सह्या वगैरेंवरून त्यांची तुलना करून पाहिली. जॅकच्या म्हणण्याप्रमाणें त्या कागदावरील ती पुसट ओळ म्हणजे एक कूट भाषा (Cryptograph) होती. त्यानें मोठ्या प्रयत्नानें तें कूट उकललें. त्याचा अर्थ इंग्रजींत Pull the centre rose in the third Panel (तिसऱ्या पडद्यांतला मधला गुलाब उपटा) तिसरा पडदा म्हणजे कुठल्या बाजूनें तें जॅकला समजेना. पण मी ज्या खोलींत झोपलों होतों त्या खोलीतील शेगडीच्या कोपऱ्यापासून जो तिसरा पडदा होता त्याच पडद्यांतून राल्फचें पिशाच्च अदृश्य झालें होतें, म्हणून कुठला गुलाब उपटावयाचा या बाब-

तींत मला संशय नव्हता.

"दुपारीं ववर्जीनें जेवणाचें आमंत्रण दिलें परंतु आम्हांला पिशाच्चाच्या सूचनांनुसार संशोधन करण्यांतच अधिक मौज वाटत असल्याकारणानें आम्ही जेवण सोडून ताबडतोब त्या खोलींत धावलों. त्या तिसऱ्या पडद्यांतला तो मधला गुलाब बराच उंच असल्याकारणानें टेबलावर चढून तो फाडून काढावा लागला. तो भाग उघडा झाल्यावर त्या ठिकाणीं एक दरवाज्याची मूठ दिसली. चिरकालपर्यंत वापर नसल्यामुळें ती गंजली होती. अतिशय जोरानें खेचल्यावर तो पडदा त्याच्या चौकटीसह एखाद्या दरवाजासारखा उघडला गेला. त्या जाड भिंतींत आंतल्या बाजूला एक कमान होती व त्या कमानींतून खालीं भुयारांत जाणाऱ्या पायऱ्या दिसल्या. पांच मिनिटें आंत स्वच्छ हवा जाऊं दिल्यानंतर दोन मेणबत्त्या पेटवून आम्ही आंत शिरलों. थोडेसें खालीं उतरल्यानंतर त्या पायऱ्या एकदम डाव्या बाजूला वळल्या होत्या. आंत हवा येण्यास कुठून तरी जागा होती. आंतल्या मार्गाची रुंदी सुमारें सहा फूट होती आणि दोन्हीं बाजूला पंधरा फूट उंचीच्या दगडी भिंती होत्या. त्या मार्गावरून तीस फूट चालून गेल्यानंतर दोन मोठ्या भक्कम पेट्या दिसल्या. त्यांपैकीं एका पेटीवर एका मृताचा सांगाडा पडला होता. त्या सांगाड्यावर एक काळा झगा होता ! आम्ही त्या सांगाड्याजवळ पोहोंचलों. तोंच जॅक मागें घांवत गेला. मला वाटलें घाबरून त्याची तिरपीट उडाली असेल. परंतु वास्तविक तो भुयाराचा दरवाजा बंद होऊं नये म्हणून तजवीज करण्यासाठीं गेला होता. कारण वाऱ्यानें अथवा अन्य कांहीं कारणामुळे जर तो दरवाजा बंद झाला असता तर आम्हाला त्या तळघरांतच मरण्यावांचून दुसरा उपाय नव्हता.

दुसऱ्या पेटीवर जिच्यांतील लहान कागद फाडून त्या पिशाच्चानें माझ्या टेबलावर Ra हीं अक्षरें लिहून टाकला होता ती पुस्तिका पडली होती. मी ती हातांत घेऊन उघडली, तों बरोबर फाडलेल्या पानावरच- मी त्या पिशाच्चानें दाखविलेलें शेवटचें पान उघडून पाहिलें–त्यावर खालील मजकूर होता.

"मी राल्फ फर्नले या ठिकाणीं माझे शेवटचे शब्द लिहीत आहें. ईश्वरी न्यायानें म्हणा अथवा दुष्ट विश्वासघातामुळें या माझ्या गुप्त भुयारांत मी अडकून पडलों आहें. तीन दिवस आणि तीन रात्री या ठिकाणीं काढल्यानंतर अन्नपाण्यावांचून मरण्याशिवाय आतां दुसरी आपली गती नाहीं म्हणून दैवानें मजपाशीं असलेल्या या मोठ्या तोंडाच्या बाटलींतील विष पिऊन माझ्या दुर्दैवी जीवनाचा अंत करण्याचें मी ठरविलें आहे. परंतु मरणापूर्वी ज्या पापाचा बोजा माझ्यावर आहे त्या पापाची कबुली मला द्यावयाची आहे. [१]"

—आणि जो कोणी माझे हीं शब्द वाचील त्यानें जर दुसऱ्या कोणा जवळ माझ्या या घातकी कृष्णकर्माचा उल्लेख केला तर माझा शाप त्याच्या माथ्यावर अखंड राहील आणि माझें पिशाच्च पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें त्याच्या थडग्यापर्यंत त्याचा पाठलाग करील. पण तो जर माझ्या हुकमाप्रमाणें वागणारा असला तर या ठिकाणीं सांपडणारी दौलत मी त्याला खुषीनें बहाल केली आहे. आणि मी अशी आशा करतों कीं ज्याच्या वाटचाला हें धन येईल त्यानें त्याचा मी केला त्याहून अधिक उपयुक्त कामाकरितां विनियोग करावा. आणि ईश्वरानें मला क्षमा करून माझ्या आत्म्याला शांती द्यावी."

त्या पेटीजवळ असलेली ती मोठ्या तोंडाची बाटली जॅकनें हातांत घेऊन आपटून तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या. आणि मग त्या बाटलींतील तो ईजिप्तचा खुषबू तिथें सांडल्यामुळें पुन्हां एकदां त्या सुखकर सुवासाचा उपभोग मला मिळाला तें अत्तर थोडेंसें गोळा करून त्याचें पुढें मी पृथक्करण करविलें. त्यांत इराणी ऊद (लोबन) बेलाडोना, अंबाडीपासून काढलेलें द्रव्य आणि इतर कांहीं वनस्पतींचे अंश सांपडले.

आम्हाला त्या पेटाऱ्यांत सोन्यारुप्याचीं नाणीं आणि हिरे मिळाले. मी जॅकला म्हणालों, तूं आतां लवकरच तुझ्या त्या लिलिअनबरोबर लग्न कर. कारण राल्फच्या सर्व सूचना अमलांत आणल्यानंतरदेखील तूं मोठा श्रीमंत होणार आहेस. त्यांतलें अर्धे द्रव्य जॅकनें मला देऊं केलें

१ 'ही पापाची हकीगत लेखकानें गाळली आहे. खिस्ती धर्मानुसार मरणापूर्वीचे हें Confession आहे.

पण मी केवळ त्याच्या आग्रहास्तव आणि त्या प्रकरणाची केवळ आठवण म्हणून फक्त दोनच मोठे हिरे घेतले.

त्यानंतर सर राल्फचें पिशाच्च कुणालाच दिसलें नाहीं. सर राल्फच्या पुस्तिकेंतील सर्व सूचना जॅकनें पूर्णपणें पार पाडल्या आणि त्यामुळें त्या मृताच्या आत्म्याला कित्येक वर्षांनीं कां होईना पण शांती मिळाली असावी !

ही हकीकत रेव्हरेंड लेडबीटर यांनीं आपल्या Perfume of Egypt या पुस्तकांत प्रथमच देऊन तिच्यासाठीं पहिलीं सत्तेचाळीस पानें खर्च करून शेवटीं तीन पानें स्वतःला वाटणारें स्पष्टीकरण लिहिलें आहे.

"बॅरिस्टर केन्स्टन यांचा व माझा कांहीं वर्षांचा निकटचा संबंध होता. ते अत्यंत भावनाप्रधान आणि कनवाळू अंतःकरणाचे असल्या-कारणानें परलोकवासी सर रॉल्फ यांनीं आपल्या कार्याकरितां त्यांचा उपयोग करून घेतला. जॅकनें आपल्या जुन्या मित्राला फर्नले येथें बोला-वण्यापूर्वी राल्फ यांच्या पिशाच्चानें लंडनमधील केन्स्टन यांच्या मुक्कामीं त्यांस भेट दिली होती. यावरून भवितव्याचें ज्ञान मृत माणसांना असूं शकतें कीं काय हा मोठा कठीण प्रश्न आहे. केन्स्टन आणि जॅक यांची मैत्री असल्यामुळें राल्फ यांच्या पिशाच्चानें केन्स्टन यांना कांहीं कळवि-ण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु तो फुकट गेल्यामुळें जॅकच्या मनाला केन्स्टन यांच्या घरीं जाऊन त्यांना फर्नले येथें बोलवावें अशा तऱ्हेची इच्छा निर्माण करण्याचा परलोकवासी राल्फ यांनीं जोराचा प्रयत्न केलेला दिसतो. कैरोचा तो शेख आणि सर राल्फ यांना तो दुर्मीळ आणि मायावी असा जो ईजिप्तचा खुषबू तो तयार करण्याची माहिती होती आणि केन्स्टन यांनाहि त्या अत्तराचा उपभोग घेण्याची संधी यावी हा नाटकी आणि अपूर्व योगायोग दिसतो !

माझी अशी खात्री आहे कीं वरील गोष्टी वाचून कांहीं वाचकांच्या मनांत तरी नवा प्रकाश पडेल. निव्वळ मनरंजन म्हणून नव्हे परंतु जीव-नाची लक्षांत ठेवण्यासारखी एक बाजू या दृष्टीनें कांहीं खटपटी लोकांनीं सत्यसृष्टींत घडलेल्या या हकीकती नमूद करून ठेवल्या आहेत. कांहीं

लोकांची अशी समजूत आहे कीं हें प्रकार निसर्गनियमाला धरून नाहींत. वास्तविक तसें नसून मरणोत्तर अस्तित्वाचें चमत्कारिक सत्य मानवी बुद्धीला अजून पूर्णपणें आकलन झालेलें नाहीं. अवलोकन आणि प्रयोग यांची सांगड जमली म्हणजे सत्य शोधतां येतें. चौकस वृत्ती, व उद्योगी आणि सूचक मन यांची जोड असली म्हणजे संशोधन करण्याजोग्या या मोठ्या प्रांतांत कुणालाहि हळू हळू पाऊल टाकतां येईल. कांहीं जुने जडवादी मेंदू म्हणजेच मन समजत असत. आणि देहाच्या नाशाबरोबर मेंदूचा अर्थात् मनाचा नाश झाला तर मग मृत माणसाची वासना ही भाषाच शिल्लक राहात नाहीं असें जगाला शिकविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता. [1] सुदैवानें आधुनिक शास्त्रज्ञांना मन ही जडदेहाहून दुसरी कांहींतरी चीज आहे हें आतां मान्य झालें आहे.

पार्थिव देह नष्ट झाल्यानंतर माणूस त्याच्या दृष्टीनें महत्वाच्या अशा कोणत्या ना कोणत्या निमित्तानें जिवन्त माणसांशीं संबंध आणण्याचा प्रयत्न करतो हें खालील हकीकतीवरून लक्षांत येईल.

सुमारें ५० वर्षांपूर्वी इंग्लंड देशांतील दोन गुराखी आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां ऑस्ट्रेलियांत गेले. भागीदारींत धंदा करून त्यांनीं पुष्कळ पैसे मिळविले. त्या दोघांपैकीं एकजण एके दिवशीं एकाएकीं अदृश्य झाला.

"त्यानंतर तीन आठवड्यांनीं एके संध्याकाळीं त्या अदृश्य झालेल्या माणसाचा जिवन्त जोडीदार एका जलाशयाच्या बाजूनें जाणाऱ्या पायवाटेनें आपल्या झोपडीकडे चालला असतां त्याला त्या जलाशयाच्या काठाशीं त्याच्या मृत मित्राची आकृति दिसली. अगदीं जीवंत माणसासारखी, आपला वाकलेला डावा हात डाव्या गुडघ्यावर ठेवून ती बसली होती. तीन आठवड्यांनंतर भेटलेल्या आपल्या मित्राजवळ जाऊन बोलावें

१ प्रोफेसर G. Elliot Smith यांचें या बाबतींतलें विधान. 'The Future, life The Origin of the Myth" या सदराखालीं १–१२–१९३३ च्या स्पेक्टटरमध्यें प्रसद्धि झालें होतें.

या उद्देशानें तो एकदम जोरानें त्या आकृतीच्या जवळ जाण्याच्या बेतांत होता, तोंच ती आकृति थोडीशी अस्पष्ट झाली आणि तिचा तो फिक्कट चेहेरा अतिशय खिन्न दिसूं लागला. पुन्हां तें पिशाच्च स्पष्ट दिसूं लागलें आणि त्यानें आपल्या उचललेल्या उजव्या हाताच्या तर्जनीनें आपल्या माथ्यावरच्या झाडाच्या फांद्यांच्या पसाऱ्याखालील त्या जलाशयाच्या काळचा आणि संथ पाण्याकडे दाखविलें. ही कृति त्यानें खुणेनें आणखी दोनदां केली व तें पिशाच्च अस्पष्ट होत होत नाहींसें झालें.

" दुसऱ्या दिवशीं सकाळीं पिशाच्चानें खुणेनें दाखविलेल्या त्या जलाशयाच्या तळांतून एक सांगाडा बाहेर काढण्यांत आला. दगड बांधून तो मुडदा पाण्यांत फेकून दिला असल्यामुळें वर तरंगत आला नव्हता. ज्या कुऱ्हाडीनें तो माणूस मारण्यांत आला होता ती कुऱ्हाडहि त्या जागीं सांपडली. त्या कुऱ्हाडीवरून तिच्या मालकाचा पत्ता लागला, व कोर्टांत केस चालून खुनी माणसास देहांत शासन झालें ! " (Glimses of Supernatural Vol, II P, 61 by Dr. lee)

खून झालेल्या त्या माणसाला आपल्या जड अवशेषांची सती गती लागावी अशी खास इच्छा असली पाहिजे. परंतु त्याबरोबरच ज्या माणसानें आपला खून केला त्यालाहि योग्य ती शिक्षा मिळावी असेंहि त्यास वाटत असलें पाहिजे. म्हणूनच आपल्या जिवंतपणींच्या मित्रास दर्शन देऊन खुणेनें सूचना देण्याचा तो खटाटोप त्यानें केला.

अत्यंत कद्रूपणानें आयुष्य घालविल्यानंतर मरणोत्तर आपल्या घरांत वेळोवेळीं प्रगट होणाऱ्या मिसेस् वेब नांवाच्या एका बाईची हकीकत लेडबीटरसाहेबांनी आपल्या पुस्तकांत दिली आहे. लोकांचा समज असा होता कीं, तिनें कुठेंतरी द्रव्य पुरून ठेवलें असेल; परंतु पुढें पुढें ती जवळपासच्या खेडुतांनाहि दिसूं लागली. तेव्हां कांहीं लोकांचीं देणीं तिच्या हातून फेडावयाची असतील असा लोकांना संशय आला आणि चौकशी अंतीं तो खराहि ठरला. ती सर्व देणीं ज्याचीं त्यांना देऊन टाकल्यानंतर ती बाई दिसेनाशी झाली. (The Other Sade of Death. पृष्ठ ४७४)

आपण मेलों परंतु आपलें जिवंतपणीचें ऋण फेडावयाचें राहून गेल्याबद्दल बऱ्याच लोकांना मरणोत्तर ताप होत असावा असें सांपडलेल्या पुराव्यावरून लक्षांत येतें. डॉक्टर एडवर्ड बिन्स यांनीं आपल्या Anatomy of Sleep (पृ. ४६२) नांवाच्या पुस्तकांत मॅलॉय नांवाच्या एका बाईची हकीगत दिली आहे. ही बाई पर्थ येथील एका बाईला रोज रात्रीं प्रकट होऊन सांगे, "पाद्र्याला म्हणावं माझं ३ शिलिंग १० पेन्सचं (सुमारें २॥ रुपये) देणं आहे तें देऊन टाक." कोणता पाद्री आणि देणं कोणाचं हें त्या पिशाच्चानें कधींच सांगितलें नाहीं. तरीसुद्धां त्या स्वागतार्ह पिशाच्चाची कटकट निघून जावी म्हणून त्या बाईनें आपल्या चर्चच्या पाद्र्याला घडलेलें वृत्त सांगितलें. पुष्कळ चौकशी केल्यानंतर शहरांतल्या एका किराणा व्यापाऱ्याचा व मॅलॉय बाईचा संबंध होता असें आढळून आलें. त्या व्यापाऱ्याला मॅलॉय मेली हें माहीतदेखील नव्हतें. आपल्या हिशोबाची चोपडी उघडून पाहिल्यानंतर मॅलॉयला दिलेल्या मालाचे ३ शिलिंग १० पेन्स यावयाचे आहेत असें त्यास आढळून आलें. पाद्र्यानें तें देणें देऊन टाकलें.

असे आणि असल्या प्रकारचे अनेक दाखले देतां येतील. कित्येक माणसांना स्वतःच्या आयुष्यांतहि असल्या प्रकारचे अनुभव आले असतील. मृताला कोणत्या प्रकारच्या मदतीची आवश्यकता असते हें त्याच्या पाठीमागें राहिलेल्या आप्तांना नीट विचार केला तर सहज समजण्यासारखें असतें. जित्या हाटी आणि मेल्या खजूर वाटी अशी आपल्यांत एक म्हण आहे. जिवंतपणीं आपल्या वृद्ध पित्याचे हाल करून मरणोत्तर त्याच्या नांवानें दानधर्म करणारा व भोजनें घालणारा पुत्र जें करतो तें केवळ आपल्या मोठेपणासाठींच.

याच्या उलट प्रकार म्हणजे वडील माणसांच्या राहून गेलेल्या इच्छा पुऱ्या करण्यासाठीं कांहीं लोक धडपड करीत असतांना दिसतात. अमुक मुलीशीं आपल्या मुलानें लग्न करावें अशी एका माणसाच्या आईची इच्छा होती. ती मुलगी पसंत नसल्याकारणानें आईच्या जिवन्तपणीं तो विवाह होऊं शकला नाहीं. परंतु आई मेल्यानंतर केवळ तिची इच्छा

म्हणून त्यानें त्याच मुलीशीं विवाह केला. वडील माणसें ज्या योजना आंखतात त्या सर्वच चांगल्या व हितावह असून आपणांस पूर्ण पसंत असतात असें नाहीं. अर्थात् त्या बाबतींत शहाणीं माणसें तंटा न करतां समजुतीनें जें योग्य तेंच करतात. त्याच तऱ्हेची वागणूक मृताच्या राहून गेलेल्या इच्छेच्या बाबतींत असावी. केवळ मृताची इच्छा म्हणून तिला भरमसाट महत्व देऊं नये. ती शहाणपणाची आहे कीं नाहीं याचा नीट विचार करूनच मग जें योग्य तें करावें. इहलोकांतल्या आपल्या वागणुकीबद्दल आपणच सर्वस्वीं जबाबदार आहोंत. ज्यांचा इहलोकांशीं संबंध तुटलेला आहे, त्यांच्या मनाप्रमाणें वागण्याची आम्हांला कांहींएक आवश्यकता नाहीं.

० ० ०

८ : स्वप्नांत भेटणारीं मृत माणसें

'स्वप्न' या विषयाला अलीकडे बरेंच शास्त्रीय महत्व प्राप्त झालें आहे. आजकाल प्रसिद्ध झालेला मानसशास्त्रावरील कोणताहि ग्रंथ उघडला तर त्यांत 'स्वप्न' या विषयावर एखादें तरी प्रकरण सांपडतें. फ्रॉईड, युंग, मॅकडुगल, डुनसारख्या अनेक मानसशास्त्रवेत्त्यांनीं स्वप्न या विषयाकडे उत्तम प्रकारें अभ्यास करून निरनिराळ्या दृष्टिकोनांनीं पाहिलें आहे. परंतु फ्रॉइडसारख्या बुद्धिमंतानें स्वप्नाची केलेली निव्वळ जडवादी चिकत्सा अपुरी वाटते.

तसें पाहिलें तर हा विषय ज्याचा त्यानें अभ्यास करण्यासारखा आहे. आणि ज्या माणसांना स्वप्नें पडण्याची संवय आहे त्यांनी आपणांला पडणाऱ्या स्वप्नांची चिकित्सा केली तर त्यांना स्वतःच्या मनोव्यापारांचें यथार्थ ज्ञान होऊं शकेल. जशा प्रत्येक माणसाच्या आवडीनिवडी असतात त्याचप्रमाणें निरनिराळ्या व्यक्तींना पडणाऱ्या स्वप्नांचें वैचित्र्यहि अपूर्व असतें.

'स्वप्न' या विषयाच्या विविध बाजू आहेत. प्रस्तुत प्रकरणांत जे आपले मेलेले आप्त राहूनराहून किंवा कालांतरानें दिसतात त्याबाबत सत्य काय आहे तें पाहाण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

जिवंत माणसांच्या उत्कट इच्छेंतून जसा स्वप्नाचा उद्भव होतो तसा मृतांच्या राहून गेलेल्या जिवंतपणींच्या आशा–वासनांतून त्याच्याविषयीं स्वप्नें पडण्याचे प्रकार घडतात. एका जिवंत माणसानें आपली इच्छा दुसऱ्या जिवंत माणसाला कळविणें जितकें सोपें आहे तितकें मृताला आपली इच्छा जिवंत माणसाला कळविणें सोपें नाहीं. मृताला आपला संबंध जिवंत माणसाशीं घडवून आणण्याचे जे विविध प्रकार आहेत त्यापैकीं स्वप्न हा एक सोपा मार्ग आहे व त्याचाच प्रामुख्यानें या प्रकरणीं विचार करावयाचा आहे. स्वप्नांत जिवंत माणसें आपला जड देह अंथरुणांत निद्रिस्त ठेवून सूक्ष्मदेहानें वावरून अनुभव घेत असतात आणि मृतांचा परलोकींचा देह व जिवंत माणसाचा सूक्ष्म देह यांचें द्रव्य एकच असल्यामुळें मृत आणि जिवंत माणसाची भूवर्लोकीं पडलेली गांठ हवेंतून उडतांना एका वैमानिकानें दुसऱ्या वैमानिकाला खूण करावी किंवा समुद्रांत एका जहाजावरील माणसानें दुसऱ्या जहाजावरील माणसाशीं हस्तांदोलन करावें तशा प्रकारची असते.

वास्तविक जो माणूस मेला त्याचा इहलोकाशीं संबंध तुटला; परंतु ज्या गांवांत आपण अनेक वर्षें राहिलों तें गांव जरी आपण सोडून दूर दुसऱ्या गांवीं गेलों तरी त्या पूर्वीच्या गांवांतले आपले अनेक लागेबांधे व मित्रत्वाची ओढ जशी मधून मधून कांहीं वर्षें तरी त्या गांवाकडे आपणांला खेंचीत असते तसाच प्रकार मृतांच्या बाबतींत होतो.

सन १८९२ सालीं कुणा एका माणसाचा खून झाला. आपल्या देहाला सद्गति लाभावी व आपला खून करणाऱ्या माणसाला योग्य तें शासन व्हावें म्हणून त्या मृतानें संबळपूर लाईनवर लांब असलेल्या आपल्या आईला स्वप्नांत भेटून सांगितलें कीं, " तालुके कर्जतपैकीं लोहझरे येथें खून झालेला असतांना आपणांस मारून आपला मुडदा डोंगरांत ठेविला आहे. " या स्वप्नांतील पुराव्यावरूनच पुढें सर्व कृत्य उघडकीस आलें व कोर्टांत केस चालून गुन्हेगारास योग्य ती शिक्षा झाली. (साद्यंत हकीकत नेटिव्ह ओपिनियन वर्तमानपत्राच्या १३–१०–१८९२ च्या अंकांत प्रसिद्ध झाली होती.)

दुसऱ्यानें आपणांस इजा केली म्हणजे त्याचें परीपत्य करावें असें सर्वसामान्य माणसाला वाटणें साहजीकच आहे. खून झालेल्या माणसाला खुनी माणसावद्दल जबरदस्त द्वेष वाटत असला पाहिजे आणि म्हणूनच खुनी माणसाचा सूड उगविण्याबद्दल मृताच्या आपल्यापरी खटपटी चालत असतील. त्या सर्वांच्याच खटपटीला यश येतें असें नाहीं. तें तसें झालें असतें तर जगांत अनेक अनर्थ झाले असते. परंतु जीं कांहीं थोडीं माणसें मरणोत्तर आपल्या शत्रूचा सूड उगविण्याच्या बाबतींत यशस्वी झालीं आहेत त्यांच्या हकीकती देशोदेशींच्या वाङमयांत उपलब्ध आहेत.

एक खुनी माणूस लंडन शहरीं गेला असतां माझा खून करून पळालेला अमुक मनुष्य हल्लीं अमुक नांव धारण करून अमुक एके ठिकाणीं आला आहे, ही बातमी तूं पोलिसाला दे, असें एका म्हातारीच्या स्वप्नांत मृत माणसानें सांगितलें. (साद्यंत माहिती केरळ कोकीळ मासिक पुस्तक अंक ५ वर्ष १८९१ ऑगस्ट यांत मिळेल.)

स्वप्न हा विषय प्रत्येकाच्या कमीजास्त प्रमाणांत नित्याच्या परिचयाचा, आहे. आपणास पडलेल्या स्वप्नाचा अभ्यास करण्याची आपण तितकीशी काळजी घेत नाहीं. परंतु त्याचा योग्य रीतीनें अभ्यास केला गेला तर स्वप्नांत दिले जाणारे संदेश भवितव्याच्या पूर्वसूचना, अनुभवानें कशा फलद्रूप झालेल्या दिसतात तें या प्रकरणवरून चांगलें प्रत्ययाला येईल.

मूल लहान असतांना जर त्याची आई वारली तर परलोकीं गेलेल्या त्या आईला इहलोकीं राहिलेल्या त्या मुलाविषयीं फार काळजी वाटते. आणि वात्सल्यामुळें प्रेरित झालेली ती माता कुणाच्या तरी स्वप्नांत जाऊन आपल्या बाळाचें प्रेमानें संगोपन करण्याविषयीं सूचना देत असते. अनेकवर्षेपर्यंत मोठ्या प्रेमानें संसार केलेल्या दांपत्यापैकीं म्हणजे मागें राहिलेल्या आपल्या जोडीदाराची किंवा सहचारिणीची कुणीतरी काळजी वहावी असें परलोकीं गेलेल्या व्यक्तीस वाटत असतें आणि म्हणून ती व्यक्ति कुणाच्या तरी स्वप्नांत येऊन आपली उत्कंठा प्रकट करीत असते.

आमचे एक स्नेही श्री. रामभाऊ हे १९२८ सालीं एका खुनाच्या खटल्यांत पंच होते. एका अत्यंत श्रीमंत माणसानें एका गरीब माणसाचा गोळी घालून खून केला होता. खून झालेल्या माणसाला रामभाऊंनीं पूर्वी कधींहि पाहिलें नव्हतें. त्या खटल्यांत ते पंच नेमले गेल्यापासून रात्रीं अंथरुणावर पडल्यावर त्यांना रोज एक व्यक्ति त्याच्या तीन मुलांसह दिसूं लागली; साडे चार फूट उंचीचा, भक्कम बांध्याचा, लंगोटी नेसलेला व कळकट कुडतें घातलेला तो माणूस होता. त्याच्या गळ्यांत लहानसें एक चाकूचें पातें अडकविलेलें असे व त्याचीं तीं लहान मुलें त्याच्या बरोबर असत. कोर्टांत खटला जसजसा रंगत चालला तसतशी त्या मृताविषयीं अधिकाधिक माहिती बाहेर येऊं लागली. त्या माणसाच्या प्रेतावर सांपडलेलें तें गळ्यांतलें पातें व अंगांतले कुडतें कोर्टांत दाखविण्यांत आलें. त्याचप्रमाणें मृताच्या पाठीमागें त्याचीं तीन मुलें उघडीं पडलीं आहेत हाही पुरावा कोर्टांत आला. तेव्हां रामभाऊंना आपणाला रोज दिसणारा माणूस तो दुसरा तिसरा कोणी नसून ज्याचा खून झाला तोच गणू पोशा असावा याबद्दल खात्री होऊन चुकली. आरोपी सूर्याजीराव मोठा श्रीमंत माणूस होता, व त्यानें आपली सुटका करून घेण्यासाठीं मोठा नामांकित व हुशार वकील दिला होता. 'सूर्याजीरावानें मज गरिबाचा खून केला. माझीं हीं पोरं पोरकीं झालीं. सूर्याजीराव खुनी आहे असं तुम्हीं कोर्टांत सांगा,' हे शब्द जरी गणू पोशाच्या पिशाच्चाला कधीं उच्चारतां आले नाहींत तरीं त्याच्या चेहऱ्यावरचा हा आविर्भाव रामभाऊंनीं बरोबर ओळखला होता.

ऐके दिवशीं रामभाऊंचा एक नातलग त्यांच्या घरीं आला व त्यांना तीनशें रुपये देऊं करून 'आरोपी दोषी नाहीं' असें तुम्हीं कोर्टांत सांगा म्हणून विनवूं लागला. रामभाऊंनीं त्या माणसाला हांकून लावला. रामभाऊंना फितविण्याकरितां आणखी दुसऱ्या एका माणसाकडून प्रयत्न झाला; परंतु रामभाऊ फितूर झाले नाहींत.

खटल्याचा निकाल जसजसा जवळ येऊं लागला तसतसा गणू पोशा आपल्या आर्जवी चेहऱ्यानें रामभाऊंस अधिकाधिक त्रास देऊं लागला.

रामभाऊंना त्याची कींव येई, पण त्यांच्या हातीं काय होतें ? रामभाऊं-खेरीज सर्व पंचांनी तीनतीनशें रुपयांची लांच घेतली होती. याशिवाय जरूर त्या अनेक माणसांचे सूर्याजीरावांच्या माणसांनीं ज्याच्या त्यांच्या मगदुराप्रमाणें भरे भरले होते.

अखेर सरकारी वकील व आरोपीचा वकील यांचीं भाषणें होऊन न्यायमूर्तींनीं पंचांस तो खटला बाहेर आलेल्या पुराव्यानिशीं समजाऊन सांगितला. विचारविनिमयासाठीं पंच एका खोलींत गेले. रामभाऊं खेरीज बाकीचे सर्वजण 'आरोपी निर्दोषी आहे.' असें सांगणार होते. रामभाऊंना आपल्या बाजूला ओढण्यासाठीं त्यांनीं जवळ जवळ एक तास प्रयत्न केला, परंतु त्यांनीं सत्याग्रह सोडला नाहीं. शेवटीं पंचमंडळी बाहेर आली. न्यायमूर्तींनी "आपलें सर्वांचें एकमत आहे काय ?" असा सरपंचास प्रश्न केला असतांना त्यानें "होय, आरोपी निर्दोषी आहे" म्हणून उत्तर दिलें 'सरपंच खोटे बोलत आहेत. आरोपी दोषी आहे, असें मला वाटतें, 'हे शब्द रामेभाऊंच्या तोंडावर आले होते. परंतु त्या वेळचा तो कोर्टांतला गलबला पाहून रामभाऊंच्या तोंडांतून शब्द उमटे नात. शिवाय दोन बाजूंच्या दोघां पंचांनीं रामभाऊ उभें राहाण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यांना त्यांचा कोट धरून खालीं खेंचून बसविलें. आणि त्या खटल्यांत श्रीमंताच्या बाजूचें न्यायदान झालें !

बिचारा गणू पोशा आपला शत्रु गळफांसापासून सुटला म्हणून तड-फडला असेल. आपला खून करणाराला योग्य ती शिक्षा मिळावी म्हणून मृत माणसाची कशी धडपड चालते याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. गणू पोशा मारला गेला होता. तेव्हां रामभाऊंस जें दिसत होतें तें गणू पोशाचें पिशाच्च होतें. पण त्याच्याबरोबरचे ते मुलगे तर जिवंत होते. अर्थात् त्या मुलांच्या आकृति म्हणजे पिशाच्चें नव्हतीं. मुलांवरील अत्यंतिक प्रेमामुळें गणू पोशाला त्यांचा सतत ध्यास लागून राहिला होता व त्यामुळें त्याचीं विचार-चित्रें सतत त्यांच्या भोंवतीं तरळत होतीं. रामभाऊंना जीं दिसत तीं गणू पोशाच्या विचारामुळें उत्पन्न झालेलीं हीं चित्रेंच होत. माणसाच्या मनांत सतत उत्पन्न होणारे बरे-

आमचे एक स्नेही श्री. रामभाऊ हे १९२८ सालीं एका खुनाच्या खटल्यांत पंच होते. एका अत्यंत श्रीमंत माणसानें एका गरीब माणसाचा गोळी घालून खून केला होता. खून झालेल्या माणसाला रामभाऊंनीं पूर्वी कधींहि पाहिलें नव्हतें. त्या खटल्यांत ते पंच नेमले गेल्यापासून रात्रीं अंथरुणावर पडल्यावर त्यांना रोज एक व्यक्ति त्याच्या तीन मुलांसह दिसूं लागली; साडे चार फूट उंचीचा, भक्कम बांध्याचा, लंगोटी नेसलेला व कळकट कुडतें घातलेला तो माणूस होता. त्याच्या गळ्यांत लहानसें एक चाकूचें पातें अडकविलेलें असे व त्याचीं तीं लहान मुलें त्याच्या बरोबर असत. कोर्टांत खटला जसजसा रंगत चालला तसतशी त्या मृताविषयीं अधिकाधिक माहिती बाहेर येऊं लागली. त्या माणसाच्या प्रेतावर सांपडलेलें तें गळ्यांतलें पातें व अंगांतले कुडतें कोर्टांत दाखविण्यांत आलें. त्याचप्रमाणें मृताच्या पाठीमागें त्याचीं तीन मुलें उघडीं पडलीं आहेत हाही पुरावा कोर्टांत आला. तेव्हां रामभाऊंना आपणाला रोज दिसणारा माणूस तो दुसरा तिसरा कोणी नसून ज्याचा खून झाला तोच गणू पोशा असावा याबद्दल खात्री होऊन चुकली. आरोपी सूर्याजीराव मोठा श्रीमंत माणूस होता, व त्यानें आपली सुटका करून घेण्यासाठीं मोठा नामांकित व हुशार वकील दिला होता. 'सूर्याजीरावानें मज गरिबाचा खून केला. माझीं हीं पोरं पोरकीं झालीं. सूर्याजीराव खुनी आहे असं तुम्हीं कोर्टांत सांगा,' हे शब्द जरी गणू पोशाच्या पिशाच्चाला कधीं उच्चारतां आले नाहींत तरीं त्याच्या चेहऱ्यावरचा हा आविर्भाव रामभाऊंनीं बरोबर ओळखला होता.

ऐके दिवशीं रामभाऊंचा एक नातलग त्यांच्या घरीं आला व त्यांना तीनशें रुपये देऊं करून 'आरोपी दोषी नाहीं' असें तुम्हीं कोर्टांत सांगा म्हणून विनवूं लागला. रामभाऊंनीं त्या माणसाला हांकून लावला. रामभाऊंना फितविण्याकरितां आणखी दुसऱ्या एका माणसाकडून प्रयत्न झाला; परंतु रामभाऊ फितूर झाले नाहींत.

खटल्याचा निकाल जसजसा जवळ येऊं लागला तसतसा गणू पोशा आपल्या आर्जवी चेहऱ्यानें रामभाऊंस अधिअधिक त्रास देऊं लागला.

रामभाऊंना त्याची कींव येई, पण त्यांच्या हातीं काय होतें ? रामभाऊं-खेरीज सर्व पंचांनी तीनतीनशें रुपयांची लांच घेतली होती. याशिवाय जरूर त्या अनेक माणसांचे सूर्याजीरावांच्या माणसांनीं ज्याच्या त्यांच्या मगदुराप्रमाणें भरे भरले होते.

अखेर सरकारी वकील व आरोपीचा वकील यांचीं भाषणें होऊन न्यायमूर्तींनीं पंचांस तो खटला बाहेर आलेल्या पुराव्यानिशीं समजाऊन सांगितला. विचारविनिमयासाठीं पंच एका खोलींत गेले. रामभाऊं खेरीज बाकीचे सर्वजण 'आरोपी निर्दोषी आहे.' असें सांगणार होते. रामभाऊंना आपल्या बाजूला ओढण्यासाठीं त्यांनीं जवळ जवळ एक तास प्रयत्न केला, परंतु त्यांनीं सत्याग्रह सोडला नाहीं. शेवटीं पंचमंडळी बाहेर आली. न्यायमूर्तींनी "आपलें सर्वांचें एकमत आहे काय ?" असा सरपंचास प्रश्न केला असतांना त्यानें "होय, आरोपी निर्दोषी आहे" म्हणून उत्तर दिलें 'सरपंच खोटे बोलत आहेत. आरोपी दोषीं आहे, असें मला वाटतें, 'हे शब्द रामेभाऊंच्या तोंडावर आले होते. परंतु त्या वेळचा तो कोर्टांतला गलबला पाहून रामभाऊंच्या तोंडांतून शब्द उमटे नात. शिवाय दोन बाजूंच्या दोघां पंचांनीं रामभाऊ उभें राहाण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यांना त्यांचा कोट धरून खालीं खेंचून बसविलें. आणि त्या खटल्यांत श्रीमंताच्या बाजूचें न्यायदान झालें !

बिचारा गणू पोशा आपला शत्रु गळफांसापासून सुटला म्हणून तड-फडला असेल. आपला खून करणाराला योग्य ती शिक्षा मिळावी म्हणून मृत माणसाची कशी धडपड चालते याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. गणू पोशा मारला गेला होता. तेव्हां रामभाऊंस जें दिसत होतें तें गणू पोशाचें पिशाच्च होतें. पण त्याच्याबरोबरचे ते मुलगे तर जिवंत होते. अर्थात् त्या मुलांच्या आकृति म्हणजे पिशाच्चें नव्हतीं. मुलांवरील अत्यंतिक प्रेमामुळें गणू पोशाला त्यांचा सतत ध्यास लागून राहिला होता व त्यामुळें त्याचीं विचार-चित्रें सतत त्यांच्या भोंवतीं तरळत होतीं. रामभाऊंना जीं दिसत तीं गणू पोशाच्या विचारामुळें उत्पन्न झालेलीं हीं चित्रेंच होत. माणसाच्या मनांत सतत उत्पन्न होणारे बरे-

वाईट विचार नेहमीं त्याच्याभोंवतीं असे तरळत असतात. यावरून सद्विचार, सद्भासना व सद्भावना याचें महत्व लक्षांत येईल.

प्रस्तुत विषयाशीं संबंध नसलेली परंतु जातां जातां सांगण्यासारखी एक गोष्ट अशी कीं, सूर्याजीराव दोषमुक्त होऊन सुटल्यावर लवकरच त्यांचा एक कर्तासावरता मुलगा त्यांच्या दुसऱ्या मुलाकडून वंदुकीनें ठार मारला गेला. दोघेहि भाऊ शिकारीला गेले असतांना चुकून चाप उडाला व भावाकडून भाऊ चुकीनें मारला गेला, असा त्या प्रकरणीं पुरावा प्रस्थापित झाला होता. आर्थिक दृष्ट्या सूर्याजीरावाची परिस्थिति आजही उत्तम असली तरी संसारांतल्या विविध अडचणींनीं तो फार गांजलेला माणूस आहे. आणि तीनतीनशें रुपयांची लांच घेणारे ते सर्व पंच अन्नाला मोताद झाले आहेत. रामभाऊ मात्र आपल्या उतारवयांत आनंदांत आहेत.

सुप्रसिद्ध इटालियन महाकवि डॅन्टे हा इसवी सन १३२१ सालीं ख्रिस्तवासी झाल्यानंतर त्याच्या Paradiso या महाकाव्याचे सर्व खंड एकत्र करण्याचें काम त्याचे दोन मुलगे जॅकोपो आणि पिएत्रो यांनीं आपल्या अंगावर घेतलें. त्या काव्याचे तेरा खंड त्या दोघांना महाप्रयत्नांअंतीहि सांपडले नाहींत. अशा रीतीनें शोधतां शोधतां कित्येक महिने गेले आणि जॅकोपो यास एके रात्रीं स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत आपला बाप त्यानें जवळ आलेला पाहिला. त्याच्या अंगावर शुभ्र वस्त्रें होतीं आणि त्याचा चेहरा दिव्य तेजानें उजळला होता. अशा प्रकारें बापाची स्वप्नांत भेट झाल्यावर ज्याचा चटका जॅकोपोच्या मनाला लागून राहिला होता ते पॅरडिसो काव्याचे न सांपडणारे खंड कुठें ठेवण्यांत आले आहेत असें त्यानें आपल्या मृत पित्यास विचारलें. नंतर सूक्ष्म देहधारी असा जो स्वप्नसृष्टींतील डॅन्टे त्यानें आपल्या पुत्राचा हात धरून तो जिवंतपणीं झोपत असे त्या खोलींत त्याला नेलें आणि तेथील भिंतींतील एक विविक्षित जागा त्याला दाखविली. त्याच क्षणीं जॅकोपोच्या स्वप्नाचा शेवट झाला आणि जॅकोपो आपल्या बिछान्यावरून जागा होऊन उठला. आपण पाहिलेलें स्वप्न जवळच असलेल्या आपल्या एका मित्राला जागा

करून त्यानें सांगितलें आणि ताबडतोब आपल्या मृत बापानें दाखवून दिलेल्या त्या भितीपाशीं ते दोघेजण गेले. जी विविक्षित जागा त्याच्या बापानें जॅकोपोला स्वप्नांत दाखविली होती त्या जागीं एक चटईचा पडदा लावण्यांत आला होता. तो पडदा हळूंच उचलल्यानंतर त्यांना एक लहानशी खिडकी दिसली. ही खिडकी त्यांनीं पूर्वी कधींहि पाहिलेली नव्हती; किंवा त्या ठिकाणीं एखादी खिडकी असेल अशी कुणाला कल्पनाहि नव्हती. त्या खिडकींत त्यांना डॅन्टेचीं कितीतरी हस्तलिखितें सांपडलीं. भितीच्या दमटपणामुळें त्या हस्तलिखितांची थोडीफार खराबी झाली होती आणि तीं जर आणखी कांहीं दिवस तिथेंच पडून राहातीं तर त्यांची अगदींच नासाडी होऊन गेली असती. त्यांवर पडलेली धूळ झाडून टाकल्यानंतर ज्या तेरा खंडांचा जॅकोपोनें इतके दिवस सतत शोध चालविला होता ते त्याच्या हातीं लागले. (बोकेशिओकृत डॅन्टेचें चरित्र)

मिस आय. सोलास नांवाच्या एका तरुणीला १९३७ च्या मे महिन्यांत स्वप्न पडलें व ती हकीकत तिनें १४ जानेवारी १९३९ च्या पत्रांत न्यूयॉर्क येथील सायकिकल रिसर्च सोसायटीला कळविली. त्या तरुणीनें लिहिलें आहे—

"या स्वप्नांत माझे वडील एक पसाभर स्वयंटाक घेऊन माझ्याशीं आले. त्यांच्या इच्छेप्रमाणें ते स्वयंटाक मी घेऊन काय करावयाचें होतें तें मला समजेना. ते आपल्या खोलींत गेले आणि पुन्हां एक पसाभर स्वयंटाक घेऊन आले व उत्सुकतेनें मला म्हणाले, 'हे त्याच पत्त्यावर पाठव.' मी जागी झाल्यावर विचार करूं लागले, त्यावेळीं मला असें आठवलें कीं, मरणापूर्वी त्यांनीं रुपेरी कागदांत बांधलेलें एक पुडकें माझ्या हातीं दिलें होतें व त्यावेळीं ते म्हणाले होते, 'यांत चांगले चांगले स्वयंटाक आहेत. तूं ते माझ्यासाठीं इस्पितळांत नेशील काय?' मी त्यांना विचारलें होतें इस्पितळाचा पत्ता काय? ते म्हणाले होते मला जर पत्ता माहीत असता तर तें पुडकें मीच नेलें नसतें कां? २० ऑक्टोबर १९३६ रोजीं माझ्या वडिलाचें देहावसान झालें होतें. म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतर सुमारें सात महिन्यांनीं मला तें स्वप्न पडलें. सकाळीं उठल्या-

नंतर मी वडिलांच्या खोलींत जाऊन तपास केला तेव्हां 'जुने स्वयंटाक' अशी पट्टिका मारलेली एक पेटी मला तिथें आढळली आणि त्यांत खरोखरीच एक पसाभर स्वयंटाक होते. स्वप्नांत अनुभविलेल्या वस्तुस्थितीचा अशा रीतीनें प्रत्यक्षांत मेळ जमल्यावर मला थोडी मौज वाटली. नंतर त्या खोलीच्या दुसऱ्या एका निजावयाच्या खोलीच्या भागांत तशीच पट्टिका लावलेली दुसरी एक पेटी मला आढळली. आणि तिच्यांतहि एक पसाभर स्वयंटाक होते आणि ते मी वडिलांच्या हातीं पाहिलेल्या टाकांसारखे होते. मी माझ्या एका मैत्रिणीला 'जुने स्वयंटाक' विकत घेऊन किंवा गोळा करून गरजूंना वाटणारी एकादी संस्था तुला माहीत आहे काय, असें विचारलें तेव्हां तिनें कांहीं दिवसांपूर्वी स्वयंटकांची मागणी करणारी एक जाहिरात वाचल्याचें सांगितलें.

मरणापूर्वी कांहीं महत्त्वाचे कागद लपवून ठेवून त्यांच्या अस्तित्त्वाचा मरणोत्तर आस्तित्त्व सिद्ध करण्यासाठीं प्रयोग केल्याचें माझ्या वडिलांनीं ऐकलें होतें, व आपणहि अशाच प्रकारचा परंतु अगदीं साधा प्रयोग करूं असें ते जिवंतपणीं म्हणत असत. मला वाटतं मरणोत्तर आस्तित्त्वाची साक्ष देण्याकरितांच त्यांनीं हा स्वयंटाकाचा प्रयोग केला असावा.

मिस् सोलास हिनें आपल्या वडिलांना त्यांच्या अभ्यासाच्या खोलींतून दुसऱ्यांदा स्वयंटाक आणण्यासाठीं झोपावयाच्या खोलींत जातांना पाहिलें होतें. पहिली पेटी तिला अभ्यासाच्या खोलींत आढळली होती व दुसरी निजावयाच्या खोलींतील टेबलाच्या खणांत मागल्या बाजूस होती. मिस् सोलास हिचें म्हणणें असें कीं वडिलांच्या अभ्यासाच्या खोलींतील ती प्रथम सांपडलेली पेटी तिनें पूर्वी कधींतरी कदाचित् पाहिलीही असेल. त्याच्यांत काय आहे हें मात्र तिनें पाहिलें नव्हतें. परंतु दुसऱ्या पेटीचा शोध मात्र स्वप्न पडल्यानंतरच लागला. (G. N. M. Tyrell कृत Personality of man पृष्ठ १९१–१९२)

वरील वृत्तांतावरून मरणोत्तर माणसाची स्मृति कायम असते असें म्हणावें लागेल.

स्वप्नांत मृताकडून कांहीं कांहीं माणसांना संदेश व मदत मिळा-

ल्याच्या कांहीं हकीकती प्रसिद्ध झाल्या आहेत. न्यूयॉक येथील Herald of health पत्राचे संपादक मिस्टर एम्. एल्. हॉलब्रुक, एम्. डी. यांनीं अशा तऱ्हेचा आपला एक अनुभव सांगितला आहे. ते म्हणतात–

" १८७० सालच्या उन्हाळचांत मला खोकल्याचा तीव्र विकार झाला. बहुतेक दरवर्षीं थंडींत व उन्हाळचांत खोकल्याची माझ्यावर धाड पडावयाची. परंतु हचा माझ्या खोकल्याची उमळ इतकी भयंकर यायची कीं, या खोकल्यानें माझा अंत होणार अशीच जवळ जवळ माझी खात्री झाली होती. आणि आत्यंतिक खोकल्यानें मी अयंत बेजार झालों. हा आपला शेवटचा आजार, आतां अंथरुणांतून आपण पुन्हां उठणार नाहीं असे विचार मनांत येत असतांना मला ग्लानी येऊन डोळा लागला. किती वेळ मी त्या अत्यंत गंभीर अवस्थेंत असेन त्याची कल्पना नाहीं; परंतु मला स्वप्न पडलें; तें अगदीं मला स्पष्ट आठवतें. माझी धाकटी मृत बहीण एकाएकीं बिछान्यापाशीं येऊन म्हणाली. " तुझ्या प्रकृतीविषयीं तुला घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं. आम्हीं तुला बरें करण्याकरितां आलों आहोंत. कारण तुला जगांत अजून पुष्कळ कामें करावयाचीं आहेत. " इतकें बोलून ती जशी एकाएकीं आली तशी अदृश्य झाली. आणि नंतर माझ्या डोक्याला जसा एखादा विजेचा झटका बसावा तसा एकदम झटका बसला. तो झटका दुःखदायक नव्हता. डोक्यांतून तो उतरत उतरत खालीं माझ्या छातींत आला; व त्यामुळें मी जागा होऊन पाहातों तो आपल्याला बरें वाटत आहे अशी जाणीव माझ्या ठिकाणीं निर्माण झाली. आणि खरोखरच त्या स्वप्नसृष्टींतील झटक्यानें मी बरा झालों होतों. त्यानंतर पुढें कधींहीं मला खोकला झाला नाहीं.' (Proceedings S. P. R. Vol. III पृष्ठ ३७४)

आपल्या मृत आप्तांकडून माणसाला स्वप्नद्वारां कसे संदेश मिळूं शकतात याचें दुसरें एक उदाहरण दुर्गाबाई जोशी यांच्या स्वप्नसाक्षात्कार या पुस्तकांत मला आढळलें. दुर्गाबाई लिहितात–––

" माझी आई स्वर्गवासी होऊन सुमारें वीस दिवस झाले असतील... मला एक सीता नांवाची दीड वर्षाची लहान बहीण होती...तिची सर्व

व्यवस्था ठेवण्याकरितां हरी नांवाचा एक गडी ठेवला होता; कारण आई आजारी होती. आई आपल्या देखरेखीखालीं हरीकडून सीतेचें दूध तापवून तिला तें आपल्यासमोर पाजावयास लावी. त्या दिवशीं हरी माझ्या बहिणीला दूध पाजीत होता. माझी मृत आई एकाएकीं तिथें येऊन वाकली. मी जवळच झोपल्ये होत्यें. आई मला म्हणाली, 'सीतेला दूध शिळं देत नाहींना, चांगलं तापवलं असतं ना ?' इतकेच शब्द बोलून आई जाण्याच्या इराद्यानें ओणव्याची उभी असलेली दिसली.

तें पाहून थोडी घाबरूनच मी उठलें व म्हणालें, "ताई, तूं कशी ग आलीस ? सर्वांनीं मला सांगितलें कीं तूं देवाकडे दूर दूर गेली आहेस व पुन्हां कधीं येणार नाहींस !"

"आई म्हणाली, 'तें खरें पण असें कधीं कधीं येतां येतें. पण मी सांगितलें तें तूं आधीं आजीला विचार पाहूं ! इतकें बोलून ती झपझप पावलें टाकीत बाहेर निघून गेली."

वरील सर्व हकीकती वाचून कुणी आपला असा समज करून घेऊं नये कीं कुणीही मेलेला माणूस स्वप्नांत दिसला किंवा त्यानें कांहीं सांगितलें कीं तें सर्व खरेंच. आपल्या मृत आप्तांचें किंवा मित्रांचें काल्पनिक चित्र आपल्या अंतःकरणांतील उत्कृष्ट इच्छेमुळें स्वप्नसृष्टींत आपल्या डोळ्यांपुढें तरळूं लागतें व आपल्या मनोवांच्छिताप्रमाणें त्याचें बोलणें आपणांस ऐकूं येतें किंवा त्याची वागणूक आपल्या प्रत्ययास येते. मृत माणसांच्या बऱ्यावाईट अशा प्रकट केलेल्या वांच्छितानुसार वागलेंच पाहिजे असें नाहीं. मेल्यानंतर माणूस एकदम देव होतो या कल्पना भ्रामक आहेत. माझ्या एका मित्राला त्याच्या मृत आईनें स्वप्नांत येऊन सांगितलें होतें कीं 'तूं अमूक मुलीशीं लग्न कर. त्या माझ्या मित्रानें त्याची आई जिवंत असतांना तिला शतशः धुडाकावून लावलें होतें. परंतु तीच मेल्यानंतर तिचा शब्द त्याला ग्राह्य वाटूं लागला होता. मी माझ्या त्या मित्राला त्या वेळीं असें सांगितलें होतें कीं, "बाबारे, तुझी मेलेली आई तुला वाटेल तें सांगो, ती मुलगी तुला जर आवडत नसली तर तिच्याशीं लग्न करून एका मृताच्या सांगण्या-

वरून दुसऱ्या जिवंत जीवाच्या सुखांत माती कां कालवतोस ! "

भावनाप्रधान आणि श्रद्धाळु मनाला भलतेभलते अनुभव देडावून सोडतात. 'स्वप्न' म्हणजे निद्रिस्ताचा अनुभव. त्या अनुभवांतलें सत्य प्रतीत होण्यासाठीं तो अनुभव घेणाऱ्याचें मन स्वच्छ असलें पाहिजे. पूर्वग्रहदूषिततेपासून तें अलिप्त असलें पाहिजे. म्हणजेच त्या निद्रेंतील जागृतींत त्याला शास्त्रीय सत्याचा प्रत्यय येईल.

० ० ०

९ : भूलोकावर रेंगाळणारे रहिवासी

भूलोकावर जन्माला आलेला कोणताही माणूस कांहीं मर्यादित काल जगतो, अनेक सुख दुःखें भोगतो, बरेवाईट चित्रविचित्र अनुभव घेतो आणि तो जसा एके दिवशीं आला तसाच एके दिवशीं निघून जातो. कांहीं माणसांची अशी समजूत आहे कीं माणूस मेला म्हणजे संपला. पण हजारों वर्षांपासून परंपरेनें कर्णोपकर्णीं चालत आलेल्या आणि देशोदेशींच्या वाङ्मयांतहि प्रसिद्धी पावलेल्या माणसाच्या मरणोत्तर अस्तित्वाच्या व व्यवहाराच्या रोमांचकारी कथा अमर होऊन राहिल्या आहेत. गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत तर या कथांतील सत्य शोधून काढण्याची जडवादी शास्त्रज्ञांनी खटपट केलेली आहे. आणि माणसाच्या मरणोत्तर अस्तित्वाचे शेंकडों पुरावे गोळा केलेले आहेत. पिशाच्चांच्या कथा म्हणून या पुराव्याकडे हेटाळणीपूर्वक पाहण्यापेक्षां जीवनाचा एक अज्ञात प्रांत या दृष्टीनें त्यांचा विचार केला तर मानवी व्यक्तित्वाची अधिक विस्तृत कल्पना आपणाला येऊं शकेल.

जगप्रसिद्ध हस्तसामुद्रिक चेरो यांच्या 'Real Ghost stories नामक पुस्तकांतील एक खरी हकीकत; (ही हकीकत Jessie Adelaide Middleton कृत The Grey Ghost Book नामक पुस्तकांतहि

The Empty Room या शीर्षकाखालीं थोडक्यांत प्रसिद्ध झाली आहे.) जिज्ञासू मराठी वाचकांसाठीं मी ती या ठिकाणीं देतो.

या शतकाच्या आरंभीं आरंभीं चेरो हा आपल्या कीर्तीच्या शिखरावर पोंचला होता. त्यावेळीं एकदां तो लंडन येथील एका घरांत राहावयास गेला. तें घर भुताटकीचें आहे अशी त्यास कल्पना नव्हती.

त्या घरांत तो पहिल्याच रात्रीं निजला तेव्हां २ वाजतां ड्रमचा आवाज ऐकून जागा झाला. दरवाज्यापाशीं जाऊन आपला कुणी नोकर वगैरे भलत्या वेळीं ड्रम बडवतो आहे कीं काय तें त्यानें पाहिलें, परंतु दरवाज्यापाशीं त्याला कुणी दिसलें नाहीं. बाहेर चांगला स्वच्छ चंद्रप्रकाश पडलेला त्याला दिसला. मग चेरो जसा इकडे तिकडे फिरूं लागला तसा त्या उघड्या दारापाशीं तोच ड्रमचा आवाज त्याला मोठमोठ्यानें ऐकूं येऊं लागला.

घाबऱ्या घाबऱ्या दरवाजा बंद करून त्यानें कुलुप घातलें. परंतु तो ड्रम अर्धा तास अधून मधून वाजतच होता.

दररोज रात्रीं २ ते २॥ असला प्रकार नियमानें होऊं लागला.

एक आठवड्यानंतर चेरोनें एके रात्रीं आपल्या चार मित्रांना घरीं जेवण्याचें आमंत्रण दिलें. ते चार पाहुणे एका टेबलाभोंवतीं कुणा मृताचा संदेश वगैरे येतो कीं काय तें पाहाण्यासाठीं बसले. टेबलावर इंग्रजी वर्णमालेचा एक पट ठेवला होता.

त्या पटावरील निरनिराळ्या वर्णावर जे ठोके पडले त्यावरून त्यांनी वाक्यें तयार केलीं, तेव्हां खालील संदेश मिळाला—

"माझें नांव...आहे... (पिशाच्चानें आपलें खरें नांव सांगितलें होतें) एकशें वीस वर्षांपूर्वी मी या घरांत राहात होतों आणि माझ्या परवानगीशिवाय या दुसऱ्या माणसांनीं कां राहावें तेंच मला समजत नाहीं. आणि म्हणून तूं जोंपर्यंत या घरांतून निघून जाणार नाहींस तोंपर्यन्त मी तुला सुखानें राहूं देणार नाहीं. तुला जेवढा त्रास देतां येईल तेवढा मी देईन."

चेरोनें लिहिलें आहे, "जिवंत माणसाची जशी कानउघाडणी करावी

तशी मी त्या पिशाच्चाची कानउघाडणी केली. मी त्याला सांगितलें कीं; माणसाच्या मरणोत्तर अस्तित्वावर माझी श्रद्धा आहे, आणि परलोकीं गेलेल्या कोणाच्याही कांहीं इच्छा माझ्याच्यानें पार पाडण्यासारख्या असल्या तर त्या मी अवश्य पार पाडीन.

मग त्यानें मला संदेश दिला कीं, 'या घराच्या मागील बाजूस जी खोली आहे ती मला पाहिजे आहे. त्यांतील सर्व सामान काढून टाकून ती माझ्यासाठीं ठेवण्यांत यावी.'

"मी त्याला विचारलें, तुला जर ती खोली देण्यांत आली तर तुझी रात्रीची कटकट बंद होईल काय ?"

पिशाच्चानें पुन्हां संदेश दिला. "तूं जर तुझ्या शब्दाप्रमाणें वागलास तर मी माझ्या शब्दाप्रमाणें वागेन."

"त्याच रात्रीं मी ती खोली खालीं करून दिली नाहीं, मग रात्रीं दोन वाजतां ड्रमची कटकट सुरूं झाली. रोजच्यापेक्षां ती अधिक त्रासदायक होती. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत मी ती खोली खालीं केली आणि मग त्या रात्रीं मात्र मी सुखानें झोपूं शकलों.

"या प्रकाराचें अधिक संशोधन करावें म्हणून मी एके रात्रीं माझ्या सात आठ मित्रांना बोलावलें. मिस्टर सेसिल हस्क नांवाच्या एका अंगांत येणाऱ्या माणसालादेखील मी त्या रात्रीं बोलाविलें होतें.

माझे मित्र, मिस्टर सेसिल हस्क येण्यापूर्वीच उपस्थित झाले. त्यांच्यापैकीं एकालाही मी त्यांना मुद्दाम कां बोलाविलें होतें याची कल्पना नव्हती.

"मिस्टर हस्क आला तेव्हां तो आंधळा असल्याकारणानें मी त्याचा हात धरून त्याला सरळ भोजनगृहांत घेऊन गेलों. त्या ठिकाणीं माझे सर्व मित्र एका ओक लाकडाच्या टबलाभोंवतीं बसलेले होते. हस्कची हॅट आणि कोट मी त्याच्यापासून घेऊन त्या दोन्हीं वस्तू टेबलाच्या मध्यभागीं असलेल्या खुर्चीवर ठेवल्या आणि पांच मिनिटांच्या आंत चमत्कार घडला.

"त्या घरांत वावरणारें तें पिशाच्च दृश्य झालें. माझ्या सात मित्रां-

पैकीं तिघांना व मला स्वतःला तें स्पष्टपणें दिसलें.

" तें पिशाच्च माझ्या खुर्चीवर वांकून म्हणालें, 'माझ्यासंबंधी ज्याच्या मनांत उदार विचार वावरत आहेत असा तूं एकच माणूस या घरांत येऊन गेलेल्या कित्येक माणसांत मला आढळलास. तूं तुझा शब्द पाळलास. आतां तुला त्रास देण्याऐवजीं तुझं जें कांहीं चांगलं करतां येईल तें मी करीन ! "

या हकीकतीच्या अखेरीस चेरोनें लिहिलें आहे, " मीं आयुष्यांत ज्या ज्या घरीं राहिलों त्या सर्व घरांहून तें घर बरकतीला व हातापायाला उत्तम असें होतें. घर भाग्यशाली होतें. "

माणूस मेला म्हणजे त्याचा जड सृष्टीशीं असलेला संबंध संपतो. परंतु कांहीं माणसें जिवंतपणींच दौलतीकडे व घरादाराकडे कशीं आकर्षिलीं जातात व वेळ फुकट घालवतात याचा एक उत्तम नमुना म्हणन या हकीकतीकडे बोट दाखवितां येईल. तो माणूस त्या घराभोंवतीं १२० वर्षें घोटाळत राहिला होता. या १२० वर्षांत त्यानें त्याच्या परिस्थित्यनुरुप जर विधायक उद्योग केले असते तर त्याची कितीतरी प्रगति झाली असती.

और्ध्वदेहिकाच्या वेळीं आणि श्राद्ध पक्षाच्या वेळीं यजमान, बाप, आजा व पणजा यांच्या नांवांचा उच्चार करून त्यांना सद्गती लाभावी या इच्छेनें जे मंत्र आपण म्हणतों त्या मंत्रांचा मरणानंतर इहलोकाशीं चिकटून राहाणाऱ्यांना किती उपयोग होत असेल कुणास ठाऊक. मात्र माणसाचें मरणत्तोर अस्तित्व दीर्घकाल असूं शकतें हें श्राद्धपक्षांतील मंत्रांवरून व वरील प्रकारच्या पुराव्यावरून सिद्ध होण्यासारखें आहे.

दुष्ट किंवा हीन प्रवृत्तीच्या माणसाच्या मनासारखें कांहीं घडलें म्हणजे तो खूष होतो, तसेंच तें पिशाच्च त्याला पाहिज असलेली स्वतंत्र खोली मिळतांच खूष झालें व चेरो आनंदानें त्या घरांत राहूं शकला. चेरोच्या जीवनांत अधिक आनंद निर्माण व्हावा म्हणून अभिवचन दिल्याप्रमाणें त्या पिशाच्चानें अदृश्य सृष्टींतून त्याच्या मगदुराप्रमाणें त्याला जें कांहीं करतां येणें शक्य होतें तें त्यानें केलेंही असेल.

आपण मेलों आहोंत आणि पार्थिव देहाला लागू असलेल्या निसर्ग नियमांपेक्षा निराळ्याच कांहीं नियमांनीं आपलें जीवन नियंत्रित झालें आहे याची जाणीव बदललेल्या परिस्थितीनंतर कधीं कधीं दीर्घकालपर्यंत माणसाला नसते. कांहीं विशिष्ट कारणांचा समन्वय झाला तरच असें क्वचित् घडतें. असल्या प्रकारची मनोरंजक हकीकत मिसेस् क्रॉवे यांनीं The Night Side Of Nature नामक आपल्या एका पुस्तकांत (पृष्ठ ३६७ वर) दिली आहे.

आयर्लंड देशांतील एक श्रीमंत माणूस एकदां रस्त्यावरून चालला असतां समोरून येणाऱ्या एका अति वृद्ध माणसाकडे त्याचें लक्ष वेधलें गेलें. तो एखाद्या शेतकऱ्यासारखा दिसत होता आणि ख्रिश्चन लोक रविवारीं जसा छानछोकीचा पोषाख करतात तसा पोषाख त्याच्या अंगावर दिसत होता. तो इतका म्हातारा होता तरी मोठ्या चपळाईनें आणि सहज टेकडी चढत असतांना पाहून त्या श्रीमंत माणसाला आश्चर्य वाटलें आणि त्यानें त्या म्हाताऱ्याजवळ जाऊन त्याची चौकशी केली. त्यानें आपलें नांव कर्क पॅट्रिक असें सांगून एका झोपडीकडे बोट दाखवून त्या झोपडींत आपण राहात असल्याचें सांगितलें. आपल्या मालकीच्या जागेंत राहाणारी प्रत्येक व्यक्ति आपल्या माहितीची आहे असा त्या श्रीमंताचा समज होता. परंतु त्या वृद्धाला आपण कधीं पाहिल्याचेंहि त्याला स्मरेना. तो वृद्ध म्हणाला, "तुम्ही मला कधीं पाहिलें नाहीं म्हणतां हें मोठें आश्चर्य आहे. कारण मी रोज या रस्त्यावरून चालत जातों.

"तुझें वय काय ?" त्या जमीनदारानें विचारलें.

"एकशें पांच. माझी सर्व हयात इथेंच गेली." वृद्ध म्हणाला.

नंतर ते दोघे आपापल्या मार्गानें गेले. नंतर तो जमीनदार जवळच्या शेतांत काम करणाऱ्या कांहीं मजुरांकडे गेला आणि कर्क पॅट्रिक नांवाचा कोणी माणूस त्यांच्या ओळखीचा आहे कीं काय असें त्यांना विचारलें. तेव्हां बहुतेकांनीं नकारार्थी मान हलविली. परंतु त्या कामगारांपैकीं जीं फार जुनीं माणसें होतीं त्यांपैकीं एक दोघांनीं कर्क पॅट्रिक ज्या झोपडींत राहात असे त्या झोपडीकडे बोट दाखवून तो वीस वर्षांपूर्वी मेला अस-

त्याचें सांगितलें.

" तो मेला त्या वेळीं त्याचें वय काय होतें ?" जमीनदारानें विस्मयानें विचारलें.

" मरतेवेळीं त्याचें वय ८५ वर्षांचें होतें."

तो वृद्ध माणूस जर अजून जिवंत असता तर त्याची उमर १०५ असती. त्यानें आपलें वयोमान अगदीं बरोबर सांगितलें होतें. ही हकीकत मोठी वैशिष्टचपूर्ण आहे. कारण वीस वर्षांनंतरसुद्धां त्या माणसाला आपण मेलों आहोंत याची जाणीव नव्हती. आपण आपल्या वयाच्या १०५ व्या वर्षींसुद्धां अगदीं सहज टेकडी चढूं शकतों हा त्या वृद्धाला मोठा अभिमान वाटत असला पाहिजे. त्याच्या बरोबरीचे लोक आणि दोस्त तर केव्हांच मरून गेले असतील व त्यामुळें त्यांच्या ऐहिक आयुष्याच्या अगदीं शेवटच्या काळांत त्याला एकटेंच राहाण्याची संवय पडली असेल. तो वृद्ध माणूस तसा एकदांच फक्त त्या जमीनदाराला कां व कसा दिसला हें समजणें मोठें कठीण आहे. तो नुसता दिसला नाहीं तर चारदोन वाक्यें-देखील बोलूं शकला. त्या जमीनदाराच्या अतींद्रिय शक्ति एकाएकीं जागृत झाल्या होत्या कीं काय हेंही सांगणें कठीण आहे. ज्या कारणामुळें असले अनुभव माणसाला येऊं शकतात त्या कारणांचा अजून पुरेसा शोध लागलेला नाहीं.

इहलोकींचा सर्व कारभार व्यवस्थित आटपून नंतर परलोकाच्या प्रवासाला निघणारीं थोडीं माणसें क्वचितच आढळतात. त्यामुळें अपुऱ्या राहिलेल्या कोणत्या ना कोणत्या कामासाठीं भूलोकाशीं संबंध ठेवणारे अनेक परलोकवासी संशोधकांना आढळून आले आहेत. मात्र असे कांहीं प्रकार घडले म्हणजे त्याची दखल घेण्याची तत्परता पाश्चात्य शास्त्रज्ञ जितकी घेतात तितकी घेण्याची आपल्या लोकांची प्रवृत्ती नाहीं. या विषयावर माझें कधीं कुठें व्याख्यान झालें किंवा एखाद्या बैठकींत चर्चा झाली म्हणजे कांहीं मंडळींना स्वतःला आलेल्या अनुभवांची जाणीव होऊन त्यांच्याकडून तो कथन केला जातो. एका तरुणानें मला अशीच त्याच्या वडिलांची हकीकत सांगितली होती.–

त्याचे वडील दामूअण्णा हे एका संस्थानाचे कारभारी होते. त्यांनी आपली हयात सरकारची इमानें इतबारें सेवा करण्यांत घालविली होती. एके दिवशीं पहांट त्यांचे तरुण पुत्र नित्याप्रमाणें व्यायामशाळेंत गेल्यावर पुढील दार लोटून दामूअण्णा सूर्योदयास पुष्कळ अवकाश होता म्हणून अंथरुणांत पडले. तासादीडतासानें त्यांचे चिरंजीव व्यायाम शाळेंतून परत येऊन पाहातात तों वडिलांची जीवनज्योती मालवली होती ! दामूअण्णांचें तेरावें झालें त्याच रात्रीं आपल्या एका चिरंजीवाच्या स्वप्नांत येऊन त्यांनीं सांगितलें, "खुंटीवर काळ्या कोटाच्या आंतल्या खिशांत हिशोबाचे कागद आहेत ते महाराजांच्या स्वाधीन कर व त्या हिशोबाबरहुकम सरकारकडून आठ रुपयें अकरा आणे तीन पै येणें आहे ते घे."

दामूअण्णा वारल्यानंतर त्या कोटाकडे कुणाचेंच लक्ष गेलें नव्हतें. त्यांत हिशोबाचे कागद असतील ही घरांत कुणासही कल्पना नव्हती. परंतु स्वप्नांत मिळालेल्या सूचनेनंतर जेव्हां तो तपासण्यांत आला तेव्हां नेमके आंतल्या खिशांत ते कागद मिळाले व त्याप्रमाणें ते महाराजांस सादर करण्यांत येऊन मृतानें सांगितलेल्याप्रमाणें आठ रुपये अकरा आण तीन पैंचा हिशेब चुकता करण्यांत आला. दामूअण्णांनी हयातभर जो कारभार चोखपणें संभाळला त्याचा अगदीं शेवटचा हिशेब चुकता झाला नाहीं, म्हणूनच त्यांनी आपल्या एका चिरंजीवाचें त्याकडे लक्ष वेधण्याची यशस्वी खटपट केली. दामूअण्णा त्यानंतर कधींहि कुणालाहि दिसले नाहींत.

जन्मभर ज्या कल्पना माणसानें उराशीं बाळगलेल्या असतात त्यांचा त्याला मरणोत्तर कधीं कधीं फार त्रास होतो व त्यामुळेंच तो भूलोकाकडे खेंचला जाऊन भूलोकावरील माणसांना त्रास देतो.

माझ्या माहितीची एक बाई सौ. सदावर्ते हिला १९४४ सालीं मृत्यु आला. तिच्या मरणोत्तर तें घर एका मुसलमान भाडोत्र्यास देण्यांत आलें. तो मुसलमान जेवायला बसला म्हणजे सौ. सदावर्ते त्याला नेमकी दिसे. त्याला ती कधीं कधीं स्वप्नांतहि दिसायची व "माझ्या घरांत मुसलमान नको!" म्हणायची. तो मुसलमान त्या घरांतून निघून जाईपर्यंत

तिनें त्याचा पिच्छा सोडला नाहीं !

तरुणपणीं अनेक आशा आकांशा अतृप्त राहून ज्या माणसांना देह सोडून जाणें भाग पडतें, त्यांचे भूलोकावरील लोकांशीं संबंध ठेवण्याचे फार प्रयत्न चाललेले असतात. गेल्या महायुद्धांत जीं माणसें कामीं आलीं त्यांच्या आप्तस्वकीयांना असे किती तरी अनुभव आलेले आहेत.

माझा मित्र देसाई याला प्लँचेटची फार हौस. तो मुंबईच्या झेवियर कॉलेजांत असतांना हॉकी खेळण्यांत मोठा प्रवीण असे. जगजीतसिंग नांवाच्या एका तरुण शीख खेळाडूची व देसाईची या हॉकीच्या खेळा-मुळेंच जानजिगर दोस्ती झाली होती. कॉलेज सुटल्यानंतर जगजीत-सिंगाचे व देसाईचे संबंध दुरावले. पांच सहा वर्षांत जगजीतसिंगाचा व देसाईचा पत्रव्यवहारदेखील झाला नाहीं व जगजीतसिंग कुठें गेला, कुठल्या उद्योगाला लागला हेंदेखील देसाईला माहीत नव्हतें. असें अस-तांना एके दिवशीं प्लँचेट चालवीत असतांना तो प्लँचेटवर आला व म्हणाला, २० सप्टेंबर १९४३ ला मला टोब्रुकच्या लढाईंत मृत्यु आला. आम्हीं एकूण वीस जण आमच्यापाशीं युद्धसामुग्री नसल्याकारणानें मृत्युमुखीं पडलों. माझी बायको अमृतसरला आहे. (त्यानें त्याच्या पत्नीचा पत्ता व नांवदेखील प्लँचेटवर सांगितलें.) तिला असं सांग कीं आंतल्या खोलींतल्या तिजोरींतल्या चोरकप्प्यांत पांच हजार रुपयांची प्रॉमेसरी नोट आहे, तिचा विनियोग कर. "

देसाईला जगजीतसिंगाचें लग्न झालें होतें व तो लढाईवर गेला होता, याची बिलकुल माहिती नव्हती. प्लँचेटवर त्यानें दिलेल्या संदेशाचा पड-ताळा पाहाण्याकरितां अमृतसरला जगतजीसिंगाच्या विधवेस पत्र धाडलें व त्या पत्राचें उत्तरहि देसाईला आठ दिवसांच्या आंत मिळालें. त्या बाईनें त्या अनपेक्षित पत्राबद्दल आश्चर्य व्यक्त करून पुढें लिहिलें होतें, " माझ्या मृत पतीचा निरोप कळविण्याची तसदी घेतल्याबद्दल मी आपली फार आभारी आहें. माझ्या संसाराच्या नंदनवनाची एकाएकीं नासधूस झाल्यानंतर ती तिजोरी घरांत ठेऊन तरी काय करायचें होतें ? म्हणून ती विकून टाकण्यांत आली. अर्थात् माझ्या दुर्दैवानें ते पांच हजार

रुपयेहि नेले गेले ! –"

देसाईच्या घरांतल्या कोणाहि माणसानें प्लँचेट चालूं केलें म्हणज जगजीतसिंग न बोलावतां यायचा नि म्हणायचा, 'तुमच्या चंन्द्रकांतला सांगा कीं तूं लग्न कर, मला जन्म घ्यायचा आहे.'

देसाईचें लग्न होऊन त्याला आतां दोन तीन मुलेंदेखील झालीं आहेत. जगजीतसिंगानें देसाईच्या घरांत जन्म घेतला आहे कीं नाहीं हें कुणास माहीत नाहीं. पण युद्धांत मेलेल्या माणसांची जिवंत माणसांशीं संबंध ठेवण्याची कशी धडपड चाललेली असते व त्यांच्या भावना कशा प्रकारच्या असतात याचा एक पुरावा जगजीतसिंगाच्या उदाहरणावरून सांपडण्याजोगा आहे.

० ० ०

१० : पिशाच्च बाधा

आपल्याच कांहीं अतृप्त आकांक्षा पूर्ण करण्यासाठीं किंवा जिवंतपणींच्या वैऱ्याला छळून छळून हैराण करण्यासाठीं जिवंत माणसाच्या देहाचा उपयोग करण्याचे जे भयंकर प्रकार कांहीं मृतांकडून केले जातात, ते लक्षांत घेतले म्हणजे मानवी मनोवृत्ती किती सैतानी असूं शकते याची कल्पना येईल.

पिशाच्चबाधेचे कांहीं नमुने पाहाण्याकरितां मी १९५१च्या ऑक्टोबरमध्यें मुद्दाम नृसिंहवाडीस गेलों होतों. पछाडलेल्या कांहीं दुर्दैवी स्त्रिया मला त्या ठिकाणीं आढळल्या. त्यांपैकीं एका बाईची हकीकत मी या ठिकाणीं देतों.

कर्नाटकांतील धारवाड जिल्ह्यांतील हावेरी गांवीं तंपूबाई नांवाची एक बालविधवा होती. बिचारीला वयाच्या दहाव्या वर्षीं वैधव्य प्राप्त झालें होतें. तिच्या सासरची दौलत होती, परंतु सौभाग्य नष्ट झाल्यामुळें त्या दौलतीला शोभा नव्हती. तंपूबाईनें दानधर्म करावा, तीर्थयात्रा कराव्या· जीवनांत आपण एकट्याच आहोंत ही जाणीव पुढें पुढें तिला अस्वस्थ करूं लागली. तेव्हां म्हणजे १९२६ सालीं तंपूबाईनें आपल्या भाचीची (बहिणीच्या मुलीची) मुलगी जानकी आपल्याजवळ ठेवण्यासाठीं

म्हणून मागून घेतली. त्यावेळीं जानकीचें वय ३ वर्षांचें होतें. तंपूबाई ३० वर्षांची होती. आपल्या वयाच्या आपल्या भोंवतालल्या आया-बायांचीं अपत्यें पाहून तंपूबाईचेंहि हृदय लहान मुलांसाठीं आसुसलें होतें. जानकीचे वडील वासुदेव परीक्षित यांनींही आपली मुलगी एका श्रीमंत विधवेच्या लळ्यांत पडली तर हरकत नाहीं या हिशेबानें तिला तंपूबाईच्या हातीं देतांना कांकूं केली नाहीं.

तंपूबाईचा जानकीला इतका लळा लागला कीं हावेरीहून २०।२५ मैल अंतरावर असलेल्या राणीबन्नूर शहरीं आपल्या बापाच्या घरीं ती कधीं पाहुणी म्हणून गेली तर तिथें ती फार दिवस राहात नसे.

१९४० सालीं जानकी सतरा वर्षांची झाली तेव्हां तिच्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्या. तंपूबाईला आपली मुलगी दुसऱ्याच्या घरीं जाईल म्हणून अत्यंत दुःख झालें. परंतु जानकीला लग्नावांचून ठेवणें इष्ट नव्हतें, म्हणून निदान घरजांवई घरीं आणावा म्हणजे जानकी आपणां-पासून दूर होणार नाहीं असे विचार तंपूबाईच्या चित्तांत घोळूं लागले. आपली सर्व इस्टेट पुढें मागें जानकीला, अर्थात् घरजांवयालाच जाणार तेव्हां निदान तो परका नसावा, आपल्या घराण्यांतला असला तर बरा, असा सर्व प्रकारें विचार करून तंपूबाईनें आपल्या दिराचा मुलगा विश्वेश्वर जो बंगलोर मुक्कामीं रहात होता त्यालाच जानकी देण्याचें ठरविलें. मुलाला मुलगी व मुलीला मुलगा पसंत होता. जानकीचे वडील वासुदेव परीक्षित व आई कौसल्याबाई यांनांही विश्वेश्वर जांवई म्हणून पसंत होता. अशा रीतीनें सर्वांची पसंती असतांना तो जर विवाह घडून आला असता तर जानकीच्या जीवनाचा पुढील कथाभाग कदाचित् मोठा सुखदायक झाला असता. परंतु आपल्याच हातांनीं धोंडा मारून घेण्याची अन्नाडी संवय कित्येक माणसांना जडलेली असते ना? तसला प्रकार घडला. तंपूबाईला विश्वेश्वर व जानकी यांची पत्रिका जमते कीं नाहीं तें पहाण्याची इच्छा झाली.

"तुम्ही पत्रिका पाहाण्याच्या कां भानगडींत पडतां? या लग्नाला सर्वांचीच अनुमति आहे, तेव्हां त्वरित विवाह उरकून घ्यावा हें बरें!"

असें वासुदेव परीक्षित यांनीं तंपूबाईस सांगितलें. तेव्हां "लग्न झालं तेव्हां पत्रिका पाहिली नव्हती. त्यामुळें मला बालवैधव्य आलं. मला जानकीचं अकल्याण करायचं नाहीं." असा स्पष्ट जबाब तंपूबाईनें दिला. तिच्या हट्टाग्रहास्तव दोघांच्या पत्रिका पाहाण्यांत आल्या. त्या जमेनात ! तेव्हां विश्वेश्वरला मुलगी देण्याचा नाद सोडून देणें हें ओघानेंच आलें. तंपूबाईच्या मनांत विश्वेश्वर जांवई म्हणून इतका भरला होता कीं, पत्रिका जमत नसली तरी जानकी विश्वेश्वरलाच द्यायची, असा नवा आग्रह तिनें धरला.

"एकदां पत्रिका पाहिल्यावर व ती जमत नाहीं असें कळून चुकल्यावर मी माझी मुलगी काय वाटेल तें झालें तरी विश्वेश्वराला देणार नाहीं !" असा वासुदेव परीक्षित यांनीं हट्ट धरला.

या दोघांच्या हट्टावर मग जानकीच्या आप्तस्वकीयांनीं जमून विचार करून एक तोड काढली. "पत्रिका बरोबरच असतात असं नाहीं. पत्रिकांचा विचार सोडून द्यावा. तंपूबाई आपली सर्व दौलत विश्वेश्वराच्या किंवा जानकीच्या नांवावर करीत असली तर हें लग्न होऊं द्यावें," असें सर्वांचें म्हणणें पडलें.

तंपूबाईचें म्हणणें असें कीं, "मी माझी संपत्ति हळूहळू जानकीच्या नवऱ्याच्या नांवावर करीन. सर्वच भांडवल या तरुण माणसांच्या हातीं दिलं तर मला कोण विचारील ?"

हें तिचें म्हणणें एकंदर माणसांचा स्वार्थी व व्यवहारी स्वभाव लक्षांत घेतां बरोबर होतें.

या सर्व खळबळींत विश्वेश्वराच्या आईच्या एका विचारानें भर टाकली. ती माउली एकंदर रागरंग पाहून म्हणाली, "निसंतान घराण्यांत मी माझा मुलगा घरजांवई म्हणून देणार नाहीं !"

अखेर तें लग्न फिसकटलें आणि तंपूबाईच्या इच्छेविरुद्ध होंबळच्या नागराज नांवाच्या एका सुखवस्तु घराण्यांतील सुशिक्षित तरुणाबरोबर वासुदेव परीक्षित यांनीं जानकीचें १९४१ सालच्या जून महिन्यांत लग्न लावून टाकलें. त्या विवाहप्रसंगीं तंपूबाई हजर होती व तिनें वधूवरांस

चांगला आहेर केला. परंतु लहानपणापासून वाढवलेली आपली जानकी आपणाला पारखी झाली व तिचा विवाह तिच्या बापानें आपल्या इच्छे-विरुद्ध घडवून आणला हें दुःख तंपूबाईला असह्य झालें. तो अतीव दुःखावेग तिनें चौदा महिने सहन केला आणि मग दुःख अनिवार होऊन तिनें १९४२ च्या ऑगस्ट महिन्यांत आपल्या वाडींतील विहिरींत जीव दिला ! तंपूबाईनें निसर्गाचा कायदा आपल्या हातीं घेतला ! तिनें अघोर कृत्य केलें !

१९४४ सालीं जानकीबाई आजारी झाली. तिचा आजार मोठा चमत्कारिक होता. छातींत कळ यावयाची, आंतून कुणीतरी चिमटा घेतो असें वाटायचें, सर्वांग थरथरावयाचें व डॉक्टरनें नाडी पाहिली, छातीचे ठोके तपासून पाहिले म्हणजे जानकीच्या प्रकृतींत कांहींच बिघाड नाहीं असें डॉक्टर म्हणावयाचे. कांहीं डॉक्टरांनीं जानकीला हिस्टेरिया झाला आहे असें सांगून औषधयोजना केली. १९४८ सालापर्यंत नागराज यांनीं आपल्या पत्नीसाठीं रुपये दोन हजार खर्च केले, परंतु कांहीं गूण आला नाहीं. जानकीस पिशाच्चबाधा झाली असेल या संशयावरून शिरहट्टीच्या एका फकीर स्वामीच्या मठांत तिला दोनदां अमावास्येच्या दिवशीं पाठविण्यांत आलें. शिरहट्टीस दोनदां जाऊन आल्यावर एके दिवशीं संध्याकाळीं ७ च्या सुमारास जानकी एकटीच घरांत असतांना तिला एक मोठी भेसूर स्त्रीची आकृति दिसली. जानकीबाईला अजून त्या आकृतीची आठवण आहे व तिनें त्या आकृतीचें मला प्रत्यक्ष वर्णन सांगितलें तें असें--

'ती आकृति पुष्कळ उंच होती व तिचे मोकळे केस पाठीवर पिंजारलेलें होते. त्या आकृतीच्या अंगावर जागजागीं केस होते व ठिकठिकाणीं एकंदर वीस डोळे होते.' (या ठिकाणीं हें सांगणें जरूर आहे कीं मेलेला माणूस पिशाच्च रूपानें जर दृश्य झाला तर तो उलटचा पायाचा अक्राळ विक्राळ असतो अशा ज्या सर्वसामान्य माणसांच्या कल्पना असतात त्या खोट्या असतात, तौत्तिरीयोपनिषदांत माणसाचे एकंदर पांच कोश वर्णन केलेले आहेत व त्यांना १ अन्नमय २ प्राणमय ३ मनोमय ४ विज्ञानमय व ५ आनंदमय अशीं नांवें दिलीं आहेत. माणूस मेल्यानंतर त्याचा अन्न-

मय कोश (म्हणजे अन्नावर पोसलेला देह) गळून पडतो. मग जो दिसतो तो प्राणमय कोशांतील किंवा वासना देहधारी माणूस. सर्व कोशांतील माणसाचा आकार कसा असतो याचें उत्तर देतांना तौत्तिरीयोपनिषद् म्हणतें, ' स वा एव पुरुषविध. एव " (जिवंतपणीं) जसा त्या व्यक्तीचा असतो तसाच. परंतु पिशाच्चांना मायावी रूपें धारण करितां येतात. मात्र ते त्यांचे खरे आकार नव्हेत. जानकीला जी दिसली ती मायावी आकृति असली पाहिजे; व त्या आकृतीनें कांहीं दुष्ट तामसी विचारचित्राचें भयंकर जंजाळ स्वतःवर पांघरलेलें असलें पाहिजे.)

जानकी त्या आकृतीला पाहून बावरली नाहीं, तर उलट हातांत काठी घेऊन त्या आकृतीस मारावयास धांवली. ' मी आतां जाईन पण तुझ्या बाळंतपणांत येईन ' असें म्हणून ती आकृति जशी एकाएकीं उपस्थित झाली तशीच एकदम अदृश्य झाली.

त्यानंतर आलेल्या अमावास्येच्या दिवशीं जानकी तिसऱ्यांदा शिरहट्टीस फकीर स्वामीच्या मठांत चालली असतां वाटेंत एका झाडाखालीं तिला तंपूबाईचें पिशाच्च दिसलें. तें फक्त तिलाच दिसलें. तिच्याबरोबरच्या कोणत्याहि माणसास दिसलें नाहीं. जानकीनेंहि मरणोत्तर तंपूबाईला पाहिली ती पहिल्यांदा याच वेळीं. ते १९४८ च्या जानेवारी महिन्याचे दिवस होते, म्हणजे तंपूबाई मरणोत्तर साडेपांच वर्षांनीं दृश्य झाली.

पुढें ९ मार्च १९४८ रोजीं जानकी गदग येथील एका सूतिकागृहांत प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें. त्यानंतर पांचव्या दिवशीं म्हणजे १४ मार्च १९४८ पासून जानकीबाईच्या छातींत दुखूं लागलें; आणि मागें १९४४ सालीं झाली त्या प्रकारची तिची स्थिति होऊं लागली. दुःख तर होतें पण डॉक्टरांना दुःखाचें मूळ सांपडेना. अशा रीतीनें कधीं बरे कधीं वाईट दिवस जात असतांना १९४९ च्या नोव्हेंबरांत जानकीबाई पुन्हां प्रसूत होऊन कन्यारत्न झालें. एक तर हें बाळंतपण अवघ्या बीस महिन्यांनंतर आलें आणि शिवाय शारीरिक पीडा होती; त्यामुळें जानकीबाईचे या बाळंतपणांत अतोनात हाल झाले. आईची स्थिति तशी भयंकर असल्यामुळें त्या कन्यारत्नाचीहि आबाळ झाली व ती मुलगी १९५० च्या जून

महिन्यांत दगावली. बाळंतपणानंतर जानकीबाई अंथरुणांत सारखी पडून राही, पण तिला तीन माणसांचा आहार लागे व दिवसांतून दोन तीन घागरी पाणी ती सहज पीत असे. नागराजांचा व्यवसाय कीर्तनकाराचा असल्याकारणानें ते गांवोगांवीं जात, त्यामुळें जानकीबाईला कुणाच्यातरी हातीं सोपवावें लागे. तिची चांगली शुश्रुषा व्हावी म्हणून मग नागराज यांनीं तिला हुबळीच्या आपल्या एक स्नेहसंबंधी वेणीबाई कौशिक यांच्याकडे आणून ठेवली. हुबळीच्या दोन नामांकित डॉक्टरांचा औषधोपचार चालू असूनदेखील जानकीबाईला आराम पडला नाहीं. तिच्या त्या राक्षसी खादीचें कारण डॉक्टरांना कधींच अजमावतां आलें नाहीं.

या प्रकरणाचा नीट विचार केला म्हणजे हें सहज लक्षांत यतें कीं जानकीच्या देहाचा तावा पिशाच्चानें घेतला होता. त्या पिशाच्चाचा अन्नमय कोश नष्ट झाला होता तरी अन्नाची आसक्ति कायम होती. म्हणून दुसऱ्याच्या देहाचा उपयोग करून तें पिशाच्च आधाशाप्रमाणें आपली आसक्ति पुरी करून घेत होतें. अत्यशनामुळें देहावर कांहींहि परिणाम झाला तरी त्याची त्या पिशाच्चाला दरकार नव्हती. कारण तो देह त्याचा नव्हताच.

(पिशाच्चबाधा काढण्याचें ढोंग करणारे कांहीं दांभिक भूतबाधा झालेल्या माणसाला वेताच्या छडीनें चोपून काढतात. मूर्ख मांत्रिकांचा हा केवळ अज्ञानजन्य निर्दयपणा होय. छडीचा मार बिचाऱ्या जिवंत माणसाला सहन करावा लागतो. तो शद्धीवर नसल्याकारणानें ते छडीचे फटके त्याला कदाचित् त्यावेळीं कळत नसतील; परंतु निसर्ग-नियमाप्रमाणें शरीरावर त्याचा वाईट परिणाम होतोच. आपली मोटार गाडी जर बरोबर चालत नसली तर चिडून तिच्या यंत्रावर वाटेल तसे घणाचे घाव न घालतां शहाणा माणूस तिच्यांत सांठलेला केर बारकाईनें तपासून ती दुरुस्त करतो. भूतबाधा तशीच काढली पाहिज.)

विज्ञानशास्त्राला निसर्गाचे जेवढे नियम माहीत झालेले आहेत तेवढ्यांवरच डॉक्टरांचा विश्वास अदृश्य सृष्टीचें संशोधन करण्याची त्यांना इच्छा नाहीं. कोणी तें केल्यास त्याकडे ढुंकून न पाहाण्याचा दुराभिमान

त्यांच्या ठायीं असतो. आणि त्यांतहि आपल्याकडील बनेचसे डॉक्टर म्हणजे पाश्चात्य वैज्ञानिकांचे आणि रसायनोत्पादक कारखानदारांचे नुसते दलाल. त्यांनीं जाहिरातबाजी करावी आणि यांनीं त्यांचें अंधानुकरण करून त्यांचा नुसता पुरस्कार करावा. या डॉक्टरांची पुस्तकी विद्वत्ता कितीही वाढली तरी त्यांच्या जडवादी दुराग्रहामुळें बुद्धीच्या नवनवोन्मेषाला ते पारखे झालेले असतात.

" Knowledge dwells in heads wrapt with thoughts of other men; wisdom in minds attentive to their own. ',

तेव्हां डॉक्टरांनीं त्यांच्याकड वेळोवेळीं येणाऱ्या रोग्याकडे पूर्वग्रह सोडून जर स्वच्छ दृष्टीनें पाहिलें तर रोगाचें खरें निदान लागून त्यांच्या हातून अधिक लोकसेवा होईल.

जानकीला Hysteria नव्हता आणि ज्या ज्या डॉक्टरांनीं तिच्यावर उपचार केले ते Hysteria म्हणूनच. त्यामुळें तिला कधींच गुण आला नाहीं. पोटदुखी, डोक्यांत गरगर, डोळे फिरल्यासारखे अशा परिस्थितींत महिनेच्या महिनें असह्य दुःख भोगल्यानंतर शिवमग्गाच्या (हें शहर हरिहरजवळ असून म्हैसूर संस्थानांतील एका जिल्ह्याचें ठिकाण आहे.' विभीषणाप्पा नांवाच्या एका मांत्रिकाला जानकीला दाखविण्यांत आलें. त्यानें जानकीला पूर्ण बरें केलें नाहीं तरी ५० टक्के गुण आणला.

परंतु पुन्हां एका महिन्यानें जानकीच्या छातींत कृमि फिरल्यासारखा, धावल्यासारखा वाटूं लागला. डॉक्टरांनीं पुन्हां हिस्टेरियावर औषधोपचार सुरू केला. हुबळीची वेणूताई जानकीस पथ्यपाणी करीत होती. आणि एके दिवशीं दुपारच्या वेळीं दोघीही घरांत झोंपल्या असतां दोघींच्या स्वप्नांत तंपूबाई आली. वेणूबाईच्या जवळ बसून तंपूबाई रडूं लागली. ती म्हणाली, "जानकीला मी मुलीसारखी वाढवली, तिच्या बापानें तिचीं व माझी ताटातूट केली. माझं ऐकलं नाहीं व पोरीचं भलत्याशीं लग्न लावून दिलं !"

जानकीला तंपूबाई जी दिसली ती रागानें गाल फुगवून बसलेली. जानकीनें तिला स्वप्नांत विचारलें, "तुझं माझ्यावर एवढं प्रेम मग तूं

मला अशी सारखी कां छळतेस ?" पण क्रुद्ध मुद्रा धारण केलेल्या तिच्या त्या आईनें तिला एका शब्दानेंहि उत्तर दिलें नाहीं. दोघीहि एकदम जाग्या झाल्या व दोघींनींहि आपापलें स्वप्न एकमेकींस सांगितलें.

आणि मग त्या स्वप्नाची जानकीच्या सर्व जवळच्या नातेवाइकांत चर्चा झाली. जानकीला पछाडणारी तंपूबाईशिवाय दुसरी तिसरी कुणी नाहीं अशी सर्वांची खात्री झाली.

२० डिसेंबर १९५० पासून जानकीस दैवी उपचारार्थ नृसिंहवाडीस ठेवण्यांत आलें. वाडीस गेल्यापासून तिच्या अंगातील तंपूबाईला वाचा फुटली.

" मी तंपूबाई आहें व जीव दिल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशीं मी जानकीच्या शरीरांत संचार केला आहे." असें तंपूबाई म्हणे. वस्तुतः तंपूबाईच्या मरणानंतर दोन वर्षेपर्यंत जानकीला कोणताच त्रास नव्हता. त्यामुळें तंपूबाईनें जानकीच्या शरीरांत मरणानंतर दुसऱ्या दिवशीं प्रवेश केला हें खरें वाटत नाहीं. कदाचित् स्मृतींत उडालेल्या घोटाळ्याचा हा परिणाम असेल किंवा तंपूबाई स्वतःचा देह टाकल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून जानकीच्या सान्निध्यांत राहिली असेल. तिच्या देहाचा ताबा दोन वर्षेपर्यन्त तिला घेतां आला नसेल.

वाडीच्या घाटावरील त्या देवळासमोर संध्याकाळच्या आरतीच्या वेळीं अंगाला आळोखे पिळोखे देऊन जानकीच्या अंगांतील तंपूबाई बोलूं लागली म्हणजे ती वासुदेवराव परीक्षित यांना लागेल तशा शिव्या देई. अगदीं जशा जिवंत असतांना आयुष्याच्या शेवटच्या दोन वर्षांत ती देत असे तशा.

"हें असं करून तुझा कांहींहि फायदा होणार नाहीं. जीव देण्याचं एक मोठ्ठं पापकर्म तूं केलंस,आतां आणखी माझ्या मुलीचा छळ करतेस ; तेव्हां या पापाच्या राशी तुला नरकांत लोटतील!" अशा आणि असल्या शब्दांनी त्या पिशाच्चाची वासुदेवराव परीक्षितांनीं वेळोवेळीं निर्भर्त्सना केली, तर कधीं कधीं तिला आर्जवून सांगितलें कीं, " बाई, मी तुला हात जोडतों, माझ्या मुलीची केलीस तितकी दशा पुरे. कृपा करून तूं ही जागा सोडून जा !"

त्यावर तें पिशाच्च म्हणतें, "मला इथें राहाण्याला अडचण पडते. मी आतां जाईन. तीन दिवसांनीं जाईन."

असे कितीतरी तीन दिवस गेले. १९५१ च्या ऑक्टोबरांत मी वाडीस जानकीबाईला पाहिली. तेव्हां तिची प्रकृति बरीच सुधारल्यासारखी दिसत होती. शुद्धीवर आलेल्या माणसासारखी ती बोलत होती. तिची स्मरणशक्तीहि ठीक होती. वाडीस त्यांच्या मुक्कामीं तिच्या वडिलांनीं व तिचे यजमान नागराज यांनीं मला तिचा सर्व इतिहास सांगितला, तेव्हां ती जवळ बसली होती व ती हकीकत सांगितली जात असतांना जे बारकावे व जे दुवे गळत होते ते ती निदर्शनाला आणून देत होती. परंतु विनाकारण विकट हास्य करितांना किंवा तासन्तास मुळमुळ रडत बसतांना तिला पाहिली म्हणजे तंपूबाईच्या तडाख्यांतून ती अजन सुटली नाहीं असें दिसे. रडत बसणें ही पिशाच्च निघून जाण्याची खूण आहे. 'जें आपल्याला हवें होतें तें मिळालें नाहीं, आणि सूड घेण्याचा आपण इतका प्रयत्न करून तरी आपल्या हातीं काय लागलें ?' या विचारानें विषण्णता प्राप्त होऊन त्यापिशाच्चास रडण्याशिवाय दुसरा उपाय नसतो.

वाडीच्या त्या देवळाभोंवतींचें अदृश्य वातावरण पिशाच्चांना अस्वस्थ करणारें असल्याकारणानें पिशाच्च-पीडितांना याचा उपयोग होतो. परंतु कांहीं महाभंयकर पिशाच्चें त्या ठिकाणीं जवळ जवळ वर्षभर मुक्काम केला तरी जात नाहींत हें जानकीच्या उदाहरणांवरून लक्षांत येतें. जानकीच्या शरीरांतील तंपूबाईनें तर अशी धमकी दिली होती कीं, "माझं आयुष्य १२ वर्षांचं, त्यांतलीं ९ मागें पडलीं. आतां मी हिच्या शरीरांतून निघून जाईन; पण आणखी तीन वष तुमच्या घरांत येऊन दुसऱ्या कुणालातरी छळीन."

पिशाच्चबाधा म्हणजे काय भयंकर प्रकार आहे हें वरील हकीकतीवरून लक्षांत येईल. तंपूबाईचें जिवंतपणीं जानकीवर केवढें प्रेम होतें ! परंतु पुढें गोष्टी तिच्या मनाप्रमाणें घडल्या नाहींत तेव्हां त्या प्रेमाचें रूपांतर वैरांत झालें. एखाद्या तरुणीवर प्रेम करणारा माणूस ती तरुणी

मला अशी सारखी कां छळतेस ?" पण क्रुद्ध मुद्रा धारण केलेल्या तिच्या त्या आईनें तिला एका शब्दानेंहि उत्तर दिलें नाहीं. दोघीहि एकदम जाग्या झाल्या व दोघींनींहि आपापलें स्वप्न एकमेकींस सांगितलें.

आणि मग त्या स्वप्नाची जानकीच्या सर्व जवळच्या नातेवाइकांत चर्चा झाली. जानकीला पछाडणारी तंपूबाईशिवाय दुसरी तिसरी कुणी नाहीं अशी सर्वांची खात्री झाली.

२० डिसेंबर १९५० पासून जानकीस दैवी उपचारार्थ नृसिंहवाडीस ठेवण्यांत आलें. वाडीस गेल्यापासून तिच्या अंगातील तंपूबाईला वाचा फुटली.

"मी तंपूबाई आहें व जीव दिल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशीं मी जानकीच्या शरीरांत संचार केला आहे." असें तंपूबाई म्हणे. वस्तुतः तंपूबाईच्या मरणानंतर दोन वर्षेपर्यंत जानकीला कोणताच त्रास नव्हता. त्यामुळें तंपूबाईनें जानकीच्या शरीरांत मरणानंतर दुसऱ्या दिवशीं प्रवेश केला हें खरें वाटत नाहीं. कदाचित् स्मृतींत उडालेल्या घोटाळ्याचा हा परिणाम असेल किंवा तंपूबाई स्वतःचा देह टाकल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून जानकीच्या सान्निध्यांत राहिली असेल. तिच्या देहाचा ताबा दोन वर्षेपर्यन्त तिला घेतां आला नसेल.

वाडीच्या घाटावरील त्या देवळासमोर संध्याकाळच्या आरतीच्या वेळीं अंगाला आळोखे पिळोखे देऊन जानकीच्या अंगांतील तंपूबाई बोलूं लागली म्हणजे ती वासुदेवराव परीक्षित यांना लागेल तशा शिव्या देई. अगदीं जशा जिवंत असतांना आयुष्याच्या शेवटच्या दोन वर्षांत ती देत असे तशा.

"हें असं करून तुझा कांहींहि फायदा होणार नाहीं. जीव देण्याचं एक मोठ्ठं पापकर्म तूं केलंस,आतां आणखी माझ्या मुलीचा छळ करतेस ; तेव्हां या पापाच्या राशी तुला नरकांत लोटतील!" अशा आणि असल्या शब्दांनी त्या पिशाच्चाची वासुदेवराव परीक्षितांनीं वेळोवेळीं निर्भर्त्सना केली, तर कधीं कधीं तिला आर्जवून सांगितलें कीं, "बाई, मी तुला हात जोडतों, माझ्या मुलीची केलीस तितकी दशा पुरे. कृपा करून तूं ही जागा सोडून जा!"

त्यावर तें पिशाच्च म्हणतें, "मला इथें राहाण्याला अडचण पडते. मी आतां जाईन. तीन दिवसांनीं जाईन."

असे कितीतरी तीन दिवस गेले. १९५१ च्या ऑक्टोबरांत मी वाडीस जानकीबाईला पाहिली. तेव्हां तिची प्रकृति बरीच सुधारल्यासारखी दिसत होती. शुद्धीवर आलेल्या माणसासारखी ती बोलत होती. तिची स्मरणशक्तीहि ठीक होती. वाडीस त्यांच्या मुक्कामीं तिच्या वडिलांनीं व तिचे यजमान नागराज यांनीं मला तिचा सर्व इतिहास सांगितला, तेव्हां ती जवळ बसली होती व ती हकीकत सांगितली जात असतांना जे बारकावे व जे दुवे गळत होते ते ती निदर्शनाला आणून देत होती. परंतु विनाकारण विकट हास्य करितांना किंवा तासन्तास मुळमुळ रडत बसतांना तिला पाहिली म्हणजे तंपूबाईच्या तडाख्यांतून ती अजन सुटली नाहीं असें दिसे. रडत बसणें ही पिशाच्च निघून जाण्याची खूण आहे. 'जें आपल्याला हवें होतें तें मिळालें नाहीं, आणि सूड घेण्याचा आपण इतका प्रयत्न करून तरी आपल्या हातीं काय लागलें?' या विचारानें विषण्णता प्राप्त होऊन त्यापिशाच्चास रडण्याशिवाय दुसरा उपाय नसतो.

वाडीच्या त्या देवळाभोंवतींचें अदृश्य वातावरण पिशाच्चांना अस्वस्थ करणारें असल्याकारणानें पिशाच्च-पीडितांना याचा उपयोग होतो. परंतु कांहीं महाभंयकर पिशाच्चें त्या ठिकाणीं जवळ जवळ वर्षभर मुक्काम केला तरी जात नाहींत हें जानकीच्या उदाहरणांवरून लक्षांत येतें. जानकीच्या शरीरांतील तंपूबाईनें तर अशी धमकी दिली होती कीं, "माझं आयुष्य १२ वर्षांचं, त्यांतलीं ९ मागें पडलीं. आतां मी हिच्या शरीरांतून निघून जाईन; पण आणखी तीन वष तुमच्या घरांत येऊन दुसऱ्या कुणालातरी छळीन."

पिशाच्चबाधा म्हणजे काय भयंकर प्रकार आहे हें वरील हकीकतीवरून लक्षांत येईल. तंपूबाईचें जिवंतपणीं जानकीवर केवढें प्रेम होतें! परंतु पुढें गोष्टी तिच्या मनाप्रमाणें घडल्या नाहींत तेव्हां त्या प्रेमाचें रूपांतर वैरांत झालें. एखाद्या तरुणीवर प्रेम करणारा माणूस ती तरुणी

त्याला प्राप्त झाली नाहीं म्हणजे जसा सूड उगविण्यास प्रवृत्त होतो त्यांतलाच प्रकार तंपूबाईचा झाला. दोन किंवा अनेक जीवांच्या असल्या प्रकारच्या पूर्वसंबंधाला जरी सर्वसामान्य लोक प्रेम म्हणून संबोधीत असले तरी तें प्रेम नव्हे. प्रेम हें सर्वथैव निरपेक्ष असतें. कमलपत्रावरील जलबिंदु जसे त्या पत्राला चिकटत नाहींत तद्वत् सूडाच्या कल्पना त्या प्रेमाचा साक्षात्कार झालेल्या हृदयाला कधींहि स्पर्श करीत नाहींत.

पिशाच्चबाधेची आणखी एक करूणसपूर्ण कहाणी या ठिकाणीं सांगावीशी वाटते.

एका सैन्यांतील अधिकाऱ्याच्या जीवनांतील हृदयस्पर्शी कथाभाग तो. कॅप्टन भालेराव यांचें लग्न वयाच्या सोळाव्या वर्षीं झालें. त्यावेळीं त्यांची पत्नी वारूबाई अवघी तेरा वर्षांची होती. या बाईनें फक्त ८ वर्षें आपल्या प्रिय पतीबरोबर संसार केला. आणि ऐन तारुण्यांत, म्हणजे वयाच्या २१ साव्या वर्षीं ती मृत्युवश झाली.

भुकेलेला माणूस पंचपक्वान्नें जेवीत बसला असतांना एकाएकीं कुणीतरी त्याला ताटावरून ओढून न्यावें तसा प्रकार वारूबाईचा झाला. भालेरावाच्या घराण्यांतील जुन्या वळणाच्या माणसांनीं सुतक संपतांच भालेरावाला पुन्हां बोहोल्यावर उभें करण्याचा चंग बांधला. त्यावेळीं भालेराव ग्वाल्हेरला राहात होते. महाराष्ट्रीय वळणाची मुलगी त्या प्रांतांत मिळणार नाहीं म्हणून भालेराव कुणाच्या तरी सांगण्यावरून द्वितीय वधूच्या शोधासाठीं साताऱ्यास गेले. त्या ठिकाणीं एक सुंदर, सशक्त व प्रौढ मुलगी त्यांनीं पसंत केली व ताबडतोब लग्न उरकून ते तिला ग्वाल्हेरला घेऊन गेले. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर एका महिन्याच्या आंत तो विवाह उरकला गेला होता.

लग्नानंतर वधूवरांच्या मीलनाची ती पहिली रात्र! त्या भव्य वाडयाच्या वरच्या मजल्यावर कॅप्टन भालेरावांची निजावयाची खोली होती. त्या पहिल्या रात्रीं पतीच्या शयनमंदिराकडे नेणाऱ्या पायऱ्या चढतांना सईबाईचें देहभान नाहींसें झालें. आणि नववधूच्या लाजाळू पावलांनीं तो जिना न चढतां वासकसज्जितेच्या लंपट घाईनें जणूं

काय ती आपल्या चिरपरिचित प्रियाच्या मंचकापाशीं गेली आणि भुकेलेल्या माणसानें ताटांत सगळे पदार्थ वाढले जाण्यापूर्वी जो पहिला पदार्थ येईल त्यावर तुटून पडावें त्याप्रमाणें तिनें कॅप्टन भालेरावांस एकदम मिठी मारली. त्या नवोढेकडून असल्या प्रकारच्या वर्तनाची त्यांनीं अपेक्षा केली नव्हती.

"सातारच्या मुली अशा असतात ?" आश्चर्याचा धक्का बसून त्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

"तुम्हीं मला ओळखलं नाहीं ?" हे शब्द उच्चारतांना त्या सुरतलोलुप प्रमदेचा आवाज बदलला होता. आपल्या मृत पत्नीचा तो आवाज भालेरावांनीं तात्काळ ओळखला. ती सबंध रात्र सईबाईनें – म्हणजे वस्तुतः ताराबाईच्या देहाचा ताबा घेतलेल्या वारूबाईनें रतिक्रीडेंत घालविली.

आणि ती एकच रात्र काय, एका पाठोपाठ अनेक रात्री आपल्या अतृप्त राहिलेल्या वासना पुऱ्या करून घेण्याकरितां वारूबाई सईबाईच्या देहांत संचार करून कॅप्टन भालेरावांच्या व त्यांच्या मित्रमंडळींच्या आश्चर्याचा विषय झाली. भालेरावांना ती रात्रभर झोंपूं देत नसे. त्यांच्याकरितां ती रात्रीं दिवे लावून स्वेटर विणत बसायची. त्यांच्या रुमालांवर, उशांवर तिनें रातोरात कशिदे काढिले आणि हें सर्व करतांना भालेरावांविषयीं तिला अत्यंत आपुलकी वाटे. पण त्यामुळें सईच्या देहावर केवढा ताण पडला होता. 'का सौ कास्मि रतं च कीदृशम्भूत स्वल्पापि मे न स्मृतिः ।" तो कोण, मी कोण, सुरतक्रीडा कशा प्रकारची झाली याची मला मुळींच आठवण नाहीं–असा हा जो नवोढेच्या सुरतसमाधीचा अनुभव तो बिचाऱ्या सातारच्या सईबाईला केव्हांच आला नाहीं. रात्रीचें जेवणखाण उरकून आपण आपल्या नवऱ्याच्या खोलीकडे जाणाऱ्या जिन्याच्या पायऱ्या चढल्या पण पुढें काय झालें याची दुसऱ्या दिवशीं सकाळीं खालीं उतरल्यानंतर तिला मुळींच आठवण नसे. सगळचा अंगाला कळा लागलेल्या, डोळे चुरचुरू लागलेले व डोकें जड झालेलें हाच अनुभव तिला प्रतिदिवशीं यावयाचा. तिच्या हातून, शीण आल्यामुळें

कोणतेंच काम होत नसे. डोळे सारखे पेंगलेले असत. ती सासुरवाशीण होती. त्यामुळें घरांतील सासू, जावा, नणंदा ती कामचुकारपणा करते या समजुतीनें तिला सारख्या टोंचून टोंचून बोलत. "सातारच्या मुली अशा असतात ? रात्रभर नवऱ्याच्या खोलींत घिगाणा घालायचा आणि दिवसा झोंपायचं ?—" अशीं आणि असल्या प्रकारचीं बोंचक बोलणीं सारा दिवसभर ऐकण्याचें तिच्या नशीबीं आलें होतें.

या सर्वाला वस्तुस्थितीचें अज्ञान हेंच खरें कारण होतें. भालेरावांनीं सईबाईला आपल्या खोलींत येण्याची बंदी केली असती, किंवा घरच्या माणसांनीं तिला रात्रीं वर जाऊंच दिलें नसतें तर सईच्या दुःखाला तेव्हांच आळा बसला असता. परंतु त्या घरांतला उलटा प्रकार असा होता कीं, सईबाईला नको नको म्हणत असतांना घरांतील माणसें भालेरावांच्या खोलींत लोटून घालवीत. कोणतीहि खोड लागलेला माणूस जसा दिवसें दिवस अधिकाधिक लंपट होत जातो तसें सईच्या सवतीचें तें पिशाच्च पुढें पुढेंरात्रींप्रमाणें दिवसाहि तिच्या अंगांत संचार करूं लागलें. तेव्हां भालेरावांनीं आपल्या सलगीच्या मित्रास ही हकिकत गुपचुप सांगितली.

भालेरावांचे एक मित्र कुंटे नांवाचे होते. कुंटे काकूंनीं मुद्दाम एका रविवारीं सईबाईला आपल्या घरीं आमंत्रण केलें. त्याप्रमाणें ती गेली. कुंटे काकूंच्या बरोबर सईबाईच्या ज्या गोष्टी झाल्या त्यांत सईबाईच विशेष बोलत होती. "माझी सवत फार चांगली होती. नवऱ्यावर तिचं भारी हो प्रेम, भरला संसार टाकून गेली. नाहींतर अशी बायको लाखांत मिळायची नाहीं." अशी आणि असल्या प्रकारची ती बडबड ऐकून ही सईची जाणीव बोलत नसून सईच्या सवतीची जाणीव बोलत आहे हें कुंटे काकींच्या लक्षांत आलें. कुंटेकाकूंनी पाहुणीच्या पुढें जे पदार्थ केले ते तिनें अधाशासारखें मटकन खाऊन टाकले. ज्याच्यासाठीं जीव हपापला आहे, तें आणलें नाहीं पण तें जर दुसऱ्याचें वापरावयास मिळालें तर तो त्यावर तुटून पडावयाचाच जीवनांतील भोग्य वस्तूंची आसक्ति असलेलीं माणसें जर अचानक इहलोक सोडन गेलीं तर स्वतः अनंत यातना भोगून वासनातृप्तीसाठीं भलोकावरील जो माणूस हातीं सांपडेल त्याची गांजणूक करीत असतात.

कुंटेकाकूंच्या घरीं सईबाई असेल दोन अडीच तास. पण त्या अवघींत तिचें चरित्र पाहून त्या अगदीं थक्क झाल्या. त्यांच्या घरांत शिरशीच्या तेलाची भरलेली बाटली होती. तें खोबरेल समजून तिनें केसांना चोपडलें आणि श्री कुंटे यांच्या पलंगावर ती खुशाल लोळली. डोक्याला लावलेल्या त्या चुपचुपीत तेलाचा डाग कुंटयांच्या उशीला पडला. "सातारच्या मुली अशा असतात ?" असे उद्‌गार कुंटे काकूंच्याहि तोंडून निघाले.

कधीं कधीं सईबाई शुद्धीवर असली म्हणजे म्हणे, "मला माझी सवत सारखी दिसते." सईबाईला जे इलाज ज्या तऱ्हेनें करणें जरूर होतें ते झालेच नाहींत म्हणून तिच्या विवाहोत्तर जीवनाचा विचका झाला. ताप यऊन येऊन माणूस खंगला म्हणजें मग त्याला औषधोपचार करण्यास सुरूवात करावी त्याप्रमाणें कुंटेकाकूंनीं सईबाईच्या भयंकर बाहेरण्याकडे भालेरावांचें लक्ष वेधलें. तेव्हां ते आपल्या मृत पत्नीनें पछाडलेल्या सईबाईला झिडकारूं लागले आणि खरोखर त्या झिडकारण्याचा योग्य तो परिणाम झाला.

आपला देह गेला तरी आपणाला आपल्या सवतीचा देह वापरायला मिळत होता. नवऱ्याच्या संगतीचं सुख लाभत होतं. पण तेंहि आतां गेलं. या जाणीवेनें सईच्या शरीरांतलें तें पिशाच्च तासन् तास रडत बसे. आणि असे कित्येक दिवस रडत कण्हत काढून त्या पिशाच्चानें सईचा दह सोडला.

सईबाईची बाधा जवळजवळ तीन वर्षेपर्यंत होती. आणि ती बाधा फिटली तेव्हां ती इतकी अशक्त झाली होती कीं, त्यानंतर ती फार दिवस जगूं शकली नाहीं !

पिशाच्च बाधा आणि अंगांत यणें या दोन्ही वेळीं एका जिवंत माणसाच्या देहाचा ताबा कुणीतरी दुसरी अशरीरी व्यक्ति घेते. त्यावेळीं त्या जिवंत माणसाचें स्वतःच्या देहावर स्वामित्व उरत नाहीं. कधीं कधीं आपलीं इंद्रियें आपली इच्छा नसतांना भलतेच व्यापार करतात हें पिशाच्चबाधित माणसाला समजतें देखील. पण त्यावर त्याचा कांहीं इलाज चालत नाहीं.

जिवंत माणसाच्या देहांत संचार केलेल्या पिशाच्चांच्या वासना, भावना ज्या व्यक्तीला त्यानें पछाडलेलें असतें त्या व्यक्तीहून भिन्न असतात. पछाडल्या गेलेल्या माणसाचें मन या बाहेरच्या हल्ल्याविरुद्ध बंड करीत असतें आणि त्या संघर्षांत त्या बिचाऱ्या माणसाचे फार हाल होतात. जो देह पिशाच्चानें पकडलेला असतो त्या देहाच्याहि वर्षानुवर्षांच्या कांहीं ठराविक संवयी असतात. त्या संवयींना अनुसरून त्या पिशाच्चाला आपले व्यवहार अनिच्छेनें करावे लागतात आणि त्या धडपडींतदेखील जिवंत माणस अत्यंत दुःख भोगतांना दिसून येतो. दारू पिणाऱ्या माणसाचें पिशाच्च दारू न पिणाऱ्या माणसाच्या देहाचा आपल्या स्वतःच्या पानसुखार्थ उपयोग करणार नाहीं. खादाड माणसाची खाण्यावरील वासना मेल्यावरही सुटत नाहीं. ती वासना तृप्त करण्यासाठीं कुठल्यातरी खादाड माणसाच्या देहाचा उपयोग करणें त्या मृत माणसाला हितावह वाटतें. माणसाच्या अत्यंत हीन वासनाच त्याला मरणोत्तर जड सृष्टीकडे खेंचीत असतात. हा नियम लक्षांत घेऊन प्राचीन आर्यांनीं उत्तर वयांत संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम स्वीकारून जिवंतपणींच विषयासक्ति झिडकारून देण्याचा नियम ठेवला होता. यावरून हें लक्षांत येईल कीं, अत्यंत शुद्धाचरणी व अनासक्त माणसाचा देह परलोकीं गेलेल्या विषयासक्त माणसाला संचारास योग्य वाटणार नाहीं. उलट विषयासक्त माणसें विशेषतः आपल्याकडे भुतें–खेतें खेचून घेऊं शकतात. असो. प्रस्तुत प्रकरण फार वाढलें असल्याकारणानें पिशाच्चबाधा व अंगांत येण्याच्या कांहीं प्रकारांसंबंधींचें विवेचन पुढील निराळ्या स्वतंत्र प्रकरणांत करूं.

० ० ०

११ : "मृत्यूनंतरची धडपड"

मनुष्याला अकस्मात मृत्यु आल्यानंतर आप्तांविषयीं किंवा मित्रांविषयीं त्याच्या ज्या आशा शिल्लक राहातात व त्याकरितां त्याची जी एकसारखी धडपड चालू राहाते तिची कल्पना देण्याचा या प्रकरणांत प्रयत्न करावयाचा आहे.

सर्वसामान्य माणसें हीं मृत्यूला भिणारीं असतात आणि मृत्यु तर कुणाला सांगून येत नाहीं. त्याची धाड बहुधा अचानक पडते. इहलोकाशीं स्थूल देहाचा संबंध एकाएकीं सुटल्यामुळें कित्येक माणसांची कोणत्या ना कोणत्या प्रकारें आपल्या मागें राहिलेल्या जिवंत आप्तांशीं, मित्रांशीं संबंध ठेवण्याची धडपड चालूं असते.

जिवंतपणीं कांहीं गोष्टी सांगावयाच्या राहून गेलेल्या असतात. हातांत घेतलेलीं कांहीं कामें अर्धवटच राहिलेलीं असतात. तेव्हां त्यासंबंधीं आपल्या मागें राहिलेल्या परिवारांतील कुणाला तरी शक्य झाल्यास कांहीं तरी सूचना द्याव्या असें कित्येक मृत माणसांना वाटत असतें. मृत माणसांना आपल्या नव्या अद्‌भुत परिस्थितीची जाणीव झाली म्हणजे त्यासंबंधींही आपल्या भूलोकावरील आप्तांस कांहीं तरी कळवावें असें वाटतें. त्या लोकांची ही धडपड भूलोकांवरील माणसांस कधीं कधीं त्रासदायक, भीतिदायक तर कधीं मोठ्या गमतीचीहि वाटते.

कांहीं लोकांना मरणानंतर जाणीव इतकी लवकर येते कीं ते आपली स्वतःची प्रेतयात्रा देखील पाहूं शकतात. नागपूर येथील माझ्या एका ओळखीच्या गृहस्थाचा मुलगा वासू ज्या दिवशीं वारला, त्याच दिवशीं रात्रीं आपल्या धाकट्या भावाच्या अंगांत आला. दिनू झोपेंत घाबरून उठला असेल अशा समजुतीनें त्याच्या वडिलांनी त्याला थोपटून झोपविण्याचा प्रयत्न केला. पण तो आपल्या अंगाला जास्तीच आळोखे देऊं लागला तेव्हां त्याच्या वडिलांनी दिवा लावला. घरांतलीं इतर माणसेंही जागीं झालीं तेव्हां वासू दिनूच्या तोंडानें बोलूं लागला — " बाबा, माझें प्रेत घरांतून बाहेर काढलेंत व सर्व मंडळी रडूं लागतांच तें मी पाहिलें. मला ताटीवर बांधून माझी मिरवणूक रस्त्यावरून नेलीत ती पण मला दिसली. मेलेल्या माणसाला कसें जाळतात तें मी पूर्वी पाहिलें नव्हतें. म्हणून माझी चिता कशी पेटवतात तें मी पाहिलें. बाबा, ज्यावेळीं चितेकडे पाठ करून तुम्ही दोन हातांनीं दोन लाकडें सारून दिलींत व रडूं लागलांत त्यावेळीं तुमचें तें दुःख माझ्यानें पाहावेना म्हणून मी बाजूला झालों. "

वासू वारला त्यावेळीं अवघा तेरा वर्षांचा होता. त्याच्या वयाला शोभेल अशीच हकीकत त्यानें सांगितली. तो दिनूच्या अंगांत आला त्याचें कारण त्याला ती हकीकत सांगण्याची उत्सुकता होती एवढेंच.

सूड, लोभ इत्यादि विकारांच्या आहारीं गेल्यामुळें कितीतरी मृत माणसें इहलोकाशीं संबंध ठेवीत असतात. गाडलेल्या द्रव्यावर बसणाऱ्या भुतांच्या कथा कित्येक वाचकांच्या कानावर आल्या असतील. त्या बाबतींत संशोधन करण्याला पुष्कळ वाव आहे. परंतु भुताखेतांवरील अविश्वास अथवा त्या बाबतींत वाटणारी भीति यामुळें, अफवा आणि भाकडकथांचाच सुकाळ जास्त झाला आहे. लेडबीटर साहेबांनी आपला एक अपूर्व अनुभव प्रसिद्ध केला आहे —

" —माझ्या एका मित्राजवळ एक खंजीर होता. तो खंजीर जो कुणी हातांत धरी त्याला स्त्रीचा खून करण्याची इच्छा होत असे. माझ्या मित्राचा असल्या गोष्टींवर विश्वास नसे. परंतु एकदां त्यानें तो खंजीर

हातांत घरला तेव्हां त्याला अत्यंत चमत्कारिक वाटलें आणि त्यानें तो पटकन् खालीं ठेवला. कांहीं प्रयोग करण्यासाठीं मी तो खंजीर घेऊन आलों आणि अगदीं शांत चित्तानें तो हातांत घेऊन बसलों. थोड्या वेळानें कुणीतरी मला ओढतो आहे असें वाटलें. मुळींच हलावयाचें नाहीं असा मी निश्चय केला आणि काय होतें तें पाहूं लागलों. एका पठाणाची भीषण आकृति मला दिसली. तो ओढीत असलेल्या ठिकाणीं मी आलों नव्हतों म्हणून तो माझ्यावर रागावला होता. माझ्या शरीरांत घुसण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. आणि मी त्याचा प्रतिकार करीत होतों. 'तूं काय करतो आहेस !' म्हणून मी त्याला विचारलें. परंतु त्याला तें समजलेलें दिसलें नाहीं —

'त्या खंजिराचा पूर्वेतिहास शोधला तो असा होता— त्या पठाणाची बायको एका माणसाबरोबर पळून गेली होती. त्या दोघांनाही त्या पठाणानें एकत्र पाहिलें आणि आपल्या बायकोच्या याराजवळचाच तो खंजीर घेऊन त्यानें त्या दोघांनाहि भोसकून ठार केलें. आपली बायको नादान झाल्याचें पाहून एकंदर स्त्रीजातीविषयीं त्या पठाणाचें मन कलुषित झालें. त्यानें आपल्या मेहुणीला व आणखी दुसऱ्या एका बाईला त्याच खंजिरानें भोसकून ठार मारलें. पुढें त्या पठाणाचा खून झाला. मेल्यानंतरही त्या पठाणाची त्या खूनी खंजिरावरील आसक्ति कायम राहिली आणि ज्या ज्या माणसाच्या ताब्यांत तो खंजीर त्यानंतर गेला त्या त्या माणसाच्या अंगांत संचार करून त्या पठाणानें त्या माणसांना स्त्रियांचे खून करण्यास प्रवृत्त केलें होतें. आणि बऱ्याच वेळां त्याची ती अपुरी आकांक्षा सफल झाली होती. त्या पठाणानें जो प्रयोग इतरांवर केला होता तो मजवर यशस्वी न झाल्याकारणानें त्याच्या संतापाचा पारा पार चढून गेला होता. मी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला कांहीं समजलें नाहीं.

त्या खंजिराचे नंतर मी तुकडे करून पुरून टाकले आणि अशा रीतीनें त्या रक्तलांछित हत्याराकडून होणारी स्त्रीहत्येची परंपरा टळली

ज्या ठिकाणीं कुणाचा खून झाला असेल, कुणी आत्महत्त्या केली असेल त्या ठिकाणीं गेल्यावर कित्येक माणसांच्या मनाला जो दुबळेपणा येतो किंवा भय वाटतें त्याचें कारण काय असावें हें वरील उदाहरणावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

पिशाच्यासंबंधीं अनेक गोष्टी अमानुष कृत्यांशीं निगडीत झाल्या आहेत. डॉक्टर ली यांनीं आपल्या Sights and Shadow नामक पुस्तकांत असल्या प्रकारच्या कांहीं हकीगती लिहून स्वतःचाहि एक अनुभव सांगितला आहे. (पृष्ठ ४९) ११८० सालीं एका मध्यरात्रीं कांहीं चमत्कारिक भावना होऊन ते एकाएकीं अंथरुणांत जागे झाले.--

" एकाएकीं मला एक आकृति दिसली. त्या आकृतीच्या कडा अस्पष्ट होत्या आणि ती आकृति माझ्या बिछान्याभोंवतीं मागेंपुढें करीत फिरूं लागली. मी उघड्या डोळ्यांनी कांहीं वेळ त्या आकृतीची ती चमत्कारिक हालचाल पाहिली. त्या पिशाच्चानें झगा घातला होता आणि त्याचें खांदे आणि हात अगदीं स्पष्ट दिसत होते; परंतु दुसरे अवयव तितकेसे स्पष्ट नव्हते. एक काडी ओढून मी बिछान्याजवळची मेणवत्ती लावली. तरी तें पिशाच्च माझ्या खोलींत वावरत होतेंच. मी बिछाना सोडून त्याच्या पाठोपाठ तें खोलींत जिथें जाईल तिथें जाऊं लागलों. दोन तीन मिनिटांनीं तें हळूं हळूं अस्पष्ट होत होत नाहींसें झालें.

" त्या पिशाच्चदर्शनाचें स्पष्टीकरण पुढें कांहीं काळानें मिळालें. सुमारें साठ वर्षांपूर्वी एका सरदाराच्या नोकरानें त्या खोलींत लोकांपासून अन्यायानें पैसे उकळणाऱ्या आपल्या धन्याचा खून केला होता. त्या खुनी नोकराचें पिशाच्च त्या खोलींत वावरतांना कितीतरी लोकांना दिसलें होतें. तो जेव्हां जेव्हां त्या खोलींत प्रकट होई तेव्हां अविचारानें आपल्या धन्याचा खून करण्याचें तें अघोर कृत्य करण्यापूर्वी तो जसा चोरट्या पावलांनीं फिरला तसाच फिरतांना दिसे. "

तो प्रसंग घडून कित्येक वर्षें झालीं; परंतु मृताच्या मनाला त्या उतावळेपणानें केलेल्या कृत्याबद्दल लागून राहिलेल्या तळमळीनें त्याला त्या खोलींत पिशाच्च रूपानें वावरावयास लावलें होतें.

जिवंतपणीं जें आपल्या मालकीचें होतें त्याच्या अवशेषाबद्दल कांहीं माणसांना मृत्यूनंतरही किती आस्था वाटत असते याचा पुरावा बोझॅनो यानें आपल्या Lies phenomensale Hantise ('भुताटकी चमत्कार') नामक सुप्रसिद्ध ग्रंथांत दिला आहे (पृष्ठें ५० ते ५२)–

डॉक्टर H. A. Kinuaman यांनीं ती हकीकत सांगितली आहे– "माझे काका जॉन किनॅमन आणि माझे वडील जेकब किनॅमन आणि आडाम्स नांवाचा दुसरा एक तरुण हे तिघे वैद्यकीचा अभ्यास करीत होते आणि त्या तिघांची चांगली दोस्ती होती. मृताच्या शरिराची चिरफाड करणें आज जितकें सहजसाध्य आहे तितकें त्याकाळीं नव्हतें. लोकांच्या कल्पनाहि अत्यंत धार्मिक आणि बुरसटलेल्या. अशा परिस्थितींत शरीरयंत्राचा अभ्यास करणें विद्यार्थ्यांना अत्यंत कठीण पडत असे. तेव्हां त्या तिघां मित्रांनीं आपापसांत असा करार केला कीं आपल्यापैकीं जो अगोदर मरेल त्याचा देह दुसऱ्या दोघांनीं शास्त्रीय संशोधनाकरितां ताब्यांत घ्यावा. कोणत्याहि परिस्थितींत सांगाडा आपल्या मित्राखेरीज दुसऱ्यांच्या ताब्यांत जातां कामा नये. ही अट पाळणें अशक्य झाल्यास सांगाडा पुरून टाकण्यांत यावा.

" कालांतरानें त्या तिघा मित्रांपैकीं आडाम्स कालवश झाला. माझ्या काकांनीं तो त्याचा देह आपल्या ताब्यांत घतला आणि त्यांच्या आयुष्याच्या अंतापर्यंत त्यांनीं तो आपल्या देखरेखीखालीं ठेवला. काकांच्या मृत्यूनंतर माझे वडील डॉक्टर जेकब यांनीं तो सांगाडा सांभाळला. त्याच्या नंतर माझे दुसरे धाकटे काका डॉक्टर जॅकसन यांनीं तो ताब्यांत घेतला आणि त्यानंतर माझा भाऊ रॉबर्ट व त्याच्याहि नंतर माझा दुसरा भाऊ चार्लस् याच्या ताब्यांत तो सांगाडा आला. आडाम्सच्या मृत्यूनंतरच्या एवढ्या दीर्घ कालावधींत ज्या ज्या वेळीं ठरलेल्या अटीप्रमाणें तो सांगाडा त्याच्या जिवन्तपणीच्या मालकानें ठरविलेल्या अटीप्रमाणें त्या मित्रमंडळींच्या ताब्यांत होता तेव्हां कोणत्याहि प्रकारची गडबड झाली नाहीं. परंतु जेव्हां जेव्हां कारणपरत्वें त्या अटींचा भंग झाला तेव्हां आम्हांला कांहीं चमत्कारिक अनुभव आले.

"मला आठवतें १९४९ सालीं मी अगदीं लहान असतांना माझ्या वडिलांस कॅलिफोर्नियास जाणें भाग पडलें. आणि त्या सांगड्याकडे दुर्लक्ष झालें ; आणि तो आमच्या घराच्या पोटमाळ्यावर टाकून देण्यांत आला. हा प्रकार आडाम्सला मानवला नसावा, कारण त्याच रात्रीं माळ्यावर दणदण पावलें ऐकूं येऊं लागलीं. कुणीतरी वरून खालीं उतरत असल्याचा व खालून वर जात असल्याचा भास होऊं लागला. त्या प्रकारानें माझ्या आईच्या मनाची शांति ढळली आणि कुटुंबियांतील सर्व माणसांची झोंप त्या रात्रीं बिघवली. तिनें माझ्या काकांस आडाम्सच्या सांगाड्याची सुव्यवस्था लावावयास सांगितलें. आणि त्याप्रमाणें काकानें तो सांगडा आपल्या ताब्यांत घेतल्यावर आमच्या घरांत पुन्हां शांति नांदूं लागली.

"माझ्या काकानें तो सांगडा कांहीं दिवस आपल्या कचेरींत ठेवला. परंतु एके दिवशीं त्याला काय लहर लागली कुणाला ठाऊक! त्यानें तो आपल्या कचेरींतून काढूनआमच्या घरच्या एका भागाच्या दुसऱ्या कोपऱ्यांत ठेवून दिला. या भागांत दोन कुटुंबें राहात होतीं. या कुटुंबांतील माणसांना कांहीं अकल्पित आणि अवर्णनीय असे आवाज वारंवार त्रास देऊं लागले. म्हणून तीं माणसें घर सोडून पळून गेलीं. आमचें घर भुताटकीचें म्हणून गवगवा झाला आणि आमच्या घरांत कुणीच भाडोत्री टिकेना. माझे वडील कॅलिफोर्नीयाहून परत आले तेव्हां त्यांनीं तो सांगडा आपल्या ताब्यांत घेऊन आपल्या कचेरींत सुरक्षित ठेवून दिला आणि मग पुन्हा एकदां आमचें घर शांत झालें."

"माझे वडील १८७४ सालीं वारले आणि आडाम्सचीं हाडें माझा भाऊ रॉबर्ट याच्या ताब्यांत आलीं. एके दिवशीं रॉबर्टनें तीं हाडें आमच्या शेजाऱ्याच्या घराच्या एका गुदामांत घराच्या एका बांधकामाचें सामान ठेवलें होतें त्या ठिकाणीं ठेवून दिलीं. ही वस्तुस्थिती त्या खोलींत वेळोवेळीं वावरणाऱ्या कामगारांना माहीत नव्हती. लवकरच ते कामगार संध्याकाळीं त्या खोलींत जाईनासे झाले. कारण या खोलींत अपूर्व असे आवाज येतात अशी त्यांची तक्रार होती. तेव्हां माझ्या भावानें तो

सांगाडा आपल्या ताब्यांत घेतला आणि पुन्हां त्या खोलींत शांति प्रस्थापित झाली.

" आडाम्सचे पार्थिव अवशेष अजून आमच्या कुटुंबांतील मंडळींच्या ताब्यांत आहेत. '

" आडाम्सनें आपल्या पार्थिव अवशेषांच्या सुरक्षिततेविषयीं जो करार जिवंतपणीं केला होता त्या करारासंबंधींचा जोरदार विचार त्या त्याच्या हाडांशीं जणूं काय निगडीत होऊन बसला होता. आणि ज्या ज्या वेळीं त्या कराराचा भंग झाला त्या त्या वेळीं त्या विचारानें जिवंत आणि उग्र स्वरूप धारण केलें. आडाम्ससारख्या सुविध माणसाचे आपल्या पार्थिव अवशेषावर जखडलेले विचार जर एवढें करूं शकतात तर ज्यांनी आपली हयात अत्यंत हीन वासनांच्या उद्दामपणांत घालविली, त्या लोकांनीं मरणोत्तर आपल्या जिवंतपणीच्या घरांत राहाणाऱ्यांना त्रास दिला तर त्यांत नवल काय ? असलीं माणसें दगड फेंकण्याचे, घरांतील कांचसामान फोडण्याचे, सुव्यवस्थित ठेवलेल्या वस्तू जागेवरून धडाधड पाडण्याचे प्रकार करितात. असल्या प्रकारच्या गोष्टी कित्येक लोकांच्या ऐकिवांत व पाहण्यांत आहेत. घरांत राहाणाऱ्या माणसांना उगाचच भिववून सोडण्याचा दुष्ट हेतु या कृत्यांच्या बुडाशीं असतो.

प्रोफेसर शूपार्ट यांना एका पिशाच्चानें बरेच दिवस पिडलें होतें. ते आपले अनुभव जाहीर व्याख्यानांत देखील सांगत—

" त्या प्रकाराला सुरुवात झाली ती माझ्या राहात्या घराच्या दरवाजावर रात्रीं धक्के बसण्यापासून. दुसऱ्या दिवशीं घराच्या सर्व बाजूंनीं दगड आले. घरांतील कोणत्याहि माणसांना दगड आंत आले तरी इजा झाली नाहीं, परंतु खिडक्यांचीं सर्व तावदानें फुटलीं. खिडक्यांना नवीं तावदानें लावलीं तर ती पुन्हां दगडफेक होऊन फुटत. दिवसाढवळ्या आणि रात्री कुणीतरी अदृश्य व्यक्ति माझ्या तोंडांत फाडकन् मारून मला अस्वस्थ करी. या मारणाऱ्या व्यक्तीला शोधून काढण्याकरितां मी माझ्या बिछान्यावर एकदोन माणसें बसवलीं तर त्यांच्याहि मुस्कटांत बसत. मी टेबलावर वाचीत बसलों म्हणजे टेबलावरचा दिवा पट्कन्

उचलला जाऊन खोलींच्या एका टोकाला जाऊन बसे. माझी पुस्तकें टराटर फाडलीं जाऊन त्यांच्या चिंध्या माझ्या पायांशीं पडत आणि कॉलेजांत व्याख्यान देत असतांना माझ्या हातांतील पुस्तकाचें मी वाचीत असलेलें पान एकएकीं फाडलें जाई. मी माझ्या डोक्यावर माझ्या हातानें-एखादी झगझगीत तरवार धरली किंवा दुसरें कोणी ती धरून माझ्या-जवळ उभें राहिलें म्हणजे या हल्ल्यापासून माझें रक्षण होई.(मिसेस् क्रॉवेकृत) The Night side of Nature (पृष्ठें ४२९–४३०)

याहूनहि कांहीं अद्भूत वस्तु आणि भयंकर अनुभव कांहीं लोकांच्या प्रत्ययास आलेले आहेत. त्यासंबंधींचा हकीकत पुढील प्रकरणीं पाहूं.

० ० ०

१२ : मृत्यूनंतरचा दुष्टावा

मागील एका प्रकरणांत परलोकवासी जिवंत माणसांकडून कशी मदतीची अपेक्षा करतात व त्यांच्याशीं जर संबंध आला तर भिऊन दूर न पळतां त्यांना योग्य ती मदत करून त्यांची सुटका करणें किती योग्य आहे हें आपण पाहिलें. परंतु त्यावरून असें कोणी समजूं नये कीं, कोणतींहि पिशाच्चें माणसाला त्रास देत नाहींत. इहलोकीं दुष्टावा करणारीं माणसें परलोकींहि आपली वृत्ति सोडीत नाहींत. जिवंत लोकांना परलोकीं गेल्यानंतर सकारण वा अकारण छळणाऱ्या कांहीं व्यक्तींचीं उदाहरणें आढळलीं आहेत. मादाम ल्नॅव्हॅट्स्कीनें वर्णिलेली एक कथा या ठिकाणीं संकलित स्वरूपांत देत आहे.

चार्लस् व हेन्री हे दोन तरुण फ्रान्स देशांत पायीं प्रवास करण्यास निघाले होते. एकदां ते एका खेड्याकडे जाणाऱ्या उतरणीवरून चालले असतांना त्यांना एक जुनी इमारत दिसली. तिच्याकडे दुर्लक्ष केलें गेल्यामुळें तिच्या कौलांतून झाडें व गवत वाढलें होतें. जुन्या लांकूड-सामानाची हेन्रीला आवड असल्याकारणानें त्या इमारतींतील कोचें व कपाटें पाहावीं व साधल्यास कांहीं खरेदीहि करावी या इराद्यानें त्या दोघांनीं त्या इमारतीच्या रक्षकाची भेट घेतली व ती इमारत आंतून

पाहाण्याची परवानगी मागितली. परंतु त्या घरांत भयंकर प्रकार घडले असल्याचें व गेल्या वीस वर्षांत सहसा आंत कोणी वास्तव्य न केल्याचें सांगून त्या म्हाताऱ्यानें त्या दोघा तरुण मित्रांना नकार दिला. मोठ्या मिनतवारीनें ते दोघे त्या म्हाताऱ्याच्या तोंडून सत्य वदवूं शकले आणि तें असें कीं, "या हवेलीचा पूर्वीचा मालक अत्यंत नीच होता. त्याचीं कर्में त्याच्या अंगावर आलीं तेव्हां त्यानें आत्महत्त्या केली. एके दिवशीं संध्याकाळीं तो पॅरिसहून आला आणि दुसऱ्या दिवशीं त्याचें गळा कापलेलें प्रेत खुर्चीवर पडलेलें आढळलें! सरदाराच्या मृत्यूनंतर ही दौलत दुसऱ्या एका कुटुंबाकडे गेली. तो नवा धनी आपली बायको आणि नोकरासह फक्त एकच रात्र या ठिकाणीं राहून पळून गेला. त्यानंतर मालकानें ही हवेली भाडचानें देण्याचा प्रयत्न केला. दोन भाडोत्री आले पण त्यांपैकीं एकहि एका रात्रीपेक्षां अधिक टिकला नाहीं. दुसऱ्या भाडोऱ्याची बायको वेडी झाली. त्यानंतर कोणी तिऱ्हाईत माणसें चार प्रसंगीं मालकाकडून चिठ्ठी घेऊन आलीं म्हणून त्यांना इथें आंत प्रवेश मिळाला. पैकीं एकानें सरदारासारखा आपला गळा कापून घतला. एक जण रात्रीं झोपला तो दुसऱ्या दिवशीं मेलेला आढळला. आणि दोघेजण भीतीनें वेडे झाले. अशा रीतीनें या जागेचा इतिहास दिवसेंदिवस दुःखमय होत गेला आहे."

हेन्रीनें त्यांना त्या बंगल्यांत एक रात्रभर जागा द्यावी म्हणून १०० फ्रँक देऊं केले. तेव्हां तो म्हातारा विनवणी करीत म्हणाला, "तुमचे १०० फ्रँक घेऊन मी तुमचा खूनी होऊं इच्छीत नाहीं."

हेन्रीनें त्याला अधिक लांच देऊं केली तरीसुद्धां त्या पैशाच्या लोभापेक्षां त्याची त्या बंगल्यांतील पिशाच्चविषयक भीतीच अधिक होती. हेन्रीनें चांगली तासभर त्या म्हाताऱ्याला वळविण्याची खटपट केल्यानंतर तो रडत रडत त्या दोन प्रवाशांना त्या हवेलींत जागा देण्यास तयार झाला. मोठ्या नाखुषीनें त्यानीं दिलेले पैसे त्या म्हाताऱ्यानें घेतले आणि त्यांना तो बंगला दिवसा उजेडीं उघडून देऊन आंतील भाग, विशेषतः त्या आमहत्त्या करणाऱ्या सरदाराचें तैलचित्र, त्याची अभ्यासाची खोली,

ज्या खुर्चीवर बसून त्यानें आपला गळा कापला ती खुर्ची वगैरे गोष्टी नीट दाखविल्या.

नंतर ते दोघे गांवांत फिरावयास गेले. त्या गांवीं चार्लस्‌चा एक मित्र होता. त्यानें त्या दोघांनाहि रात्रीं जेवणाचें आमंत्रण दिलें. परंतु हेन्रीला कांहीं पत्रें लिहावयाचीं असल्याकारणानें त्यानें तें आमंत्रण स्वीकारलें नाहीं. चार्लस्‌नें आपल्या मित्राकडे जेवून रात्रीं १०॥ वाजतां त्या भूत-बंगल्यावर परत यावें असा त्या दोघांचा ठराव होऊन त्यांनीं तात्पुरती एकमेकांची रजा घेतली.

आपलें पत्रलेखन उरकून हेन्री मोकळा झाला तेव्हां त्या पिशाच्च-ग्रस्त बंगल्यांतील तो रात्रीचा एकलेपणा त्याला असह्य वाटूं लागला. तिथून पळून जावेंसें त्याला वाटूं लागलें. परंतु साहसाची ती नामी संधी दवडण्यास तो तयार झाला नाहीं. आपल्या धैर्यवान् मित्राच्या साहाय्यानें आपण या साहसांतून पार पडूं अशी त्याची खात्री होती. समोरच्या खाणावळींत जेवण उरकून तो त्या बंगल्यावर परत आला तो आपला मित्र चार्लस् आधींच येऊन आपली वाट पाहात असलेला त्याला दिसला. रात्रींच्या काळोखांत त्याचा चेहरा स्पष्टपणें दिसला नाहीं परंतु आपण विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें आपणाला धड मिळत नाहींत यावरून त्याचें चित्त ठिकाणावर नाहीं हें हेन्रीनें ताडलें. चार्लस् ज्याच्या घरीं जेवावयास गला होता त्या मित्राच्या घरीं कांहीं गडबड झाली कीं, एखादी अनिष्ट बातमी त्याच्या कानावर आलीं हें हेन्रीला समजेना. हेन्रीची अप्रसन्नता वाढत चालली होती. कुणीतरी आपली शक्ति खेंचून घेत आहे असें त्याला वाटूं लागलें. हवेलीच्या त्या म्हाताऱ्या रक्षकाकडून त्यांनीं एक दिवा घेतला होता. सरदाराच्या अभ्यास करण्याच्या ज्या खोलींत ते गेले होते त्या खोलींत उत्तम प्रकाश आणण्यास तसल्या तीन दिव्यांची जरूरी होती. त्या खोलीच्या प्रत्येक कोपऱ्यांत एक मोठा आरसा असल्या-मुळें त्या एक दिव्याच्या प्रकाशानें चमत्कारिक परिणाम निर्माण केला होता. चार्लस् तो प्रकाश टाळण्याचा प्रयत्न करीत होता हें हेन्रीच्या

पाहाण्याची परवानगी मागितली. परंतु त्या घरांत भयंकर प्रकार घडले असल्याचें व गेल्या वीस वर्षांत सहसा आंत कोणी वास्तव्य न केल्याचें सांगून त्या म्हाताऱ्यानें त्या दोघा तरुण मित्रांना नकार दिला. मोठ्या मिनतवारीनें ते दोघे त्या म्हाताऱ्याच्या तोंडून सत्य वदवूं शकले आणि तें असें कीं, "या हवेलीचा पूर्वीचा मालक अत्यंत नीच होता. त्याचीं कर्में त्याच्या अंगावर आलीं तेव्हां त्यानें आत्महत्त्या केली. एके दिवशीं संध्याकाळीं तो पॅरिसहून आला आणि दुसऱ्या दिवशीं त्याचें गळा कापलेलें प्रेत खुर्चीवर पडलेलें आढळलें! सरदाराच्या मृत्यूनंतर ही दौलत दुसऱ्या एका कुटुंबाकडे गेली. तो नवा धनी आपली बायको आणि नोकरासह फक्त एकच रात्र या ठिकाणीं राहून पळून गेला. त्यानंतर मालकानें ही हवेली भाड्यानें देण्याचा प्रयत्न केला. दोन भाडोत्री आले पण त्यांपैकीं एकहि एका रात्रीपेक्षां अधिक टिकला नाहीं. दुसऱ्या भाडोत्र्याची बायको वेडी झाली. त्यानंतर कोणी तिऱ्हाईत माणसें चार प्रसंगीं मालकाकडून चिठ्ठी घेऊन आलीं म्हणून त्यांना इथें आंत प्रवेश मिळाला. पैकीं एकानें सरदारासारखा आपला गळा कापून घतला. एक जण रात्रीं झोपला तो दुसऱ्या दिवशीं मेलेला आढळला. आणि दोघेजण भीतीनें वेडे झाले. अशा रीतीनें या जागेचा इतिहास दिवसेंदिवस दुःखमय होत गेला आहे."

हेन्रीनें त्यांना त्या बंगल्यांत एक रात्रभर जागा द्यावी म्हणून १०० फ्रँक देऊं केले. तेव्हां तो म्हातारा विनवणी करीत म्हणाला, "तुमचे १०० फ्रँक घेऊन मी तुमचा खूनी होऊं इच्छीत नाहीं."

हेन्रीनें त्याला अधिक लांच देऊं केली तरीसुद्धां त्या पैशाच्या लोभापेक्षां त्याची त्या बंगल्यांतील पिशाच्चविषयक भीतीच अधिक होती. हेन्रीनें चांगली तासभर त्या म्हाताऱ्याला वळविण्याची खटपट केल्यानंतर तो रडत रडत त्या दोन प्रवाशांना त्या हवेलींत जागा देण्यास तयार झाला. मोठ्या नाखुषीनें त्यानीं दिलेले पैसे त्या म्हाताऱ्यानें घेतले आणि त्यांना तो बंगला दिवसा उजेडीं उघडून देऊन आंतील भाग, विशेषतः त्या आमहत्त्या करणाऱ्या सरदाराचें तैलचित्र, त्याची अभ्यासाची खोली,

ज्या खुर्चीवर बसून त्यानें आपला गळा कापला ती खुर्ची वगैरे गोष्टी नीट दाखविल्या.

नंतर ते दोघे गांवांत फिरावयास गेले. त्या गांवीं चार्लस्चा एक मित्र होता. त्यानें त्या दोघांनाहि रात्रीं जेवणाचें आमंत्रण दिलें. परंतु हेन्रीला कांहीं पत्रें लिहावयाचीं असल्याकारणानें त्यानें तें आमंत्रण स्वीकारलें नाहीं. चार्लस्नें आपल्या मित्राकडे जेवून रात्रीं १०॥ वाजतां त्या भूत-बंगल्यावर परत यावें असा त्या दोघांचा ठराव होऊन त्यांनीं तात्पुरती एकमेकांची रजा घेतली.

आपलें पत्रलेखन उरकून हेन्री मोकळा झाला तेव्हां त्या पिशाच्च-ग्रस्त बंगल्यांतील तो रात्रीचा एकलेपणा त्याला असह्य वाटूं लागला. तिथून पळून जावेंसें त्याला वाटूं लागलें. परंतु साहसाची ती नामी संधी दवडण्यास तो तयार झाला नाहीं. आपल्या धैर्यवान् मित्राच्या साहाय्यानें आपण या साहसांतून पार पडूं अशी त्याची खात्री होती. समोरच्या खाणावळींत जेवण उरकून तो त्या बंगल्यावर परत आला तो आपला मित्र चार्लस् आधींच येऊन आपली वाट पाहात असलेला त्याला दिसला. रात्रींच्या काळोखांत त्याचा चेहरा स्पष्टपणें दिसला नाहीं परंतु आपण विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें आपणाला धड मिळत नाहींत यावरून त्याचें चित्त ठिकाणावर नाहीं हें हेन्रीनें ताडलें. चार्लस् ज्याच्या घरीं जेवावयास गला होता त्या मित्राच्या घरीं कांहीं गडबड झाली कीं, एखादी अनिष्ट बातमी त्याच्या कानावर आलीं हें हेन्रीला समजेना. हेन्रीची अप्रसन्नता वाढत चालली होती. कुणीतरी आपली शक्ति खेंचून घेत आहे असें त्याला वाटूं लागलें. हवेलीच्या त्या म्हाताऱ्या रक्षकाकडून त्यांनीं एक दिवा घेतला होता. सरदाराच्या अभ्यास करण्याच्या ज्या खोलींत ते गेले होते त्या खोलींत उत्तम प्रकाश आणण्यास तसल्या तीन दिव्यांची जरूरी होती. त्या खोलीच्या प्रत्येक कोपऱ्यांत एक मोठा आरसा असल्या-मुळें त्या एक दिव्याच्या प्रकाशानें चमत्कारिक परिणाम निर्माण केला होता. चार्लस् तो प्रकाश टाळण्याचा प्रयत्न करीत होता हें हेन्रीच्या

लक्षांत आलें. जाळ्यांतील कोळ्याच्या तोंडांत सांपडलेल्या माशीला जशी हळूहळू क्षीणता यावी तद्वतच हेन्रीला आपलें जीवन सत्त्व कोणी-तरी शोषून घेत आहे असें वाटूं लागलें होतें. इतक्यांत चार्लस् तिथल्या एका मोठ्या आरामखुर्चीवर निपचित पडला. थोड्या वेळानें तो उठला आणि पिंजऱ्यांत कोंडलेला एखादा पशू जसा आंतल्या आंत इकडे तिकडे येरझारा घालतो तसा तो त्या खोलींत इकडन तिकडे फिरूं लागला. हेन्रीनें त्याला आवरण्याचा प्रयत्न केला परंतु तो त्याच्यानें आवरेना.

या सर्व प्रकारानें हेन्री अत्यंत अस्वस्थ झाला. कोणता तरी भयंकर आजार आपल्या मित्राला झाला आहे असें त्याला वाटूं लागलें. रात्रीचे बारा वाजावयास आले होते; आणि फिरतां फिरतां चार्लस् एकदम त्या खोलींतील सरदाराच्या खुर्चीवर बसला. त्याचा चेहराही हेन्रीला बदलल्यासारखा दिसूं लागला. हेन्री त्याचा खांदा हालवून म्हणाला, 'जागा हो, जागा हो, तुला काय झालं आहे ?'

इतक्यांत मध्यरात्रीचे टोले कुठेंतरी पडले. ते हेन्रीनें स्वच्छ ऐकले. चार्लस् ज्या खुर्चीवर बसला होता तिच्या समोरच असलेल्या टेबलावर एक बिलोरी आरसा होता. त्या आरशांत चार्लस्चें प्रतिबिम्ब टेबलावरील दिव्याच्या उजेडांत जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां त्या ठिकाणीं त्याला आपल्या मित्राची प्रतिमा न दिसतां त्या सरदाराचें तैलचित्र–त्यानें जें दुपारीं पाहिलें होतें–अगदीं हुबेहुब तसेंच तें प्रतिबिंब होतें. आणि ती व्यक्ति आपल्या हातांतील वस्त्र्यानें आपला कंठ चिरीत होती. हेन्रीनें आरशा-वरील दृष्टि काढून आपला हात ज्याच्या खांद्यावर होता त्या खुर्चीवर बसलेल्या माणसाकडे पाहिलें तेव्हां त्याची खात्री झाली कीं तो आपला मित्र नसून आत्महत्त्या केलेला तो सरदार आहे आणि दांत विचकून द्वेषपूर्ण आणि विजयी दृष्टीनें तो आपल्याकडे पाहात आहे. रक्ताचा ओघळ आपल्या हातावर पडल्याचाहि त्याला भास झाला. आपल्या डोक्याच्या कवटीच्या आंत कांहींतरी तुटल्यासारखें त्याला वाटलें आणि तो धाडकन् जमिनीवर बेशुद्ध पडला.

तो शुद्धीवर आला तेव्हां त्या हवेलीचा म्हातारा रक्षक हातानें त्याला

हलवून विचारीत होता, "तुझा मित्र कुठें आहे ?"

आदल्या रात्रीचा सर्व प्रकार हेन्रीच्या लक्षांत आला. त्यानें सभोंवतीं पाहिलें तों आपला मित्र चार्ल्स किंवा त्या सरदाराचें पिशाच्चहि त्याला दिसेना. त्या म्हाताऱ्यानें दाखविल्यावरून त्यानें आपला रक्तानें माखलेला हात पाहिला. तें रक्त कुणाचें होतें ? सरदाराचें कीं चार्लस्चें ?

म्हाताऱ्यानें आणलेल्या पाण्यानें त्यानें आपल्या हातावरील रक्ताचे डाग पुसून टाकले. वरकरणीं जरी ते पुसल्यासारखे दिसले तरी हेन्रीला वाटलें कीं ते डाग आतां कधींच पुसले जाणार नाहींत. त्या म्हाताऱ्याच्या सहाय्यानें हेन्रीनें चार्लस्च्या तपासासाठीं त्या हवेलीचीं सर्व दालनें व आजूबाजूच्या मोकळ्या जागेचे कानेकोपरे पाहिले. परंतु व्यर्थ ! बुद्धीला न पटणारा असा तो प्रकार घडला होता.

त्या हवेलीपासून जवळच असलेल्या ज्या हॉटेलांत तो आदल्या रात्रीं जेवला होता त्या हॉटेलांत त्या दोघांनीं आपल्यासाठीं दोन खोल्या भाड्यानें घेतल्या होत्या. हेन्रीनें चार्लस्च्या खोलींत जाऊन पाहिलें तो त्या खोलींतील बिछान्यावर कुणी निजल्यासारखें दिसत नव्हतें. स्वतःला अत्यंत अशक्तता वाटत असल्याकरणानें तो आपल्या खोलींत जाऊन पडला. कांहीं वेळानें एकाएकीं त्या खोलीचा दरवाजा उघडला गेला आणि चार्लस् जणूं कांहींच झालें नाहीं अशा चेहऱ्यानें त्याच्या खोलींत आला. हेन्रीनें ताडकन् बिछान्यावरून उठून त्याचा हात पकडला. "अरे तुला झालं आहे काय ?" चार्लस्नें विचारलें.

विस्मयाचा पहिला भर ओसरल्यानंतर चार्लस्नें आपली सर्व हकीकत सांगितली.

"रात्रीं मी माझ्या मित्राच्या घरीं जेवण उरकल्यानंतर ठरल्याप्रमाणें त्या भूतबंगल्यावर यावयास निघालों. तों एकाएकीं मला कांपरें भरल्यासारखें वाटून अशक्तता अंगीं आली. तशा स्थितींत मला त्या मित्राच्या घरच्या मंडळींनीं आपण नियोजिलेलें साहस करण्यासाठीं बाहेर जाऊं दिलें नाहीं. मी त्यांच्याकडे झोपलों आणि हा आतां तुझी भेट घ्यायल

आलों आहें."

हेन्रीनें नंतर घडलेलें वर्तमान चार्लस्ला सांगितलें. तो प्रकार कसा घडला असावा याविषयीं तर्कवितर्क करीत ते डोकें खाजवीत बसले.

(जिज्ञासूंनीं मादाम ब्लॅव्हॅट्स्कीच्या The nightmave tales या पुस्तकांतील " The cave of the Echoes " " The Bewitched Life " या गोष्टी अवश्य वाचाव्या.)

आदल्या दिवशीं ते दोघे त्या म्हाताऱ्या रक्षकाबरोबर जेव्हां त्या हवेलींत शिरले तेव्हांच त्या सरदाराच्या पिशाच्चानें अदृश्य राहून त्यांचा बेत लक्षांत घेतला असला पाहिजे. चार्लस्ला त्याच्या मित्राच्या घरीं अस्वस्थ वाटावयास लावून त्या दोघां मित्रांची गांठभेट होऊं न देण्याचा प्रयोग त्याला पूर्णपणें साधला. परंतु त्या पिशाच्चानें पुष्कळ काळपर्यंत जें जडत्व पांघरलें होतें तें या हकीकतीचें वैशिष्ट्य आहे. हेन्रीची शक्ती खेंचून घेऊन त्या दुष्ट सरदाराला चिरकालपर्यंत आपलें जडत्व टिकवितां आलें असलें पाहिजे. (Rev. C. W. Leadbeater कृत The Perfume of Egypt या पुस्तकांतील The Baron's Room हें प्रकरण.)

रस्किननें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, Revenge always keeps thy wounds green. (सूडबुद्धि तुमच्या जखमा कायमच्या ओल्या ठेवीत असते.) पुष्कळशीं मेलेलीं माणसें सूडाच्या भावनेनें इहलोकाशी संबंध ठेवत असतात. तसें करण्यामुळें आपण आपलें स्वतःचेंहि नुकसान करून घेत आहोंत याची त्यांना जाणीव नसते.

एका इंग्रज अधिकाऱ्यानें कॅनडामधील एका बाईला आपल्या प्रेमपाशांत गोंवून नंतर तिचा त्याग केला होता. त्या बाईचा अंत कोणत्या प्रकारें झाला तें बाहेर आलेलें नाहीं; परंतु त्या इंग्रज अधिकाऱ्याला त्या बाईनें मेल्यानंतर जवळ जवळ दहा वर्षेपर्यंत त्रास दिल्याची हकीकत मिस्टर R. D. Owen यांनीं आपल्या 'Foot falls on the boundry of Another world' पुस्तकांत दिली आहे (पृ. ३२६). ती त्याला पिशाच्च-

रूपानें प्रत्यक्ष अथवा स्वप्नांत कधींच दिसली नाहीं; परंतु तो झोंपला म्हणजे रात्रीं त्याच्या दरवाजावर थापा बसाव्या, भयंकर आवाज ऐकूं यावे आणि त्याच्या झोपेचा आणि शांतीचा भंग व्हावा. तो अधिकारी आपल्या फौजेबरोबर फिरत असे. पण तो कुठेंही गेला तरी त्या भयानक आवाजांनीं त्याची पाठ सोडली नाहीं. रात्रीं त्यानें आपल्या खोलींत दिवा ठेवला तर तो विझून जात असे. त्यानें आपल्या खोलींतील पिंजऱ्यांत एकदां पक्षी ठेवलेला असल्यास दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो मरून पडलेला दिसावयाचा. कुत्र्याला घेऊन तो आपल्या खोलींत झोंपला तर तो कुत्रा सुटा होतांक्षणींच जोरजोरानें धांवत जावयाचा तो कधींच परत न येण्याकरितां. या प्रकाराला वैतागून त्या इंग्रज अधिकाऱ्याला अर्ध्या पगारावर सेवानिवृत्त व्हावें लागलें. तरीसुद्धां त्या बाईनें त्याची पाठ सोडली नाहीं.

त्या इंग्रज अधिकाऱ्याचा तो छळ म्हणजे त्याच्या कृष्णकृत्यांचें परितोषिक होतें; व त्यापासून योग्य तो धडाही तो शिकला असेल. परंतु मेल्यानंतर अशा रीतीनें सूड घेणाऱ्या त्या दुर्दैवी बाईची कींव करावीशी वाटते.

असल्याच प्रकारची दुसरी एक हकीकत उपरिनिर्दिष्ट पुस्तकाच्या ३१८ पानावर दिली आहे. निराश झालेल्या प्रियकरानें आपल्या प्रेयसीवर कसा सूड उगविला याची ती गोष्ट आहे. फ्रान्समधील त्या नटीचे अनेक स्तुतिपाठक होते. त्यांमध्यें एक तरुण होता व त्याच्याकडे ती नटी कृपाकटाक्षानें पाहात असे. पुढें जेव्हां त्या दोघांचा निकट सहवास झाला तेव्हां त्या नटीला आपलें पाणीग्रहण करण्यास अयोग्य असे कांहीं दोष त्या तरुणाच्या अंगीं आढळून आले व तिनें त्याच्याशीं असलेला आपला संबंध सोडून टाकला. त्यानंतर थोडयाच दिवसांत तो तरुण वारला. मरतेवेळीं त्या नटीवरचा त्याचा राग कायम असल्यामुळें आपण मरणोत्तर तिचा सूड घेऊं असें त्यानें जाहीर केलें होतें.

त्याप्रमाणें दररोज रात्रीं अकरा वाजतां (त्याच सुमारास त्या तरुणानें आपला पार्थिव देह सोडला होता.) त्या नटीला ती ज्या ठिकाणीं असे

त्या ठिकाणीं भयंकर आवाज ऐकूं येत असत. त्यामुळें ती अगदीं घाबरून जाई. हे आवाज तिच्या आजूबाजूच्या माणसांनादेखील ऐकूं येत. कांहीं महिन्यांनीं तर तिच्या अगदीं सान्निध्यांत बंदुकीची गोळी सोडल्याचा तिला आवाज येई व आपण त्या गोळीला बळी पडतों कीं काय या भीतीनें ती अगदीं गर्भगळित होई. फ्रेंच पोलिसांनीं या आवाजाचें मूळ शोधून काढण्याचें जंग जंग प्रयत्न केले. परंतु व्यर्थ ! असे प्रकार त्या नटीच्या आयुष्यांत सतत अडीच वर्षेपर्यंत घडले आणि जवळ जवळ तितकाच काल तो तरुण जिवंत असतांना तिच्या प्रेमांत सांपडला होता.

माणसाच्या मरणोत्तर सूडबुद्धीचें एक भयंकर उदाहरण रेव्हरंड लेडबीटर यांनीं आपल्या ' The Perfume of Egypt ' नामक पुस्तकांत दिलें आहे.

" टॉम प्राइस नांवाचा एक उंच भरदार तरुण इंजिन ड्रायव्हर होता. ' फायर क्वीन ' नांवांचें जें इंजिन तो चालवीत असे त्यावर त्याचा जीव कीं प्राण होता. हेट्टी हॉकिन्स नांवांच्या एका हरिणाक्षीवर त्याचें प्रेम होतें. कीजबरो स्टेशनवरून जाणाऱ्या लोहमार्गावर तिच्या बापाचें घर होतें. ज्यो ब्राऊन नांवाच्या दुसऱ्या एका तरुण सुतारानेंहि हेट्टी हॉकिन्सला आपल्या नादीं लावण्याचा प्रयत्न केला होता. ' Absense makes the heart Grow Fonder (गैरहजेरींत अंतःकरण अधिक प्रेमळ असतें.) या न्यायानें कालांतरानें भेटणाऱ्या टॉम प्राइसची ओढ हेट्टीला अधिक लागावयास पाहिजे होती; परंतु ज्यो ब्राऊनला तिच्या घराभोंवतीं घिरट्या घालण्यास अधिक वेळ असल्याकारणानें आणि दिसावयासहि तो बरा असल्यामुळें ' Out of sight, Out of mind ' ' दृष्टीआड तो मनाआड ' हा न्याय टॉमच्या बाबतींत लागूं पडत होता. ज्यो तीन तीन महिने चर्चचें दर्शन घेत नसे. परंतु अलीकडे चर्चमधील बायबलच्या वर्गाला तो दर रविवारीं जाऊं लागला. कारण त्या वर्गाला हेट्टी पण येत असे. टॉमच्या कानावर हचा गोष्टी गेल्या होत्या आणि त्यानें आपल्या एका मित्राजवळ बोलून दाखविलें होतें--' ज्यो माझ्या तावडींत सांपडला कीं, त्याची धडगत नाहीं ! '

'एके दिवशीं संध्याकाळीं टॉम आपली गाडी घेऊन चालला होता. किंजबरो स्टेशन सोडून गाडीनें थोडा वेग धारण केला होता. हेट्टीचें घर आलें तेव्हां टॉमनें आपल्या इंजिनाच्या बाहेर डोकावून पाहिलें. ती आपल्या बागेंत फुलें खुडीत होती आणि ज्यो ब्राऊन आपल्या हत्यारांची पिशवी खांद्यावर टाकून तिच्याशीं संभाषण करीत होता. तें दृश्य पाहून त्याचा राग अनावर झाला. आपलें सर्वांग इंजिनच्या बाहेर काढून त्यानें आपली वळविलेली मूठ त्या धांवत्या गाडींतून आपल्या प्रतिस्पर्ध्याला दाखविली. गाडी भरधांव चालली होती आणि हेट्टीचें घर दृष्टिआड झालें तरी त्यानें आपलें बाहेर काढलेलें अंग आंत घेतलें नाहीं. त्याचें देहभान क्रोधानें नाहींसें झालें होतें. बाहेरच्या एका खांबाचा त्याच्या डोक्याला फटका बसून तो इंजिनमधून फेंकला गेला. तो प्रकार पाहून घाबरलेल्या कोळसेवाल्यानें गाडी थांबविली आणि गार्डाबरोबर तो मागें गेला. टॉमच्या डोक्याचा उजवा भाग त्या फटकाऱ्यानें फुटला होता आणि त्याच्या चेहऱ्यावर मोठी जखम झाली होती. कीजबरोला त्याचें शरीर नेण्यापूर्वीच त्याचें प्राणोत्क्रमण झालें होतें. आयुष्याच्या शेवटच्या क्षणाला ओंठावर शिवी आणि मनांत अत्यंतिक क्रोधावेश ठेऊन तो ह्या भयंकर अपघातानें इहलोक सोडून गेला होता. त्याच्या त्या हृदयद्रावक अंताची हकीकत ऐकून हेट्टीलाहि वाईट वाटलें; परंतु तिनें त्याच्या प्रेमाचा सर्वस्वी अस्वीकार केला असल्यामुळें तिच्या मनावर त्याचा फारसा परिणाम झाला नाहीं.

टॉमची 'फायर क्वीन' जॅक विल्किन्सनला देण्यांत आली. टॉम प्राइसचें पिशाच्च कीजबरोच्या आसपास कांहीं लोकांना एक दोनदां दिसलें होतें.

टॉमला मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत अपघात झाला आणि त्यानंतर ३ जुलैची हकीकत. जॅक विल्किन्सन नित्याप्रमाणें सुमारें एक तास अगोदर आपल्या कामावर हजर झाला आणि पाहातो तों पडवींत आपली 'फायर क्वीन' नाहीं! आसपास तपास केल्यानंतर त्याला एक माणसांचा जमाव दिसला. जवळ जाऊन पाहातो तों यार्डांतला एक भंगी

बेशुद्ध होऊन पडला होता. त्याला त्या लोकांनीं शुद्धीवर आणला तेव्हां तो थरथरत 'टॉम प्राईस ! टॉम प्राईस' म्हणून बडबडूं लागला. पुरता सावध झाल्यानंतर त्यानें सांगितलें.

"मी शपथपूर्वक सांगतों. फायर क्वीन मी त्या पडवींत नेली तों जवळच टॉम प्राईस उभा होता. रक्तानें नुसता माखला होता तो. आणि त्याच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूला मोठी थोरली जखम दिसत होती. मी घावरून इंजिनमधून पलीकडल्या बाजूला उडी मारली तेव्हां टॉम माझ्याजवळ आला. माझ्या हातांत असलेला लोखंडी गज मी त्याला मारला. तो त्याच्या अंगांतून गेला. जसा कांहीं मी तो हवेंतूनच फिरविला. तावडतोब मला मूर्च्छा आली टॉमचें काय झालें तें मला माहीत नाहीं."

मग स्टेशनमधील एका अधिकाऱ्याच्या कानांवर ही हकीकत घालण्यांत आली तेव्हां त्यानें पुढील केबिनवाल्याला टेलिफोवरून विचारलें; जबाव असा आला कीं 'एक नुसतें इंजिन भयंकर वेगानें गेलें.'

त्यानंतर पुढील स्टेशनवर टेलिफोन करण्यांत आला. 'येथील पडवींतून एक इंजिन सुटून गेले आहे. त्याच्यावर कोणीहि माणूस नाहीं. अपघात टाळण्याकरितां त्या इंजिनाला सांधा देऊन कुठल्यातरी लाईनवर जाऊन आदळूं द्या.' परंतु दुर्दैवानें धोका टाळण्याचा हा संदेश फार उशीरा पोहोंचला होता.

कीजबरोच्या त्या पाद्रयानें आपल्या बायबलच्या विद्यार्थ्यांची एक सहल काढली होती. सकाळीं सुटणाऱ्या एका गाडीनें ते विद्यार्थी कार्स्टन येथें चालले होते. ज्यो ब्राऊन आणि ती सुंदरी हेट्टी हॉकिन्स त्या गाडींत बसली होती. पिशाच्चाकडून चालविलें गेलेलें तें पन्नास टन वजनाचें इंजिन महावेगानें आपली गाडी ज्या रुळावर उभी आहे त्यावरूनच दौडत येत आहे याची त्या गाडींतील उतारूंना कोठून कल्पना असणार? कितीतरी शेतकरी आणि त्यांच्या बायका भाजीपाला व फळफळावळ घेऊन शहरच्या बाजाराला चालल्या होत्या. पाद्रयाच्या सहलीला जाणारी मंडळी गाडीच्या मागें खास जोडलेल्या डब्यांत होती. गाडी

सुटण्याच्या बतांत होती आणि गार्ड शिटी वाजवून बावटा दाखविण्याच्या बेतांत होता. इतक्यांत एका मिनिटाचीहि सूचना न मिळतां सकाळच्या प्रहरीं त्या स्टेशनवरील उत्साही वातावरणावर मृत्यूची धाड पडली! 'फायर क्वीन' त्या गाडीवर येऊन आदळली. बहुतेक सर्व डब्यांचीं दारें, खिडक्या, बाकें, तावदानें आंतील माणसांसह जोराच्या वाऱ्यानें जमिनीवर पाचोळा उडतो तद्वत् फेंकलीं गेलीं. गार्डाच्या डब्यासकट शेवटच्या तीन डब्यांच्या तर ठिकऱ्या उडाल्या. त्या इंजिनांतून फेंकल्या गेलेल्या जळत्या निखाऱ्यांनीं आग लागून कित्येक माणसें भाजून काढलीं. आश्चर्याची गोष्ट अशी कीं एवढ्या भयंकर अपघातांतून हेट्टी हॉकिन्स जवळ जवळ कांहींच दुखापती न होतां बाहेर पडली. ज्यो ब्राऊनचें चक्काचूर झालेलें शरीर त्या चक्काचुराच्या ढिगाखालून काढण्यांत आलें. अशा रीतीनें टॉम प्राईसनें मेल्यानंतरहि आपला सूड उगविला!

रेल्वेच्या चालकांनीं नंतर मग चौकशी समिती नेमली. एका अधिकाऱ्यानें तें इंजिन धांवत जात असतांना त्यावर ज्याच्या उजव्या बाजूचें डोकें फुटलें आहे असा रक्ताबंबाळ झालेला टॉम प्राईस तें इंजिन चालवीत असलेला आपण पाहिल्याची साक्ष दिली. परंतु तें खरें मानण्यास कुणीही तयार नव्हतें. इंजिन साफ करणाऱ्या कुणातरी पोरांनीं वाऱ्रटपणा केला असेल. आंतला Regulator उघडा राहिला असेल असा संशय घेऊन दोघां पोरांना कामावरून काढून टाकण्यांत आलें. तो भंगी व त्याच्याबरोबर असलेला टर्नर यांनींही शपथपूर्वक थडग्यांतून आलेल्या टॉमनेंच तो भयंकर अपघात घडवून आपला सूड उगविला असें सांगितलें. पण तें चौकशी समितीच्या एकाही सदस्याला खरें मानावेंसें वाटलें नाहीं.

मानसशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना वरील हकीकत विचार करण्यासारखी वाटेल. एक दुष्ट माणूस सूडबुद्धी मनांत ठेवून मेला आणि मेल्यानंतर त्याला जी सूड उगविण्याची पहिली संधी सांपडली त्या संधीचा त्यानें जिवंतपणीं जसा फायदा घेतला असता तसा फायदा घेतला. इंजिनाच्या आंतीलRegulator उघडा राहिला असेल हें चौकशी

समितीचेंही म्हणणें खरें असावें. ज्या वेळीं तीं पोरें इंजिनच्या यंत्रांची साफसफाई करावयास गेलीं त्यावेळीं अदृश्य रूपानें जवळपास राहून टॉम प्राईसनें त्या पोरांना भारून तो regulator उघडा टाकावयास लावला असला पाहिजे. त्यामुळें तात्कालिक जडत्व धारण करणाऱ्या टॉमचें काम थोडेसें सोपें झालें. (The Perfume of Egypt. पृष्ठें १०९ व १२८)

अशा रीतीनें परलोकीं गेल्यानंतरहि इहलोकाशीं बरेवाईट संबंध ठेवणारांचे विविध नमुने आपण पाहिले. जीवनप्रवाह अगाध–अथांग आहे. त्या प्रवाहांत वावरणाऱ्या अनंत जीवांच्या वृत्तींचें वैचित्र्य शब्दसृष्टीच्या मर्यादेंत आणतां येणार नाहीं. जेवढें संशोधन करावें, जेवढे अनुभव घ्यावे तेवढे थोडेच. मरण म्हणजे चिरनिद्रा. निद्रेंत माणसाला स्वप्नें पडतात तीं त्याच्या दिवसभराच्या बऱ्यावाईट व्यवहाराला धरून असतात. जो माणूस भेकड आहे तो स्वप्नांतहि भीत भीत जागा होतो. जो सदाचारी असतो तो स्वप्नांतहि सदाचारी असतो. झोपतेवेळीं शेवटचा विचार उदात्त असला म्हणजे दुःस्वप्नें पडत नाहींत, म्हणून हरिनामस्मरण करून कित्येक माणसें झोंपीं जातात. परंतु लंपट मनाला जबरदस्तीचें देवनाम उपयोगीं पडत नाहीं. तें मन नामस्मरण संपतांच परत आपल्या आवडीच्या विषयांत गुंगून जातें. झोंपतेवेळीं शेवटचा विचार जसा उदात्त असावा–तशी मरतेवेळींहि भावना उदात्त असावी. गीतेंत म्हटलें आहे —

यं यं वाऽपि स्मरन् भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भाव भावितः ॥

ज्या ज्या विषयाचें स्मरण करून मनुष्य शेवटीं कुडीचा त्याग करतो त्याप्रत तो जातो. परंतु तोंडांत गंगाजल घातलें आणि कानाशीं हरिनामाचा गजर केला तरी आयुष्यभर ज्या माणसानें जिभेचे चोचले पुरविले तो माणूस अंतकाळीं बटाटावडाच मागेल. कारण ज्या भावना जन्मभर उराशीं बाळगल्या त्या अंतकाळीं उफाळून येतात. म्हणूनच

सत्संगतींत आणि सदाचारानें ज्यानें जीवित व्यतीत केलें तो पार्थिव देह चिरनिद्रेंत टाकून परलोकीं गेला तरी त्याला भीतीचें कारण उरत नाहीं. तो विश्वाचा मित्र सुखाचा सांगाती होतो.





